१९२६
म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. नं. २६९०

# हिंदुस्थानची राज्यव्यवस्था

यशवंत दत्तात्रेय नवाथे
M. A.

REFBK-0003129

# अभिप्राय

( १ )

रा. रा. य. द. नवाथे यांनीं लिहिलेल्या "हिंदुस्तानची राज्यव्यवस्था" ह्या पुस्तकाची लेखी प्रत बरीचशी वाचून पाहिली. या विषयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस आवश्यक असे सर्व विषय या पुस्तकांत आले असून त्यांची मांडणी सुबोध व संगतवार केली आहे. कायदेमंडळ, स्थानिकसंस्था या विषयांवरील प्रकरणें वाचून विद्यार्थ्यांप्रमाणेंच प्रौढ वाचकांनाहि उपयुक्त माहिती या पुस्तकांतून मिळण्यासारखी आहे. एकंदरींत हें पुस्तक फार उपयुक्त झालें आहे.

व्ही. एन्. कुंभारे,

२०-५-२५ सुपरिंटेंडेंट् न्यू इंग्लिश स्कूल, सातारा.

( २ )

माझे सहाध्यायी स्नेही रा. नवाथे यांची "हिंदुस्थानची राज्यव्यवस्था" समग्र वाचून पाहिली. राज्यव्यवस्थेसंबंधीं पुस्तक लिहिणें एक प्रकारें बरें बिकट आहे. एकतर, राज्यकर्त्यांची व्यवस्था जाणूं इच्छिणारा वाचकवर्ग फार विस्तृत व वयोमान, शिक्षण, भावना वगैरे प्रकृतिभेदामुळें फार भिन्न असा असल्यामुळें सर्वांनाच एकसमयावच्छेदेंकरून र आवश्यक वाटेल एवढाच मजकूर गोंवणें अशक्यप्राय होय. रा यांनीं प्रथमपासूनच शाळेंतील वरचे वर्गांतील विद्यार्थी असें . पण निश्चित आपलें क्षेत्र संकल्पिल्यामुळें विवेचनांत सर्वत्र एकः आढळून येते. तसेंच, राज्यव्यवस्था म्हटली म्हणजे तींत प्रजेच्या कार्यक्ष मतेनुरूप सारखे फेरबदल होत रहावयाचेच. ह्या सर्वांचा इतिहास, त्या कारणीभूत झालेली विविध कारणपरंपरा व मुख्यत: प्रजेच्या हक्कां होणारी स्थित्यन्तरें ह्या सर्वांचा अवश्यमेव उल्लेख केला पाहिजे. तो

# हिंदुस्थानची
# राज्यव्यवस्था.

REFBK-0003129

# हिंदुस्थानची राज्यव्यवस्था

नं. ११८

लेखक

यशवंत दत्तात्रेय नवाथे, एम. ए.

हेडमास्तर, हायस्कूल—अहमदनगर शहर.

आवृत्ति दुसरी

१ आगस्ट, १९२१.

( या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क लेखकानें आपलेकडे ठेविले आहेत. )

किंमत १२ आणे.

मुद्रकः—अच्युत चिंतामण भट,
यशवंत प्रेस, शनवार पेठ, पुणें शहर.
प्रकाशक—यशवंत दत्तात्रेय नवाथे, एम्. ए.
गुजरगल्ली, अहमदनगर.

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

मुंबई विश्वविद्यालयानें दुय्यम शाळांमध्यें इतिहास हा विषय मातृभाषेंतून शिकविण्याची व परीक्षेंत उत्तरेंही मातृभाषेंतून देण्याची परवानगी नुकतीच दिली आहे व त्याप्रमाणें महाराष्ट्रामधील बऱ्याच शाळांमधून हा विषय मराठींतून शिकविण्यास सुरवातही झाली आहे. हिंदुस्थानच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमांत "हिंदुस्थानची सांप्रतची राज्यव्यवस्था" या विषयाचा अंतर्भाव होतो. आजपर्यंत हा विषय इंग्रजीमध्यें शिकविला जात असल्यामुळें इंग्रजीमध्यें विद्यार्थ्यांच्याकरितां लिहिलेलीं आठ दहा पुस्तकें झालीं; परंतु मराठीमध्यें विद्यार्थ्यांना उपयुक्त असें एकही पुस्तक नसल्यामुळें ती अडचण दूर करण्याच्या हेतूनें हें पुस्तक लिहिलें आहे.

या विषयावर मराठींत अलीकडे पांच सात पुस्तकें झालीं आहेत व दोन तीन जुनींही आहेत. परंतु यांतील बरीचशीं प्रौढ वाचकांकरितांच लिहिलेलीं असल्यामुळें त्यामध्यें तात्त्विक व टीकात्मक भाग आले आहेत. दोनतीन विद्यार्थ्यांकरितां आहेत; परंतु तीं मध्यप्रांत व वऱ्हाड येथील शाळांकरितां लिहिलेलीं असल्यामुळें त्यांचा इकडील वस्तुस्थिति समजावून देण्याच्या कामीं फारसा उपयोग होत नाहीं.

या पुस्तकामध्यें सांप्रतच्या राज्यपद्धतीची कल्पना स्थूलमानानें दिली असून वस्तुस्थितिव्यतिरिक्त इतर भागांची, विद्यार्थ्यांना व या विषयाच्या मूलतत्त्वांची माहिती करून घेणाऱ्या इसमांना जरूर नसल्यामुळें ते मुळींच गाळून टाकले आहेत.

कंपनी सरकारच्या व्यवस्थेंतून हल्लींच्या राज्यपद्धतीचा विकास कसकसा होत गेला हें स्पष्ट करण्याकरितां प्रथम ऐतिहासिक उपोद्घात जोडला आहे व प्रत्येक प्रकरणामध्येंही जरूर तेवढी ऐतिहासिक माहिती दिली आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेकरितां जरूर असलेल्या भागांशिवाय, विषयाची पूर्तता व्हावी म्हणून शिक्षण, आरोग्य, वैद्यक, सार्वजनिक बांधकाम व उद्योगधंदे यासंबंधीं माहिती दिली आहे.

शेवटीं सहा परिशिष्टें जोडलीं असून त्यांमध्यें अंदाजपत्रकें, मत देण्या-संबंधीं माहिती इत्यादि उपयुक्त भाग दिले आहेत. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटीं सारांश दिला असून प्रश्नही जोडले आहेत. S. L. C. परीक्षेंतील प्रश्न परिशिष्टांत दिले आहेत.

शक्य तों मराठी शब्द वापरले आहेत. परंतु जे इंग्रजी शब्द रूढ व लोकांच्या जास्त परिचयाचे झाले आहेत ते तसेच ठेवले आहेत. उदा-हरणार्थ ' बिल ' हा शब्द तसाच वापरला आहे. अधिकाऱ्यांचीं नांवें जशींच्या तशींच इंग्रजींत दिलीं आहेत. शेवटीं, पुस्तकांत वापरलेले मुख्य शब्द एके ठिकाणीं दिले आहेत.

हें पुस्तक लिहिण्याच्या कामीं मुख्यतः प्रो. काळे, सप्रे, अंडरसन यांचीं या विषयावरील पुस्तकें, गॅझीटियर भाग ४, इंडियन इयरबुक १९२४ व १९२५, हिंदुस्थान व मुंबई सरकार यांचे गेल्या दोन सालचे अहवाल, १९१९ चा कायदा, केसरी व भारतसेवक यांच्या फायली इत्यादि पुस्तकांचा पुष्कळ उपयोग झाला आहे. यांशिवाय येथील व इंग्लंडमधील विद्यार्थ्यांकरितां या विषयासंबंधीं लिहिलेल्या पुस्तकांचा विषयाची मांडणी करण्यामध्यें बराच उपयोग झाला आहे. वरील सर्व ग्रंथकर्त्यांचा मी फार ऋणी आहें.

या पुस्तकाची हस्तलिखित प्रत प्रो. ना. ग. नारळकर, असिस्टंट सुपरिंटेंडेंट नूतन मराठी विद्यालय, यांनीं काळजीपूर्वक वाचून पाहिली व अनेक सूचना केल्या, त्यांबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणें प्रो. श. रा. कानिटकर, सुपरिंटेंडेंट न्यू इंग्लिश स्कूल पुणें; व प्रो. वि. ना. कुंभारे, सुपरिंटेंडेंट न्यू इंग्लिश स्कूल सातारा, यांनींही या पुस्तकांतील बरेच मुख्य मुख्य भाग वाचून सूचना केल्या त्याबद्दल त्यांचेही आभार मानणें जरूर आहे.

या पुस्तकामध्यें कांहीं दोष अढळल्यास व कांहीं फरक करणें जरूर वाटत असल्यास ते माझ्या नजरेस आणून देण्याबद्दल शिक्षकबंधूंस सवि-नय विनंति आहे.

पुणें,
१८।५।१९२५

य. द. नवाथे

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

पहिली आवृत्ति निघाल्यापासून एक वर्षांतच दुसरी काढण्याचा योग आला. गेल्या सालीं हें पुस्तक बहुतेक इंग्रजी शाळांमध्यें ६ व ७ इयत्तांकरितां नेमलें गेलें व सामान्य वाचकांकडूनही त्याला बराच आश्रय मिळाला. शिक्षक, मासिकें व वृत्तपत्रें यांच्याकडून आलेल्या अभिप्रायांवरून त्याचा चांगुलपणा व उपयुक्तता याविषयीं एकवाक्यता दिसून आली. यावरून हें पुस्तक बहुतेक सर्वांसच आवडलें असें म्हणणें वावगें होणार नाहीं.

मुंबई शाळाखात्यानें हें क्रमिक पुस्तक म्हणून मंजूर केलें असून सरकारी ट्रेनिंग कालेजामध्यें दुसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमांतही त्याचा समावेश झाला आहे. त्याचप्रमाणें बडोदें आणि मध्यप्रांत व वऱ्हाड येथील शाळाखात्यांकडूनही त्याला मान्यता मिळाली आहे.

बरेचसे मित्र व शिक्षकमंडळी यांजकडून फेरफार सुचविण्यांत आले, त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहें. विनंति एवढीच कीं, सदर पुस्तक केवळ विद्यार्थी व सामान्य वाचक यांच्याकरितांच लिहिलें असल्यामुळें यांत विषयाची फक्त सामान्य रूपरेषा दिली आहे. सर्व सूचनांचा अंगीकार केल्यास मूळ हेतु बाजूस राहून पुस्तकाचा आकार सध्यांच्या दुप्पट होईल. या सूचनांवरून एवढें मात्र सिद्ध होतें कीं, या विषयाचें सांगोपांग विवेचन करणाऱ्या पुस्तकाची मराठीमध्यें अत्यंत जरूर आहे.

पुस्तकाच्या मूळ हेतूला पोषक अशा बहुतेक सूचनांचा योग्य परामर्श घेतला आहे. या आवृत्तींत मुख्य फरक केले ते असेः—

( १ ) राणीचा जाहीरनामा ही पहिली महत्वाची सनद, सबब तिचा गोषवारा दिला आहे.

( २ ) मुंबई व मध्यप्रांत यांचा निकट संबंध असल्यामुळें, व बृहन्महाराष्ट्राची माहिती विद्यार्थ्यांना असणें जरूर असल्यामुळें मुंबईप्रमाणेंच

मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतांतील कायदेमंडळ, अंदाजपत्रक वगैरेसंबंधीं माहिती दिली आहे.

( ३ ) जून १९२६ अखेर राज्यकारभारामध्यें झालेल्या सर्व फेरफारांचा उल्लेख केला आहे.

( ४ ) याशिवाय रेग्युलेशन व नॉनरेग्युलेशन प्रांत, इलबर्ट बिल, हिंदी आरमाराची पुनर्घटना, बालवीर, महारोग, शेतकी-कमिशन वगैरे जास्त मजकूर घातला आहे.

( ५ ) परिशिष्ट अ मध्यें अध्यक्ष व वरिष्ठसभेचे सभासद यांची यादी दिली आहे. परिशिष्ट ऊ मध्यें मॅट्रिक परीक्षेंत आजतागायत आलेले सर्व प्रश्न देऊन त्यांचीं उत्तरें सहज सांपडावीं म्हणून पृष्ठांक दिले आहेत. परिशिष्ट ऋ मध्यें एतद्देशीय उद्योगधंदे व त्यांवर उपजीविका करणाऱ्यांसंबंधीं आंकडे दिले आहेत.

( ६ ) शक्य तों पहिल्या आवृत्तींतील दोष काढण्याचा प्रयत्न केला आहे.

हिंदुस्थान व मुंबई सरकार यांचे ताजे अहवाल व टाइम्सचें नवें इयर बुक या पुस्तकांची ही आवृत्ति काढतांना पुष्कळ उपयोग झाला आहे. विद्यार्थ्यांच्या करितां या विषयावर लिहिलेल्या पुस्तकांपैकीं श्री. पप्पू यांच्या पुस्तकाची मांडणी फार आवडली. हें पुस्तक लिहितांना तिचेंच अनुकरण केलें आहे. याबद्दल श्री. पप्पू व वरील ग्रंथकार यांचा अत्यंत आभारी आहें.

पुस्तकामध्यें कांहीं दोष आढळल्यास व कांहीं फरक करणें जरूर वाटत असल्यास ते माझ्या नजरेस आणून देण्याबद्दल शिक्षक बंधूंस सविनय विनंती आहे.

अहमदनगर, २५।७।१९२६ ]

य. द. नवाथे.

# अनुक्रमणिका

## भाग पहिला

### ऐतिहासिक उपोद्घात


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| जबाबदार राज्यपद्धतीचा उगम ... ... | आरंभीं |
| १. इंग्रजांचें आगमन व उत्कर्ष. ... ... | १ |
| २. कंपनीच्या कारभारांमधील स्थित्यंतरें. ... | २ |
| ३. कायदेमंडळांची वाढ. ... ... ... | ५ |
| ४. जबाबदार राज्यपद्धतीचा उपक्रम. ... ... | १० |


## भाग दुसरा

### ब्रिटिश साम्राज्यांतील शासनपद्धति


| | |
|---|---|
| १. विलायत सरकार, वसाहती व इतर राष्ट्रें. ... | १५ |
| २. विलायत सरकार व हिंदुस्थान. ... ... | २० |


## भाग तिसरा

### भारतमंत्री आणि वरिष्ठ व प्रांतिक सरकार


| | |
|---|---|
| १. भारतमंत्री. ... ... ... | २४ |
| २. वरिष्ठ सरकार. ... ... ... | ३३ |
| ३. प्रांतिक सरकार. ... ... ... | ४१ |
| ४. प्रांतांचे विभाग व जिल्हे यांची राज्यव्यवस्था. ... | ५० |
| ५. वरिष्ठ कायदेमंडळ. ... ... ... | ५६ |
| ६. प्रांतिक कायदेमंडळ. ... ... ... | ६५ |
| ७. राष्ट्राची जमा व खर्च. ... ... ... | ७१ |
| ८. न्याय. ... ... ... | ८२ |
| ९. पोलीस व तुरुंग. ... ... ... | ९० |
| १०. लष्कर व आरमार. ... ... ... | ९५ |

## भाग चवथा

### राष्ट्रसंवर्धन


| | | | | |
|---|---|---|---|---|
| *१. शिक्षण. | ... | ... | ... | १०३ |
| २. स्थानिक स्वराज्य. | ... | ... | ... | १११ |
| *३. आरोग्य व वैद्यक. | ... | ... | ... | ११९ |
| *४. सार्वजनिक बांधकाम. | ... | ... | ... | १२३ |
| *५. उद्योगधंदे व दुष्काळ. | ... | ... | ... | १२५ |


## भाग पांचवा


| | |
|---|---|
| १ संस्थानें. | १३० |


### परिशिष्टें


| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. अधिकाऱ्यांचीं नांवें. | ... | ... | ... | १३६ |
| आ. अधिकाऱ्यांचे पगार. | ... | ... | ... | १३७ |
| इ. हिंदुस्थान सरकारचें अंदाजपत्रक. | | ... | ... | १३८ |
| ई. मुंबई सरकारचा जमाखर्चाचा तक्ता. | | ... | ... | १४० |
| उ. मतदानासंबंधीं माहिती. | | ... | ... | १४१ |
| ऊ. परीक्षेंतील प्रश्न. | ... | ... | ... | १४३ |
| ऋ. हिंदुस्थानांतील कारखाने | | ... | ... | १४५ |
| पारिभाषिक शब्द. | ... | ... | ... | १४६ |


( * अशी खूण केलेलीं प्रकरणें परीक्षेकरितां नाहींत. )

## जबाबदार राज्यपद्धतीचा उगम.

तारीख २० आगष्ट १९१७ रोजीं पार्लमेंट सभेंत भारतमंत्री मॉंटेग्यु यांनीं खालील धोरण जाहीर केलें.

" हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या प्रत्येक शाखेंत हिंदी लोकांना अधिकाधिक भाग देणें, आणि ब्रिटिश-साम्राज्याचा घटक ह्या नात्यानें हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति अधिकाधिक प्रमाणानें स्थापन करण्याच्या हेतूनें स्वराज्यसंस्थांचा आस्ते आस्ते विकास करणें, हें ब्रिटिश सरकारचें धोरण असून तें हिंदुस्थान सरकारासही पूर्णपणें मान्य आहे. या धोरणाला अनुसरून महत्त्वाच्या सुधारणा शक्य तितक्या लौकर अंमलांत आणण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे. त्या सुधारणा कोणत्या हें ठरविण्यापूर्वीं हिंदुस्थानांतील व विलायतेंतील अधिकाऱ्यांनीं औपचारिक पद्धतीचा अवलंब न करितां विचारविनियम करावा हें अत्यंत महत्त्वाचें आहे, असेंहि त्यांनीं ठरविलें आहे. यास्तव मीं हिंदुस्थानांत जावें, आणि व्हाइसरॉयांबरोबर या गोष्टींचा खल करावा, तसेंच व्हाइसरॉयांबरोबर प्रांतिक सरकारांच्या मतांचा विचार करावा, आणि प्रातिनिधिक

संस्था आणि व्यक्ति यांच्या सूचना काय आहेत त्या ऐकून घ्याव्या, अशी व्हाइसरॉयांनीं केलेली सूचना मीं स्वीकारावी असें ब्रिटिश सरकारनें राजेसाहेबांच्या संमतीनें ठरविलें आहे. मला आणखी एक गोष्ट सांगणें जरूर वाटतें, ती ही कीं, या धोरणाला अनुसरून जी प्रगति करावयाची ती पायरीपायरीनेंच घडून येणारी आहे. हिंदी लोकांच्या कल्याणाची जबाबदारी ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थान सरकार यांचेवर आहे. सबब, या धोरणाला अनुसरून जी सुधारणा करावयाची ती किती व केव्हां करावयाची याचा निर्णय त्यांनींच केला पाहिजे; आणि तो निर्णय करितांना, या धोरणाला अनुसरून ज्यांना देशसेवेची नवीन संधी मिळेल ते सरकारबरोबर कितपत सहकारिता करितील आणि त्यांच्या अंगच्या जबाबदारीच्या जाणीवेवर विश्वास कितपत ठेवतां येईल, या दोन गोष्टींचा विचार करावा लागेल. सरकारतर्फे सुधारणांची जी योजना तयार करण्यांत येईल तिची हिंदी लोकांना चर्चा करण्याला भरपूर संधि देण्यांत येईल, आणि नंतर ती पार्लमेंटच्या संमतीकरितां तिजपुढें मांडण्यांत येईल."

—भारतसेवक

# हिंदुस्थानची राज्यव्यवस्था

## भाग पहिला

## ऐतिहासिक उपोद्घात

### १. इंग्रजांचें हिंदुस्थानांत आगमन व उत्कर्ष

१. पोर्तुगीज व डच:—प्रसिद्ध पोर्तुगीज खलाशी वास्को-डि-गामा यानें हिंदुस्थानचा मार्ग शोधून काढल्यापासून (१४९८) युरोप व हिंदुस्थान यांमधील व्यापार वाढत्या प्रमाणांत सुरू झाला. सोळावें शतकभर सर्व व्यापार पोर्तुगीज लोकांच्या हातीं होता. सतराव्या शतकाच्या आरंभीं हॉलंड, इंग्लंड व फ्रान्स ह्या देशांतील व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याच्या उद्देशानें व्यापारी कंपन्या काढल्या व त्यांच्यामध्यें चढाओढ सुरू झाली. या झटापटींत डच लोकांनीं पोर्तुगीजांचा पाडाव केला. पुढें इंग्रज व डच या दोन राष्ट्रांमध्यें चुरस उत्पन्न होऊन अठराव्या शतकाच्या शेवटीं डच लोकांना हिंदुस्थान सोडावें लागलें.

२. इंग्रज व फ्रेंच:—पोर्तुगीज व डच यांच्या व्यापारास उतरती कळा लागल्यावर इंग्रज व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर वसाहती स्थापण्याचें धोरण पतकरलें व लवकरच मुंबई व कलकत्ता हीं गांवें त्यांच्या ताब्यांत आलीं. अशा प्रकारें इंग्रज व्यापाऱ्यांची भरभराट होत असतां फ्रेंच व्यापाऱ्यांनीं आपला व्यापार जोरानें चालू ठेवून बरींच ठिकाणें व मुलूख हस्तगत केला होता. थोडक्याच दिवसांत या दोन राष्ट्रांमध्यें उघड वैमनस्य सुरू झालें व डुप्लेनें तर इंग्रजांना हिंदुस्थानांतून हाकलून देऊन फ्रेंच सत्ता स्थापन करण्याची महत्त्वाकांक्षा धरली.

हैद्राबाद व अर्काट येथील कारस्थानामुळें त्याला पूर्ण यश येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. फ्रेंचांनीं अशा प्रकारें इंग्रजांचा पाडाव करण्याकरितां चालविलेला यत्न मुकाट्यानें पाहणें इंग्रजांस असह्य झालें व त्यांनींही दक्षिणेंतील कारस्थानाचा फायदा घेण्याचें ठरविलें. क्लाइव्हनें अर्काटच्या वेढ्यामध्यें फ्रेंचांचा पूर्ण पाडाव केल्यामुळें त्यांच्या सत्तेस उतरती कळा लागली व इंग्रजांचें वर्चस्व वाढूं लागलें. लवकरच फ्रेंचांचा पूर्ण मोड झाला व येथील सर्व व्यापार इंग्रजांच्या ताब्यांत आला. पुढें ( १७५७ ) प्लासीच्या लढाईत मिळालेल्या जयामुळें इंग्रजी साम्राज्याचा पाया घातला गेला.

---

## २. कंपनीच्या कारभारांतील स्थित्यंतरें

१. स्थापना व कारभार:—लंडन मधील कांहीं व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याच्या उद्देशानें भांडवल उभारलें व त्यांना इलिझाबेथ राणीनें पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याची सनद दिली ( १६०० ) आरंभीं कंपनीचा सर्व कारभार एक गव्हर्नर व त्याचें सल्लागार मंडळ यांच्या तंत्रानें चाले. पुढें मालक-मंडळ ( Court of Proprietors ) व व्यवस्थापक मंडल ( Court of Directors ) अशीं दोन मंडळें स्थापून त्यांच्याकडे सर्व कारभार सोंपविण्यांत आला. निदान ५०० पौंड देऊन भागीदार होणारे मालक असत; व ज्यांचें भांडवल २००० पौंड असेल त्यांना व्यवस्थापक होण्याची लायकी असे. मालकांची संख्या पुष्कळ असल्यामुळें ते चोवीस व्यवस्थापक निवडून देत व हें मंडळ कंपनीचा बहुतेक कारभार पाही. मद्रास, मुंबई व कलकत्ता येथें त्या टापूंतील वखारींची सर्व व्यवस्था पाहण्याकरितां प्रत्येक ठिकाणीं एक अध्यक्ष व त्याच्या मदतीस एक सल्लागारमंडळ असे. या अध्यक्षाच्या म्हणजे 'प्रेसिडेन्ट' च्या ताब्यांतील मुलखास 'प्रेसिडेन्सी' म्हणजे इलाखा म्हणण्याचा प्रघात पडला. हे इलाखे स्वतंत्र असून त्यांच्यावर फक्त व्यवस्थापकांची हुकमत चाले.

२. पार्लमेंटचा शिरकाव:--पहिलीं दीडशें वर्षें ( १६०० ते १७५० ) कंपनीचें धोरण फक्त व्यापार करण्याचें होतें. सबब अध्यक्ष व त्यांचें मंडळ यांना काम करणें फारसें कठीण जात नसे. प्लासी ( १७५७ ) व बक्सारच्या ( १७६४ ) लढायानंतर कंपनीनें जवळ जवळ व्यापारी पेशा टाकून एतद्देशीय राजकारणांत पाऊल टाकल्यामुळें कामाचा व्याप वाढला, व व्यापाराकडे दुर्लक्ष होऊं लागल्यामुळें आणि युद्धाकरितां पुष्कळ खर्च झाल्यामुळें नफा बिलकूल उरेना; त्यामुळें हें मंडळ डबघाईस येतें कीं काय, अशी भागीदारांस भीति वाटूं लागली. कंपनीची अशी हलाखीची स्थिति असतांही कंपनीचे थोडक्या पगारावर असलेले नोकर मात्र खासगी व्यापार करून चांगले गबर होऊन विलायतेस परत जात. यामुळें व वारन हेस्टिंग्जच्या वागण्याच्या पद्धतीमुळें कंपनीच्या कारभारावर टीकांचा भडिमार सुरू झाला आणि पार्लमेंटनें या सर्व गोष्टींची चौकशी करावी असें विलायतेंत लोकमत बनलें. इतक्यांत कंपनीनें पार्लमेंटकडे पैशाची मदत मिळावी ह्मणून अर्ज केला. तेव्हां पार्लमेंटनें या संधीचा फायदा घेऊन कंपनीच्या कारभारांत आपला हात शिरकावून घेतला.

३. रेग्युलेटिंग कायदा (The Regulating Act.)--कंपनीचा कारभार सुव्यवस्थित चालण्याकरितां पार्लमेंटनें हा कायदा केला ( १७७३). या कायद्यामुळें बंगालचा गव्हर्नर हा बंगालचा गव्हर्नर जनरल झाला. त्याची हुकमत मद्रास व मुंबई इलाख्यांवर चालू लागली. त्याच्या मदतीला एक सल्लागारमंडळ नेमलें आणि कलकत्त्यास एक वरिष्ठ न्यायकचेरी स्थापली. या नवीन फरकामुळें कंपनीचा कारभार विलायत सरकार व कंपनी यांच्यामध्यें विभागला जाऊन कंपनीच्या कारभारावर पार्लमेंटचा ताबा प्रस्थापित झाला. पार्लमेंटला मिळालेल्या या नवीन अधिकाराबद्दल कंपनीला बरेंच कर्ज देण्यांत आलें.

या कायद्यानें गव्हर्नर जनरलवर सर्व जबाबदारी टाकली गेली खरी, परंतु त्याला जरूर ते अधिकार नसल्यामुळें वॉरन हेस्टिंग्ज व त्याचें मंडळ यांचें जमेना व त्यामुळें कारभार सुरळीत चालणं अशक्य झालें.

४. पिटचें बिल ( १७८४ ):—हे दोष दूर करण्याकरितां इंग्लंडचा

मुख्य प्रधान पिट यानें एक बिल तयार केलें, त्यामुळें सहा सभासदांचें **एक नियामक मंडळ** ( Board of Control ) स्थापन करून हिंदुस्थानांतील सर्व राजकीय काम त्याजकडे सोंपविण्यांत आलें. या मंडळाचा अध्यक्ष पार्लमेंटला जबाबदार असे. व्यवस्थापकमंडळाकडे फक्त व्यापारी काम राहिल्यामुळें त्याचें कार्यक्षेत्र बरेंच संकुचित झालें. अशा प्रकारें कंपनी व पार्लमेंट यांचा दुहेरी कारभार सुरू झाला. तो १८५८ पर्यंत तसाच चालू होता.

**५. मध्यंतरींच्या सनदांचे कायदे:**—प्रत्येक वीस वर्षांनीं नवीन सनद देण्याच्या वेळीं या व्यवस्थेमध्यें परिस्थित्यनुरूप थोडे फार फरक करण्यांत येत असल्यामुळे कंपनीची सत्ता थोडथोडी संपुष्टांत येऊं लागली व नियामकमंडळामध्यें मंत्रिमंडळांतील लोकांचा हळू हळू समावेश करण्यांत येऊन बहुतेक अधिकार अध्यक्षास प्राप्त झाले.

१८१३ मध्यें सर्व व्यापारी हक्क काढून घेऊन कंपनीकडे फक्त चहाचा व्यापार व चीनशीं व्यापार करण्याचे हक्क राहिले. तेही १८३३ मध्यें काढून घेऊन कंपनीचा सर्व व्यापार बंद करण्यांत आला. अशा तऱ्हेनें हिंदुस्थानचा व्यापार सर्वांस खुला झाला. २३० वर्षें व्यापार केल्यानंतर आतां कंपनी फक्त राजकीय व्यवस्था पाहाणारी संस्था बनली. बंगालचा गव्हर्नर जनरल हा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल झाला आणि त्यास सर्व दिवाणी, मुलकी व लष्करी अधिकार देण्यांत आले. १८५४ मध्यें बंगालवर स्वतंत्र लेफ्टेनन्ट गव्हर्नर नेमण्यांत आला, व गव्हर्नर जनरलकडे सर्व हिंदुस्थानची सामान्य व्यवस्था पाहण्याचें काम राहिलें.

१८५३ सालीं नेहमींप्रमाणें वीस वर्षें मुदतीची सनद न देतां ती वाटेल तेव्हां रद्द करण्याचें पार्लमेंटनें आपल्या स्वाधीन ठेवलें. या नवीन धोरणामुळें कंपनीची सद्दी संपत आल्याचीं चिन्हें दिसू लागलीं.

**६. सारांश:**—एकंदरींत १७९३ ते १८५३ च्या दरम्यान जे फरक झाले, त्यांयोगें पार्लमेंटची सत्ता हिंदुस्थानच्या कारभारामध्यें हळू हळू वाढू लागली. गव्हर्नर जनरलला जास्त जास्त अधिकार मिळून तो स्वतंत्र झाला व व्यवस्थापकांचे हक्क कमी होत चालले. याचा वास्तविक परि-

णाम असा झाला कीं, १८५४ मध्यें कंपनी जवळजवळ नामशेष झाली. १८५८ मध्यें तर सर्व सत्ता पार्लमेंटच्या हातीं गेली व हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंतील नवीन युगास प्रारंभ झाला. प्लासीच्या लढाईपासून तों १८५७ च्या बंडापर्यंत कंपनी मुख्यतः मुलूख जिंकण्यांतच गुंतून गेल्यामुळें अंतर्व्यवस्थेचा व इतर गोष्टींचा विचार करण्यासच फारशी सवड नव्हती. १८५८ मध्यें शांततेच्या युगास सुरवात झाली आणि त्यामुळें हिंदुस्थान व इंग्लंड यांचे परस्पर संबंध काय असावेत वगैरे गोष्टींचा विचार करण्यास सवड मिळाली.

---

## ३. कायदे-मंडळांची वाढ (१८५८–१९१७)

१. १८५८ चा कायदाः—बंडानंतर कंपनीची सर्व सत्ता पार्लमेंटच्या ताब्यांत गेली, व दुहेरी राज्यपद्धतीचा शेवट झाला. आतां नियामक-मंडळ व व्यवस्थापकमंडळ यांचे ऐवजीं **भारतमंत्री** (Secretary of State) व त्याचें सल्लागारमंडळ अस्तित्वांत आलें. या वेळेपासून गव्हर्नर जनरलास "व्हाइसराय" म्हणजे राजाचा प्रतिनिधि असें म्हणण्याचा प्रघात पडला.

२. राणीचा जाहीरनामाः—१८५८ चा कायदा पास झाल्याबरोबर राणी सरकारनें हिंदुस्थानांतील सर्व संस्थानिक व प्रजा यांना उद्देशून जो जाहीरनामा काढला, त्याचा मुख्य हेतु लोकांचें समाधान करून देशांत शांतता प्रस्थापित करण्याचा होता. लोकांचें जेणेंकरून हित होईल असें राज्यकारभाराचें धोरण आंखलें जाईल असें या जाहीरनाम्यानें अभिवचन दिलें आहे. हा जाहीरनामा हिंदी लोकांना मिळालेली पहिली महत्वाची सनद आहे, म्हणून त्यांतील मुख्य कलमांचा गोषवारा पुढें दिला आहे.

"यापुढें हिंदुस्थानचा राज्यकारभार आम्हीं पार्लमेंटच्या संमतीनें चालविणार असल्यामुळें असें जाहीर करण्यांत येतें कीं, सर्व प्रजेनें आमच्याशीं व आमच्या गादीवर जे जे येतील त्यांच्याशीं इमानेंइतबारें वागावें व आम्ही नेमू त्या अधिकाऱ्यांचे हुकूम पाळावे.

हिंदी संस्थानिकांशीं कंपनीनें केलेले सर्व तह व करार आह्मांस सर्वस्वी मान्य आहेत. व ते दोहोंपक्षीं पाळले जावे अशी आमची इच्छा आहे.

राज्याचा विस्तार वाढविण्याची आमची मुळींच इच्छा नाहीं. परंतु आमच्या अगर संस्थानिकांच्या मुलखास कोणीं त्रास दिल्यास त्याचें योग्य पारिपत्य केलें जाईल. राजेरजवाड्यांचे हक्क, दर्जा व मानमरातब पाळण्याची आम्हीं खबरदारी घेऊं. देशांत शांतता व सुव्यवस्था होऊन प्रजेची भरभराट व्हावी हीच आमची उत्कट इच्छा आहे.

साम्राज्यांतील, इतर देशांतील व हिंदुस्थानांतील प्रजाजन यांमध्यें कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाहीं.

आम्ही जरी क्रिस्ताभिमानी आहों, तरी आमचा धर्म कोणावरही लादण्याची आमची इच्छा नाहीं; अगर तसें करण्याचा आम्हांस अधिकारही नाहीं. धर्मसंबंधीं आम्हीं तटस्थ आहों. सबब आमची व आमच्या अधिकारी वर्गाची वृत्ति निःपक्षपातीपणाचीच राहील.

आमची अशी इच्छा आहे कीं, जात व धर्म लक्षांत न घेतां केवळ काम करण्यास लागणारी विद्वत्ता. बुद्धिमत्ता व सचोटी पाहून निःपक्षपातानें सरकारी नोकऱ्या दिल्या जाव्या.

जमीनदार व शेतकरी यांच्या वंशपरंपरागत हक्कांस कोणत्याही प्रकारचा धोका येणार नाहीं. मात्र त्यांनीं योग्य त सरकारदेणें दिलें पाहिजे.

ईशकृपेनें देशांत शांतता प्रस्थापित झाल्यावर देशी उद्योगधंदे व सार्वजनिक कल्याणाचीं कामें यांना उत्तेजन देऊन येथील प्रजेचें जिणें करून कल्याण साधेल अशी राज्यव्यवस्था असावी, अशी आमची उत्कट इच्छा आहे. आमच्या प्रजेची भरभराट हेंच आमचें सामर्थ्य, त्यांचा संतोष हेंच आमचें चिरस्थायित्व, व त्यांची कृतज्ञता हेंच आमचें बक्षीस. ”

३. **मुख्य कायदे:**—१९१७ पर्यंत हिंदुस्थानासंबंधीं महत्वाचे असे पार्लमेंटचे कायदे फार थोडे झाले. त्यांत १८६१, १८९२, १९०९ चे कायदे मुख्य आहेत. या सर्व कायद्यांचा रोख कायदेमंडळें विस्तृत करून त्याचें कार्यक्षेत्र वाढविणें व लोकांना राज्यकारभारामध्यें जास्त

भाग घेऊं देणें हाच होता. या कायद्यांची माहिती म्हणजेच या कालां- तील राज्यव्यवस्थेचा व कायदेमंडळाच्या विकासाचा इतिहास होय. हल्लींच्या कारभाराची स्पष्ट कल्पना येण्याकरितां याची थोडीशी तरी माहिती असणें जरूर आहे.

४. १८३३ व १८५३ चे कायदेः—१८३३ पूर्वीं मद्रास, मुंबई व कलकत्ता येथें स्वतंत्रपणे कायदे करण्यांत येत व त्यांची अंमलबजावणी- ही स्वतंत्रपणें होई. त्यामुळें निरनिराळ्या ठिकाणच्या कायद्यांत परस्पर विसगतपणा असे. १८३३ मध्यें मद्रास व मुंबईचे कायदे करण्याचे हक्क काढून घेण्यांत येऊन या तिन्हीही इलाख्यांना लागू पडणारे कायदे कर- ण्याचा अधिकार हिंदुस्थानसरकारला देण्यांत आला, आणि कायदे- पंडित म्हणून मेकॉलेसाहेबांची कायदेमंडळांत जादा सभासद म्हणून नेमणूक झाली. या मंडळामधील सर्व सभासद बंगालकडील असल्यामुळें त्यांना मद्रास व मुंबईकडील परिस्थितीचें प्रत्यक्ष ज्ञान नसे; त्यामुळें तेथील स्थानिक बाबींची हेळसांड होई. हा दोष नाहींसा व्हावा म्हणून १८५३ मध्यें कायदेपंडिताला इतर मंत्र्यांइतके हक्क दिले, व कायदे कर- ण्याकरितां सहा जादा सभासदांची नेमणूक केली. यांत प्रत्येक प्रांतातर्फे एक एक प्रतिनिधि घेण्यांत आला. तरीही स्थानिक अडचणींचा योग्य विचार होईना.

५. १८६१ चा कायदाः—१८६१ मध्यें नवीन कायद्यान्वयें मुंबई व मद्रास प्रांतांना पूर्वीप्रमाणें कायदे करण्याचा अधिकार दिला व इतर प्रांतांमध्यें कायदेमंडळें स्थापण्याची परवानगी मिळाली. या मंडळांमध्यें एक तृतीयांश सभासद बिनसरकारी घेण्यांत येऊं लागले. याप्रमाणें पंजाब, बंगाल, संयुक्तप्रांत वगैरे ठिकाणीं मंडळें स्थापन झालीं. त्याच- प्रमाणें कायदे करण्याच्या कामीं मदत म्हणून गव्हर्नरजनरलनें सहा तें बारापर्यंत जरूरीप्रमाणें सभासद नेमावे व यांतील निदान निम्मे बिन- सरकारी सभासद असावे असें ठरलें. यांना कार्यकारी मंडळाच्या इतर बैठकीस हजर राहतां येत नसे. या कायद्यानें बऱ्याच नवीन गोष्टी घडवून आणल्या.

६. १८९२ चा कायदा:—विश्वविद्यालयांच्या योगें शिक्षणाचा बराच प्रसार झाला. त्याचप्रमाणें लार्ड मेयो व रिपन यांच्या वेळीं स्थानिक स्वराज्य-संस्थांची बरीच वाढ झाली. त्यामुळें जनतेला राजकीय हक्कांची जाणीव होऊं लागली. कै. रानडे, नौरोजी, वगैरे पुढाऱ्यांनीं व राष्ट्रीय सभेनें (Congress) सरकारपुढें आपलीं गाऱ्हाणीं मांडलीं. त्यामुळें सरकारला १८९२ चा कायदा करणें भाग पडलें. यामुळें कायदेमंडळें जास्त विस्तृत होऊन निवडणुकीचें तत्व प्रथम अमलांत आलें. व्यापारीमंडळ (Chamber of Commerce), विश्वविद्यालयें, म्युनिसिपॅलिट्या, लोकलबोर्डें वगैरे संस्थांतर्फे प्रतिनिधि निवडले जात व नंतर सरकारच्या पसंतीनें त्यांची नेमणूक होई. याशिवाय वार्षिक अंदाजपत्रकावर चर्चा करण्याची व कांहीं प्रश्न विचारण्याचीही मोकळीक मिळाली.

७ मोर्ले-मिंटो सुधारणा (१९०९):—परंतु एवढ्यानें लोकांच्या वाढत्या आकांक्षांचें समाधान होईना. १९०६ मध्यें परलोकवासी दादाभाई नौरोजी यांनीं कलकत्ता येथें "स्वराज्य आमचें ध्येय आहे." असें कांग्रेसचें धोरण जाहीर केलें. कै. गोखले यांनींही विलायतेंत बरीच खटपट करून सुधारणांची आवश्यकता तेथील लोकांस पटवून दिली. बंगालची फाळणी लोकमताविरुद्ध झाली असल्यामुळें पुष्कळच चळवळ होऊन जनतेंत जागृति झाली. या गोष्टीचा विचार होऊन मोर्लेमिंटो सुधारणा देण्यांत आल्या. या कायद्यानें कायदेमंडळें जास्त विस्तृत होऊन त्यांना जास्त प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त झालें. शिफारसवजा ठराव मांडण्याची आणि सार्वजनिक हितासंबंधीं प्रश्न व पुरवणीप्रश्न विचारण्याची सवलत मिळाली; निवडून आलेल्या प्रतिनिधींची संख्या वाढवून मुसलमान, जमीनदार वगैरे विशिष्ट संघांतर्फे प्रतिनिधि निवडून देण्यांत येऊं लागले; आणि गव्हर्नर जनरलच्या व प्रांतिक सरकारच्या कार्यकारी मंडळामध्यें एकएक जागा हिंदी सभासदांना देण्यांत आली व भारतमंत्र्याच्या मंडळामध्यें दोन हिंदी सभासद नेमले.

या कायद्यामुळें बरीच सुधारणा झाली. परंतु कांहीं विशिष्ट संघांनाच फक्त प्रतिनिधि निवडण्याचा हक्क दिला गेल्यामुळें सर्व जनतेचें समाधान झालें नाहीं. दुसरें, कायदेमंडळें कितीही विस्तृत झालीं असलीं तरी

कामाचें धोरण पूर्वीचेंच कायम राहिलें. बिनसरकारी सभासदांची संख्या वाढली, परंतु त्यांना फक्त शिफारसवजा ठराव करण्यापलीकडे जास्त कांहींही करतां येणें शक्य नव्हतें. बहुतेक कामें कार्यकारीमंडळाच्या मर्जीप्रमाणेंच चालत आणि लोकांना तर सर्व कारभार आपल्या मताप्रमाणें चालावा असें वाटावयास लागलें होतें.

८. हार्डिंज साहेबांचें उदार धोरण:—१९११ मध्यें हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यामध्यें सहानुभूति व बंधुभाव वाढावा, म्हणून बादशहांनीं या देशाला भेट दिली. शिक्षणाचा बराच प्रसार झाल्यामुळें सुशिक्षित लोकांमध्यें कार्यक्षमता व जबाबदारीनें काम करणें हे गुण आले होते. ही गोष्ट लक्षांत घेऊन १९१३ मध्यें लार्ड हार्डिंज यांनीं वरच्या दर्जाचे नोकरींत जास्त हिंदी लोक घेण्यास सुरवात केली. परंतु आतां एवढ्यानें हिंदी लोकांची स्वातंत्र्यक्षुधा शमणें कठीण होतें. यापुढें महायुद्धास सुरवात होऊन राजकीय परिस्थितींत मोठी क्रांति झाली.

९. सारांश:—ब्रिटिश पार्लमेंटनें हिंदुस्थानच्या कारभारांत लक्ष घातल्यापासून ( १७७३ ) गेल्या महायुद्धापर्यंत ( १९१४ ) राज्यघटनेमध्यें सारखे थोडेफार फरक होत होते. अगदीं प्रथम बहुतेक कायदे युरोपियन अधिकाऱ्यांकडूनच केले जात. यानंतर लोकनियुक्त परंतु सरकारनें पसंत केलेले सभासद घेण्यांत येऊं लागले. यांपैकीं कांहीं हिंदी असत. यानंतर क्रमाक्रमानें सरकारनियुक्त बिनसरकारी सभासदांशिवाय, कांहीं संस्थांतर्फें व मुसलमान, जमीनदार वगैरे विशिष्ट संघातर्फे सभासद घेण्यांत येऊं लागले. त्यांना सार्वजनिक हितासंबंधीं प्रश्न विचारण्याची व अंदाजपत्रकावर चर्चा करण्याची मोकळीक देण्यांत आली; याशिवाय नोकरीमध्यें जास्त जास्त हिंदी लोक घेण्यांत येऊन कार्यकारी मंडळामध्यें व भारतमंत्र्याच्या मंडळामध्येंही हिंदी सभासद घेण्यास प्रारंभ झाला. लवकरच मंडळामध्यें बिनसरकारी बहुमत झालें.

---

प्रश्न:—१. ईस्टइंडिया कंपनीची स्थापना कोणत्या परिस्थितींत झाली तें सांगा. २. रेग्युलेटिंग कायद्यानें कंपनीच्या कारभारामध्यें काय फरक

झाला ? ३. कंपनीचे अधिकार पार्लमेंटकडे कसकसे येत गेले तें लिहा. ४. इ. स. १८५८ च्या कायद्याची माहिती देऊन राणीच्या जाहीरनाम्यानें काय कार्य केलें तें सांगा. ५. कायदेमंडळासंबंधीं प्रमुख कायदे कोणते झाले व त्यांनीं कायदेमंडळामध्यें कशी सुधारणा होत गेली ? ६. पिटचें बिल, इ. स. १८३३ चा कायदा, मोर्लेमिंटो–सुधारणा यांवर टीपा द्या.

---

## ४. जबाबदार राज्यपद्धति

१. प्रास्ताविकः—बादशाही अंमल सुरू झाल्यापासून तीन वेळां सुधारणांचे कायदे झाले; परंतु या सर्वांच्या मुळाशीं अधिकारीवर्गाची सत्ता अनियंत्रित व अबाधित ठेवणें हें मुख्य तत्त्व होतें. मोर्लेमिंटो–सुधारणांमुळें राज्यकारभाराच्या धोरणासंबंधीं लोकांना आपले मत प्रगट करतां येऊं लागलें. परंतु या मताप्रमाणें वागण्यास कार्यकारी मंडळें जबाबदार नव्हतीं. पुष्कळ वेळां सरकार लोकमताला मान देई, परंतु तें लोकमताप्रमाणें वागण्यास बांधलें गेलें नव्हतें.

महायुद्धामुळें जी विचारक्रांन्ति झाली, तिचा परिणाम या देशावरही झाल्यावांचून राहिला नाहीं. कायदेमंडळामध्यें नुसतें लोकनियुक्त बहुमत झाल्यानें कोणाचेंहि समाधान होईना. लोकनियुक्त सभासदांनीं जबाबदारीनें देशाचा सर्व कारभार पहावा व कार्यकारी मंडळाचें कामही लोकमताप्रमाणेंच चालावें असें सर्वसाधारण मत बनत चाललें व तशा प्रकारच्या मागण्या सरकारकडे जाऊं लागल्या.

२. जबाबदार राज्यपद्धति ह्मणजे काय ?—कायदे बनविणें व त्यांचा अंमल करणें हीं राज्यकारभाराचीं दोन प्रमुख अंगें आहेत. यांतील पहिलें काम कायदेमंडळाचें व दुसरें कार्यकारीमंडळाचें असतें.

एकतंत्री राज्यपद्धतीमध्यें राजाला सर्व अधिकार असतात व तोच कार्यकारीमंडळ म्हणजे 'प्रधान-मंडळ' नेमतो. या प्रधानांना त्याच्याच तंत्रानुसार वागावें लागतें. या पद्धतीप्रमाणें प्रजेला अधिकार नसल्यामुळें राजा करील तें प्रमाण अशी स्थिति असते. सारांश, कायदा करणें व

१२ २१.१.

त्याचा अंमल करणें हें सर्व राजाच्याच हातांत असतें.

जबाबदार राज्यपद्धतींतील प्रधानमंडळ (कार्यकारी मंडळ) एका व्यक्तीस जबाबदार नसून प्रतिनिधिसभेस (कायदेमंडळ) पूर्णपणें जबाबदार असतें; सबब प्रधानांची निवडणूक सुद्धां लोकनियुक्त सभासदांतील बहुसंख्याक पक्षांतून केली जाते. यांना लोकमताप्रमाणें वागावें लागतें; नाहींतर राजीनामा देऊन मोकळें व्हावें लागतें. या पद्धतीला 'जबाबदार राज्यपद्धति' ( Responsible Government ) अशी संज्ञा आहे.

३. सुधारणांचीं तात्कालिक कारणें:—

१. मोर्लेमिंटो सुधारणा अपुऱ्या वाटून लोकमतानुसार राज्यकारभार चालेल अशा प्रकारची कांहींतरी नवीन घटना अमलांत आली पाहिजे, असें १९१० पासूनच सुशिक्षित लोकांस वाटूं लागलें होतें. या बाबतींत वरिष्ठ कायदेमंडळांतील १९ लोकनियुक्त सभासदांच्या सहीचा एक खलिता व्हाइसरॉयकडे पाठविण्यांत आला होता; व नंतर लखनौ येथें हिंदुमुसलमानांचीही या बाबतींत एकी झाली होती ( १९१६ ).

२. लोकमतामध्यें अशा प्रकारची जागृति झाल्यामुळें लोकांचें समाधान करण्यास प्रचलित राज्यघटनेंत कांहींतरी विशेष फेरबदल केले पाहिजेत, असें सरकारासहि वाटूं लागलें. लॉर्ड हार्डिंज यांनीं २५ आगस्ट १९११ रोजीं विलायतेंत धाडलेल्या खलित्यामध्यें असें म्हटलें आहे कीं, "सांप्रतचे परिस्थितींत प्रांतांना हळूहळू जास्त स्वातंत्र्य देणें हाच एक मार्ग आहे. यामुळें असा एक काळ येईल कीं, ज्या वेळीं सर्व प्रांत पूर्ण स्वतंत्र व स्वयशासित होऊन हिंदुस्थानसरकारचे ताब्यांत राहतील." या वेळेपासूनच प्रांतिक स्वातंत्र्याचा विचार लोकांच्या मनांत घोळूं लागला.

३. या सुमारास महायुद्ध सुरू झालें व ब्रिटिश साम्राज्याचा घटक या नात्यानें हिंदुस्थाननें दोस्त राष्ट्रांना पुष्कळ मदत केली. येथील संस्थानिक, लष्करी शिपाई व स्वयंसेवक यांनीं जिवाची पर्वा न करितां युरोपच्या रणभूमीवर आपलें रक्त सांडलें व प्रसंग जाणून पैशाचीही मदत केली. यामुळें विलायतेंतील लोक हिंदुस्थानकडे सहानभूतिपूर्वक पाहूं लागले व याचा पुष्कळच फायदा झाला.

४ युद्धामुळें नवा मनू सुरू झाला; आणि सर्व जगांतील राजकारणांत क्रांन्ति घडून आली. याचा हिंदुस्थानावर परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. हिंदुस्थानने केलेल्या मदतीबद्दल येथील राज्यकारभारामध्यें नवीन धोरणाचा स्वीकार करणें जरूर आहे असें विलायतेंतील लोकांना वाटूं लागलें.

**४ मान्टेग्यू साहेबांचें धोरणः**—या सर्व कारणामुळेंच नवीन सुधारणांचा जन्म झाला. भारतमंत्री मॉंटेग्यू यांनीं २० आगष्ट १९१७ रोजीं पार्लमेंटच्या प्रतिनिधिसभेत आपलें नवीन धोरण मांडून जबाबदार राज्यपद्धतीचा उपक्रम केला. यामध्यें मुख्य दोन तत्वें होतीं. एक, हिंदी लोकांशीं राज्यकारभारामध्यें जास्त सहकार्य करणें, व दुसरें—हळुहळू त्यांनीं स्वराज्याचे हक्क देत देत शेवटीं साम्राज्यान्तर्गत वसाहतीचे स्वराज्याचे हक्क देणें. ( आरंभींच मॉंटेग्यू साहेबांच्या भाषणांतील उतारा दिला आहे.)

यानंतर कांहीं दिवसांनीं येथील परिस्थितीचा प्रत्यक्ष परिचय करून घेण्याकरितां मॉंटेग्यूसाहेब स्वतः हिंदुस्थानांत आले. त्यांनीं व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं येथील पुढारी, संस्था वगैरेबरोबर विचारविनिमय करून सुधारणांची योजना पार्लमेंटपुढें मांडली. हीच पुढें थोडयाबहुत फरकानें १९१९ चा कायदा या नांवानें पसार झाली. या कायद्याचा अंमल १९२१ जानेवारीपासून करण्यांत आला.

**५. सुधारणांचें स्वरूपः**—मॉंटेग्यू साहेबांच्या सूचनांचा गोषवारा पुढीलप्रमाणें आहेः—

( १ ) जबाबदारपद्धतीचें शिक्षण देणाऱ्या संस्था, म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डे वगैरे आहेत. त्या शक्य त्या पूर्ण स्वतंत्र असाव्यात, व लोकमतानुसार चालाव्या.

( २ ) जबाबदार राज्यपद्धतीचा उपक्रम प्रांतांमध्यें करणें इष्ट असल्यामुळें तो एकदम करण्यांत यावा. प्रांतिक कायदेमंडळाचें अधिकारक्षेत्र हलकें हलकें वाढवून अनुकूल परिस्थिति दिसल्याबरोबर पूर्ण जबाबदारपद्धति सुरू करावी. कायदे करणें, स्थानिक कारभार पाहणें व जमाखर्च इत्यादि बाबतींत प्रांतांना वरिष्ठ सरकारनें शक्य तितकें स्वातंत्र्य द्यावें.

( ३ ) प्रांतामध्यें सुरू केलेल्या प्रयोगाचा परिणाम काय होतो, हें कळे-पर्यंत सर्व महत्वाच्या बाबतींत हिंदुस्थानसरकारची सत्ता अबाधित राहील. हिंदुस्थानसरकारचें कायदेमंडळ विस्तृत करून त्याला जास्त प्रातिनिधिक स्वरूप देण्यांत याव.

( ४ ) जसजशी प्रांतिक स्वायत्तता वाढत जाईल, तसतसा पार्लमेंट, भारतमंत्री व व्हाइसराय यांचा प्रांतावरील ताबा कमी होत जाईल.

या कायद्यामुळे हिंदुस्थानच्या राज्यघटनेंत पुष्कळच फरक झाले आहेत. त्यांतील मुख्य पुढील भागांमध्यें खातेवार दिले आहेत.

**६ स्वराज्याची पहिली पायरीः**—सुधारणांचें ध्येय हिंदुस्थानामध्यें वसाहतींसारखी पूर्ण जबाबदार राज्यपद्धति सुरू करणें हे होय. परंतु येथील जनतेमध्यें सध्यां येवढी जबाबदारी योग्य तऱ्हेनें पार पाडण्याची पात्रता नाहीं, असें सरकारला वाटत असल्यामुळें, ती अंगावर घेण्याकरितां जे गुण आवश्यक आहेत ते लोकांमध्ये आणण्याचा हा प्रयत्न आहे. हे गुण जस-जसे जास्त येतील तसतसे स्वराज्याचे जास्त हक्क देण्याचें अभिवचन दिलें आहे. आपला कारभार जबाबदारीनें आपल्याला करतां यावा म्हणूनच स्थानिक स्वराज्याच्या संस्था शक्य तितक्या लोकनियुक्त व विस्तृत करण्यांत आल्या आहेत. प्रांतांनाहि हल्लीं थोडेसें स्वातंत्र्य दिलें आहे व लोकांकडे कांहीं खात्यांचा कारभार सोंपविला आहे. हा कार-भार व्यवस्थितपणें करतां येऊं लागल्याबरोबर वरिष्ठ सरकारचें नियंत्रण कमी होत जाऊन लोकांना स्वराज्याचे जास्त जास्त हक्क देण्यांत येणार आहेत. तात्पर्य, साम्राज्यान्तर्गत वसाहतीचें स्वराज्य आपणांस मिळवाव-याचें आहे व सध्यां जे हक्क मिळाले आहेत, ते केवळ या ध्येयाकडे नेणारी पहिली पायरी होय.

**७. सारांशः**—१९१९ पर्यंतच्या सुधारणांनीं अधिकारीवर्गाची सत्ता अबाधित व अमर्याद राहिली. कायदेमंडळें जरी विस्तृत झालीं तरी त्यांना शिफारसी व मतप्रदर्शन यापलीकडे कांहींच करतां येत नव्हतें. लोकांच्या वाढत्या आकांक्षा जबाबदार राज्यपद्धतीची सुरवात केल्या-वांचून तृप्त होणें शक्य नव्हतें. हिंदुस्थाननें युद्धामध्यें केलेल्या कामगिरीचा

पुष्कळ उपयोग झाला, व त्या स्वार्थत्यागाचा मोबदला म्हणून मॉटेग्यू साहेबांनीं हिंदुस्थानच्या मागण्यांचा सहानुभूतिपर विचार करून जबाबदार राज्यपद्धति सुरू केली. यामुळें एकंदर धोरण बदलून लोकांच्या ताब्यांत कांहीं खातीं देण्यांत आलीं. अनुभवानें ही जबाबदारी पार पाडण्यास जसजसें प्रांत समर्थ होतील, तसतसें त्यांना वसाहतींचें पूर्ण स्वराज्य देण्याचें ध्येय पुढें ठेवण्यांत आलें आहे.

---

प्रश्न—१. जबाबदार राज्यपद्धति म्हणजे काय ? २. युद्धामुळें विचारक्रांति कशी झाली ? ३. युद्ध हें सुधारणांचें महत्वाचें तात्कालिक कारण आहे, तें कसें ? ४. हिंदुस्थानांत जागृति कशी झाली ? ५. मॉटेग्यूसाहेबांच्या जाहिरवचनांतील मुख्य तत्वें कोणतीं ? ६. सुधारणांचें मुख्य ध्येय कोणतें ? ७. सुधारणा ही स्वराज्याची पहिली पायरी कशी आहे ?

---

स.इ. ११८

# भाग दुसरा
# ब्रिटिश साम्राज्यांतील शासनपद्धति

## १. विलायत सरकार, वसाहती व इतर राष्ट्रें

१. **साम्राज्याचा विस्तारः**—ग्रेटब्रिटन व आयर्लंड यांशिवाय ब्रिटिश-साम्राज्यामध्यें अनेक वसाहती, संरक्षित राष्ट्रें व परतंत्र राष्ट्रें वगैरेंचा समावेश होतो. मुख्य वसाहती कानडा, आस्ट्रेलिया व न्यूझीलंड वगैरे असून, ब्रिटिश पूर्व आफ्रिका हें संरक्षित राष्ट्र व हिंदुस्थान हें एक मोठें परतंत्र राष्ट्र ( Dependency ) आहे. साम्राज्याचा विस्तार इतका मोठा आहे कीं, त्याचें क्षेत्रफळ जगाच्या क्षेत्रफळाच्या पंचमांशीपेक्षां थोडें-बहुत जास्तच आहे, व जगाच्या लोकसंख्येपैकीं सुमारें चतुर्थांश लोक या साम्राज्यांत राहतात. या साम्राज्याचा हिंदुस्थान हा एक महत्त्वाचा घटक आहे. सबब इतर घटकांच्या शासनपद्धतींची रूपरेषा माहीत असल्यास हिंदुस्थानचा साम्राज्यामध्यें काय दर्जा आहे, तें कळण्यास ठीक पडेल.

२. **शासनपद्धतिः**—साम्राज्यांतील शासनपद्धतींचे स्थूल मानानें मुख्य तीन प्रकार आहेत. ( १ ) इंग्लंडची शासनपद्धति, ( २ ) स्वायत्त वसाहतींची शासनपद्धति, ( ३ ) व बादशाही वसाहती आणि संरक्षित व परतंत्र राष्ट्रें यांच्या शासनपद्धति.

साम्राज्याचें केंद्र ग्रेट ब्रिटन असून त्याचें सार्वभौमत्वही ब्रिटनकडेच आहे. त्यामुळें वसाहती व इतर देशांतील शासनपद्धतींचे जनक इंग्लंड-मधील मुत्सद्दी असतात. त्यामुळें साहजिकच मातृभूमींतील शासनपद्धतींचा नमुना पुढें ठेवून आणि त्यांत स्थानिक परिस्थित्यनुरूप फरक करून इतर देशांतील राज्यघटना त्यांनीं बनविल्या आहेत. अशाच प्रकारें आपली

राज्यघटना हल्लीं बनत आहे. म्हणून इंग्लंडमधील पद्धतीची आपणांस माहिती असणें जरूर आहे.

**३. इंग्लंडची शासनपद्धतिः**—इंग्लंडच्या शासनपद्धतीस **नियंत्रित राजसत्ता** ( Limited Monarchy ) असें म्हणतात. याचा अर्थ असा कीं, राजसत्ता जरी सार्वभौम असली, तरी ती अनियंत्रित नाहीं. खुद्द राजाला देशांतील कायदा पाळावा लागतो. त्याला प्रजेवर सुलतानशाही गाजवितां येत नाहीं. राजा आपले सर्व अधिकार प्रधानमंडळामार्फत चालवितो. हें प्रधानमंडळ पार्लमेंट सभेंतील बहुसंख्याक पक्षाचें असल्यामुळें राजाचें कोणतेंही कृत्य लोकमतानुसारच होतें. म्हणूनच इंग्लंडची राजसत्ता नियंत्रित आहे असें म्हणतात.

राजाची गादी वंशपरंपरागत असून ती वडील मुलाला मिळते; पण हा वारशाचा हक्क सुद्धां पार्लमेंटच्या कायद्यानें बदलतां येतो. 'कायद्यानुसार वागेन' अशी राज्याभिषेकाच्या वेळीं प्रत्येक राजाला शपथ घ्यावी लागते. त्यामुळें राजा सर्वांत श्रेष्ठ नसून ज्या कायद्याच्या योगानें राजा बनविला जातो तो कायदाच सर्वश्रेष्ठ आहे.

राजा व पार्लमेंटच्या दोन्ही सभा मिळून इंग्लंडच्या राज्यघटनेचीं मुख्य तीन अंगें आहेत. पार्लमेंटची **उमराव सभा** ( House of Lords ) व **प्रतिनिधि-सभा** ( House of Commons ) अशीं दोन अंगें आहेत. उमराव-सभेंतील सभासद अमीर उमराव असून त्यांच्या बऱ्याच जागा वंशपरंपरागत आहेत. प्रतिनिधिसभा लोकनियुक्त प्रतिनिधींची असते. कारभारांतील मुख्य सत्ता प्रतिनिधिसभेच्या हातीं आहे. सर्व आर्थिक बाबी या सभेच्या पुढें येतात. देशाच्या संरक्षणार्थ किंवा राज्यकारभार चालविण्याकरितां होणारा खर्च या सभेनें मंजूर करावा लागतो. कोणताही कायद्याचा मसुदा ( Bill ) या दोन सभांमध्यें मजूर होऊन त्यावर राजाची सही झाल्याशिवाय त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त होत नाहीं. हिंदुस्थानांतील राज्यकारभाराचे धोरण ठरविणारे प्रमुख कायदे याच सभेंत केले आहेत.

लोकसभेंतील बहुसंख्याक पक्षाचा पुढारी मुख्य प्रधान असतो. तो

आपल्या पक्षांतील प्रमुख लोकांचें मंत्रिमंडळ बनवितो. अंमलबजावणीचे सर्व अधिकार नांवाला मात्र राजाच्या हातीं असतात. वस्तुत: मंत्रिमंडळच सर्व गोष्टी करतें. मुख्य प्रधान, इतर प्रधान, निरनिराळ्या खात्यांचे व देशांचे प्रधान मिळून मंत्रिमंडळ बनतें. भारतमंत्रीही या मंडळाचा सभासद असतो हें मंडळ पार्लमेंटला जबाबदार असतें.

४. स्वायत्त वसाहती ( Self Governing Dominions );—साम्राज्यामध्यें ग्रेट ब्रिटनच्या खालोखाल स्वायत्त वसाहतींचा दर्जा आहे. हिंदुस्थानचें राजकीय ध्येय साम्राज्यांतर्गत वसाहतींचे स्वराज्याप्रमाणें पूर्ण जबाबदार राज्यपद्धति मिळविण्याचें आहे व सरकारकडूनही या बाबतींत प्रोत्साहन व अभिवचन मिळालें आहे. कानडा, आस्ट्रेलिया वगैरे मुख्य स्वायत्त वसाहती आहेत. या वसाहतींमध्यें स्थानिक पार्लमेंटला अंतर्व्यवस्थेसंबंधीं—म्हणजे देशांतील शांतता, शिस्त, कारभार वगैरे बाबतींत—कायदे करण्याचे पूर्ण अधिकार असतात, व त्यांच्या कारभारामध्यें साम्राज्यसरकार मुळींच ढवळाढवळ करीत नाहीं. तेथील सरकारही कायदेमंडळाला पूर्णपणें जबाबदार असतें. त्यांना पूर्ण आर्थिक स्वातंत्र्य असतें. खुद्द इंग्लंडच्या मालावर जकात बसवितां येते व इतर देशांबरोबर स्वतंत्रपणें व्यापारी करार करतां येतात.

या वसाहतींचें सामान्य धोरण ब्रिटिश पार्लमेंट ठरवितें, परंतु प्रत्यक्ष कारभार स्थानिक पार्लमेंटच्या संमतीनें तेथीलच अधिकारी पाहतात. मात्र गव्हर्नर जनरलची नेमणूक साम्राज्यसरकारकडून होते. बादशहाची सत्ता केवळ अप्रत्यक्ष असते. स्वसंरक्षणार्थ त्यांचें स्वत:चें सैन्य व आरमार असतें. फक्त परराष्ट्रीय राजकारण, लष्कर, आरमार वगैरे बाबतींत इंग्लंडच्या तंत्रानें चालावें लागतें. एकंदरींत वसाहतींना स्वयंशासनाचे पूर्ण अधिकार असतात व त्यांचा दर्जा बहुतेक इंग्लंडच्या बरोबरीचा असतो.

वरील दोन्ही शासनपद्धतींमध्यें देशाचा कारभार लोकमतानुवर्ती आहे; परंतु बादशाही वसाहती, संरक्षित व परतंत्र राष्ट्रें यांमध्यें सर्व कारभार मुख्यत: बादशाहाच्या मताप्रमाणें त्यांनीं नेमलेले अधिकारी पाहतात.

५. **बादशाही वसाहती**:—स्वायत्त वसाहतींशिवाय इतर वसाहतीं-मध्यें जबाबदार राज्यपद्धति नसल्यामुळें तेथील लोकनियुक्त कायदेमंडळाचा ताबा अंमलबजावणी (कार्यकारी) खात्यावर नसतो. तेथील राज्यकारभाराचें सर्व धोरण इंग्लिश पार्लमेंटमध्यें ठरतें व त्याचा अंमल इंग्लिश पार्लमेंट आपल्या अधिकाऱ्यांकडून करवितें. तेथील गव्हर्नरांस बादशहाचा प्रतिनिधि या नात्यानें बरेच अनियंत्रित अधिकार असतात. या वसाहतींवर बादशाहाची सत्ता गव्हर्नरमार्फत प्रत्यक्ष चालते. सबब यांना 'बादशाही वसाहती' (Crown Colonies) म्हणतात. जमेका, सीलोन या अशा प्रकारच्या वसाहती आहेत. ब्रिटिश पूर्व आफ्रिके-सारख्या संरक्षित राष्ट्रामध्येंही अधिकाऱ्यामार्फत विलायतसरकार कारभार चालवितें.

६. **हिंदुस्थान**:—हिंदुस्थान हा देश वसाहत नाहीं. त्याचा कारभार बादशहा व पार्लमेंट यांनीं केलेल्या कायद्याबरहुकूम भारतमंत्री व गव्हर्नर जनरल चालवितात. तेथील सरकारही लोकमताला पूर्ण जबाबदार नाहीं. सबब हिंदुस्थानला **परतंत्र राष्ट्र** असें म्हणतात. या देशाला अलीकडे कांहीं हक्क मिळाले आहेत. तरी स्वायत्त वसाहती व हिंदुस्थान यांच्या दर्जामध्यें महदंतर आहे. सध्यांचे हक्क म्हणजे वसाहतीच्या स्वराज्याची केवळ पहिली पायरी आहे.

७. **हिंदुस्थानचा दर्जा**:—हिंदुस्थान म्हणजे केवळ एक परतंत्र राष्ट्र, म्हणून साम्राज्यांतील इतर देशांना त्याला आपल्या बरोबरीचें लेखणें महायुद्धापूर्वी कमीपणाचें वाटे. परंतु अलीकडे या भावनेमध्यें थोडा फरक झाला आहे. कारण हल्लीं साम्राज्यपरिषदेंत हिंदुस्थानच्या प्रतिनिधीस हजर राहून आपली बाजू इतर राष्ट्रांपुढें मांडतां येते. त्याचप्रमाणें हिंदुस्थान राष्ट्रसंघाचा* (League of Nations) सभासद आहे. युद्धानंतर

* टीप—**राष्ट्रसंघ**:—(१९२०) जगामध्यें शांतता प्रस्थापित करण्याच्या हेतूनें गेल्या महायुद्धानंतर हा संघ स्थापन करण्यांत आला. १९१९ च्या शांततापरिषदेनें या बाबतींत प्रथम चर्चा करून योजना

झालेल्या तहावर हिंदुस्थानच्या प्रतिनिधींच्या सह्या आहेत; व आंतर-राष्ट्रीय मजूर-मंडळानेंही जगांतील आठ प्रमुख राष्ट्रांमध्यें या देशाची गणना केली आहे. या सर्व गोष्टींवरून हिंदुस्थानचा दर्जा दिवसेंदिवस वाढत आहे असें दिसतें.

८. **सारांश**:—जगांतील कोणतेंही साम्राज्य ब्रिटिश साम्राज्याइतकें विस्तीर्ण नाहीं. त्यामध्यें स्वयंशासित वसाहती, बादशाही वसाहती, व परतंत्र राष्ट्रें यांचा समावेश होतो. स्वयंशासित किंवा स्वायत्त वसाहतींना पूर्ण स्वातंत्र्य असून त्यांचा दर्जा इंग्लंडच्या बरोबरीचा आहे. परंतु इतर वसाहती व राष्ट्रें यांवर बादशहा व पार्लमेंट यांनीं ठरविलेल्या धोरणाचा अंमल करणारे अधिकारी नेमले जातात. त्यामुळें त्यांना फारच थोडें स्वातंत्र्य असतें. हिंदुस्थान परतंत्र राष्ट्र आहे, परंतु साम्राज्यामध्यें त्याचा दर्जा दिवसेंदिवस वाढविण्यांत येत आहे.

---

प्रश्नः—१. ब्रिटिश साम्राज्याचें वर्णन द्या. २. वसाहत म्हणजे काय? ३. साम्राज्यांत किती प्रकारच्या वसाहती आहेत? ४. स्वायत्त वसाहतींचें स्वराज्य म्हणजे काय? ५. पूर्ण स्वयंशासित वसाहती कोणकोणत्या? ६. परतंत्र राष्ट्र म्हणजे काय? ७. साम्राज्यामध्यें हिंदुस्थानचा काय दर्जा आहे? ८. पार्लमेंट, बादशाही वसाहत व नियंत्रित राज्यपद्धति यांवर टीपा लिहा.

---

तयार केली. संघामध्यें हल्लीं ५४ राष्ट्रें आहेत. दोन राष्ट्रांमध्यें लढाईचा प्रसंग आल्यास वादाचा प्रश्न संघापुढें मांडून तेथें निकाल मिळेल त्याप्रमाणें वागावें लागतें. एकाद्या राष्ट्रानें या अटी मोडल्यास इतर सर्व राष्ट्रांनीं त्याच्याशीं असलेले राजकीय व आर्थिक संबंध सोडून त्याला ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करावयाचा असतो. याशिवाय आर्थिक आणि सामाजिक बाबी व मजूर वर्गाची स्थिति वगैरे सार्वराष्ट्रीय प्रश्न संघाच्या क्षेत्रांत येतात. संघाची कचेरी जिनीव्हा येथें आहे.

## २. विलायत सरकार व हिंदुस्थान

हिंदुस्थान स्वावलंबी नसल्यामुळें त्याचा कारभार पार्लमेंटच्या तंत्रानें चालतो. पार्लमेंटचा हिंदुस्थानशीं काय संबंध आहे त्याचा खुलासा खालीं दिला आहे.

१. **पार्लमेंट व हिंदुस्थानः**—पार्लमेंटनें हिंदुस्थानांत कंपनीच्या कारभारामध्यें प्रथम १७७३ सालीं लक्ष घातलें, व कंपनीची हलाखीची स्थिति सुधारून तिचा कारभार सुरळीत चालू करण्याकरितां रेग्युलेटिंग कायदा केला. या वेळेपासून पार्लमेंटचा शिरकाव हिंदुस्थानच्या कारभारामध्यें झाला. पुढें प्रत्येक सनदेच्या वेळीं पार्लमेंटची सत्ता वाढत जाऊन १८५८ सालीं सर्वच व्यवस्था महाराणी व पार्लमेंट यांनीं आपल्या हातीं घेतली. तेव्हांपासून कोणतीहि नवीन गोष्ट पार्लमेंटच्या कायद्यावांचून होत नाहीं. हिंदुस्थानच्या राज्यघटनेंत किंवा कारभाराच्या धोरणामध्यें फेरफार करणें असल्यास फक्त पार्लमेंट कायदे करते व या घटनेनुसार किंवा धोरणानुसार देशांतील अंतर्व्यवस्थेचे कायदे करण्याचें काम हिंदुस्थानसरकार व प्रांतिक सरकार करतें. स्थूलमानानें राज्यकारभाराचें धोरण ठरविणें हें काम मुख्यतः पार्लमेंटचें आहे.

२. **पार्लमेंटची सत्ताः**—हिंदुस्थानावर पार्लमेंटची सत्ता चालविण्याचे तीन मार्ग आहेतः—( १ ) कायदे करणें, ( २ ) वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुका करणें, ( ३ ) वारंवार कमिट्या किंवा कमिशनें नेमून हिंदुस्थानच्या कारभाराची व परिस्थितीची चौकशी करणें.

( १ ) हिंदुस्थानचें सध्यांचें राज्ययंत्र पार्लमेंटनें वारंवार केलेल्या कायद्यान्वयें बनलें गेलें आहे. कायदेमंडळें, स्थानिक स्वराज्यसंस्था वगैरे पार्लमेंटच्या कायद्यानेंच अस्तित्वांत आल्या असल्यामुळें या सर्वांना पार्लमेंटच्या कायद्यानुसार चालावें लागतें. हिंदुस्थानांतील कायद्यांनाही भारतमंत्र्याची मंजुरी लागते.

( २ ) इंग्लंड देश फार दूर असल्यामुळें तेथील मंत्र्यांना हिंदुस्था-

नच्या कारभाराचीं सर्व सूत्रें गव्हर्नर जनरलच्या हातीं देऊन प्रत्यक्ष हिंदुस्थानामध्यें असलेल्या अधिकाऱ्यांच्या तंत्रानेंच कारभार चालवावा लागतो. हे अधिकारी बहुतेक अधिकारारूढ असलेल्या पक्षापैकीं असल्यामुळें ते पार्लमेंटची शिस्त योग्य तऱ्हेनें पाळतात.

( ३ ) कोणत्याही बाबीसंबंधीं माहिती मिळवावयाची असल्यास पार्लमेंटमधील कांहीं निवडक लोकांचें मंडळ नेमलें जातें. हें मंडळ हिंदुस्थानांतील परिस्थितीचें योग्य ज्ञान मिळवून आपला अहवाल पार्लमेंटला सादर करतें.

याशिवाय दरवर्षीं हिंदुस्थानचा जमाखर्च व प्रगतीचा अहवाल पार्लमेंटपुढें मंजुरीकरितां ठेवला जातो. परदेशाशीं कोणतेही व्यवहार वगैरे कर्तव्य असल्यास पार्लमेंटची संमति लागते. त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या सरहद्दीबाहेर झालेल्या खर्चाला पार्लमेंटची मंजुरी लागते. याशिवाय भारतमंत्री पार्लमेंटचा सभासद व राजाचा मंत्री असल्यामुळें तो दोघांनाही जबाबदार असतो. कोणत्याही सभासदाला त्याच्या धोरणावर टीका करतां येते, व प्रश्न विचारून जरूर असलेली माहिती मिळावेतां येते. त्याचें धोरण पसंत नसल्यास प्रसंगविशेषीं निंदाव्यंजक ठरावसुद्धां त्याच्याविरुद्ध पार्लमेंटपुढें येऊं शकतो.

३. पार्लमेंटचें लक्ष वेधण्याकरितां उपाय:—( १ ) पार्लमेंटमध्यें प्रतिवर्षीं जमाखर्चाचें अंदाजपत्रक व वार्षिक अहवाल वाचला जातो. त्या वेळीं हिंदुस्थानविषयक प्रश्नांसंबंधीं माहिती नसल्यामुळें व हिंदुस्थानचा प्रश्न फारसा जिव्हाळ्याचा वाटत नसल्यामुळें पार्लमेंटचे बहुतेक सभासद गैरहजरच असत, व अहवालवाचन वगैरे विधि केवळ औपचारिक होत. ही परिस्थिति नाहींशी करण्याच्या हेतूनें नवीन सुधारणा करतांना भारतमंत्री व त्याचा नोकरवर्ग यांचा पगार ब्रिटिश तिजोरींतून देण्याचें ठरविलें आहे. हिंदुस्थानच्या तिजोरींतून जोंपर्यंत हा पगार जात असे, तोंपर्यंत कोणाही पार्लमेंटच्या सभासदास फारशी फिकीर नव्हती. परंतु पार्लमेंटमध्यें हा पगार मंजूर करण्याचे वेळीं हिंदुस्थानविषयक चर्चा साहजिकच होते.

(२) हिंदी राज्यकारभाराशीं पार्लमेंटचा जास्त निकट संबंध राखण्या-करितां पार्लमेंटच्या दोन्ही सभांतून सभासद निवडून त्यांचें एक मंडळ ( Joint Standing Committee ) नेमलें जातें. हिंदुस्थानविषयक हर-एक प्रश्नासंबंधीं हें मंडळ माहिती मिळवितें. हिंदुस्थानविषयक कायद्यांचे कच्चे मसुदे व नियम यांचा विचार करण्याचें कामही या मंडळा-कडेच असतें.

(३) सुधारणा अंमलांत आल्यापासून दहा वर्षांच्या ( १९२९ ) आंत हिंदुस्थानने जबाबदार राज्यपद्धतीमध्यें कितीशी प्रगति केली आहे, सुधारणा यशस्वी होण्याचा संभव कितीसा आहे, वगैरे गोष्टींचा तपास करण्याकरितां पार्लमेंटचें एक चौकशीमंडळ नेमलें जाणार आहे. या मंडळाच्या शिफारशीवर सुधारणांसंबंधीं जास्त हक्क देणें किंवा दिलेले कमी करणें अगर दुसरे कांहीं फरक करणें हें अवलंबून राहील.

(४) इकडून पेन्शन घेऊन विलायतेस परत गेलेल्या बड्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या लोकांचें लक्ष साहजिकच हिंदुस्थान-विषयक बाबींकडे जातें.

( ५ ) येथील राजकीय व व्यापारविषयक चळवळीमुळें हिंदुस्थाना-संबंधीं पार्लमेंटमध्यें होणाऱ्या चर्चेकडे लोकांचें लक्ष जाऊं लागलें आहे.

४. पार्लमेंटची सत्ता व सुधारणा:—वर सांगितल्याप्रमाणें पार्लमेंटची सत्ता अमर्यादित आहे व पार्लमेंटनें आंखून दिलेल्या धोरणाबरहुकूम हिंदुस्थानांतील काम चालतें, हें खरें; परंतु जबाबदार राज्यपद्धतीमध्यें अशा प्रकारचा ताबा हिंदुस्थानसरकारावर राहणें अशक्य आहे. या-करितां हिंदुस्थानसरकार व प्रांतिक सरकार या दोहोंवरील पार्लमेंटचें नियंत्रण हलके हलके कमी होऊन त्यांना जास्त स्वातंत्र्य मिळणें आव-श्यक आहे. सबब वरिष्ठ सरकार किंवा प्रांतिक सरकार व त्यांचीं कायदे-मंडळें यांचें ज्या बाबींसंबंधीं दुमत नसेल त्यांमध्यें भारतमंत्री वगैरे मुळींच ढवळाढवळ करीत नाहींत. तसेंच प्रांतांमध्येंही खात्यांची विभागणी झाली असून सोपींव खातीं शक्य तों कायदेमंडळाच्या तंत्रानें चालतात.

नं. २३ ता.

५. **सारांश**:—पार्लमेंटची सत्ता अमर्यादित आहे खरी, परंतु ती अधिकाऱ्यांमार्फत अंमलांत आणावी लागत असल्यामुळें खरी सत्ता भारतमंत्र्याच्या हातीं देण्यांत आली आहे. पार्लमेंटच्या सभासदांनीं हिंदुस्थानाविषयक प्रश्नांमध्यें जास्त लक्ष घालावें म्हणून भारतमंत्र्याचा पगार ब्रिटिश तिजोरींतून देण्यास सुरवात झाली आहे व हिंदी राजकारणाची व परिस्थितीची पूर्ण माहिती मिळविण्याकरितां पार्लमेंटच्या सभासदांचें एक मंडळ नेमलें गेलें आहे. जबाबदार राज्यपद्धतीचा उपक्रम झाल्यापासून पार्लमेंटनें आपला ताबा कमी केला आहे. कारण, कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांच्यामध्यें एकमत असल्यास त्यांच्याच मताप्रमाणें सर्वस्वीं कारभार चालतो.

---

**प्रश्न**:—१. पार्लमेंट व हिंदुस्थान यांच्यामध्यें काय संबंध आहे? २. पार्लमेंटची सत्ता हिंदुस्थानावर कशी चालते? ३ पार्लमेंटचें लक्ष अलीकडे हिंदुस्थाननें वेधलें आहे तें कां? ४ सुधारणा व्हावयाची असेल तर पार्लमेंटची सत्ता कमी होणें जरूर आहे काय?

---

# भाग तिसरा

# भारतमंत्री आणि वरिष्ठ व प्रांतिक सरकार

## १. भारतमंत्री व त्याचें मंडळ

१. **पार्लमेंट व भारतमंत्री:**—हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविणारी सर्वांत वरिष्ठ संस्था पार्लमेंट आहे. परंतु या संस्थेमध्यें पुष्कळ सभासद असल्यामुळें तिचें काम अंमलबजावणीचें नसून चर्चात्मक स्वरूपाचें आहे. स्थूल मानानें साम्राज्यांतील निरनिराळ्या देशांच्या शासनपद्धतींचीं मुख्य तत्त्वें व रूपरेषा या ठिकाणीं ठरविण्यांत येतात. त्यांचा अंमल करण्याचें काम मंत्रिमंडळाकडे सोंपविलेलें असतें. हिंदुस्थानचा भारतमंत्री या मंडळाचा सभासद असतो. पार्लमेंटनें आपले हिंदुस्थानविषयक बहुतेक सर्व अधिकार त्याच्या स्वाधीन केले आहेत. पार्लमेंट व बादशाहा यांना योग्य सल्ला देणें, त्यांच्या वतीनें हिंदुस्थानच्या कारभारावर देखरेख करणें व त्याला चांगलें वळण लावणें हीं भारतमंत्र्याचीं मुख्य कामें होत.

२. **इतिहास:**—१८५८ सालीं कंपनीकडून हिंदुस्थानचा कारभार विलायत-सरकारनें आपल्याकडे घेतला व बादशाही अंमल सुरू झाला. त्या वेळीं नियामकमंडळ व व्यवस्थापकमंडळ नांवाच्या ज्या दोन कार्यकारी संस्था होत्या, त्या बंद करण्यांत आल्या, व त्या दोहोंचे सर्व अधिकार भारतमंत्र्याच्या स्वाधीन करण्यांत आले.

३. **भारतमंत्री व त्याचे अधिकार:**—अधिकारारूढ असलेल्या पक्षांचे अनुभविक व वाकबगार पुढारी लोक बहुतेक मंत्रिमंडळामध्यें घेतले जातात. या लोकांपैकीं एकाची मुख्य प्रधानाच्या संमतीनें बादशाहा भारतमंत्री म्हणून नेमणूक करतात. हा पार्लमेंटचा सभासद असल्यामुळें पार्लमेंटला जबाबदार असतो. त्याचप्रमाणें तो प्रिव्ही कौन्सिलचाही सभा-

सद असतो. अधिकारारूढ[1] पक्षाचा पाडाव झाल्यास याला आपलें मंत्रिपद सोडावें लागतें. हिंदुस्थानविषयक प्रश्नासंबंधीं पार्लमेंटला व बादशहांना योग्य सल्ला देणें हें याचें मुख्य काम असतें. गव्हर्नरांच्या व कार्यकारी मंडळांतील सभासदांच्या नेमणुका भारतमंत्र्याच्या शिफारशीवरून बादशहाकडून केल्या जातात. पार्लमेंटचा हिंदुस्थानशीं होणारा सर्व पत्रव्यवहार याच्या मार्फत होतो. याचा हिंदुस्थानसरकारावर पूर्ण अधिकार चालतो. म्हणजे याचे सर्व हुकूम गव्हर्नर जनरल व गव्हर्नर यांना बिनचूक पाळावे लागतात.

वरिष्ठ सरकार किंवा प्रांतिक सरकार यांनीं केलेल्या कायद्याला भारतमंत्र्याची संमति लागते. त्याचप्रमाणें करामध्यें फेरफार करणें वगैरे महत्त्वाच्या गोष्टी याचा विचार घेतल्याशिवाय होत नाहींत.

याशिवाय राज्यकारभाराचें एकंदर धोरण ठरविणें, प्रांतिक व वरिष्ठ सरकारांना मार्गदर्शक नियम करणें, महत्त्वाच्या कामीं सल्ला देणें वगैरे अनेक गोष्टी याला कराव्या लागतात.

४. **भारतमंत्र्यावरील नियंत्रणें**:—भारतमंत्री हा पार्लमेंटच्या वतीनें काम करीत असल्यामुळें त्याच्या हातीं सर्व सूत्रें दिलेलीं आहेत. पार्लमेंटला कोणतीही गोष्ट करावयाची असल्यास त्याच्या मार्फतच करावी लागते. यावरून त्याची सत्ता अमर्यादित आहे असें दिसतें. परंतु त्याचें काम म्हणजे पार्लमेंटचें धोरण अमलांत आणण्याचें असतें. त्यानें व हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांनीं केलेल्या प्रत्येक गोष्टीबद्दल त्याला पार्लमेंटला जाब द्यावा लागतो. दोन्हीही सभांमध्यें पार्लमेंटचे सभासद त्याला वारंवार त्याच्या कामाबद्दल जे प्रश्न विचारतात, त्यांची योग्य माहिती पुरवून स्वतःच्या धोरणाचें समर्थन करावें लागतें. पार्लमेंटमधील प्रश्नोत्तरांप्रमाणेंच त्याचें सल्लागारमंडळ व पार्लमेंटचें मंडळ (Standing Committee)

---

टीपः—१ हल्लीं इंग्लंडमध्यें पुराणमतवादी, उदारमतवादी व मजूर असे मुख्य तीन पक्ष आहेत. निवडणुकींत ज्या पक्षाचे जास्त प्रतिनिधि निवडून दिले जातात, त्यांतून प्रधानमंडळ निवडलें जातें. सबब याला अधिकारारूढ पक्ष असें म्हणतात.

यांचे योगानेंही त्याची सत्ता मर्यादित झाली आहे. अशा प्रकारचें नियंत्रण असल्यामुळें त्याला सर्व कामें जबाबदारपणें करावीं लागतात. त्याचें वर्तन पार्लमेंटला पसंत नसल्यास पगार कमी करण्याची सूचना आणून निंदाव्यंजक ठरावही आणणें अशक्य नसतें. हिंदुस्थानच्या प्रगतीचा वार्षिक अहवाल व जमाखर्चाचें अंदाजपत्रक पार्लमेंटपुढें मंजुरी-करितां मांडावें लागतें. याशिवाय परराष्ट्रांशीं लढाई करणें, कर्ज काढणें, सरहद्दीबाहेरील मोहिमेवर खर्च करणें इत्यादि गोष्टी पार्लमेंटच्या संमती-शिवाय त्याला करतां येत नाहींत.

वास्तविक पाहातां, पार्लमेंटला जरी भारतमंत्र्यापेक्षां वरिष्ठ अधिकार असले, तरी त्याच्या कामामध्यें मुळींच ढवळाढवळ केली जात नाहीं.

५. **भारतमंत्री व हिंदुस्थानसरकार:**—हिंदुस्थानच्या कारभाराबद्दल पार्लमेंटमध्यें प्रश्नोत्तरें झाल्यास भारतमंत्र्यास आपलें व हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांचें समर्थन करणें जरूर असल्यामुळें त्याचे सर्व हुकूम हिंदु-स्थानामध्यें पाळले जाणें जरूर आहे. असें न झाल्यास त्याला येथील कारभाराबद्दल पार्लमेंटला जबाबदार राहतां येणार नाहीं. कारभाराचें धोरण ठरविणें, हिंदुस्थानांतील कारभारावर देखरेख करणें, कायद्यास मंजुरी देणें, पार्लमेंटच्या कायद्याची अंमलबजावणी करणें वगैरे सर्व गोष्टी भारतमंत्रीच करतो. त्याचप्रमाणें वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुका करणें, हिंदुस्थानसरकारला हुकूम सोडणें, कोणत्याही प्रश्नासंबंधीं माहिती मिळविणें, इत्यादि गोष्टी त्याला करतां येतात. लढाई पुकारणें किंवा नवीन कायदा करणें या गोष्टी याच्या मंजुरीशिवाय होत नाहींत. एकं-दरींत हिंदुस्थान सरकारावर याची पुष्कळ सत्ता आहे. तो पार्लमेंटला जबाबदार असल्यामुळें त्याला हे अधिकार असणें जरूरच आहे. दुसरें, येथील अधिकारी-वर्गामध्यें सारखा बदल होत असल्यानें कारभारांत एक धोरण कायम राहणें शक्य नसतें. परंतु भारतमंत्री व त्याचें मंडळ यांचा या कामीं बराच उपयोग होतो. हिंदुस्थानसरकाराला भारतमंत्र्याच्या मर्जी-नुरूप आपलें धोरण ठेवून, त्याच्या देखरेखीखालीं कारभार चालवावा लागतो. त्यामुळें येथील नोकरवर्गावर दाब राहातो. लोकमताला जोंपर्यंत

कार्यकारी मंडळ जबाबदार नाहीं, तोंपर्यंत हिंदुस्थानसरकारावर दडपण ह्मणून भारतमंत्र्याचा फार उपयोग आहे.

हिंदुस्थानसरकारच्या कारभारावर भारतमंत्र्याची हुकमत पूर्वीप्रमाणेंच आहे. तथापि ज्या बाबतींत हिंदुस्थानसरकार व कायदेमंडळें यांचे एकमत असेल त्या बाबतींत भारतमंत्र्यानें ढवळाढवळ करूं नये, असा नियम आहे, व तोच प्रांतिक सरकारच्या बाबतींतही लागू आहे.

## भारतमंत्र्याचें सल्लागारमंडळ

**६. रचनाः**—हिंदुस्थानच्या कारभारामध्यें भारतमंत्र्याला मदत करण्याकरितां एक सल्लागारमंडळ (The India Council) असतें. त्याला जरूर तो सल्ला देणें हें याचें काम आहे. हें मंडळ १८५८ सालीं प्रथम बनविण्यांत आलें. त्यांतील सभासदांना हिंदुस्थानमध्यें बऱ्याच वर्षांचा अनुभव मिळालेला असल्यामुळें त्यांना हिंदुस्थानविषयक पूर्ण माहिती असते.

१९१९ च्या अगोदर सभासदांची संख्या १० पेक्षां कमी किंवा १४ पेक्षां जास्त नसे, व त्यांची मुदत ७ वर्षांची असे. यांतील निम्यापेक्षां जास्त सभासद हिंदुस्थानांतील वरिष्ठ नोकरांपैकीं निदान दहा वर्षें अनुभव घेतलेले असत. १९०७ च्या मोर्लेमिंटो सुधारणांपासून यामध्यें दोन हिंदी इसमांची नेमणूक होऊं लागली आहे.

१९१९ च्या नवीन सुधारणेच्या कायद्यान्वयें या मंडळाचे सभासद कमींत कमी आठ व जास्तींत जास्त बारा असावे असें ठरलें आहे, व त्यांची मुदत पांच वर्षें केली गेली आहे. यांतील निम्यापेक्षां जास्त सभासद १० वर्षें हिंदुस्थानच्या नोकरींत असलेले व निवडणुकीच्या आधीं नोकरी सोडून ५ वर्षांपेक्षां जास्त दिवस न झालेले असावेत, हा पूर्वींचाच निर्बंध कायम आहे. याशिवाय भारतमंत्र्याला या मंडळांत तज्ज्ञांची नेमणूक करतां येते. तसेंच हिंदुस्थानांत सार्वजनिक कामांमध्यें पुढाकार घेतलेल्या तीन गृहस्थांस १९१७ पासून नेमण्याचा प्रघात सुरू झाला आहे. यापूर्वीं हे फक्त दोनच असत. हिंदी सभासदांची संख्या हलके हलके वाढविण्यांत यावी असें पार्लमेंटच्या कमिटीचें मत आहे. या सर्व

सभासदांची नेमणूक भारतमंत्रीच करतो.

मंडळांतील प्रत्येक सभासदाचा वार्षिक पगार १२०० पौंड असतो. हिंदी सभासदांना ६०० पौंड जादा भत्ता मिळतो. हा सर्व खर्च विलायतेंतील तिजोरींतून होतो. भारतमंत्र्याचा वार्षिक पगार ५००० पौंड असून त्याचें मंडळ व कचेरीकरितां होणारा वार्षिक खर्च अजमासें २५०,००० पौंड आहे.

७ **कामकाजाची पद्धतिः**—भारतमंत्री हा या मंडळाचा 'अध्यक्ष' असतो, परंतु त्याच्या गैरहजरीमध्यें काम चालावें, म्हणून त्यांतीलच एका सभासदाची 'उपाध्यक्ष' म्हणून नेमणूक केलेली असते.

जरूरीप्रमाणें वाटेल त्या वेळीं सभा भरवितां येते, परंतु निदान महित्यांतून एक तरी सभा झालीच पाहिजे. वादविवादात्मक गोष्टींचा निर्णय बहुमताप्रमाणें दिला जातो. दोहों बाजूला समसमान मतें पडल्यास अध्यक्षाला असलेलें जादा मत देऊन निकाल देतां येतो.

८. **पोट-कमिट्याः**—सुव्यवस्थितपणें व आटोपशीरपणें काम उरकावें म्हणून मंडळांतील सभासदांच्या पोट-कमिट्या बनवून त्यांच्याकडे निरनिराळीं कामें सोंपविलेलीं असतात. या कमिट्या दोन किंवा अधिक सभासदांच्याही असतात. त्यांच्याकडे सोंपविलेल्या खात्यांतील प्रश्नांचा विचार करून त्या आपलें मत देतात. भारतमंत्री त्याप्रमाणें वागतो, किंवा जरूर वाटल्यास ते प्रश्न सर्व मंडळापुढें मांडतो. अशा प्रकारें झालेल्या कामांची जबाबदारी विशिष्ट व्यक्तीवर न पडतां संयुक्त मंडळावर पडते.

९. **मंडळाचें भारतमंत्र्यावर नियंत्रणः**—हें मंडळ बहुतांशीं सल्लागार-मंडळच आहे. यांतील लोक चांगले अनुभविक मुत्सद्दी असल्यामुळें महत्त्वाच्या प्रत्येक बाबीमध्यें भारतमंत्री त्यांच्या सल्ल्याप्रमाणें आपलें धोरण आंखतो, आणि त्याप्रमाणें वागतो. परंतु मंडळाचा निकाल त्याला मुळींच बंधनकारक नसतो. असें जरी असलें तरी त्याचे हुकूम मंडळाचे सल्ल्यावरून सोडलेले हुकूम म्हणूनच सुटतात. त्याला कोणतीही गोष्ट नामंजूर करण्याचा ( Veto ) अधिकार आहे. हिंदुस्थानामध्यें एकादा खलिता

किंवा हुकूम पाठवावयाचा असल्यास तो मंडळापुढें विचाराकरितां ठेविला जातो. एकादी गोष्ट अत्यंत जरूरीची किंवा महत्त्वाची असून ती बाहेर फुटूं नये असें वाटल्यास भारतमंत्री, मंडळास न विचारतां स्वतःच्या जबाबदारीवर काय करावयाचें तें करितो. एकंदरींत हें मंडळ केवळ सल्लागारमंडळच आहे. त्याला भारतमंत्र्याच्या सत्तेला आळा घालितां येत नाहीं. खालील बाबींमध्यें मात्र मंडळाच्या बहुमताप्रमाणेंच त्याला वागावें लागतें:—

( १ ) हिंदुस्थानच्या मिळकतीची अगर वसुलाची व्यवस्था करणें, करार करणें, मालमत्ता विकणें, विकत घेणें वगैरे;

( २ ) भारतीय सनदी नोकरांकरितां राखून ठेविलेल्या जागेवर हिंदी इसमांची नेमणूक करणें.

( ३ ) लष्करी किंवा बिगर लष्करी अधिकाऱ्यास बडतर्फ करणें.

( ४ ) पगार, फर्लो रजा, पेनशन वगैरेसंबंधीं नियमांत फेरबदल करणें, सनदी नोकरांच्या परीक्षेचे नियम करणें व त्यांच्या नेमणुका करणें.

( ५ ) गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळामध्यें हंगामी नेमणुका करणें.

१०. **इंडिया ऑफिसः**—भारतमंत्र्याच्या अनेकविध कामांमध्यें त्याला मदत करण्याकरितां नोकरवर्ग असतो. याला " इंडिया ऑफिस " अशी संज्ञा आहे. भारतमंत्र्याला मदतनीस म्हणून दोन मंत्री ( Under Secretaries ) असतात. त्यांतील एक कायम असतो. त्याच्याकडे कचेरीचें काम असतें. त्याला पक्षभेदांशीं कांहीं कर्तव्य नसतें. तो सरकारनें नेमलेला अधिकारीच असतो. दुसरा ( Parliamentary Under Secretary ) पार्लमेंटचा सभासद असून जोंपर्यंत त्याचा पक्ष अधिकारारूढ आहे, तोंपर्यंतच राहातो. हा पार्लमेंटमधील कामांमध्यें भारतमंत्र्यास मदत करतो. त्याला पार्लमेंटांतील ' **दुय्यम मंत्री** ' असें म्हणतात. भारतमंत्री जर उमरावसभेंतील असेल, तर हा प्रतिनिधिसभेपैकीं असतो, किंवा याचे उलट असतें. म्हणजे पार्लमेंटचे दोन्ही सभांमध्यें हिंदुस्थानच्या वतीनें बोलणारीं माणसें असतात.

याशिवाय **'आसिस्टंट अंडर सेक्रेटरी'** म्हणून एक अधिकारी असतो. तो या मंडळाचा मुख्य कारकून असतो. याशिवाय प्रत्येक खात्यागणिक चिटणीस व दुय्यम चिटणीस असून त्यांच्या हाताखालीं नोकरवर्ग असतो. याशिवाय प्रत्येक खात्याचे स्वतंत्र अधिकारी असतात. या सर्वांचा पगार विलायतच्या तिजोरींतून दिला जातो.

११ **हाय-कमिशनरः**—हिंदुस्थानसरकाराकरितां विलायतेंत होणारे करारमदार, देवघेव व इतर आर्थिक व्यवहार आजपर्यंत भारतमंत्र्यामार्फत होत असत, हल्लीं हीं कामें हाय-कमिशनर करतो. हिंदुस्थानसरकारच्या शिफारशीवरून भारतमंत्री याची नेमणूक करतो. याचा पगार येथील तिजोरींतून जातो. याची नेमणूक पांच वर्षांची असते. आगगाडी, लष्कर वगैरेकरितां लागणाऱ्या सामानाचा सौदा करणें, तिकडे कर्ज काढणें, हिंदुस्थानसरकाराकरितां लागणारा माल खरेदी करणें, नाणें पाडण्याकरितां सोनें अगर चांदी खरेदी करणें, तिकडील कंपन्या, संस्था वगैरेशीं करारमदार करणें इत्यादि जोखमीचीं कामें याच्याकडे असतात. हिंदुस्थानाकरितां माल विकत घेणें, पेन्शनचा बटवडा करणें, हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांच्या सोई पाहणें व हुंडणावळीची व्यवस्था करणें वगैरे किरकोळ कामेंही याजकडेच सोंपविलीं आहेत.

## सनदी नोकरवर्ग

१२. मुलकी राज्यव्यवस्था चालविण्याकरितां कायम वाकबगार नोकरवर्गाची जरूरी असते. कायदेमंडळें, कार्यकारीमंडळें, वगैरे कायम टिकाऊ स्वरूपाचीं नसल्यामुळें राज्यकारभाराच्या धोरणाला टिकाऊपणा व एकसूत्रता आणण्याकरितां या अनुभविक अधिकारी वर्गाचा मुख्यतः उपयोग होतो. १७९३ मध्यें लॉर्ड कॉर्नवालिसनें लांचलुचपती, जुलूम वगैरे बंद करण्याकरितां, नेमणुकीचे वेळीं नोकरलोकांकडून एक करार लिहून घेण्यास सुरवात केली; ह्मणून या नोकरांना **करारी नोकर** (Covenanted Civil Service) म्हणत. त्यांत व्यापार करणार नाहीं, नजराणा घेणार नाहीं, आणि स्वतःसाठीं व कुटुंबासाठीं पेन्शनची वर्गणी भरीन; वगैरे शर्ती असत. या नोकरांकरितां मोठमोठ्या ठराविक जागा राखून ठेव-

ण्यांत येत. हल्लीं यांना **सनदी नोकर** ( Indian Civil Service) म्हणतात.

पुढें ( १८५३ ) चढाओढीची परीक्षा सुरू झाली, ती अद्याप चालू आहे. तिला ब्रिटिश प्रजाजनांपैकीं २२ ते २४ वर्षांचे कोणत्याहि इसमास बसतां येतें. ही परीक्षा हल्लीं इंग्लंड व हिंदुस्तान या दोन्ही देशांत घेतली जाते. याशिवाय प्रांतिक सरकारनें निवडलेल्या उच्च कुळांतील वजनदार व बुद्धिमान गृहस्थांच्या नेमणुकीस भारतमंत्र्यानें मंजुरी दिल्यास वरिष्ठ नोकरींत घेण्यास सुरवात झाली ( १८७९ ). पुढें ( १८८७ ) हल्लींप्रमाणें वरिष्ठ, प्रांतिक व कनिष्ठ असे नोकरांचे तीन वर्ग करण्यांत आले व खालच्या वर्गांतील उत्तम लोक वरच्या वर्गांत घेण्यास सुरवात झाली.

वरिष्ठ नोकरवर्गामध्यें हिंदुस्थान व इंग्लंडमधील चढाओढीची परीक्षा पास झालेले, प्रांतिक नोकरींतून बढती मिळालेले, उच्च व सरदार वगैरे कुळांतील निवडक लोक घेतले जातात. याशिवाय न्यायखात्यामध्यें नावाजलेल्या वकिलांचीही नेमणूक केली जाते.

प्रांतिक नोकरीमध्यें एतद्देशीय किंवा परकीय परीक्षेंत वर आलेल्या इसमांची नेमणूक केली जाते व कनिष्ठ नोकरींतील निवडक लोक घेतले जातात.

१३. **एतद्देशीय लोक व वरिष्ठ नोकरी:**—वर सांगितल्याप्रमाणें १८७९ पासून हिंदी लोकांना या नोकरवर्गांत जागा मिळू लागल्या. १९०९ च्या सुधारणांपासून जास्त हिंदी लोकांना राज्यकारभारांत घेण्याचें ठरलें, व १९१९ च्या कायद्यान्वयें तर हिंदी लोकांशीं जास्त सहकार्य करण्याचें धोरण स्वीकारलें असून, नोकरीमध्यें शक्य तितकें हिंदी लोकांचें प्रमाण वाढविण्याचा उपक्रम केला आहे. वरिष्ठ नोकरीमध्यें शेंकडा ३३ हिंदी लोक आहेत. हें प्रमाण दरवर्षी शेंकडा १॥ प्रमाणें वाढविण्यांत येणार आहे.

हिंदी लोकांना जास्तींत जास्त शेंकडा ४८ जागा मिळाव्यात असें सध्यां ठरलेलें आहे व इतकी भरती बहुतेक १९२९ पर्यंत होईल असा अंदाज आहे.

असिस्टंट कलेक्टरपासून तों थेट गव्हर्नरपर्यंत जागा सनदी नोक-

रांनाच मिळतात. १९१९ च्या सुधारणांपासून दिवाणांच्या हाताखालीं या अधिकाऱ्यांना कामें करावीं लागतात; व कायदेमंडळाच्या तंत्रानें वागावें लागतें. ही नवीन परिस्थिति न आवडून बऱ्याच लोकांनीं राजीनामेही दिले. यामुळें नवीन लोक मिळणेंही कदाचित जड जाईल म्हणून या प्रश्नाचा ऊहापोह करण्याकरितां ली कमिशनची* नेमणूक झाली (१९२३) या कमिशनच्या रिपोर्टमधील शिफारशींप्रमाणें वरिष्ठ नोकरवर्गाचे पगार, भत्ते वगैरे वाढविण्यांत आले असून त्यांना इतर सवलतीही देण्यांत आल्या आहेत.

१४. सारांशः—बादशाह व पार्लमेंट हे भारतमंत्र्याच्या मार्फत हिंदुस्थानचा कारभार पाहतात. भारतमंत्री प्रधानमंडळाचा सभासद असल्यामुळें पार्लमेंटला जबाबदार असतो. हिंदुस्थानविषयक प्रश्नासंबंधीं बादशहास योग्य सल्ला देणें व पार्लमेंटचें धोरण अमलांत आणणें, हें त्याचें मुख्य काम असतें. त्याला गव्हर्नर जनरलाशिवाय इतर सर्व अधिकाऱ्यांच्या नेमणुका करणें, हिंदुस्थानच्या कारभारावर देखरेख करणें व त्याला योग्य वळण लावणें वगैरे कामें करावीं लागतात. त्याची सत्ता जरी तात्विक दृष्ट्या अमर्याद भासली तरी त्याचें सल्लागार मंडळ, पार्लमेंटचें मंडळ ( Standing Committee ) व पार्लमेंटमधील प्रश्नोत्तरें वगैरेंचें त्याच्यावर थोडेंसें नियंत्रण असतें. त्याच्या मदतीला दोन दुय्यम भारतमंत्री असतात. त्यांच्या हाताखालीं मोठा कामगारवर्ग असून सर्व कामांच्या खातेवार निरनिराळ्या कचेऱ्या आहेत. या सर्वांचा खर्च विलायतच्या तिजोरींतून दिला जातो. हिंदुस्थानचे करारमदार करण्याचें काम १९१९ च्या कायद्यापासून हाय-कमिशनरकडे सोंपविण्यांत आलें आहे. याचा पगार हिंदुस्थानांत खर्चीं पडतो. हिंदुस्थानचा राज्यकारभार सनदी नोकरांचे हातीं आहे. यांची नेमणुक भारतमंत्र्याकडून केली जाते.

---

* टापः—एखाद्या बाबीसंबंधीं चौकशी करण्याकरितां कांहीं गृहस्थ निवडलेले असतात. त्यांना समुच्चयानें कमिशन म्हणतात. यांतील अध्यक्षांचें नांव मंडळाला दिलें जातें. ली कमिशन म्हणजे ली साहेब ज्याचे अध्यक्ष होते तें मंडळ.

प्रश्नः—१. भारतमंत्र्याच्या कामाची व अधिकाराची कल्पना द्या. २. हिंदुस्थान सरकार व भारतमंत्री यांचे संबंध काय आहेत? ३. भारतमंत्र्यावर पार्लमेंटची सत्ता कशी चालते? ४. सुधारणा-कायद्यानें भारतमंत्र्याच्या कामामध्यें काय फरक झाले? ५. भारतमंत्र्याच्या सल्लागारमंडळाची रचना सांगून तेथील कामकाजाची माहिती द्या. ६. या मंडळाची भारतमंत्र्यावर कितीशी हुकमत चालते? ७. इंडिया ऑफीस, हाय-कमिशनर व सनदी नोकरवर्ग यांवर टीपा द्या.

---

## २. वरिष्ठ सरकार

१. हिंदुस्थानच्या राज्यघटनेमध्यें सर्वांत वरिष्ठ संस्था पार्लमेंट असून, पार्लमेंट व बादशहा हे हिंदुस्थानचा कारभार भारतमंत्र्याच्या मार्फत चालवितात. भारतमंत्री इंग्लंडमधून येथील कामाचीं सर्व सूत्रें हालवितो. परंतु हिंदुस्थानांत प्रत्यक्ष ठिकाणावर कोणीतरी जबाबदार अधिकारी असला पाहिजे, म्हणून बादशहाचा प्रतिनिधि या नात्यानें गव्हर्नर जनरलची नेमणूक करण्यांत येते. हिंदुस्थानांतील सर्वांत श्रेष्ठ अधिकारी हाच होय. याप्रमाणें अधिकारी वर्गाचे विलायतेंतील अधिकारी व हिंदुस्थानांतील अधिकारी असे दोन भाग पडतात.

२. **हिंदुस्थानसरकारः**—गव्हर्नर जनरल, त्याचें कार्यकारी मण्डळ, मुख्य सेनापति व वरिष्ठ कायदेमंडळाच्या दोन्ही सभा या सर्व संस्था मिळून हिंदुस्थानसरकार बनतें. सर्व हिंदुस्थानचें कामकाज पाहणाऱ्या एवढ्याच संस्था आहेत. यांनाच मध्यवर्ती किंवा वरिष्ठ सरकार म्हणतात. सर्व प्रांतिक सरकारांवर देखरेख ठेवणें, त्यांच्या कारभाराचें धोरण ठरविणें व त्यांना योग्य सल्ला देणें हीं कामें हिंदुस्थानसरकारचीं आहेत.

गव्हर्नर जनरल व त्याचें कार्यकारी मंडळ ( Governor General in Council ) मिळून मुख्य अंमलबजावणी-सरकार होतें.

## गव्हर्नर जनरल

३. इतिहास:—रेग्युलेटिंग कायदा ( १७७३ ) होण्याच्या पूर्वी प्रत्येक प्रांताला एकएक गव्हर्नर असे व त्याचें काम अगदीं स्वतंत्रपणें चाले. त्यांच्या कारभारांत एकसूत्रीपणा आणणारा कोणी वरिष्ठ अधिकारी नसल्यामुळें हिंदुस्थानच्या एकंदर कामांमध्यें फारच विसंगतपणा येई. हा घोंटाळा दूर करण्याच्या उद्देशानें १७७३ मध्यें बंगालचे गव्हर्नरला गव्हर्नर जनरल नेमिलें. पहिला गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज होय. हा बंगालचें काम प्रत्यक्ष पाहून मुंबई व मद्रासचे गव्हर्नरांवर सत्ता चालवी. याच्या मदतीस चार सभासदांचें सल्लागारमंडळ असे. १८३३ मध्यें याला बंगालचा गव्हर्नर जनरल म्हणण्याच्या ऐवजीं हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल असा किताब मिळाला. १८५४ मध्यें बंगालचें काम लेफ्टेनंट गव्हर्नरकडे सोंपविण्यांत येऊन वरिष्ठ सरकार अजिबात स्वतंत्र झालें सर्व हिंदुस्थानच्या लष्करी आणि मुलकी कारभारावर देखरेख करणें, व हिंदुस्थानच्या कारभाराला एकसूत्रता आणणें हीं कामें मुख्यत: गव्हर्नर जनरलकडे सोंपविण्यांत आलीं. १८५८ मध्यें बादशाही अंमल सुरू झाल्यापासून याला व्हाइसरॉय म्हणजे राजप्रतिनिधि असें म्हणण्यांत येऊं लागलें. लॉर्ड कॅनिंग हे पहिले व्हाइसरॉय होत.

४. लायकी:—इंग्लंडमध्यें राजकारणांत मुरलेले अनेक उमराव असतात. त्यांच्यापैकीं एकाद्या मोठ्या मुत्सद्याची योजना मुख्य प्रधानाच्या शिफारशीवरून बादशहाकडून गव्हर्नर जनरल म्हणून केली जाते. ही नेमणूक पांच वर्षांची असते.

५. अधिकार व कर्तव्यें:—गव्हर्नर जनरलला गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय या दोन नात्यानें काम पहावें लागतें.

( १ ) व्हाइसरॉय म्हणजे राजप्रतिनिधि:—या नात्यानें अपराध्यावर दया करणें, शिक्षेची माफी करणें वगैरे अधिकार गव्हर्नर जनरलला प्राप्त झाले आहेत. त्याची संस्थानिकांवर हुकमत चालते. संस्थानांतील कारभार सुधारण्याकरितां योग्य मदत करणें, त्यांना सल्ला देणें,

संस्थानी हद्दींत शांतता व सुव्यवस्था राखणें या गोष्टी त्याला कराव्या लागतात. संस्थान खालसा करण्याचे व खालसा केलेलें परत देण्याचेही त्याला अधिकार आहेत.

( २ ) **गव्हर्नर-जनरल**--या नात्यानें त्याला मुख्यत: विलायत-सरकारचें धोरण अमलांत आणावें लागतें व भारतमंत्र्याचे हुकूम पाळावे लागतात.

( ३ ) हिंदुस्थानांतील **वरिष्ठ अधिकारी** या नात्यानें सर्व लष्करी व बिनलष्करी ( Civil ) कारभाराला योग्य वळण लावणें, प्रांतिक कारभारावर देखरेख ठेवणें, परराष्ट्रीय संबंधांत बिघाड होऊं न देणें इत्यादि जोखमीचीं कामें त्याला पहावी लागतात.

ही जबाबदारी पार पाडण्याकरितां शांतता, संरक्षण व लोकहित यांना जरूर असलेले नियम व कायदे त्याला मंजूर करून घेतां येतात, व बाधक असलेले रद्द करतां येतात.

## कार्यकारी मंडळ ( The Executive Council.)

६. इतिहास:—हें मंडळ १७७३ मध्यें रेग्युलेटिंग कायद्यान्वयें पहिला गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज् याला मदतनीस म्हणून स्थापन करण्यांत आलें. त्या वेळीं त्यामध्यें चार सभासद असत. त्यांची नेमणूक व्यवस्थापक मंडळाकडून होई. परंतु १८५८ पासून ही नेमणूक भारतमंत्र्याच्या शिफारशीवरून खुद्द बादशहा करितात. १९१९ पूर्वीं गव्हर्नर जनरल, मुख्य सेनापति व सहा सभासद मिळून एकंदर आठ सभासद होते. त्यांतील तीन हिंदुस्थानांत दहा वर्षें नोकरी केलेल्या सनदी नौकरांपैकीं, एक पांच वर्षांपेक्षां जास्त अनुभव असलेला विलायतेतील बॅरिस्टरपैकीं, व बाकीच्या दोनपैकीं एक लंडनमधील मुलकी खात्यांतील व एक हिंदी गृहस्थ, असे एकंदर सहा सभासद होते.

७. रचना:—परंतु १९१९ पासून यामध्यें फरक झाला आहे- सभासदांची संख्या नक्की केलेली नसून ती गव्हर्नर जनरलच्या मर्जीनुरूप वाढवितां येईल. हल्लीं गव्हर्नर जनरलशिवाय दुसरे कार्यकारी

मंडळाचे सात सभासद आहेत. यांपैकीं तीन सभासद निदान दहा वर्षे हिंदुस्थानचे नौकरींत अनुभवलेले असतात. कायदेपाडित विलायतेंतीलच पाहिजे, ही अट काढून टाकण्यांत आली असून तो हिंदुस्थानांतील कोणत्याही हायकोर्टामध्यें दहा वर्षे अनुभव घेतलेला वकील असला तरी चालतो. यांपैकीं निदान तीन इसम हिंदी असलेच पाहिजेत. हिंदी लोकांची संख्या हलके हलके वाढविण्यांत यावी, अशी पार्लमेंटच्या कमीटीची शिफारस आहे. सुधारणाकायद्याचा वास्तविक फायदा हाच आहे. यापूर्वीं फक्त एकच हिंदी सभासद कार्यकारी मंडळामध्यें असे. या मंडळांतील सभासदांची मुदत पांच वर्षांची असते. वरील सभासदांशिवाय मुख्य सेनापति, हे जादा सभासद व गव्हर्नर जनरल हे कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष असतात. या दोघांशिवाय इतर सभासदांचा दर्जा सारखाच असतो. बैठक मुंबई, मद्रास किंवा बंगाल या इलाख्यांत भरल्यास तेथील गव्हर्नरास जादा सभासद म्हणून हजर राहतां येतें.

८. कार्यकारी मंडळाच्या सभेची शिस्तः—मंडळाच्या सभासदांपैकीं एक उपाध्यक्ष म्हणून निवडला जातो. कामकाजासंबंधीं नियम असतात. या नियमानुसार मंजूर झालेली प्रत्येक गोष्ट, मंडळाच्या समतीनें गव्हर्नर जनरलनें दिलेला हुकूम, समजली जाते. मंडळाची सभा आठवड्यांतून निदान साधारणतः १।२ वेळ भरते. कौन्सिलपुढें आलेल्या बाबींत मतभेद झाल्यास गव्हर्नर जनरलला बहुमताप्रमाणें वागावें लागतें. भारतमंत्र्याला मंडळाच्या सल्याप्रमाणें वागावेंच लागतें असें नाहीं, परंतु गव्हर्नर जनरलला मात्र तसें करतां येत नाहीं. सारखीं मतें पडल्यास अध्यक्षाला एक जादा मत असतें. एकादा ठराव शांतता, संरक्षण व लोकहित यांना बाधक आहे असें वाटल्यास त्याला अनुमति देणें न देणें वगैरेसंबंधीं अधिकार गव्हर्नर जनरलला आहेत. गव्हर्नर जनरलचें धोरण कार्यमंत्र्यांना आक्षेपार्ह वाटत असल्यास, त्यांना आपल्या म्हणण्याची नोंद करून ठेवतां येत व हे आक्षेप भारतमंत्र्याकडे पाठविले जातात. मंडळाच्या बैठकी बहुतेक दिल्ली व सिमला येथें भरतात.

९. खात्यांची विभागणीः—हिंदुस्थानसरकारनें राज्यकारभाराच्या

सोईकरितां केलेल्या निरनिराळ्या खात्यांचे १९१९ च्या कायद्यानें, वरिष्ठ सरकारच्या ताब्यांतील खातीं व प्रांतिक सरकारच्या ताब्यांतील खातीं, असे दोन वर्ग पडतात. प्रांतिक कारभाराकरितां आवश्यक, किंवा ज्यांचें प्रांतापुरतेंच स्थानिक महत्त्व असतें, अशीं खातीं प्रांतिक समजलीं जातात. उदाहरणार्थः—पोलीस, शिक्षण, आरोग्य, न्याय, स्थानिक स्वराज्य वगैरे. ज्या खात्यांचा सर्व हिंदुस्थानशीं संबंध येतो किंवा अखिल भारतीय या दृष्टीनें ज्यांना विशेष महत्त्व आहे, किंवा ज्यांच्या धोरणामध्यें एकसूत्रता असणें आवश्यक आहे, अशीं खातीं वरिष्ठ सरकारचीं होत. उदाहरणार्थ, देशाचें संरक्षण, हुंडणावळ, पोस्ट वगैरे.

१०. हिंदुस्थान सरकारचीं खातीं:-

( १ ) परराष्ट्रीय, लष्कर, आरमार व विमान खातीं.

( २ ) आगगाड्या, टपाल, तार, वगैरे दळणवळणाचीं साधनें.

( ३ ) खानेसुमारी, व्यापार, जकात, मीठ, अफू, प्राप्तीवरील कर.

( ४ ) चलनी नाणीं, टांकसाळ इत्यादि.

११. खात्यांची व्यवस्थाः—

पूर्वी कामाचा व्याप फारसा नव्हता, त्या वेळीं सर्वच कामें स्वतः गव्हर्नर जनरल पहात, त्यामुळें कामें लांबणीवर पडत. ही अडचण दूर करण्याकरितां कॅनिंग साहेबांनीं सर्व कामांची खातेवार विभागणी केली व प्रत्येक मंत्र्याच्या ताब्यांत एकएक स्वतंत्र खातें दिलें. त्यामुळें कामें जलद व व्यवस्थेशीर होतात, आणि प्रत्येक मंत्री आपआपल्या खात्याबद्दल जबाबदार असतो. हल्लीं वरिष्ठ सरकारचीं सर्व खातीं खालीं दिल्याप्रमाणें जरूरीप्रमाणें थोडाफार फरक करून वांटून देण्यांत येतात.

१२. खातीं:-हिंदुस्थानसरकारच्या सर्व कामांचीं एकंदर आठ खातीं आहेत. तीं खालीं दिल्याप्रमाणें:-

( १ ) शिक्षण, आरोग्य व शेती ( Education, Health and Lands ):—यामध्यें शिक्षण, आरोग्य, जंगल, शेतसारा, दुष्काळ वगैरे कामें येतात. स्थानिक स्वराज्यसंस्थाही याच खात्यांत येतात. यां-

पैकीं बहुतेक खातीं प्रांतिक असल्यामुळें, प्रांतिक कारभारावर देखरेख करणें, कारभाराचें सामान्य धोरण ठरविणें वगैरे कामें या खात्याकडे असतात.

( २ ) **अंतर्व्यवस्थाखातें** ( Home Department ):—सर्वसामान्य राज्यव्यवस्था व देशांतील अंतर्व्यवस्था यासंबंधीं सर्व कामें, म्हणजे न्याय, कायदा, पोलीस वगैरेसंबंधीं व्यवस्था, या खात्याकडे असते. खानेसुमारी याच खात्याकडून केली जाते. हीं कामें पाहणाऱ्या मंत्र्यास **गृहमंत्री** ( Home Member ) म्हणतात.

( ३ ) **आर्थिक खातें** ( Finance ):--प्रांतिक व वरिष्ठ सरकारच्या जमाखर्चासंबंधीं सर्व बाबींवर देखरेख ठेवणें, चलनी नाणें, टांकसाळ, पेढ्या, प्राप्तीवरील कर वगैरे पैशासंबंधानें सर्व कामें या खात्याकडेच असतात. मीठ व अफू यांची व्यवस्था याच खात्याकडे आहे. त्याचप्रमाणें अधिकाऱ्यांचा पगार, रजा, पेन्शन इत्यादि बाबी या खात्याचा अधिकारी पाहतो. या खात्यांतील मुख्य अधिकाऱ्यास **फडणीस** ( Finance Member ) म्हणतात. अंदाजपत्रक तयार करून तें कायदेमंडळापुढें मांडणें हें फडणिसाचें मुख्य महत्त्वाचें काम आहे.

( ४ ) **व्यापार व आगगाडी** ( Commerce ):—-आगगाडी, जहाजें इत्यादि व्यापाराच्या व दळणवळणाच्या साधनांची व्यवस्था पाहणें; बंदरें, गोद्या वगैरेंची तपासणी करणें, व्यापारासंबंधीं आंकडे प्रसिद्ध करणें, आयात व निर्गत व्यापारासंबंधीं नियम करणें, इत्यादि कामें याच खात्याकडे आहेत. याची हुकमत आगगाडी--मंडळावर ( Railway Board ) चालते.

( ५ ) **उद्योगधंदे व मजूर** ( Industries and Labour ): -मजुरांसंबंधीं कायदे करणें व उद्योगधंद्यांची वाढ करणें हीं या खात्याचीं मुख्य कामें आहेत. याशिवाय, टपाल, तार, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे इत्यादि कामें या खात्याकडे असतात.

( ६ ) **कायदा** ( Law ):--हें खातें **कायदेपंडिताच्या** ( Law Member ) ताब्यांत असतें. सर्व कायदेशीर मुद्यांसंबंधीं सरकारला

सल्ला देणें, कायद्यामध्यें फेरफार सुचविणें, शांतता राखण्याकरितां कायदे व नियम करणें, कायद्यांचे मसुदे तयार करणें व ते कायदेमंडळापुढें मांडणें हीं कामें या खात्याकडे असतात.

( ७ ) **परराष्ट्रीय खातें** ( Foreign and Political ):—संस्थानांसंबंधीं सर्व कामकाज पाहणें, सरहद्दीवरील जातींवर देखरेख ठेवणें, अफगाणिस्थान, इराण, अरबस्थान वगैरे राष्ट्रांशीं संबंध ठेवणें इत्यादि या खात्याचीं मुख्य कामें होत. अजमीर–मारवाड, वायव्येकडील प्रांत व ब्रिटिश बलुचिस्थान या प्रांतांची व्यवस्था या खात्याकडेच असते. एजंट व रेसिडेंट यांच्या नेमणुका करण्याचें काम या खात्याकडेच आहे. या खात्याची व्यवस्था खुद्द व्हाइसरॉयकडेच असते.

( ८ ) **लष्करीखातें**:–( Military ) हें मुख्य सेनापतीच्या ताब्यांत असून लष्करासंबंधीं सर्व व्यवस्था पाहतें.

१३. **खात्यांतील कामाची पद्धति**:—प्रत्येक खात्याचा एक चिटणीस ( Secretary ) असतो. त्याच्या हाताखालीं दुय्यम चिटणीस असुन मोठा नोकरवर्गही असतो. कार्यकारी मंडळापुढें येणाऱ्या प्रत्येक प्रश्नासंबंधीं सर्व कागदपत्रें व माहिती गोळा करून ती मंडळाला पुरविण्याचें काम चिटणिसाचें असतें.

खात्यांतील रोजचीं ठराविक कामें चिटणीस स्वतःच्या जबाबदारीवरच निकालांत काढतो. परंतु कारभाराच्या धोरणासंबंधीं महत्त्वाचे प्रश्न असल्यास ते खात्यांतील मंत्र्याच्या अभिप्रायासह गव्हर्नर जनरलकडे रवाना होतात. गव्हर्नर जनरल व मंत्री यांचें मत जुळल्यास, त्या प्रश्नास कार्यकारी मंडळाच्या अनुमतीनें केलेल्या ठरावाचें स्वरूप येतें. परंतु दोघांमध्यें विरोध आल्यास तो प्रश्न मंडळापुढें विचाराकरितां येतो. विशेष महत्त्वाच्या बाबतींत मंत्री व गव्हर्नर जनरल यांचें मत जुळलें तरी एखाद्या दुसऱ्या मंत्र्याचा सल्ला घेणें जरूर वाटत असल्यास तसें करण्यांत येतें.

एखाद्या सभासदानें व्यक्तिशः सोडलेला हुकूम असो, गव्हर्नर जनरलची अनुमति घेऊन सोडलेला असो, मंडळांतील बहुमतानें सोड-

लेला असो, किंवा गव्हर्नर जनरलनें स्वतःच्या जबाबदारीवर सोडलेला असो, त्याला गव्हर्नर जनरलनें मंडळाच्या संमतीनें काढलेला हुकूम असेंच म्हणण्याचा प्रघात आहे.

१४. सारांशः—हिंदुस्थानांतील प्रत्यक्ष काम करणारा सर्वांत वरिष्ठ अधिकारी गव्हर्नर जनरल होय. तो राजाचा प्रतिनिधि असल्यामुळें त्याला विशिष्ट अधिकार प्राप्त झाले आहेत. त्याच्यावर भारतमंत्र्याची हुकमत चालते. मुलकी व लष्करी कारभारासंबंधीं सर्व जबाबदारी त्याच्यावरच असते. प्रांतिक सरकारला योग्य मदत करण्याचें काम त्या चेंच आहे. त्याचे मदतीकरितां एक कार्यकारी मंडळ असतें. गव्हर्नर जनरल, सेनापति व कार्यकारी मंडळाचे सभासद हिंदुस्थानच्या राज्य-कारभाराचीं सर्व कामें वांटून घेतात. गव्हर्नर जनरलला नेहमीं बहु-मताप्रमाणें वागावें लागतें. शिस्त, शांतता, लोकहित वगैरे बाबींमध्यें प्रसंगविशेषीं कार्यकारी मंडळाचा निर्णय बंधनकारक नसतो. सुधारणा-कायद्यान्वयें प्रांतांना कांहींशी स्वायत्तता प्राप्त झाली आहे.

---

प्रश्नः—१. हिंदुस्थानसरकार म्हणजे काय? २. ग. ज. च्या जागेची थोडक्यांत माहिती द्या. ३. ग. जनरलला काय अधिकार असतात? ४. कार्यकारी मंडळ म्हणजे काय? ५. सुधारणांमुळें कार्यकारी मंडळांत काय फरक झाले? ६. या मंडळाची रचना देऊन कामकाज कसें चालतें तें सांगा. ७. कार्यमंत्री व ग. ज. यांचे परस्परसंबंध काय आहेत? हिं. सरकारच्या कामाची विभागणी कशी केली आहे व या खात्यांचीं कामें कशीं चालतात? ९. परराष्ट्रीय खातें व रेल्वेमंडळ यांवर टीपा द्या.

## ३. प्रांतिक सरकार

**१. प्रांतांची विभागणीः—**

ब्रिटिश हिंदुस्थानच्या राजकीय विभागास प्रांत म्हणतात. एकंदर प्रांत पंधरा असून त्यांचे वरिष्ठ व कनिष्ठ असे दोन वर्ग आहेत.

( १ ) **वरिष्ठ प्रांतः**—१ मद्रास, २ मुंबई, ३ बंगाल, ४ बिहार-ओरिसा, ५ संयुक्तप्रांत, ६ पंजाब, ७ ब्रम्हदेश, ८ आसाम व ९ मध्यप्रांत.

( २ ) **कनिष्ठ प्रांतः**—१ वायव्येकडील प्रांत, २ बलुचिस्तान, ३ कुर्ग, ४ अजमीर, ५ अंदमान, व ६ दिल्ली.

सुधारणांपूर्वी प्रांतांचे पांच वर्ग होते, ते सर्व नाहींसे करून हल्लीं वरील दोनच वर्ग केले आहेत. श्रेष्ठ प्रतीचे प्रांत गव्हर्नरच्या ताब्यांत असून बाकीचे चीफ कमिशनरच्या ताब्यांत आहेत.

**२. १९१९ च्या कायद्यापूर्वीः—**

सुधारणाकायद्यापूर्वीं प्रांतांचा राजकीय दर्जा काय होता तें खालील कोष्टकावरून स्पष्ट होईल.

| प्रांत | सरकार | | |
|---|---|---|---|
| १ मद्रास, मुंबई, बंगाल, | गव्हर्नर, कार्यकारी मंडळ | व | कायदेमंडळ |
| २ बहार-ओरिसा | ले. गव्हर्नर | ,, | ,, |
| ३ संयुक्तप्रांत, पंजाब, ब्रम्हदेश; | ,, | — | ,, |
| ४ मध्यप्रांत व आसाम; | चीफकमिशनर | — | ,, |
| ५ ब्रिटिश बलुचिस्तान, वायव्येकडील प्रांत व दिल्ली इत्यादि. | ,, | — | — |

**३. रेग्युलेशन व नॉनरेग्युलेशन प्रांतः**—मद्रास, मुंबई व बंगाल या तीन इलाख्यांमध्यें कंपनीनें प्रथम व्यापार सुरू करून मुलूख हस्तगत करण्यास प्रारंभ केला, म्हणून त्यांना राजकीयदृष्ट्या विशेषःमहत्व आलें आहे. येथील कारभार पार्लमेन्टच्या कायद्याप्रमाणें चालत असल्यामुळें त्यांना रेग्युलेशन प्रांत म्हणतात. परंतु पुढें ताब्यांत आलेल्या प्रांतांचा-

कारभार गव्हर्नर जनरलनें केलेल्या नियमान्वयें चालूं लागला, सबब त्यांना नॉन रेग्युलेशनप्रांत म्हणतात. ( १ ) हे प्रांत मागाहून ताब्यांत आल्यामुळें ते मागसलेले असत; सबब त्यांचे कायदे परिस्थित्यनुरूप निराळे बनले. ( २ ) शांतता प्रस्थापित करणें सोपें जावें म्हणून तेथें लष्करी अंमलदारांचा नेमणूक होई व त्यांना विशेष अधिकार दिलेले असत. ( ३ ) येथील प्रांताधिकाऱ्यांस चीफ कमिशनर व जिल्हाधिकाऱ्यास डेप्युटी कमिशनर म्हणतात. नवीन कायद्याप्रमाणें हे भेद हळूहळू कमी होत आहेत. मुंबई हा रेग्युलेशनप्रांत असून मध्यप्रांत व वऱ्हाड नॉन रेग्युलेशनपैकीं होय.

**४ इलाखे व इतर प्रांतांमधील गव्हर्नर**—इलाख्यांच्या गव्हर्नरांची नेमणूक बहुधा इंग्लंडमधील बड्या मुत्सद्यांमधून भारतमंत्र्याच्या शिफारशीवरून बादशहा करितात. त्यांचा पगार इतर गव्हर्नरांपेक्षां जास्त असतो. त्यांना भारतमंत्र्याशीं परस्पर पत्रव्यवहार करतां येतो व हिंदुस्थान-सरकारच्या विरुद्ध दादही मागतां येते. यांच्यावर वरिष्ठ सरकारचा ताबा कमी असून त्यांना आपल्या नोकरांची निवडणूक करण्यांत बरेंच स्वातंत्र्य असतें. त्यांच्या कार्यकारी मंडळामध्यें चार मंत्री असून तीन दिवाण असतात.

इतर प्रांतांतील गव्हर्नरांच्या नेमणुका गव्हर्नर जनरलच्या शिफारशीवरून बहुतेक येथील सनदी नोकरवर्गामधून होतात. त्यामुळें त्यांच्या कामावर गव्हर्नर जनरलची बरीच हुकमत चालते व त्यांचा पगारही कमी असतो. त्यांच्या कार्यकारी मंडळामध्यें दोन मंत्री व दोन दिवाण असतात. यांना भारतमंत्र्याशीं पत्रव्यवहार करणें झाल्यास गव्हर्नर जनरलच्या मार्फतच करावा लागतो.

**५. चीफ कमिशनरः**—गव्हर्नरांच्या सर्व प्रांतांमध्यें कार्यकारी मंडळें, दिवाण, व कायदेमंडळें असतात. परंतु चीफ कमिशनर हा गव्हर्नर जनरलच्या हाताखालील केवळ एक अधिकारी असतो. त्यामुळें त्याला फक्त वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हुकूम बजावावे लागतात. दुसरें, कनिष्ठ प्रतीचे प्रांत फार लहान किंवा मागसलेले असल्यामुळें, वरिष्ठ प्रतीच्या प्रांतां-

प्रमाणें ते स्वातंत्र्याचे हक्क उपभोगण्यास पात्र नाहींत असें समजलें जातें, सबब तेथें कार्यकारी व कायदे मंडळें इत्यादि संस्था नाहींत. कुर्ग प्रांताला मात्र नुकतेंच ( १९२३ ) कायदेमंडळ दिलें आहे. इतर प्रांतांतील कारभार एकतंत्री चालतो.

ब्रिटिश बलुचिस्तान व वायव्येकडील प्रांताच्या कमिशनरांचा आसपासच्या जातींशीं संबंध येतो; सबब ते गव्हर्नर जनरलचे तेथील एजंट या नात्यानें काम पहातात. यांच्यावर परराष्ट्रीय खात्याची हुकमत चालते. बाकीच्या कमिशनरांचा सर्व कारभार गृहखात्याच्या देखरेखीखालीं चालतो.

६. द्विदल राज्यपद्धति ( Dyarchy )—येथील लोकांना वसाहतीच्या स्वराज्याचे हक्क देण्यासारखी परिस्थिति नसल्यामुळें व जबाबदारी अंगावर घेऊन कामें करण्याचा अनुभव नसल्यामुळें राज्यकारभाराची सर्व जबाबदारी कायदेमंडळावर टाकणें अनर्थकारक होईल, असें पार्लमेंटला वाटून त्यांनीं ही जबाबदारी लोकांवर हलके हलके टाकून त्यांना प्रांतिक सरकारच्या द्वारें हें शिक्षण देण्याचा उपक्रम करण्याचें ठरविलें. हा उद्देश सिद्धीस नेतां यावा म्हणून प्रांतिक खात्यांचे सोंपींव व राखींव असे दोन भाग पाडले आहेत.

जाबाबदार राज्यपद्धतीला पोषक व जीं सुधारण्याकडे हिंदी लोकांचें लक्ष लागलें आहे अशीं शिक्षण, स्थानिक स्वराज्य वगैरे राष्ट्रसंवर्धक खातीं दिवाणांकडे सोंपविलीं असल्यामुळें त्यांना सोंपीव खातीं ( Transferred ) असें म्हणतात. बाकीच्यांची व्यवस्था सरकारनें स्वतःकडेच राखून ठेविली असल्यामुळें त्यांना राखींव खातीं ( Reserved ) म्हणतात. राखिव खात्यांबद्दल गव्हर्नर व त्याचें कार्यकारी मंडळ वरिष्ठ सरकारला जबाबदार असतें.

अशा प्रकारें प्रांतिक कारभाराचे सोंपींव व राखींव असे दोन भाग करण्यांत आले असल्यामुळें, या पद्धतीला द्विदल राज्यपद्धति म्हणतात. दोन्हीही खात्यांवर प्रांतिक गव्हर्नरची सारखीच देखरेख असते. हल्लीं प्रांतिक सरकार आपलें कायदेमंडळ व वरिष्ठ सरकार या दोघांनाही जबाबदार असतें.

७. प्रांतिक खात्यांची विभागणी:—

सोंपींव:—१ शिक्षण, वैद्यक, सार्वजनिक आरोग्य व उद्योगधंदे.

२ स्थानिक स्वराज्य व सार्वजनिक बांधकाम.

३ जंगल, अबकारी, शेतकी, सहकारी पेढ्या, नोंदणी वगैरे.

राखींव:—राजकीय खातें, जमीनमहसूल, इतर वसूल, न्याय, पोलीस, तुरुंग, कालवे, पाट-बंधारे, दुष्काळी कामें वगैरे.

स्थूल मानानें विभागणीची सर्वसाधारण रूपरेषा वरीलप्रमाणें आहे. कारण सर्व प्रांतांमध्यें राखींव व सोंपींव खातीं एकच नाहींत. प्रांतिक परिस्थितीप्रमाणें थोडे फार फरक आहेत. उदाहरणार्थ, मुंबई इलाख्यामध्यें जंगल खातें सोंपींव आहे, परंतु इतर सर्व प्रांतांमध्यें तें राखींव आहे. याशिवाय एकादें खातें सोंपींव असलें, तर तें सर्वच सोंपींव नसून त्यांतील कांहीं भाग राखीव असतो, व कांहीं तर मध्यवर्ती सरकारच्या ताब्यांत असतो. उदाहरणार्थ:—मुंबई इलाख्यांत शिक्षण सोंपींव आहे, परंतु त्यांत युरोपियन व अँग्लो इंडियन शिक्षणाचा समावेश होत नाहीं. एवढाच भाग राखींव आहे. नवीन विश्वविद्यालयासंबंधी कायदे करणें हिंदुस्थानसरकारच्या ताब्यांत आहे.

८. सुधारणा व प्रांतिक कारभार:—सुधारणाकायद्यानें लोकांना स्वराज्याचे हक्क देण्याचा जो उपक्रम प्रांतांमध्यें केला आहे, त्यांतील मुख्य महत्त्वाचा भाग म्हणजे खात्यांची विभागणी करून त्यांतील एक विभाग लोकनियुक्त दिवाणांचे ताब्यांत दिला हा होय. पूर्वीं लोकांचें किंवा कायदेमंडळाचें काम फक्त शिफारसवजा असे, व जमल्यास कार्यकारी सरकारावर वजन पाडण्याचा प्रयत्न केला जाई. हल्लीं सोंपींव खात्यांचा कारभार लोकमतानुवर्ती झाला आहे. राखींव खात्यांचा आणि वरिष्ठ सरकारचा सर्व कारभार पूर्वींप्रमाणेंच चालतो.

## कार्यकारी मंडळ.

९. रचना:—कार्यमंत्र्यांची संख्या श्रेष्ठ प्रतीच्या प्रांतांमध्यें चार व कनिष्ठ प्रतीच्या प्रांतांमध्यें दोन आहे. यांपैकीं निम्मे हिंदुस्थानसरकारचे

नोकरींतील अनुभविक व निम्मे हिंदुस्थानांतील सार्वजनिक आयुष्य-क्रमामध्यें बरींच वर्षें काम केलेले बिनसरकारी हिंदी गृहस्थ असतात. यांची नेमणूक भारतमंत्र्याच्या शिफारशीवरून बादशाहाकडून केली जाते. त्यांची मुदत पांच वर्षें असते.

१०. **कामाची शिस्तः**—गव्हर्नर कार्यकारीमंडळाचा अध्यक्ष असतो. त्याच्या गैरहजेरींत काम करण्याकरितां सभासदांपैकीं एकाची उपाध्यक्ष म्हणून योजना केलेली असते. बैठकींतील काम व्यवस्थेशीर व्हावें म्हणून शिस्तीचे नियम केलेले असतात. रोजचीं ठराविक कामें खात्याचा मंत्री निकालांत काढतो. परंतु प्रश्न महत्वाचा असल्यास किंवा मतभेद असल्यास तो गव्हर्नराकडे विचाराकरितां जातो व जरूर असल्यास मंडळाची सभाही भरते. गव्हर्नरला बहुमताप्रमाणें वागावें लागतें. सारखीं मतें पडल्यास गव्हर्नरला एक जादा मत असतें. मंडळाची एकादी सूचना शांतता, सुरक्षितता किंवा लोकहित यांला बाधक आहे असें गव्हर्नरास वाटल्यास मंडळाचा निकाल त्याला बंधनकारक होत नाहीं. मंडळानें सोडलेल्या हुकुमांस मंडळाच्या अनुमतीनें गव्हर्नरनें सोडलेले हुकूम असें म्हणतात.

११. **दिवाणः**—प्रांताच्या दर्जाप्रमाणें व सोंपींव खात्यांच्या कामाच्या मानानें दिवाणांची संख्या बदलते. इलाख्यामध्यें दिवाण तीन असतात, व इतर प्रांतांमध्यें दोनच असतात. प्रांतिक कायदेमंडळांतील लोकनियुक्त सभासदांपैकीं सोंपींव खात्यांची व्यवस्था पाहण्याकरितां सरकारनें नेमलेल्या सभासदांना दिवाण म्हणतात. त्यांची कामाची मुदत कायदेमंडळाच्या इतकी म्हणजे तीन वर्षांची असते. कायदेमंडळाला त्यांचा पगार ठरवितां येतो.

१२. **दिवाण व कायदेमंडळः**—दिवाण कायदेमंडळांतील लोकनियुक्त सभासदांपैकीं असल्यामुळें मंडळाचा त्याच्यावर विश्वास पाहिजे व मंडळाचें पुढारीपण पतकरण्याची योग्यता व वजन त्याच्या आंगीं पाहिजे. त्यानेंही शक्य तों कायदेमंडळाच्या धोरणानें वागलें पाहिजे. तात्विक दृष्ट्या दिवाण कायदेमंडळाला जबाबदार असतो; परंतु तो कायदेमंड-

ळाला जबाबदार असलाच पाहिजे असा नियम नाहीं. गव्हर्नर सोपींव व राखींव खात्यांबद्दल जबाबदार असल्यामुळें दिवाणाला आपला कारभार सुरळित चालावा म्हणून थोडेंफार गव्हर्नरच्या तंत्रानें वागावें लागतें. व तो लोकनियुक्त असल्यामुळें मतदार-संघालाही नाखूष करतां येत नाहीं, व कायदेमंडळांतील बहुमताचा पाठिंबा मिळविणें जरूर असल्यामुळें त्याला शक्य तों मंडळाच्या धोरणानें चालावें लागतें. कारण दिवाण मतदारसंघाच्या विरुद्ध वागला किंवा त्याचें काम लोकांना पसंत नसलें तर तो पुन्हां निवडून येत नाहीं; अगर त्याच्यावरील गैरविश्वास प्रदर्शित करण्याकरितां पगार कमी करण्याबद्दल ठराव येतो. त्यामुळें तो कदाचित राजीनामाहि देतो. मात्र त्यानें राजीनामा दिला नाहीं तर कायदेमंडळ त्याला काढून टाकूं शकत नाहीं.

या सुधारणा यशस्वी झाल्यास निदान सोंपींव खात्यांमध्यें तरी जबाबदार पद्धति सुरू झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. एकादा दिवाण निवडणुकीच्या वेळीं कायदेमंडळाचा सभासद नसेल तर त्याला सहा महिन्यांच्या आंत आपली निवडणूक करून घ्यावी लागते.

१३. गव्हर्नर व दिवाणः—चांगल्या तऱ्हेनें काम होण्याकरितां गव्हर्नर व दिवाण या दोघांमध्यें सहकार्य असणें आवश्यक आहे. दिवाणांची चूक होत असल्यास गव्हर्नरनें त्यांना योग्य सल्ला देऊन व प्रसंगविशेषीं जरूर ती मदत देऊन त्यांचें धोरण यशस्वी करून दाखविण्याविषयीं प्रोत्साहन दिलें पाहिजे. दिवाणांनाही लोकमताची पूर्ण जाणीव असल्यामुळें त्यांनीं गव्हर्नरला त्याची ओळख करून दिली पाहिजे व अशा तऱ्हेनें एकमेकांनीं एकमेकांस आपल्या माहितीचा व अनुभवाचा फायदा दिला पाहिजे. परंतु दोघांमध्यें अशा प्रकारचा सलोखा नसून तीव्र मतभेद असला तर दिवाण राजीनामा देऊन तरी मोकळा होतो, किंवा गव्हर्नर त्याला कामावरून दूर करतो. एकानें राजीनामा दिल्यानंतर दुसरा एखादा सभासद त्याची जागा घेण्यास तयार असला तर विशेष अडचण उत्पन्न होत नाहीं. परंतु विरोधविषयक प्रश्न फारच महत्वाचा असल्यास सर्वच दिवाण राजीनामे देतात, व त्यांना कायदे-

मंडळाची सहानुभूति असल्यास विकट परिस्थिति उत्पन्न होते. अशा वेळीं गव्हर्नरला कायदेमंडळ बरखास्त करणें भाग पडतें; व दुसऱ्या दिवाणांची नेमणूक होईपर्यंत सोंपींव खात्यांची व्यवस्था त्यालाच पाहावी लागते. परंतु पुन्हा निवडणूक होऊन तेच प्रतिनिधि निवडून आले तर मात्र गव्हर्नरला आपलें म्हणणें सोडून देऊन पूर्वीच्या दिवाणाचीच निवडणूक करणें भाग पडतें.

दिवाणांप्रमाणेंच गव्हर्नरची स्थिति मोठी बिकट असते. त्याच्यावर मोठी जबाबदारी असते. निरनिराळ्या राजकीय मतमतांतरांमध्यें न्यायानें वागून शक्य तों विरोध न माजूं देणें हें त्याचें मुख्य कर्तव्य आहे. दिवाणाला जर मंडळाचा पाठिंबा असेल तर गव्हर्नर त्याच्या कामामध्यें ढवळाढवळ करीत नाहीं; मात्र त्याचें धोरण राखींव किंवा मध्यवर्ती खात्याला बाधक, किंवा शांतता, लोकहित वगैरेच्या विरुद्ध नसलें पाहिजे

१४. **कार्यकारी मंत्री व दिवाणः**—साधारणतः दोघेही आपापला कारभार स्वतंत्रपणें पाहतात. परंतु सार्वत्रिक लोकहिताचे प्रश्न विचाराकरितां आल्यास किंवा कारभाराचें सामान्य धोरण ठरवावयाचें असल्यास दिवाण व कार्यमंत्री यांची संयुक्तसभा बोलाविली जाते; व गव्हर्नरच्या अध्यक्षतेखालीं सदर प्रश्नांचा खल होतो. सर्वांचें म्हणणें मांडून झाल्यावर दिवाण व कार्यमंत्री यांना आपापल्या मर्जीप्रमाणें मतें देतां येतात. अशा प्रकारच्या संयुक्त सभांचा मुख्य उद्देश, सर्वांनीं एकमतानें व सलोख्यानें वागून एकमेकांस शक्य ती मदत करावी आणि सल्ला द्यावा असा आहे. या दोघांकडून एकदिलानें काम करून घेण्यांतच गव्हर्नरचें खरें कौशल्य आहे. यांत ठरलेला प्रश्न राखींव खात्यांतील असल्यास त्या ठरावास, कार्यकारी मंडळाच्या अनुमतीनें गव्हर्नरनें केलेला ठराव, असें म्हणतात; व सोंपींव खात्यांतील असल्यास दिवाणाच्या अनुमतीनें गव्हर्नरनें काढलेला हुकूम किंवा केलेला ठराव असें म्हणण्याचा प्रघात आहे.

१५. **मुंबई सरकारच्या मंत्र्यांचीं नांवें**:—मुंबई इलाख्यांतील सध्यांचे कार्यमंत्री व दिवाण यांना त्यांच्याकडे असलेल्या कामांवरून पुढील-

प्रमाणें सरकारी रीतीनें नांवें देण्यांत आलीं आहेत.

**कार्यमंत्री**:—वसुलीमंत्री, गृहमंत्री, फडणवीस व सर्वसाधारण खात्यांचा मंत्री.

**दिवाण**:—स्थानिक स्वराज्य खात्याचे दिवाण, जंगल व अबकारी खात्याचे दिवाण, शिक्षणखात्याचे दिवाण.

१६. **वरिष्ठ सरकारचें प्रांतिक सरकारवरील नियंत्रण**:—वरिष्ठ सरकार या नात्यानें हिंदुस्थानसरकारला प्रांतिक सरकारच्या राखींव व सोंपींव खात्यांवर देखरेख करण्याचा पूर्ण अधिकार आहे. परंतु व्यवहारामध्यें जोंपर्यंत प्रांतिक कारभार हिंदुस्थानसरकारला बाधक होत नाहीं, तोंपर्यंत प्रांतांना आपापल्या मर्जीप्रमाणें वागण्याची पूर्ण मुभा आहे. सोंपींव खात्यांविषयीं हिंदुस्थानसरकारचे हक्क फार मर्यादित आहेत. दिवाणांचें काम हिंदुस्थानसरकारच्या किंवा इतर प्रांतांच्या कारभाराला बाधक किंवा विरोधी नसलें तर तें कायदेमंडळाच्या तंत्राप्रमाणें चालतें. व त्यांत वरिष्ठ अधिकारी हात घालीत नाहींत.

जबाबदार पद्धतीचीं तत्वें लोकांच्या अंगवळणीं पडून ते सरकारवर आपल्या मताची छाप पाडूं लागेपर्यंत वरिष्ठ सरकारचें प्रांतिक कारभारावर नियमन असणें अत्यंत जरूर आहे. ज्याप्रमाणें गव्हर्नर जनरलवर भारतमंत्र्याचें नियंत्रण जरूर आहे, त्याचप्रमाणें वरिष्ठ सरकारची देखरेख प्रांतिक सरकारवर असणें जरूर आहे.

१७. **चिटणीस कचेरी** (Secretariate):—प्रत्येक मंत्र्याला व दिवाणाला एक चिटणीस असतो. कायदेमंडळामध्यें दिवाणावर प्रश्नांचा भडिमार होत असतो. त्यांचीं उत्तरें देण्याकरितां लागणारी माहिती चिटणीस गोळा करतो. शिवाय कारभारासंबंधीं सर्व प्रश्नांचीं योग्य माहिती मिळवून, कागदपत्र तयार करून प्रकरणें मंडळापुढें किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढें निकालाकरितां किंवा चर्चेकरितां ठेवणें हें चिटणीसाचेंच काम असतें. चिटणीसाला मदतनीस अधिकारी असतात व त्यांच्या हाताखालीं नोकरवर्गही असतो. '**चिटणीस-कचेरी**' म्हणून यांची एक

मोठी कचेरी असते. अंमलबजावणी--सरकारचीं (Executive) सर्व कामें या कचेरींत होतात.

याशिवाय खात्यानिहाय निरनिराळे अधिकारी असतात. सोपींव खात्यांमधील अधिकाऱ्यांच्या नेमणुका दिवाण करतात. त्यांच्यावरच त्यांच्या खात्यांतील व्यवस्थेची व कारभाराची सर्व जबाबदारी असते. उदाहरणार्थ, जंगल-खात्याचा कान्झरव्हेटर, शिक्षणाचा डायरेक्टर, सार्वजनिक बांधकाम-खात्याचा (P. W. D.) मुख्य एंजिनियर, वैद्यक खात्याचा मुख्य सर्जन, आरोग्यखात्याचा डायरेक्टर व तुरुंगांचा इन्स्पेक्टर जनरल. असे प्रत्येक खात्याचे स्वतंत्र अधिकारी आहेत. या प्रत्येकांना जिल्ह्यानिहाय मदतनीस अधिकारी असतात. याशिवाय कलेक्टरचा ताबा तर सर्व खात्यांवरच चालतो.

१८. **सारांश**:—एकंदर प्रांत १५ असून त्यांतील ९ वर गव्हर्नर व ६ वर चीफ कमिशनर हे मुख्य अधिकारी असतात. गव्हर्नरच्या प्रांतांमध्यें कार्यकारी मंडळ, दिवाण व कायदेमंडळ असतें. परंतु चीफ कमिशनर हा एकटाच असतो. प्रांतिक खात्यांची राखींव व सोपींव अशी विभागणी केली आहे. राखींव मंत्र्याच्या ताब्यांत व सोपींव दिवाणांच्या ताब्यांत असतात. गव्हर्नर जनरलची व गव्हर्नरची आपल्या कार्यकारी मंडळाशीं वागण्याची पद्धति सारखीच असते. प्रत्येक खात्याचा एकेक चिटणीस, त्याच्या मदतीस एक दुय्यम चिटणीस व त्याच्या हाताखालीं नोकरवर्ग असतो. हे लोक अंमलबजावणी-सरकारच्या सर्व कामकाजाचीं प्रकरणें तयार करून ठेवितात. या कचेरीला 'चिटणीस-कचेरी' असें म्हणतात. याशिवाय प्रत्येक खात्याची व्यवस्था पाहणारा एकएक बडा अधिकारी असतो.

सुधारणेच्या कायद्यानें प्रांतांमध्येच लोकांना हक्क देण्यास सुरवात झाली आहे. सोंपींव खात्यांची व्यवस्था लोकांच्या हातीं देण्यांत आली. कार्यकारी मंडळामध्यें हिंदी सभासदांची संख्या वाढविण्यांत आली. दिवाणांच्या नेमणुका झाल्या. यावरून प्रांतिक कारभारामध्यें हिंदी लोकांचें प्रमाण बरेंच वाढलें आहे असें दिसून येतें. सध्यांचा उपक्रम

यशस्वी झाल्यास हलके हलके पूर्ण जबाबदार पद्धति सुरू करण्याचें अभिवचन मिळालेलें आहे.

---

प्रश्नः—१. सुधारणांमुळें प्रांतांच्या राजकीय दर्जामध्यें काय फरक झाले? २. इलाख्यांचे व इतर प्रांतांचे गव्हर्नर यांच्या दर्जामध्यें काय फरक आहेत? ३. १९१९ पासून खातेंविभागणी कशी करण्यांत आली आहे? ४. हिंदुस्थानसरकारच्या ताब्यांतील खातीं कोणतीं? ५. सुधारणांमुळें प्रांतिक कारभार लोकमतानुवर्ती झाला तो कसा? ६. प्रांतांतील कार्यकारी मंडळाची रचना सांगून तेथें काय कामकाज चालतें तें लिहा. ७. दिवाण म्हणजे कोण व त्यांचे अधिकार काय असतात? ८. दिवाणांचें कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांचें काय नातें आहे? ९. गव्हर्नर व दिवाण यांचे परस्पर काय संबंध आहेत? १०. चीफ् कमिशनर, चिटणीस—कचेरी व द्विदल राज्यपद्धति यांवर टीपा लिहा.

---

## ४. प्रांताचे विभाग व जिल्हे यांची राज्यव्यवस्था.

### कमिशनर

१. भाग (Division):--पांच सहा जिल्ह्यांच्या गटाला इलाख्याचा भाग म्हणतात. मुंबई इलाख्याचे मध्यभाग, उत्तरभाग, दक्षिणभाग, व सिंध असे चार भाग आहेत. मध्यप्रांताचेही चारच भाग असून वऱ्हाड हा पांचवा भाग आहे.

२. अधिकारः—प्रत्येक भागावर कमिशनर नांवाचा अधिकारी असतो. याचें काम आपल्या भागांतील जिल्ह्यावर व कलेक्टरवर देखरेख करण्याचें असतें. याला जमिनीचा सारा व मुलकी बाबीशिवाय इतर बाबतींत मुळींच अधिकार नसतात. जमिनसाऱ्याबाबत कलेक्टरच्या निकालावर याजकडे दाद मागतां येते. दुष्काळांत रयतेला साऱ्याची सूट देणें, वसूली तहकूब करणें, तगाई देणें वगैरे अधिकार याला दिलेले आहेत. भागां-

तील म्युनिसिपालिटया व लोकलबोर्डें यांवर याचा ताबा असतो. कलेक्टर-कडून सरकारकडे जाणारीं पत्रकें वगैरे याच्या मार्फत जातात.

कलेक्टरकडे जमीनसारा व इतर सर्वच खातीं असतात. परंतु कमिशनरकडे फक्त जमीनमहसूलासंबंधींच काम असल्यामुळें त्याचा दर्जा जरी वरिष्ठ प्रतीचा असला तरी त्याचे अधिकार व सत्ता हीं कलेक्टरच्यामानानें फारच मर्यादित असतात.

मुंबईशिवाय इतर प्रांतांमध्यें वसूलाची व्यवस्था एका मंडळाकडे ( Board of Revenue ) असते. या मंडळाचा भागाच्या कमिशनरवर फक्त वसूलाच्या बाबतींत ताबा चालतो. मद्रासमध्यें कमिशनर नसल्यामुळें मंडळाचे सभासदच सर्व काम पाहतात.

३. सिंधचा कमिशनरः—सिंधप्रांताच्या कमिशनरकडे इतर कमिशनरप्रमाणें फक्त जमीनमहसूल किंवा जमिनीसंबंधींच कामें नसून मुंबई सरकारनें त्याला अंमलबजावणीचे कांहीं हक्क दिलेले आहेत.

5720

## कलेक्टर.

४. जिल्हाः—राज्यकारभाराच्या सोईकरितां प्रांतांचे भाग केलेले आहेत. एका विभागामध्यें पांच सहा जिल्हे असतात. जिल्ह्याच्या विभागास 'तालुका किंवा तहसील' म्हणतात. अनेक खेडगांवांचा एक तालुका बनतो. ब्रिटिश हिंदुस्थानांत अजमासें २६७ जिल्हे आहेत. प्रांताच्या खालोखाल 'जिल्हा' फार महत्त्वाचा गणला जातो. वरिष्ठ व प्रांतिक सरकारासंबंधीं खेडेगांवांतील लोकांना मुळींच कल्पना नसते. कारण त्यांचा सर्व संबंध तालुक्याचा मुख्य अधिकारी मामलेदार किंवा जिल्ह्याचा अधिकारी कलेक्टर यांच्याशींच येतो. मध्यप्रांतांत जिल्ह्याच्या अधिकाऱ्यास डेप्युटी कमिशनर म्हणतात व तालुक्याच्या अधिकाऱ्यास तहशीलदार म्हणतात.

५. कलेक्टरचे अधिकार व कर्तव्यें:—जिल्ह्याचा मुख्य अधिकारी कलेक्टर हा भारतीय सनदी नोकरवर्गापैकीं असतो. जिल्ह्यामध्यें सरकारचा प्रतिनिधि हाच असतो. त्यामुळें त्याचें काम मोठें महत्त्वाचें असतें.

सरकारी खजिन्याबद्दल सर्व जबाबदारी याच्यावरच असून बहुतेक सर्व खात्यांच्या कारभारावर याला देखरेख ठेवावी लागते.

कलेक्टर म्हणजे वसूल गोळा करणारा अधिकारी असल्यामुळें त्याचा जमिनीशीं निकट संबंध येतो. जमिनीच्या वांटण्या, हक्कनोंदणी, विक्री, जमीनदार व कुळें वगैरेसंबंधीं सर्व गोष्टी यानेंच पहावयाच्या असल्यामुळें प्रत्यक्ष शेतकरीवर्गामध्येंच याचा काळ जातो. शेतकरी व सरकार यांचे हितसंबंध नीट ठेवणारा हाच अधिकारी आहे. पिकांची आणेवारी करणें, शेतकऱ्यांस तगाई देणें व त्यांना हरएक बाबींत मदत करणें हीं कामें कलेक्टरवरच सोंपविलेलीं असतात.

तो पहिल्या दर्जाचा मॅजिस्ट्रेट असल्यामुळें गुन्ह्यांची चौकशी करणें, गुन्हेगारांना शासन करणें आणि पोलिसवर योग्य वचक ठेवून व गुन्हे कमी करून शांतता राखणें वगैरे फौजदारी कामेंही याजकडे असतात.

यांशिवाय म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें वगैरे स्थानिक स्वराज्य-संस्थांना योग्य वळण लावून त्यांच्यावर ताबा ठेवण्याचें कामही याला करावयाचें असतें.

अशा प्रकारचीं अनेकविध कामें याजकडे असल्यामुळें जिल्ह्यांतील परिस्थिति समजावून घेण्याकरितां व निरनिराळ्या लोकांशीं समक्ष विचार-विनिमय करून त्यांच्या अडचणींची प्रत्यक्ष माहिती करून घेण्याकरितां दरवर्षीं कलेक्टरसाहेबांचा जिल्ह्यामध्यें दौरा निघतो.

**६. न्याय व अंमलबजावणी:**—कलेक्टरला अंमलबजावणीचें व मॅजिस्ट्रेट या नात्यानें न्याय देण्याचें हीं दोन्हीं कामें करावीं लागतात. गुन्हेगार शोधून काढून त्याच्यावर खटला भरून आरोप शाबीत करण्याचें कामही त्याचेंच व पुराव्याच्या खरेखोटेपणावरून शिक्षा देण्याचेंही काम त्याचेंच. हीं दोन्हीं कामें न्यायाच्या दृष्टीनें एकाच अधिकाऱ्याकडे असणें बरें नाहीं. सबब न्याय व अंमलबजावणी यांची फारकत करून न्याय देण्याचें काम न्यायाधीशानें करावें असें लोकमत आहे. परंतु सरकारच्या बाजूनें हल्लींच्या व्यवस्थेच्या समर्थनार्थ बरेच मुद्दे मांडले जातात. त्यांपैकीं कांहीं खालीं दिले आहेत:—

( १ ) अद्यापपर्यंत याच पद्धतीनें काम बिनतक्रार चाललें आहे.

( २ ) दोन्ही कामें एकाकडे असल्यामुळें काटकसर होते.

( ३ ) मॅजिस्ट्रेट कोर्टांमधील कामावर जज्ज व हायकोर्ट यांची देखरेख असते.

( ४ ) कलेक्टरचा लोकांवर वचक बसतो. त्यानें उच्च प्रकारचें शिक्षण घेतलेलें असल्यामुळें त्याचें काम बहुतेक निःपक्षपातीपणानें चालतें.

( ५ ) न्याय देण्याकरितां लोकांच्या चालीरीती, राहणी, समजुती वगैरे माहिती जरूर पाहिजे व ती कलेक्टरला असते.

या वादग्रस्त प्रश्नांचा बरेच दिवस सरकार विचार करीत आहे.

७. **कलेक्टर व प्रांतिक सरकारः**—अशा प्रकारें जिल्ह्यामध्यें कलेक्टरची सत्ता अमर्याद व अनियंत्रित अशी दिसते. परंतु आपल्या अधिकाराचा त्याला वाटेल तसा उपयोग करतां येत नाहीं. कलेक्टरनीं कसें वागावयाचें वगैरेसंबंधीं प्रांतिक सरकारनें हरएक बाबतींत नियम केलेले असतात, व सर्वसामान्य धोरण ठरविलेलें असतें. त्याच्याबाहेर त्याला जातां येत नाहीं. याशिवाय प्रांतिक सरकारकडे त्याला वारंवार आपल्या कारभारासंबंधीं माहिती पुरवून वार्षिक अहवालही धाडावे लागत असल्यामुळें वरिष्ठ अधिकाऱ्यांना कारभाराची कल्पना येते. त्याच्यावर जरी अशा प्रकारचा दाब असला तरी जिल्ह्यामध्यें प्रत्यक्ष काम करणारा अधिकारी तोच असल्यामुळें साहजिकच सरकारचा त्याच्यावर जास्त विश्वास असतो. जमिनमहसूल, शेतकी, स्थानिक स्वराज्य वगैरे बाबींमध्यें त्याच्यावर कमिशनरची सत्ता चालते.

रयतेच्या गाऱ्हाणीं कलेक्टरतर्फे सरकारला कळतात. या दृष्टीनें रयत व सरकार यांचेमधील कलेक्टर हा एक दुवाच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

८. **जिल्ह्यांतील इतर अधिकारीः**—जिल्ह्यामध्येंही प्रांताप्रमाणेंच खात्यांचे निरनिराळे स्वतंत्र अधिकारी नेमलेले असतात. कलेक्टरची सर्व खात्यांवर देखरेख असते व हे अधिकारी त्याला मदत करतात.

जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांचीं खातेवार नांवें:—पोलीस—सुपरिन्टेंन्डेन्ट; शिक्षण—डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर; वैद्यक व आरोग्य—सिव्हिल सर्जन; सार्वजनिक रस्ते वगैरे ( P. W. D. )—एक्झिक्यूटिव्ह एंजिनियर; जंगलखातें—डिव्हिजनल ऑफिसर. यांशिवाय इतर खात्यांचे इन्स्पेक्टर असतात. न्यायखात्याचा मुख्य न्यायाधीश हा स्वतंत्र अधिकारी असतो.

## मामलेदार व गांवकामगार.

९. **जिल्ह्याचे भाग व तालुका**:—तालुक्यावरील मुख्य अधिकारी **मामलेदार** किंवा **तहसीलदार** असतो. याला कलेक्टरप्रमाणें तालुक्यापुरते सर्व प्रकारचे अधिकार असून तो पहिल्याप्रतीचा मॅजिस्ट्रेट असतो.

तीन चार तालुके मिळून एक भाग समजला जातो. यावर **असिस्टंट** किंवा **डेप्युटी कलेक्टर** म्हणून त्या भागांतील मामलेदारांवर देखरेख करणारा अधिकारी असतो. मध्यप्रांतांत यांना असिस्टंट कमिशनर व एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर म्हणतात.

१०. **खेडेगांव**:—तालुक्यामध्यें अनेक खेडीं असतात. प्रत्येक खेड्यामध्यें पाटील, कुलकर्णी, चौकीदार वगैरे अधिकारी असतात. कुलकर्ण्यालाच तलाठी, पटवारी वगैरे म्हणतात.

**पाटील**:—हा खेड्यांतील मुख्य असून जमिनीवरील साऱ्याचा वसूल करून त्याचा तालुक्याच्या खजिन्यांत भरणा करितो. खेडेगांवांत शांतता राखण्याचें काम याचेंच असतें. कांहीं ठिकाणीं त्याला लहानसहान खटलेही चालवितां येतात, आणि गैरवर्तनाबद्दल १ रुपयापर्यंत दंड व २४ तास अटक करण्याचे अधिकार दिलेले असतात.

**कुलकर्णी**:—हा हिशोब ठेवणारा कारकून असून शेतकऱ्यांचे जमिनीवरील हक्क दाखविणारीं पत्रकें तयार करणे, सरकारी सारा वगैरेचा हिशेब ठेवणें इत्यादि कामें करतो.

**चौकीदार**:—म्हणजे खेड्यांतील पोलीस होय. कांहीं खेड्यांमध्यें आसपास दरारा बसविण्याकरितां, शांतता राखण्याकरितां आणि लोकांच्या

मालमत्तेच्या रक्षणाकरितां मधूनमधून पोलीसचौक्या बसविलेल्या असतात.

११. **पंचायत:**—गांवांतील पांच किंवा जास्त लोकांची ही एक संस्था असते. प्राचीनकाळीं खेडें पूर्णपणें स्वतंत्र असे, व त्यांतील लोक आपली सर्व व्यवस्था पहात. देशावर अनेक परचक्रें आलीं, राजघराणीं उदयास आलीं व अस्तास गेलीं; परंतु गांवगाडा बरेच काळपर्यंत सुव्यवस्थित चालू राहिला. याचें सर्व श्रेय ग्रामपंचायत संस्थेस दिले पाहिजे. खेडेगांवांसबंधीं नियम करणें, त्यांचा अंमल करणें, तंटयांचा निकाल देणें, सार्वजनिक कामें करणें, आरोग्य, शिक्षण वगैरेंची सोय करणें हीं सर्व कामें हीच संस्था करी.

१२. **सारांश:**—प्रांताचे मुख्य विभाग जिल्हे होत. यांवराल मुख्य अधिकारी कलेक्टर असतो. हाच सरकारचा मुख्य प्रतिनिधि असल्यामुळ त्याला पुष्कळ अधिकार असतात. प्रांतिक सरकारच्या हुकुमाप्रमाणे त्याला चालावें लागतें. कलेक्टरला जिल्ह्यांतील सर्व प्रकारचीं कामें पहावयाचीं असल्यामुळें त्याला मदत करण्याकरितां निरनिराळे अधिकारी असतात. तो पहिल्या दर्जाचा मॅजिस्ट्रेट असतो. मुलकी व फौजदारी खटले त्यालाच चालवावयाचे असतात. शेतसारा गोळा करणें व शेतीसंबंधीं व्यवस्था पाहणें हीं त्याचीं मुख्य कामें होत. कामाच्या सोयीकरतां जिल्ह्याचे भाग केलेले असतात, त्यांना 'तालुके' म्हणतात. यांवर मामलेदार हा मुख्य अधिकारी असतो. चार पांच तालुके मिळून एक भाग होतो, तो 'डेप्युटी किंवा असिस्टंट कलेक्टरचे' ताब्यांत असतो.

पांच सहा जिल्हे मिळून एक भाग होतो. त्यांवर 'कमिशनर' हा मुख्य अधिकारी असतो. त्याचें काम फक्त शेतकी, सारावसुली वगैरेसबंधीं असतें. सिंधच्या कमिशनरची सत्ता इतर कमिशनरपेक्षां जास्त आहे.

---

प्रश्न:—१. तुमच्या जिल्ह्याचा कारभार कसा चालतो ? २ कलेक्टरच्या कामाची थोडक्यांत कल्पना सांगा. ३ जिल्ह्यांतील पांच मुख्य

अधिकाऱ्यांचीं नांवें द्या. ४ न्याय व अंमलबजावणी यांची फारकत होणें जरूर आहे असें म्हणतात, तें कां? ५ प्रांतिक सरकारचें कलेक्टरवर नियंत्रण कसें चालतें? ६ खेडेगांवच्या व्यवस्थेची कल्पना द्या. ७ गांव-पंचायत व कमिशनर यांवर टीपा द्या.

---

## ५. वरिष्ठ कायदेमंडळ.

१. **प्रास्ताविकः**—आतांपर्यंत हिंदुस्थानसरकार व प्रांतिक सरकार यांचीं अंमलबजावणीचीं कामें कशीं चालतात हें पाहिलें. अंमलबजावणी कशी करावयाची तें कायदेमंडळांनीं कायदे करून ठरविलेलें असतें. निरनिराळ्या कायद्यांना अनुसरून हें राज्ययंत्र बिनधोकपणें चालतें. कोणती गोष्ट करणें योग्य व कोणती अयोग्य हें कायद्यानें ठरलेलें असतें. राज्यघटनेचा व सर्व शासनपद्धतीचा मूळ पाया जो कायदा तो कसा केला जातो, व ज्या संस्थांमध्यें तो केला जातो तीं कायदेमंडळें काय आहेत, त्यांचें कामकाज कसें चालतें, वगैरे गोष्टींची माहिती करून घेणें जरूर आहे.

२. **इतिहासः**—ऐतिहासिक उपोद्घातामध्यें याचें पूर्ण विवेचन केलें आहे ( भाग १, ३. )

३. **हिंदुस्थानांतील कायद्यांचे प्रकारः**—देशांत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठीं कायदे करणें, हें कोणत्याही सरकारचें एक मुख्य कर्तव्य आहे. येथील कायद्यांचे चार वर्ग पडतात:—

१ पार्लमेंटनें हिंदुस्थानाकरतां केलेले कायदे. २ वरिष्ठ व प्रांतिक कायदेमंडळांनीं केलेले कायदे. ३ गव्हर्नर जनरलनें काढलेले वटहुकूम. हे सहा महिनेपर्यंत कायदे म्हणूनच समजले जातात. ४ ब्रिटिश बलुचिस्थान, सरहद्दीवरील प्रांत वगैरे मागसलेल्या व रानटी मुलुखाकरितां गव्हर्नर जनरलनें केलेले नियम. पार्लमेंटच्या कायद्यानें स्थूलमानानें राज्यकारभाराचें धोरण ठरविलें जातें; परंतु अंतर्व्यवस्थेसंबंधीं सर्व कायदे-

कानू देशांतील कायदेमंडळांतच केले जातात. ३ व ४ हे हंगामी असून चवथ्या प्रकारचे तर केवळ स्थानिक महत्त्वाचे आहेत.

४. ज्या सभांमध्यें कायदे केले जातात, त्यांना कायदेमंडळें म्हणतात. कायदेमंडळाचे ' **वरिष्ठ व प्रांतिक** ' असे दोन प्रकार आहेत.

## वरिष्ठ कायदेमंडळ ( India's Parliament )

५. १९१९ च्या सुधारणा अमलांत येण्यापूर्वी हिंदुस्थानसरकारचे मध्यवर्ती कायदेमंडळ एकेरी होतें व त्यास वरिष्ठ कायदेमंडळ ( Imperial Legislative Council ) असें म्हणत: सुधारणाकायद्यानें इंग्लंडमधील पार्लमेंटच्या धर्तीवर या मंडळाच्या जागीं हल्लीं एक **वरिष्ठ सभा** ( Council of State ) व दुसरी ' **लोकसभा** ' ( Legislative Assembly ) अशा दोन सभा स्थापन केल्या आहेत. सांप्रत हिंदुस्थानसरकारच्या कायदेमंडळाचीं मुख्य तीन अंगें आहेत:-१ गव्हर्नर जनरल, २ वरिष्ठसभा, व ३ लोकसभा. कोणतेंही बिल पास व्हावयाचें म्हणजे या तिघांची संमति पाहिजे.

६. **वरिष्ठ सभा**:--( The Council of State ) या सभेमध्यें एकंदर ६० सभासद असून त्यांपैकीं ३३ लोकनियुक्त व २७ सरकारनियुक्त असतात. सरकारनियुक्त सभासदांपैकीं २० पेक्षां जास्त सरकारी अधिकारी वर्गांपैकीं नसावेत असा निर्बंध आहे. बाकीच्या ७ सरकारनियुक्तांपैकीं एक वऱ्हाडतर्फे असतो. वऱ्हाडप्रांत निजामचा, परंतु ब्रिटिश सरकारकडे निरंतर वहिवाटीस असल्यामुळें त्या प्रांततर्फे मतदारांनीं निवडून दिलेला सभासदच सरकारनियुक्त असतो. म्हणजे त्याच्या निवडणुकीस गव्हर्नर जनरलची संमति लागते. लोकसभेंत सुद्धां सरकारनियुक्त व लोकनियुक्त सभासद एकच असतो. मुंबई इलाख्यातर्फे सरकारनियुक्त २ आणि लोकनियुक्त ६ सभासद असतात. प्रत्येक पांच वर्षांनीं ह्या सभेची निवडणूक होते. या सभासदांना ' नामदार ' ( Honourable ) ही पदवी आहे.

लोकनियुक्त सभासदांची प्रांतवार विल्हेवारी:—मद्रास ५, मुंबई ६,

बंगाल ६, संयुक्तप्रांत ५, पंजाब ४, बहार-ओरिसा ३, ब्रम्हदेश २, मध्यप्रांत १, व आसाम १; एकंदर ३३.

मुंबई इलाख्यांतील सभासदांची विल्हेवारी:—मुसलमानेतर ३, सिंधी मुसलमान १, इतर मुसलमान १, चेंबर-ऑफ-कामर्स १; एकंदर ६.

७. **लोकसभा** (The Legislative Assembly):—या सभेमध्यें हल्लीं १४४ सभासद असून त्यांपैकीं १०३ लोकनियुक्त आहेत. बाकीच्या ४१ सरकारनियुक्तांपैकीं २६ सरकारी नोकर असतात. लोकनियुक्तांपैकीं मुंबईतर्फे १६ व मध्यप्रांतातर्फे ५ असतात. या सभेंत लोकनियुक्तांची संख्या एकंदर संख्येच्या ५/७ पेक्षां कमी नसते. सभेची निवडणूक प्रत्येक ३ वर्षांनीं होते. यांतील सभासदांना एम्. एल्. ए. (Member, Legislative Assembly) असें म्हणतात. वरिष्ठसभा व लोकसभा प्रसंगविशेषीं बरखास्त करण्याचा किंवा त्यांची मुदत वाढविण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला आहे.

लोकनियुक्त सभासदांची प्रांतवार विल्हेवारी:—मद्रास १६, मुंबई १६, बंगाल १७, संयुक्तप्रांत १६, पंजाब १२, बहार-ओरिसा १२, मध्यप्रांत ५, आसाम ४, ब्रम्हदेश ४, व दिल्ली १; एकंदर १०३.

८. **मतदार**:—वरिष्ठसभा व लोकसभा यांच्या मतदानाच्या अटी निरनिराळ्या प्रकारच्या आहेत. मतदार कमींत कमी २१ वर्षे वयाचा, वेडा नसलेला, मतदारसंघाच्या हद्दींत वास्तव्य असून मतदारांच्या यादींत दाखल केलेला ब्रिटिश प्रजाजन पाहिजे. याशिवाय 'घरभाडें, मालमत्ता, साऱ्याचें प्रमाण, प्राप्तीवरील कर, खेड्यांतील किंवा शहरांतील स्थानिक संस्थांचे कर वगैरेवरून मतदारांची लायकी ठरविली जाते.

ह्या अटी सर्वसामान्य मतदारांच्या झाल्या. निरनिराळ्या मंडळांच्या मतदारांची लायकी वर सांगितलेल्या गोष्टींच्या कमजास्त प्रमाणावर अवलंबून आहे.

लोकसभेच्या मतदारांची लायकी:—मतदार (१) प्राप्तीवरील कर देणारा, (२) वार्षिक ७५ रुपये सारा भरणारा [ रत्नागिरी, पंचमहाल

वगैरे ठिकाणीं ३७॥ रुपये ] असला पाहिजे. मध्यप्रांत व वऱ्हाडांत कमींत कमी ९० रुपये सारा देणारास मतदानाचा हक्क आहे. ( ३ ) व्यापारी, जमीनदार, इनामदार वगैरे विशिष्ट मतदारसंघातर्फे उभे राहिलेल्या उमेदवारांस मत देण्याचा अधिकार त्या त्या संघाच्या सभासदांस असतो.

वरिष्ठ सभेच्या मतदारांची लायकीः—मतदार ( १ ) ३०,००० किंवा जास्त रुपये उत्पन्नावर कर देणारा, ( २ ) २००० रुपये शेतसारा भरणारा, ( ३ ) जहागिरदार अगर मोठा इनामदार, ( ४ ) लोकलबोर्ड किंवा म्युनिसिपालिटींचा बिनसरकारी अध्यक्ष अगर उपाध्यक्ष, ( ५ ) विश्वविद्यालयाचा सभासद, महामहोपाध्याय किंवा शमसुलउल्मा पदवी धारण करणारे पंडित, ( ६ ) वरिष्ठ किंवा प्रांतिक कौन्सिलचा सभासद, यांपैकीं कोणी तरी असला पाहिजे.

उमेदवार ज्या कायदेमंडळाकरितां उभा रहात असेल त्या मंडळाच्या मतदाराची लायकी त्याला असून, त्याचें वय २५ किंवा अधिक पाहिजे. त्याचप्रमाणें तो दिवाळखोर किंवा सनद रद्द झालेला वकील नसावा. स्त्रियांनाहि उमेदवार म्हणून उभे राहण्याचा हक्क नुकताच ( १९२६ मे ) देण्यांत आला आहे.

९. दोन सभांची तुलनाः—वरिष्ठ सभेकरितां मत देण्याचा अधिकार असणारीं माणसें लोकसभेच्या मतदारांपेक्षां वरच्या दर्जाचीं असतात. हे सर्व मतदार बहुतेक जमीनदार, जहागिरदार, इनामदार किंवा स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्यें बराच अनुभव आलेले असे असतात. म्हणूनच बड्या सभेचे मतदार १७००० आहेत, परंतु लोकसभेचे ९१००० आहेत. वरिष्ठ सभेचा संबंध बहुतेक बड्या दर्जाच्या घराण्यांशींच येतो. या सभेची तुलना इंग्लंडांतील पार्लमेंटच्या उमरावसभेशीं

---

**टीपः**—या व पुढील प्रकरणीं मताधिकारासंबंधीं दिलेल्या अटी मुंबई इलाख्याला लागू आहेत. प्रांतानिहाय यांमध्यें थोडेफार फरक आहेत.

करतां येण्यासारखी आहे. परंतु इंग्लंडमधील उमराव वंशपरंपरागत असतात व हे सभासद निवडून आलेले असतात, हा मोठाच फरक आहे. ह्या लोकांचे हितसंबंध बऱ्याच जबाबदारीचे असल्यामुळें त्यांना कोणतीहि नवीन गोष्ट एकदम करणें कठीण वाटतें, आणि त्यामुळें ते बहुतेक पुराणवादीच असतात.

लोकसभेशीं संबंध येणारे बरेचसे लोक मध्यम वर्गांतील असतात. नवीन सुधारणा भराभर घडवून आणाव्या अशा प्रकारची त्यांची मनोवृत्ति असते. इंग्लिश पार्लमेंटमधील प्रतिनिधिसभेशीं हिची तुलना करतां येईल. दोन सभा असल्यामुळें त्यांमध्यें देशांतील सर्व पेशांच्या लोकांचा अंतर्भाव होतो.

**१०. वरिष्ठ सभा निर्माण करण्याचा हेतुः**—वर सांगितल्याप्रमाणें पूर्वी वरिष्ठ कायदेमंडळ नामक एकच संस्था असे. परंतु पार्लमेंटच्या धर्तीवर हल्लीं दोन संस्था निर्माण करण्यांत आल्या आहेत. त्यामुळें त्यांचें एकमेकांवर नियंत्रण राहून अविचारानें, घाईनें किंवा केवळ एकाद्या विशिष्ट पक्षाचें बहुमत झाल्यामुळें कोणताही कायदा मंजूर होण्याचा संभव नसतो. लोकसभेनें कितीही उचल केली, तरी वरिष्ठ सभा जुन्या मताची अभिमानी असल्यामुळें काम बहुतेक संथपणें व पोक्तपणें चालतें. त्यामुळें सरकारच्या धोरणास कायमपणा येतो आणि मंडळापुढें आलेल्या बिलाचा सर्व बाजूंनीं पूर्ण विचार होऊन तें मंजूर केलें जातें

**११. कार्यमंत्री व वरिष्ठ कायदेमंडळः**–सरकारतर्फे मंडळापुढें कामकाज मांडून सरकारी बिलांचें व धोरणाचें समर्थन करण्याचें काम कार्यमंत्री करतात. सबब दोहोंपैकीं कोणत्या तरी एका सभेंत त्यांचा समावेश केला जातो. कोणत्याही सभेंत हे मंत्री असले तरी त्यांना दुसऱ्या सभेच्या बैठकींत भाग घेण्याचा व भाषण करण्याचा हक्क आहे; पण त्यांना त्या सभेंत मत देतां येत नाहीं. कायदेमंडळापुढें येणाऱ्या विषयांसंबंधीं सरकारचें धोरण व्यक्त करण्याचें व प्रश्नांचीं सरकारतर्फे उत्तरें देण्याचें काम त्यांच्याकडेच असतें.

**१२. अध्यक्षः**—१९१९ पूर्वी खुद्द गव्हर्नर जनरल कायदेमंडळाच्या

अध्यक्षाचें काम करीत असे. नवीन सुधारणानुसार झालेल्या या दोन सभांपैकीं कोणत्याही सभेच्या अध्यक्षाचें काम गव्हर्नर जनरलकडे नसतें. त्याला कांहीं विचार किंवा धोरण व्यक्त करावयाचें असल्यास दोन सभांची संयुक्त बैठक भरविली जाते व तीमध्यें त्याचें भाषण होतें.

लोकसभेचा अध्यक्ष १९२१ पासून पहिल्या चार वर्षांकरितां गव्हर्नर जनरलनें निवडलेला होता. हल्लीं गव्हर्नर जनरलच्या संमतीनें सभासदांना आपल्यापैकीं एकादा सभासद अध्यक्ष म्हणून निवडतां येतो. अध्यक्षाच्या गैरहजेरींत काम चालविण्याकरितां उपाध्यक्ष असतो. तोही सभासदांपैकीं असून गव्हर्नर जनरलच्या पसंतीनें निवडलेला असतो. वरिष्ठ सभेचा अध्यक्ष मात्र सभासदांपैकींच परंतु गव्हर्नर जनरलनें नेमावयाचा असतो.

**१३. वरिष्ठ कायदेमंडळाचें कार्यक्षेत्र**:—ब्रिटिश पार्लमेंटनें केलेल्या कायद्यांना जेणेंकरून बाध येणार नाहीं, अशा प्रकारचे ब्रिटिश हिंदुस्थानच्या अंतर्व्यवस्थेसंबंधी व प्रजेसंबंधीं कोणतेही कायदे वरिष्ठ कायदेमंडळामध्यें केले जातात.

खालील प्रश्न गव्हर्नर जनरलच्या संमतीशिवाय मंडळापुढें विचाराकरितां मांडतां येत नाहींत.

१ राष्ट्रीय कर्ज, हिंदुस्थानचा जमीनमहसूल, परराष्ट्रीय राजकारण, लष्कर व आरमार वगैरे.

२ ब्रिटिश प्रजाजनांपैकीं कोणत्याही वर्गाचा धार्मिक विधि व आचार.

३ प्रांतिक खात्यांना जास्त मर्यादा घालणारे कायदे.

४ गव्हर्नर जनरलचा वटहुकूम ( Ordinance ) किंवा कायदा रद्द करण्याविषयीं किंवा त्यांत कांहीं दुरुस्ती करण्याविषयीं सूचना.

**१४. कायदेमंडळाचीं कामें**:—कायदेमंडळांत कायदेकानू करणें, जमाखर्चाचें अंदाजपत्रक मंजूर करणें, ठराव मांडणें व प्रश्न विचारून माहिती मिळविणें वगैरे कामें होतात. सार्वत्रिक जनहिताच्या बाबीसंबंधीं किंवा व्यवस्थेसंबंधीं एखाद्या सभासदास आपलें मत व्यक्त करावयाचें

असल्यास त्या बाबीसंबंधीं ठराव मंडळापुढें मांडले जातात. एखाद्या खात्यामध्यें गैरव्यवस्था होत आहे असें सभासदास वाटत असल्यास तशा प्रकारचा ठराव तो पुढें मांडतो व त्यामुळें सर्व मंडळाचेंही मतप्रदर्शन होतें. ठराव झाल्यास सरकार त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करतें; परंतु सरकारला तो बंधनकारक होत नाहीं. कायदा व ठराव यांमध्यें महद्‌तर आहे. कायदा मंजूर झाल्याबरोबर तो सरकार व प्रजा या दोघांनाही बंधनकारक होतो; परंतु ठराव फक्त शिफारसवजा असतात.

प्रश्नः—एखाद्या गोष्टींची माहिती मिळविण्याकरितां किंवा एखादी गोष्ट सरकारच्या नजरेस आणण्याकरितां, प्रश्नांचा चांगला उपयोग होतो. ज्या खात्यासंबंधीं प्रश्न विचारला असेल त्या खात्याचा कार्यमंत्री माहिती पुरवितो, व सरकारचें धोरण काय आहे तें व्यक्त करतो किंवा त्याचें समर्थन करतो.

प्रश्न व ठराव यांचा उपयोग मुख्यतः अंमलबजावणी योग्य तऱ्हेनें होत आहे किंवा नाहीं तें पाहण्याकडे होतो. परंतु अंमलबजावणी सरकार कायदेमंडळाला जबाबदार नसल्यामुळें त्यांचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं.

१५. **कायदे करण्याची पद्धतिः**—दोन सभांपैकीं कोणत्याही एका सभेमध्यें कायदा करण्याकरितां सरकारी किंवा खासगी सभासदाला बिल आणतां येतें. सभासदानें बिल आणण्याबद्दल सूचना देऊन आपल्या सभेकडून तें पुढें आणण्याबद्दल परवानगी घेतली पाहिजे. एखादें बिल गव्हर्नर जनरलच्या मंजुरीशिवाय मंडळापुढें आणतां येण्यासारखें नसल्यास, सदर मंजुरी मिळविल्याबद्दलही कळवावें लागतें. परवानगी मिळाल्यानंतर बिल सरकारीं गॅझेटमध्यें, लोकांचें मत अजमावण्याकरितां प्रसिद्ध केलें जातें. पार्लमेंटच्या पद्धतीप्रमाणें या मंडळापुढें प्रत्येक बिलाचीं तीन वाचनें होतात. प्रथमतः ठरलेल्या दिवशीं, बिल सभेपुढें मांडण्याची सूचना केली जाते व त्याचा स्थूलमानानें विचार होतो. नंतर तें विचारांत घेण्याबद्दल सूचना येते, किंवा ज्या सभेंत तें मांडलें असेल तिजमधील कांहीं निवडक सभासदांची कमिटी नेमून, तिच्याकडे विचार

करून रिपोर्ट करण्याकरितां दिलें जातें. या रिपोर्टामध्यें जर कांहीं दुरुस्त्या किंवा सूचना केल्या असल्या, तर त्यांसह बिलाचा तपशीलवार विचार होतो. यानंतर बिल मंजूर करण्याची सूचना केली जाते व तें मंजूर होतें. याप्रमाणें परवानगी, गॅझेटमधून प्रसिद्धि, कमिटीकडे विचाराकरितां रवानगी, व कमिटीच्या सूचनांसह विचार होऊन तें मंजूर होणें वगैरे अनेक संस्कार एका सभेमध्यें बिलावर घडावयाचे असतात. अशा रीतीनें एका सभेंत मंजूर झाल्यानंतर तें दुसऱ्या सभेकडे पाठविलें जातें. तेथेंही पूर्वीप्रमाणेंच पूर्ण विचार होऊन तें मंजूर झाल्यास पहिल्या सभेस तसें कळवितात. नंतर तें गव्हर्नर जनरलच्या मंजुरीकरितां पाठविलें जातें. ही मंजुरी मिळाल्यावर बिलास कायद्याचें स्वरूप येतें.

बिल दोन्ही सभांत मंजूर व्हावें लागतें. कोणत्याही एका सभेंत नामंजूर झाल्यास तसें गव्हर्नर जनरलला कळविण्यांत येते. सहा महिन्यांच्या आंत जोडसभेनें तें मंजूर केल्यास गव्हर्नर जनरलची मंजुरी मिळाल्यावर त्याला कायद्याचें स्वरूप येतें; नाहींतर तें मुदतीबाहेर जातें. एखादे प्रसंगीं बिल पूर्णपणें नापसंत न होतां दुसऱ्या सभेला फक्त कांहीं फरक करावयाचे असतात. ते पहिल्या सभेस पसंत असल्यास बिल मंजूर होतें.

एखादें बिल विशेष महत्त्वाचें असून त्याच्या मार्गांत अडचणी येण्यासारख्या असल्यास दोन्ही सभांत चांगलपणानें विचार व्हावा म्हणून प्रथमच, एका सभेंतील निवडक लोकांच्या कमिटीकडे विचाराकरितां देण्याऐवजीं, तें दोन्ही सभांच्या जोडकमिटीकडे सोंपविलें जातें. इतकेंही करून दोहींचें मतैक्य न झाल्यास गव्हर्नर जनरलला दोहींकडील सभासदांची एकत्र बैठक बोलवितां येते. वरिष्ठ सभेचा अध्यक्ष हाच या सभेचा अध्यक्ष असतो. या सभेंत बहुमतानें ठरेल तो कायदेमंडळाचा निकाल समजण्यांत येतो एखादें बिल एका सभेंत मंजूर होऊन सहा महिन्यांचे आंत दुसरीमध्यें मंजूर न झाल्यास वरीलप्रमाणेंच एकत्र सभा बोलावून निर्णय द्यावा लागतो.

एखादे वेळीं बिल दोन्ही सभांतही मंजूर होऊन गव्हर्नर जनरलची मंजुरी मिळाल्यावरही ब्रिटिश सरकारला तें पसंत नसल्यास भारतमंत्र्याला

तें नामंजुर करण्याचा ( Veto ) अधिकार आहे. परंतु एखाद्या आक्षेपार्ह बिलाचा विचार चालूं असतांनाच भारतमंत्री तें गाळून टाकण्याबद्दल गव्हर्नर जनरलला सुचवितो व मग त्याच्याबद्दल नापसंती दर्शविण्याचा प्रसंग येत नाहीं.

**१६. गव्हर्नर जनरलचे विशेष अधिकारः**—दोन्हीही सभांमध्यें मंजूर झालेलें बिल गव्हर्नर जनरलच्या मंजुरीशिवाय कायदा होऊं शकत नाहीं. कोणतेंही बिल शांतता, सुरक्षितता व जनहित यांना विरोधकारक आहे, असें वाटल्यास गव्हर्नर जनरल त्याला मंजुरी देत नाहीं. त्याचप्रमाणें गव्हर्नर जनरलास जरूर वाटत असलेलें बिल दोन्हीही सभांनीं नामंजूर केलें तरी ' शांतता, सुरक्षितपणा व जनहित वगैरेकरितां त्याची जरूरी आहे ' असा शेरा मारून ( Certificate ) त्याला कायद्याचें स्वरूप देतां येतें. परंतु तो कायदा व अशा रीतीनें मंजूर करण्याचें कारण पार्ले-मेंटपुढें मांडून बादशाहाची संमति मिळाल्याशिवाय त्याला कायद्याचें स्वरूप येत नाहीं. उदाहरणार्थ, १९२३ सालीं मिठाचा कर दुप्पट कर-ण्यासंबंधीं प्रश्न लोकसभेपुढें आला त्यावेळीं सभेनें या सूचनेला मुळींच संमति दिली नाहीं. परंतु हा कर वाढविणें खर्च भागविण्याकरितां जरूर आहे असें गव्हर्नर जनरलचें मत असल्यामुळें वर सांगितल्याप्रमाणें शेरा मारून तो मंजूर करून घेण्यांत आला.

दोन्हीही सभांनीं मंजूर केलेलें बिल तसेंच किंवा कांहीं दुरुस्त्या करून गव्हर्नर जनरलकडून फेरतपासणीकरितां कायदेमंडळाकडे पाठविण्यांत येतें, किंवा बादशहांचे पसंतीकरितां राखून ठेवलें जातें. बादशाहाची संमति मिळाल्याचें गव्हर्नर जनरलनें जाहीर केल्याशिवाय बिलाला काय-द्याचें स्वरूप येत नाहीं.

याशिवाय कायदेमंडळाचे सल्ल्यावांचून गव्हर्नर जनरलास वटहुकुम काढतां येतात, व ते सहा महिनेपर्यंत कायद्याप्रमाणेंच चालतात.

याप्रमाणें जरूर वाटेल ते कायदे गव्हर्नर जनरलला करून घेतां येतात व पसंत नसतील ते अमान्य करतां येतात; परंतु साधारणतः कायदे-मंडळाचे म्हणण्याला बराच मान दिला जातो.

प्रश्नः—१. हिंदुस्थानांत कायदे किती प्रकारचे आहेत? २. वरिष्ठ कायदेमंडळाची रचना कशी आहे? ३. वरिष्ठसभा व लोकसभा यांच्या मतदानाच्या अटींमध्यें काय फरक आहे? ४. वरिष्ठ मंडळाचें कार्यक्षेत्र काय आहे? ५. कायदेमंडळामध्यें कार्यमंत्री काय काम करतात? ६. ठराव व कायदा यांमध्यें फरक काय? ७. वरिष्ठ कायदेमंडळांत बिल मंजूर होण्याची पद्धति काय आहे? ८. वटहुकूम व प्रश्न यांसंबंधीं माहिती द्या. ९. बिल, कायदा, ठराव व प्रश्न यांमधील फरक सांगा.

---

## ६. प्रांतिक कायदेमंडळें.

१. **कायदेमंडळांत झालेले फरकः**—गव्हर्नरच्या प्रत्येक प्रांतामध्यें कायदेमंडळ आहे. प्रांतिक सरकारच्या कारभारांत जबाबदार राज्यपद्धतीचा उपक्रम केला असल्यामुळें तेथील मंडळाच्या रचनेंत व अधिकारांत पुष्कळ फरक झाले आहेत. पूर्वींप्रमाणें आतां तीं केवळ शिफारसवजा ठराव मांडणारीं मंडळें नसून त्यांना बरीच सत्ता व स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे. या मंडळाइतके हक्क वरिष्ठ कायदेमंडळाला नाहींत.

मुख्य फरक खालीलप्रमाणें आहेतः—

( १ ) मंडळांतील सभासदांची संख्या वाढवून लोकनियुक्तांचें प्रमाणही वाढविलें आहे.

( २ ) प्रत्यक्ष निवडणूक सुरू झाली असून मजूर, शेतकरी, इत्यादिकांना मत असावें म्हणून मतदारांच्या अटी अगदीं हलक्या केल्या आहेत. अल्पसंख्याक जाती व विशिष्ट संघ यांचेही प्रतिनिधि घेण्याची सोय केली आहे.

( ३ ) अध्यक्षपद गव्हर्नरकडे नसून अध्यक्ष सभासदांनीं निवडावयाचा असतो. १९२१ पासून पहिलीं चार वर्षें मात्र गव्हर्नरनें निवडलेला अध्यक्ष होता.

२. मतदार:—सर्वसाधारण लायकीच्या अटी मागील प्रकरणीं दिल्या त्याच आहेत. विशेष अटी पुढीलप्रमाणें:—

मुंबईमध्यें १२०, कराचीमध्यें ६० आणि इतर शहरांमध्यें ३६ रुपये भाड्याच्या घरांत राहणारा, किंवा इतकें भाडें येईल अशा किंवा १५०० रुपये किंमतीच्या घराचा मालक, ह्यांना मत देण्याचा हक्क आहे. प्राप्तीवरील कर देणारास व लष्करी पेन्शनरासही मत आहे. इतर ठिकाणीं ३२ रुपये व रत्नागिरी, पंचमहाल वगैरे जिल्ह्यांमध्यें १६ रुपये सारा भरणारा; आणि रत्नागिरी, पचमहाल वगैरे जिल्ह्यांमध्यें २४ रुपये व इतर जिल्ह्यांमध्यें ३२ रुपये वार्षिक भाडें देणारा अगर इतकें भाडें येईल अशा घराचा मालक, यांना मत देण्याचा अधिकार आहे. स्त्रियांना मत देण्याचा प्रश्न प्रांतिक मंडळांनीं सोडवावयाचा आहे. मुंबई मंडळानें स्त्रियांना मत असावें असें ठरविलें आहे.

३ रचना:—प्रांतांनिहाय क्षेत्रफळ, लोकसंख्या व इतर परिस्थितीच्या मानानें कायदेमंडळांतील सभासदांची संख्या कमीअधिक आहे. ती अशी:—बंगाल १२५, आग्रा–अयोध्या ११८, मद्रास ११८, मुंबई १११, बिहार-ओरीसा ९८, पंजाब ८३, मध्यप्रांत ७०, आसाम ५३, ब्रम्हदेश १०३.

प्रांतिक मंडळें एकसभात्मक आहेत. सभासदांच्या संख्येपैकीं शेंकडा ७० लोकनियुक्त, व २० सरकारनियुक्त सरकारी अधिकारी, व बाकीचे सरकारनियुक्त परंतु सरकारी नोकर नसलेले असतात. सरकारी अधिकारी सभासदांमध्यें कार्यकारी मंडळाच्या सभासदांचा अंतर्भाव होतो. ते अधिकारी या नात्यानें आपोआपच सभासद होतात. गव्हर्नर स्वत: सभासद नसतो, परंतु त्यास भाषण करण्याचा अधिकार आहे. दिवाण हे जरी सरकारी नोकर असले तरी ते लोकनियुक्त असतात. मजूर, अस्पृश्य किंवा इतर अल्पसंख्यांकांतर्फे प्रतिनिधि निवडून येणें कठीण असतें. सबब त्यांच्यातर्फे प्रतिनिधि घेतां यावे म्हणून सरकार आपण होऊनच त्यांच्यापैकीं कांहीं लोक निवडून देतें.

४ मुंबई-कायदेमंडळ:—प्रांतिक कायदेमंडळाची पूर्ण कल्पना यावी,

म्हणून मुंबई व मध्यप्रांतांतील कायदेमंडळाची रचना पुढें दिली आहे. मुंबई कायदेमंडळामध्यें एकंदर १११ सभासद आहेत. त्यांपैकीं ८६ लोकनियुक्त व २५ सरकारनियुक्त असतात. लोकनियुक्त सभासदांमध्यें सर्वसामान्य व विशिष्ट असे दोन प्रकारचे मतदारसंघ आहेत. त्यांची विल्हेवारी खालीलप्रमाणें आहे:—

**सर्वसामान्य संघ:—**

मुसलमानेतर—खेड्यांतर्फे ३५ + शहरांतर्फे ११ = ४६.

मुसलमान:—खेड्यांतर्फे २२ + शहरांतर्फे ५ + युरोपियन २ = २९

विशिष्टसंघ:—जमीनदार ३ + व्यापारी ७ + विश्वविद्यालय १ = ११

शहरांतर्फे ११ पैकीं, मुंबई ६ व अमदाबाद, कराची, सुरत, पुणें, सोलापूर, प्रत्येकीं १ याप्रमाणें आहेत.

एकंदर ८६ लोकनियुक्तांची वर दिल्याप्रमाणें विल्हेवारी आहे. लोकनियुक्तांमध्यें तिसरा हिस्सा मुसलमान आहेत. विश्वविद्यालयातर्फे प्रतिनिधि निवडून देण्याचा हक्क पदवी घेऊन सात वर्षें झालेल्या लोकांना आहे. मुसलमानेतरांच्या ४६ जागांपैकीं ७ मराठे लोकांकरितां राखून ठेवल्या आहेत.

सरकारनियुक्त २५ पैकीं सरकारी अधिकारी जास्तींत जास्त १८ असतात. इतरांपैकीं पांचांची विभागणी पुढीलप्रमाणें आहे:—ॲंग्लो इंडियन १, हिंदी खिश्चन १, मजुरवर्ग १, अस्पृश्यवर्ग १ व कापसाचे व्यापारी १. वरील पृथक्करणावरून लोकनियुक्तांची संख्या किती वाढली आहे तें स्पष्ट होईल.

**५. मध्यप्रांत-कायदेमंडळ:**—या मंडळामध्यें एकंदर ७० सभासद असून त्यांपैकीं ५३ लोकनियुक्त व १७ सरकारनियुक्त असतात. लोकनियुक्तांची विल्हेवारी खालीलप्रमाणें आहे.

**सर्वसामान्य संघ:—**

मुसलमानेतर:—खेड्यांतर्फे ३१ ( म. २१ + व. १० ) आणि
शहरांतर्फे ९ ( म. ७ + व. २ ) = ४०

मुसलमानः—खेड्यांतर्फे ६ ( म. ४ + व. २ ) आणि
शहरांतर्फे १ ( म. ० + व. १ ) = ७

विशिष्ट संघः—जमीनदार ३ + व्यापारी २ + खाणीवाले १ = ६

( टीप—म. = मध्यप्रांत, व. = वऱ्हाड. )

सरकारनियुक्तांमध्यें १० पर्यंत सरकारी अधिकाऱ्यांपैकीं व बाकीचे ७ सरकारनियुक्त असतात. त्यांची विल्हेवारी पुढीलप्रमाणें आहे:—विश्वविद्यालय १, युरोपियन वगैरे १, मंडळाजिल्हा १, मध्यप्रांत जमीनदार १, मागसलेल्या जाती १, व इतर १ = ७

६. अध्यक्षः—गव्हर्नर अध्यक्ष नसून पहिलीं चार वर्षें सरकारकडून नेमलेला अध्यक्ष होता. हल्लीं गव्हर्नरच्या संमतीनें सभासदांना आपल्यापैकींच एकास अध्यक्ष निवडतां येतें. उपाध्यक्ष प्रथमपासूनच लोकनियुक्त आहे. साधारणतः मंडळाची निवडणूक प्रत्येक तीन वर्षांनीं होते. परंतु गव्हर्नरास या मुदतीच्या आधींच तें बरखास्त करतां येतें, किंवा ही मुदत एक वर्षपर्यंत वाढवितां येते. या मंडळांतील सभासदांना एम. एल. सी. ( Member, Legislative Council ) म्हणतात.

७. कार्यक्षेत्रः—प्रांतिक कायदेमंडळांना प्रांतांतील शांतता, सुव्यवस्था वगैरे बाबींसंबंधीं कायदे करण्याचा अधिकार आहे. परंतु पार्लमेंटचे किंवा वरिष्ठ सरकारचे कायद्याला जेणेंकरून बाध येईल अशा कोणत्याही कायद्यांचा विचार त्यांना करतां येत नाहीं.

हिंदुस्थानसरकारची खंडणी, सनदी नोकरांचे पगार, कर्जावरील व्याज वगैरे खर्चांना मंडळाची मंजुरी लागत नाहीं.

धार्मिक बाबी, सार्वजनिक कर्ज, प्रांतिक सरकारच्या ताब्यांत नसलेले कर, सैन्य, आरमार, परराष्ट्रीय संबंध, मध्यवर्ती सरकारचे ताब्यांतील टपाल, तार वगैरे खातीं, यांसंबंधीं प्रश्नांचा विचार हिंदुस्थानसरकारच्या परवानगीवांचून करतां येत नाहीं.

८. कायदेमंडळांचीं कामें:—मागील प्रकरणीं सांगितल्याप्रमाणेंच आहेत.

९. **कायदे करण्याची पद्धतिः**—प्रांतिक कायदेमंडळामध्यें बिल मंजूर करण्याची पद्धति, वरिष्ठ कायदेमंडळाच्या कोणत्याहि एका सभेंतील पद्धतीप्रमाणें हुबेहुब आहे. बिल मांडण्याची परवानगी मिळवून तें पुढें आल्यानंतर त्याचें भाषांतर निरनिराळ्या प्रांतिक भाषांतून गॅझिटमध्यें प्रसिद्ध होतें. यानंतर प्रत्येक बिलाचीं पुढीलप्रमाणें तीन वाचनें होतात.

प्रथम, बिल पुढें मांडण्याची सूचना येते व बिलाचा सर्वसामान्य विचार होतो. यानंतर तें, मंडळानें निवडलेल्या लोकांकडे पूर्ण चर्चा करून रिपोर्ट करण्याकरतां पाठविण्याची सूचना येते. हा रिपोर्ट आल्यानंतर तो सूचनांसह वाचला जातो. या वेळीं कलमवार वाचन होऊन दुरुस्तीच्या सूचनांचा विचार झाल्यावर तें मंजूर करण्याबद्दल तिसरी सूचना येते. बहुमतानें पास झाल्यानंतर त्यावर अध्यक्षांची सही होते व नंतर तें गव्हर्नर व गव्हर्नर जनरलच्या मंजुरीकरितां रवाना होतें. ही मंजुरी मिळाली म्हणजे त्याला कायद्याचें स्वरूप येतें.

१०. **गव्हर्नरचे विशेष अधिकारः**—गव्हर्नर जनरलप्रमाणें गव्हर्नरलाही शांतता, संरक्षण वगैरेला बाधक असलेलें बिल नामंजूर करण्याचा व राखींव खात्यांसंबंधीं अत्यंत जरूरीचें बिल गव्हर्नरच्या म्हणण्याप्रमाणें मंडळानें मंजूर न केल्यास, शेरा मारून मंजूर करण्याचा अधिकार आहे. अशा प्रकारें मंजूर केलेलें बिल गव्हर्नर जनरलकडे पाठवावयाचें असतें. जरूर वाटल्यास गव्हर्नर जनरल तें बादशाहांच्या पसंतीकरितां राखून ठेवतो.

कायदेमंडळानें मंजूर करून पसंतीकरितां पाठविलेलें बिल गव्हर्नरला पसंत नसल्यास तो तें पुनः मंडळाकडे विचाराकरितां पाठवितो किंवा गव्हर्नर जनरलचें मत काय आहे तें पाहण्याकरितां ठेवून देतो. अशा बिलास सहा महिन्यांत गव्हर्नर जनरलची संमति मिळाल्यास कायद्याचें स्वरूप येतें. असें न झाल्यास किंवा सहा महिन्यांच्या आंत बिल मंडळाकडे विचाराकरितां परत न आल्यास तें मुदतीबाहेर जातें. गव्हर्नर जनरलला बिलाच्या बाबतींत काय अधिकार आहेत ते मागें दिले आहेतच.

११. **सारांशः**—वरिष्ठ व प्रांतिक अशीं दोन प्रकारचीं कायदेमंडळें

आहेत. वरिष्ठ कायदेमंडळ दुहेरी असून वरिष्ठसभा व लोकसभा अशीं त्याचीं दोन अंगें आहेत. १९१९ च्या कायद्यानें सर्व कायदेमंडळांतील लोकनियुक्तांचें प्रमाण पुष्कळ वाढलें आहे. सर्व कायदेमंडळांचे अध्यक्ष पहिलीं चार वर्षें गव्हर्नर जनरल किंवा गव्हर्नरनें नेमलेले होते. हल्लीं लोकसभा व प्रांतिक मंडळें यांचे अध्यक्ष लोकनियुक्त आहेत. वरिष्ठ सभेचा अध्यक्ष मात्र गव्हर्नर जनरलनें नेमलेलाच नेहमीं असावयाचा. सर्व सभासदांची निवडणूक मतदारसंघाकडूनच होते. प्रांतामध्यें तर मताधिकार शेतकरी व मजुरांना सुद्धां मिळाला आहे. पार्लमेंटच्या कायद्यांला बाध न येईल अशा प्रकारचे सर्व हिंदुस्थानला लागू पडणारे कायदे वरिष्ठ कायदेमंडळामध्यें केले जातात. त्याचप्रमाणें पार्लमेंट व हिंदुस्थान-सरकार यांच्या कायद्यांना बाध न येईल असे स्थानिक महत्त्वाचे कायदे प्रांतिक कायदेमंडळांत केले जातात. याशिवाय अंदाजपत्रक मंजूर करणें, ठराव आणणें, प्रश्न विचारणें वगैरे कामें सर्व कायदे-मंडळांमध्यें होतात. वरिष्ठ कायदेमंडळाच्या दोन्ही सभांमध्यें मंजूर झालेल्या बिलाला गव्हर्नर जनरलची संमति मिळाल्या-शिवाय कायद्याचें स्वरूप प्राप्त होत नाहीं. त्याचप्रमाणें कायदेमंडळा-मध्यें मंजूर झालेल्या बिलाला गव्हर्नर जनरल व गव्हर्नर या दोघांची संमति लागते. गव्हर्नर जनरल व गव्हर्नर यांना कोणतेंही बिल शांत-तेला बाधक वाटल्यास नामंजूर करतां येतें; व राष्ट्रहिताला जरूर वाटेल तें स्वतःच्या जबाबदारीवर मंजूर करून घेतां येतें.

प्रश्नः—१. सुधारणांमुळें प्रांतिक कायदेमंडळांत काय फरक झाले ? २. प्रांतिक मंडळाच्या मतदारांची लायकी काय ठरली आहे ? ३. प्रांतिक मंडळांची रचना कशी असते व त्यांत काय कामकाज होतें ? ४. गव्ह-र्नर जनरलला बिलाच्या बाबतींत विशेष अधिकार काय आहेत ? ५. प्रांतिक कायदेमंडळामध्यें कायदा करण्याची काय पद्धति आहे ? ६. एकंदर कायदेमंडळें किती व कोणकोणत्या प्रांतांमध्यें आहेत ?

---

९१

## ७. राष्ट्राची जमा व खर्च.

१. आर्थिक खातें:—उत्तम रीतीनें राज्यकारभार चालविण्याकरितां द्रव्य पाहिजे. हें द्रव्य सरकार कराच्या रूपानें गोळा करतें. खर्चाला लागणारा पैसा उत्पन्न करण्याकरितां काय उपाय योजावे व गोळा झालेल्या पैशाचा विनियोग उत्तम तऱ्हेनें कसा करावा, वगैरे गोष्टी जें खातें ठरवितें, त्याला "आर्थिक खातें" म्हणतात. हीं खातीं वरिष्ठ व प्रांतिक अशीं दोन प्रकारचीं असतात.

२. इतिहास:—१८७० पूर्वीं हिंदुस्थानसरकार सर्व वसुलाबद्दल जबाबदार असून प्रांतिक सरकारचा दुय्यम दर्जा होता. सर्व हिंदुस्थानचें एकच अंदाजपत्रक असे व प्रांतांना ठराविक रकमा मिळत. परंतु हिंदुस्थानसरकारजवळ स्वतंत्र वसुलीखातें नसल्यामुळें गव्हर्नर जनरलच्या नांवावर गव्हर्नर रकमा गोळा करून प्रांतांचा खर्च भागवीत. १८३३ मध्यें प्रांतिक खर्चावर गव्हर्नर जनरलला पूर्ण ताबा प्राप्त झाला. परंतु प्रांतांची सत्ता व महत्व दिवसेंदिवस वाढत गेल्यामुळें त्यांना वरिष्ठ सरकारवर सर्वस्वी अवलंबून राहणें आवडेना. ही तक्रार दूर करण्याकरितां लॉर्ड मेयो यांनीं प्रांतिक सरकारास थोडेंसें आर्थिक स्वातंत्र्य देण्याच्या हेतूनें त्यांच्याकडे कांहीं खर्चाच्या बाबी दिल्या व खर्चाकरितां ठराविक रकमा हवालीं करण्यांत येऊं लागल्या. प्रांतिक खातीं सोडून इतर खातीं प्रांतिक सरकारला कोणत्याही प्रकारें फायदेशीर नसल्यामुळें प्रांतिक सरकार त्यांकडे दुर्लक्ष करूं लागलें व त्यामुळें हिंदुस्थानसरकारचें उत्पन्न कमी होऊं लागलें. हा दोष नाहींसा करण्याकरितां लॉर्ड लिटननीं पांच वर्षांची करारपद्धति सुरू केली. परंतु त्यामुळें मध्यवर्ती व प्रांतिक सरकार यांमध्यें नेहमीं कुरबुर सुरू झाली. कारण खर्च कमी झाल्यास रकम कमी केली जाईल, अशी प्रांतिक सरकारांस सारखी भीति वाटे. ही व्यवस्था १९११ सालीं बंद करण्यांत येऊन प्रांतिक उत्पन्नांत छाटाछाट करूं नये व प्रांतिक बाबतींत हिंदुस्थानसरकारनें ढवळाढवळ करूं नये असें ठरलें. यामुळें प्रांतिक सरकारच्या शिलकेवर हिंदुस्थानसर-

कारचा ताबा राहिला नाहीं. उत्पन्नाच्या एकंदर खात्यांची, वरिष्ठ सरकारचीं, प्रांतिक सरकारचीं, व समाईक खातीं, अशी विभागणी करण्यांत आली. प्रांतिक सरकारला यामुळें बरेंच स्वातंत्र्य मिळालें, तरी पण बहुतेक व्यवस्था हिंदुस्थानसरकारच्या संमतीनेंच करावी लागे. नवीन सुधारणांमुळें प्रांतांना कांहींसें आर्थिक स्वातंत्र्य मिळालें आहे.

३. प्रांतिक स्वायत्तता:( Provincial Autonomy ) प्रांतांमध्यें जबाबदार राज्यपद्धतीचा उपक्रम करण्याचें ठरल्यामुळें योग्य सुधारणा करण्याकरितां प्रांतांना आर्थिक स्वातंत्र्य देणें जरूर होतें. म्हणून पुढीलप्रमाणें फेरफार करण्यांत आले आहेत व वरिष्ठ सरकारचें, प्रांतांवरील आर्थिक नियंत्रण पुष्कळच कमी झालें आहे.

( १ ) समाईक खात्यांची पद्धति रद्द करण्यांत येऊन हिंदुस्थानसरकारचीं खातीं व प्रांतिक सरकारचीं खातीं असे सर्व खात्यांचे दोनच विभाग पाडण्यांत आले आहेत.

( २ ) प्रांतांना आपली शिल्लक वाटेल तशी वापरण्याची पूर्ण मुभा देण्यांत आली आहे. पूर्वीं ही शिल्लक वरिष्ठ सरकाराजवळ ठेवावी लागे व ती वाटेल तशी खर्च करण्याची मुभा नव्हती.

( ३ ) प्रांतिक सरकारास कर्ज उभारण्याचा अधिकार मिळाला आहे. मात्र हें कर्ज पाटबंधारे, दुष्काळनिवारण वगैरेसारख्या लोकोपयोगी कामांकडेच खर्च करावें लागतें.

( ४ ) करमणुकीचीं साधनें, चैनीचे पदार्थ, नोंदणी इत्यादि नवीन कर बसविण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास देण्यांत आला आहे.

( ५ ) हिंदुस्थानसरकारचा प्रांतिक जमाखर्चावरील ताबा शक्य तितका कमी करण्यांत आला असल्यामुळें प्रांतांना कांहींशी आर्थिक स्वायत्तता प्राप्त झाली आहे.

( ६ ) हिंदुस्थानसरकारची तूट भरून काढण्याकरितां प्रांतिक सरकारांस वार्षिक खंडणी द्यावी लागते.

( ७ ) दुष्काळनिवारण प्रांतिक सरकारकडे सोंपविलें आहे. हें काम पूर्वीं वरिष्ठ सरकारकडे होतें.

या सुधारणांमुळें प्रांतिक व वरिष्ठ सरकारचे जमाखर्च अगदीं स्वतंत्र झाले आहेत. यापूर्वी हिंदुस्थानसरकारच्या जमाखर्चामध्यें प्रांतिक सरकारच्या जमाखर्चाचाही समावेश होत होता. प्रत्येक प्रांताचें अंदाजपत्रक मंजूर झाल्यानंतर त्याला गव्हर्नर जनरलची मंजूरी लागे; परंतु हल्लीं प्रांतिक जमाखर्च अगदीं स्वतंत्र असतो. कांहीं खातीं पूर्णपणें वरिष्ठ सरकारच्या व कांहीं पूर्णपणें प्रांतिक सरकारच्या ताब्यांत आहेत. प्रांतिक सरकारला कांहीं खात्यांवर जो पूर्ण ताबा प्राप्त झाला आहे, तोच प्रांतिक स्वायत्ततेचा आरंभ होय. नवीन धोरणाप्रमाणें प्रांतिक खात्यांपासून झालेलें उत्पन्न व त्यांवर झालेला खर्च याबद्दल प्रांतिक सरकारला पूर्ण अधिकार आहेत.

वरिष्ठ व प्रांतिक सरकारच्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबी पुढें दिल्या आहेत. ( परिशिष्ट इ आणि ई पहा ).

४. वरिष्ठ सरकारच्या उत्पन्नाच्या बाबी:—

( १ ) संस्थानिकांना ब्रिटिश सरकाराकडून जो फायदा होतो त्याबद्दल सरकारास दरवर्षी ठराविक रक्कम द्यावी लागते.

( २ ) जकात:—परदेशांतून येणारे पदार्थ, हत्यारें, दारू, साखर, वगैरे आयात मालावरील व कापूस, तांदूळ वगैरे निर्यात मालावरील करास 'जकात' म्हणतात. ही किंमतीच्या मानानें ११ टक्के असते. सर्वांत जास्त उत्पन्नाची बाब हीच होय.

( ३ ) प्राप्तीवरील कर:—सर्व प्रकारच्या बिगरशेतकी उत्पन्नावर हा कर आहे. २००० वर उत्पन्न असल्यास दर रुपयास ५ पैप्रमाणें आकारला जातो. जसजसें उत्पन्न जास्त, तसतसें कराचें प्रमाणही वाढतें. ५००० पासून १०००० पर्यंत ६ पै प्रमाणें आहे. मोठमोठ्या व्यापारी मंडळ्यांकडूनच या कराचा बराचसा भाग वसूल होतो. जमीनमहसूल शेतकऱ्यांपासून घेतला जात असल्यामुळें इतर उत्पन्नावर हा कर आकारला जातो.

( ४ ) अफू:—अफूची लागवड करणें, विकणें, बाहेर पाठविणें इत्यादि गोष्टी सरकारच्या परवान्याशिवाय करतां येत नाहींत. हे परवाने मिळ-

विण्याकरितां मोठमोठ्या रकमा द्याव्या लागतात. अफू हा सरकाराचा मक्ता आहे.

( ५ ) **मीठ:**—मीठ ठराविक ठिकाणींच उत्पन्न करून त्यावर कर आकारला जातो. हा कर दर मणीं १। रुपाया आहे. मीठ हा पदार्थ सर्वांच्या सारख्याच उपयोगाचा असल्यामुळें गरीबांनाही श्रीमंतांइतकाच कर देऊन तें विकत घ्यावें लागतें.

( ६ ) **प्रांतिक सरकारची खंडणी:**—हिंदुस्थानसरकारकडे तोडून दिलेल्या खात्यांचा वसूल खर्चाच्या मानानें कमी असल्यामुळें वरिष्ठ सरकारचें त्यांत भागणें शक्य नाहीं. सबब प्रत्येक प्रांताला आपल्या शिल-केचा ठराविक भाग वरिष्ठ सरकारकडे पाठवावा लागतो. प्रत्येक प्रांताच्या परिस्थितीप्रमाणें ही रक्कम ठरविण्यांत आली आहे. मुंबईला ५६ लाख व मध्यप्रांताला १२ लाख रुपये द्यावे लागतात. बहार व ओरिसा गरीब असल्यामुळें त्यांना खंडणी माफ आहे. प्रांतांच्या मदतीशिवाय खर्च भागविण्याचे प्रयत्न वरिष्ठ सरकारनें करावे, अशी मेस्टन कमीटीची शिफारस आहे. याशिवाय पोस्ट, तार, आगगाडी वगैरेबाबत खर्च भागून राहिलेली शिल्लक, संस्थानिकांना कर्जाऊ दिलेल्या रकमांवरील व्याज, लष्करी सामान विकून आलेला नफा वगैरे उत्पन्नाच्या बऱ्याच बाबी आहेत.

५. **वरिष्ठ सरकारचा खर्च:**—( १ ) **करवसूली:**—निरनिराळे कर वसूल करण्याकरितां लागणारा खर्च व वसूलीखात्याचा पगार वगैरे बाबी या सदरांत येतात. याशिवाय प्राप्तीवरील कर गोळा करण्याबद्दल हिंदुस्थान-सरकार प्रांतिक सरकारला कांहीं रक्कम देतें.

( २ ) **मुलखी खर्च:**—सनदी व इतर नोकरवर्ग यांचा पगार, भत्ते, पेन्शन व इतर खर्च आणि सर्व मुलकी खात्याचा खर्च मिळून अजमासें १० कोट रुपये लागतात.

( ३ ) **लष्करी खर्च:**—ही सर्वांत मोठी खर्चाची बाब होय. वरिष्ठ सरकारचा अजमासें निमा वसूल यावरच खर्च होतो. हल्लीं हा खर्च ६०

कोटी रुपयेपर्यंत आहे व तो ५० कोटीपर्यंत उतरावा अशी काटकसर-कमीटीची सूचना आहे.

( ४ ) **व्याज:**—पाट-बंधारे, आगगाड्या, दुष्काळी कामें, लढाया वगैरेबाबत हिंदुस्थानसरकारला झालेलें कर्ज १९२५ च्या मार्चमध्यें १०१३ कोटि होतें. या कर्जावरील व्याज द्यावें लागतें.

( ५ ) आगगाडी, पोस्ट, तार, सार्वजनिक बांधकाम वगैरे खात्यांवर बराच खर्च होतो.

( ६ ) **विलायतेंतील खर्च:**—भारतमंत्री व त्याच्या कचेरीचा खर्च इंग्लंडच्या तिजोरींतून खर्ची पडतो. परंतु रजा किंवा पेन्शन घेऊन गेलेल्या नोकरांचें देणें, तिकडे विकत घेतलेल्या मालाची किंमत, इंग्रज लोकांकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज वगैरे रकमा हिंदुस्थानच्या खजिन्यांतून पाठवाव्या लागतात.

( ७ ) **हुंडणावळ:**—हिंदुस्थानांतील मुख्य चलनी नाणें चांदीचें व इंग्लंडमधील सोन्याचें आहे. बाजारांत सोन्याचांदीच्या किंमतीचें परस्पर प्रमाण एकसारखें बदलत असतें. त्यामुळें साव्हरिनबद्दल नक्की किती रुपये द्यावयाचे तें ठरवितां येत नाहीं व पुष्कळ वेळां सरकारी भावापेक्षां जास्त रकमा द्याव्या लागतात. त्यामुळें तोटा होतो. अशा प्रकारें होणारा खर्च हुंडणावळ खातीं दाखवितात.

प्रांतिक जमेचा व खर्चाचा तपशील खालीं दिला आहे.

**६. प्रांतिक सरकारच्या उत्पन्नाच्या बाबी:**—

( १ ) **जमीनमहसूल:**—ही सर्वांत मोठी महत्वाची बाब आहे. हा कर प्रत्येक आकारणीच्या वेळीं सारखा वाढतच असतो. मुंबई इलाख्यांत हें उत्पन्न अजमासें सहा कोटि येतें.

( २ ) **अबकारी:**—दारू, अफू, गांजा वगैरे मादक पदार्थांवरील कर.

( ३ ) **स्टँप:**—मुलखी व न्यायखात्यामध्यें खतपत्र वगैरेकरितां लागतात.

( ४ ) **प्राप्तीवरील कर:**—प्रांतामध्यें वसूल केलेल्या कराचा कांहीं

भाग वसूलीच्या कामाबद्दल मोबदला म्हणून वरिष्ठ सरकाराकडून मिळतो.

( ५ ) नोंदणी फीः—खतें, रोखे वगैरेंची नोंदणावळ.

( ६ ) करमणुकीचीं साधनें व ऐषआरामाच्या जिनसांवरील कर.

( ७ ) जंगल:—जंगलांतील लांकूड वगैरेपासून सरकारला येणारें उत्पन्न.

याशिवाय सार्वजनिक इमारती, न्याय, तुरुंग, पोलीस, शिक्षण, उद्योग-धंदे व इतर किरकोळ खात्यांपासून बरेंच उत्पन्न होतें.

७. प्रांतिक खर्चाच्या बाबी:—( १ ) मुलखी खर्चः—यामध्यें गव्हर्नरापासून खालपर्यंतच्या नोकरांचा पगार, भत्ता वगैरे येतो.

( २ ) पोलीस, तुरुंग न्यायकचेऱ्या, आरोग्य, कालवे, सार्वजनिक इमारती यांवर होणारा खर्च.

( ३ ) शिक्षणः—सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्यामुळें हा खर्च बराच वाढण्याचा संभव आहे. मुंबईइलाख्यांत सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा मंजूर झाला आहे.

( ४ ) प्रांतिक खंडणीः—मुंबई प्रांतातर्फे ५६ लाख रुपये द्यावे लागतात.

( ५ ) दुष्काळी कामें:—प्रत्येक वर्षी प्रांतानिहाय दुष्काळफंड म्हणून ठराविक रकमा राखून ठेविल्या जातात. दुष्काळ नसल्यास ही रकम कालवे, पाटबंधारे वगैरेसारख्या उत्पादक कामांकडे खर्च केली जाते.

दुष्काळनिवारणार्थ तरतूद म्हणून प्रत्येक प्रांताला पुढीलप्रमाणें रकमा शिल्लक टाकाव्या लागतात. ( आंकडे हजारांचे आहेत. ):—

मद्रास ६६१, मुंबई ६३६०, बंगाल २००, संयुक्तप्रांत ३९६०, पंजाब ३८१, ब्रम्हदेश ६७, बहार–ओरिसा ११६२, मध्यप्रांत ४७२६, आसाम १०.

## अदाजपत्रक.

८. जमाखर्चाचें अंदाजपत्रक:—अंदाजपत्रक ( Budget ) म्हणजे कार्यकारी मंडळांनीं तयार केलेला जमाखर्चाचा कच्चा खर्डा होय. अकौं-

टंट जनरल प्रथम एक जमाखर्चाचा अंदाजी तक्ता तयार करून कार्यकारी मंडळाकडे पाठवितो. नंतर मंडळाच्या संमतीनें त्यांत जरूर ते फेरफार फडणवीस करतात. इतकें झालें म्हणजे अंदाजपत्रक सभेपुढें मांडण्यास तयार झालें असें समजतात. यामध्यें गेल्या सालचा पक्का हिशेब, चालू वर्षाचा दुरुस्त अंदाज व पुढील वर्षाचा कच्चा अंदाज इतक्या बाबी असतात. याशिवाय जरूर असलेली रक्कम वसूल करण्याबद्दल, नवीन कर बसविण्याबद्दल, किंवा वसूल होणारी रक्कम जरूर नसल्यास कर रद्द करण्याबद्दल सूचना असतात. त्याचप्रमाणें होणारा वसूल तपशीलवार निरनिराळ्या खात्यांस कसा वाटून द्यावयाचा हेंही दिलेलें असतें. ( परिशिष्ट इ पहा. )

प्रत्येक वर्षी फेब्रुवारीमध्यें हिंदुस्थानसरकारचें अंदाजपत्रक वरिष्ठ कायदेमंडळाच्या दोन्ही सभांपुढें, ठरविलेल्या दिवशीं खुलाशासह मांडण्यांत येतें. त्यानंतर प्रथम स्थूलमानानें कांहीं तत्वानुसार त्यासंबंधीं विचार होतो. या वेळीं सूचना वगैरे कांहीं करावयाच्या नसतात. यानंतर फडणवीस उत्तर देतात आणि मग लोकसभेमध्यें तपशीलवार विचारास सुरवात होते, व बारीकसारीक मुद्यांवरही वादविवाद होतात. कर्जावरील व्याज व गंगाजळी; भारतमंत्र्यानें नेमलेल्या अधिकाऱ्यांचे पगार व पेन्शनें; धार्मिक, राजकीय व संरक्षक खात्यांवरील खर्च इत्यादि बाबींमध्यें मंडळाला मत नाहीं. वरिष्ठ सभेमध्यें फक्त अंदाजपत्रकाच्या एकंदर धोरणावर चर्चा करितां येते, परंतु त्याचा तपशीलवार विचार करितां येत नाहीं किंवा त्यावर मतेंहि घेण्यांत येत नाहींत.

लोकसभेला कोणत्याही बाबी वगळण्यास किंवा रकमा कमी करण्यासंबंधीं सूचना करतां येतात. मागण्यांना मंजुरी देण्याला फक्त पंधरा दिवसांची मुदत असते व कोणत्याही एका बाबीबद्दल दोनपेक्षां जास्त दिवस चर्चा करण्याची परवानगी नसते. लोकसभेमधील दुरुस्त्या, सूचना वगैरे झाल्यानंतर तपशीलवार चर्चा होऊन मागण्यांना मंजुरी मिळाल्यावर अंदाजपत्रक गव्हर्नर जनरलकडे रवाना होतें. त्याला सर्व दुरुस्त्या व सूचना पसंत असल्यास प्रश्नच राहात नाहीं. परंतु तसें नसल्यास शेरा

मारून (Certificate) पाहिजेत ते फरक करून घेतले जातात.

९. **आर्थिक बिल** (Finance Bill):—खर्च भागविण्याकरितां नवीन कर बसवावयाचे असल्यास किंवा पूर्वीच्या करांमध्यें बदल करावयाचा असल्यास त्या सर्वांचा एका बिलामध्यें समावेश केला जातो. या बिलाला आर्थिक बिल असें म्हणतात. हें बिल कायदेमंडळापुढें इतर बिलांप्रमाणें मांडलें जातें. त्यानंतर त्यावर सर्व संस्कार होऊन त्याला कायद्याचें स्वरूप येतें. या कायद्याला मंजुरी देणें न देणें वगैरे सर्व अधिकार इतर कायद्यांप्रमाणेंच वरिष्ठ सभेला असतात.

१०. **प्रांतिक अंदाजपत्रक**:—प्रांतिक मंडळांमध्येंही याचप्रमाणें अंदाजपत्रक मंजूर व्हावयाचें असतें फरक येवढाच कीं, वरिष्ठ कायदे-मंडळाच्या दोन सभा असतात व प्रांतिक कायदेमंडळ एकच असतें. तेथें मागण्यांचा विचार करण्याकरितां फक्त १२ दिवसांची मुदत असते. याशिवाय अंदाजपत्रक मंडळापुढें मांडणें, त्यावर स्थूल व तपशीलवार चर्चा करणें, नंतर रकमांना मंजुरी देणें, वगैरे सर्व प्रकार वरिष्ठ कायदे-मंडळाप्रमाणेंच होतात. मात्र हिंदुस्थानसरकारची वार्षिक खंडणी, कर्जा-वरील व्याज, सनदी अधिकाऱ्यांचे पगार वगैरे बाबींत मंडळाला मत नाहीं. मंडळानें नामंजूर केलेल्या राखीव खात्यांपैकीं मागण्या अत्यंत जरूरीच्या असल्यास त्या गव्हर्नरला मंजूर करून घेतां येतात. करामध्यें फरक कर्तव्य असल्यास त्यासंबंधीं कायदे करून घ्यावे लागतात. प्रांताचें अंदाजपत्रक कायदेमंडळापुढें येण्यापूर्वीं तें फिनॅन्स कमीटीकडून नीट तपासलें जातें. प्रांतानिहाय असलेली 'कमीटी ऑफ पब्लिक अकौंटंस' हिशेब वगैरे तपासते. या कमीटीमध्यें १२ सभासद असून त्यांपैकीं ८ लोकनियुक्त सभासदांनीं निवडलेले असतात. फडणवीस हे कमीटीच्या अध्यक्षाचें काम करतात.

११. **कायदेमंडळाचे हक्क**:—नवीन कर बसविण्यासंबंधीं सूचना करणें, खर्चाची एकादी नवीन बाब सुचविणें, किंवा सुचविलेल्या खर्चात वाढ करणें यांपैकीं कोणतीही गोष्ट बिनसरकारी सभासदाला करतां येत नाहीं.

सुचविलेल्या करांना व खर्चाच्या निरनिराळ्या मागण्यांना मंजुरी देणें किंवा न देणें, किंवा एखाद्या खर्चाच्या रकमेंत छटाछाट करणें कायदेमंडळाच्या हातीं असतें. परंतु कर्ज, भारतमंत्र्यानें केलेल्या नेमणुकांचे पगार वगैरे कांहीं प्रश्नांसंबंधीं कायदेमंडळाला मत देतां येत नाहीं. राज्यकारभारास अत्यंत आवश्यक अशी एखादी बाब लोकसभेनें नामंजूर केली तर निरुपाय म्हणून गव्हर्नर जनरलला ती शेरा मारून मंजूर करून घ्यावी लागते.

राज्यकारभाराचें काम लोकांना बंद पाडतां येऊं नये म्हणून गव्हर्नर जनरल व गव्हर्नर यांना अशा प्रकारचे हक्क दिलेले आहेत. परंतु नवीन सुधारणेचें धोरण लोकमतानुवर्ती असल्यामुळें या उपायांचा उपयोग अगदीं निर्वाणीच्या प्रसंगीं केला जातो. सरकार शक्य तितकें कायदेमंडळाच्या धोरणानेंच चालतें.

**१२. पार्लमेंटचें जमाखर्चावर नियंत्रणः**—हिंदुस्थानच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक प्रतिवर्षीं पार्लमेंटमध्यें मंजूर व्हावें लागतें. त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या सरहद्दीपलीकडे लढाईकरतां खर्च होणाऱ्या रकमांस पॉर्लमेंटची मंजुरी लागते. कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ यांच्या संमतीनें खर्च होत असल्यास वरिष्ठ अधिकारी त्यांत ढवळाढवळ करीत नाहींत. परंतु परदेशांशीं तह किंवा इतर संबंध यांमध्यें कोणत्याही प्रकारें व्यत्यय येत असल्यास भारतमंत्र्याला त्या कामांत लक्ष घालावें लागतें.

**१३. प्रांतिक खर्चावर ताबाः**—प्रांतिक सरकारच्या सर्वच खात्यांवर वरिष्ठ सरकारचा ताबा कमी झाला आहे. सोंपीव खात्यांमध्यें तर पुष्कळच स्वातंत्र्य आहे. राखींव खात्यांमध्यें सुद्धां एकंदर खर्च सरकार व कायदेमंडळ यांच्या एकमतानें चालला असेल, तर वरिष्ठ अधिकारी त्यांत लक्ष घालीत नाहींत. परंतु यांतील कोणत्याही खात्याचा कारभार वरिष्ठ सरकारला किंवा इतर प्रांतांना बाधक होत असेल, तर मात्र गव्हर्नर जनरल व भारतमंत्र्याला ढवळाढवळ करण्याचा हक्क आहे.

प्रांतिक अंदाजपत्रक स्वतंत्र करण्यांत येऊं लागल्यामुळें गव्हर्नर जनरलला त्यामध्यें हात घालतां येत नाहीं. प्रांतीवरील कराच्या वसुलीसारखीं कामें प्रांतिक सरकार करतें. परंतु हें काम केवळ गुमास्तेगिरीचें असल्यामुळें त्यावर वरिष्ठ सरकारचा पूर्ण ताबा चालतो.

प्रांतिक जमाखर्चावर कायदेमंडळ व प्रांतिक सरकार या दोघांचीही हुकमत चालते. कंट्रोलर व हिशेबखातें यांची प्रांतिक जमाखर्चावर देखरेख असते. त्यामुळें एखादी चूक झाल्यास ती सरकारच्या नजरेस येते.

१४. **वरिष्ठ व प्रांतिक सरकारची तुलना**:—१९१९ च्या सुधारणांनीं प्रांतांना जरी बरेंच आर्थिक स्वातंत्र्य मिळालें आहे, तरी हिंदुस्थानसरकारची स्थिति प्रांतिक सरकारपेक्षां चांगली आहे. प्रांतांच्या ताब्यांत जीं खातीं आहेत त्यांचा वसूल गरीब व श्रीमंत दोघांकडूनही घेतला जातो. यामुळें त्यामध्यें जास्त वाढ होणें शक्य नाहीं. उलटपक्षीं वरिष्ठ सरकारकडे असलेलीं खातीं राष्ट्रोन्नतीस पोषक अशीं आहेत व त्यांचा बोजा श्रीमंतांवरच मुख्यतः पडत असल्यामुळें उत्पन्नामध्यें बरीच वाढ होण्याचा संभव आहे. फक्त मिठाची बाब मात्र अशी नाहीं.

कर बसविण्याचे बाबतींत प्रांतिक सरकारचे हक्क मर्यादित आहेत. गव्हर्नर जनरलच्या मंजुरीशिवाय त्याला कांहींच करतां येत नाहीं. वरिष्ठ सरकारचे हक्क मात्र अनियंत्रित आहेत. उत्पादक कामांकडेच विनियोग होणार असल्यास प्रांतिक सरकारला कर्ज काढतां येतें.

## जमीनमहसुलाच्या प्रमुख पद्धति.

हिंदुस्थानांतील बऱ्याच मोठ्या उत्पन्नाची जमीनमहसूल ही एक बाब आहे. या कराचा बहुतेक सर्व जनतेशीं संबंध येतो म्हणून त्यासंबंधीं त्रोटक माहिती येथें दिली आहे. वेगवेगळे प्रांत जसजसे सरकारच्या अंमलाखालीं आले, तसतशी तेथील धारापद्धति ठरल्यामुळें परिस्थित्यनुरूप या धारेबंदीची उभारणी अनेक तत्वांवर झाली आहे. धारेबंदीचे कायम व हंगामी असे दोन प्रकार आहेत. हंगामीमध्यें **महालवारी** व **रयतवारी** या मुख्य होत. एकंदरींत कायम, महालवारी व रयतवारी असे

धारेबंदीचे मुख्य तीन प्रकार आहेत.

( १ ) **कायमधारापद्धति किंवा जमिनदारीः**—ही पद्धति बंगालमध्यें लॉर्ड कॉर्नवालिसनें १७९३ त सुरू केली. या पद्धतीमुळें जमिनदार लोक जमिनीचे कायमचे मालक झाले असून, ठरवून दिलेला सारा त्यांना निरंतर भरावा लागतो. शेतकरी जमिनदारांकडे शेतसारा भरतात. या पद्धतीमुळें जमीनदारांचा फायदा झाला आहे. परंतु सरकारला आपलें उत्पन्न वाढवितां येत नाहीं. कायमधारापद्धतीशिवाय इतर बहुतेक पद्धती हंगामी आहेत.

( २ ) **महालवारीः**—ही पद्धति मध्यप्रांत, 'अयोध्या, पंजाब वगैरे ठिकाणीं प्रचलित आहे. गांवचा एक जमीनदार किंवा तालुकदार असतो व त्याच्या जमीनी अनेक कुळांकडे वाटून दिलेल्या असतात. जमीनदार कुळांकडुन वसूल करून त्याचा ठराविक भाग सरकारांत भरतो. आग्रा प्रांतामध्यें किंवा पजाबांत खेडयांतील जमिनींचे बरेच मालक असतात; परंतु त्यांचा एक सघ किंवा गट असतो. हा संघ हाच एक जमिनदार समजून त्याच्या बरोबर धाराबंदीचा ठराव केला जातो व वसूलही त्याच्याकडूनच करण्यांत येतो. मध्यप्रांतामधील मालगुजारी पद्धतीप्रमाणें मालगुजारनें सरकारला व कुळानें मालगुजारला काय द्यावयाचें तें ठरलेलें आहे. प्रांताप्रमाणें २० अगर ३० वर्षांनीं किंवा ठराविक मुदतीनंतर नवीन आकारणी होते.

( ३ ) **रयतवारीः**—ही पद्धति मुंबई, मद्रास, व वऱ्हाड या ठिकाणीं चालू आहे. या पद्धतींत प्रत्यक्ष शेतकरी सरकारशीं सारा देणें वगैरे व्यवहार करतो. ३० वर्षांनीं आकारणी होते व सारा कमजास्त होतो. जमीनसारा ही बाब प्रांतिक झाली असून तिचें वार्षिक उत्पन्न सर्वांत जास्त आहे.

**१६. सारांशः**—१९१९ च्या कायद्यान्वयें वरिष्ठ सरकारचीं व प्रांतिक सरकारचीं उत्पन्नाचीं खातीं अजिबात स्वतंत्र झालीं आहेत. समाईक खातीं बंद करण्यांत आलीं असून प्रांतांना बरेंच स्वातंत्र्य मिळालें आहे. प्रांतिक सरकारला कर्ज काढण्याचे व कर बसविण्याचे कांहीं हक्क मिळाले-

आहेत. सरकारला जरूर असलेल्या अंदाजपत्रकांतील रकमा नामंजूर झाल्या असल्यास त्या गव्हर्नरला शेरा मारून मंजूर करून घेतां येतात. तरीपण हा हक्क फारसा उपयोगांत आणला जात नाहीं. वरिष्ठ सरकारकडे असलेल्या खात्यांचें उत्पन्न वाढण्यासारखें आहे. परंतु प्रांतिक सरकारचें उत्पन्न वाढण्याची आशा नाहीं.

---

प्रश्न:—१. हिंदुस्थानसरकार व प्रांतिक सरकार यांच्या जमेच्या व खर्चाच्या मुख्य बाबी कोणत्या ? २. जमाखर्चाचें अंदाजपत्रक म्हणजे काय ? ३. वरिष्ठ सरकारचें अंदाजपत्रक मंजूर करण्याची पद्धति काय आहे ? ४. प्रांतिक स्वायत्तता म्हणजे काय ? ५. सुधारणांच्या कायद्यामुळें प्रांतांना किती स्वायत्तता मिळाली आहे ? ६. जमीनमहसुलाच्या मुख्य पद्धतींचें थोडक्यांत वर्णन द्या. ७. हिशेबमंडळ, हुंडणावळ, प्रांतिक खंडणी यासंबंधीं त्रोटक माहिती लिहा.

---

## ८. न्याय

—:०:—

हिंदुस्थानच्या राज्यपद्धतिमध्यें कायद्याचें किती महत्त्व आहे, कायदे कसे केले जातात आणि कायदेकौन्सिलें कशीं असतात याचा विचार मागें झाला आहे. आतां कायदे अमलांत आणण्याचें मुख्य साधन जीं न्यायकोर्टें त्यांची माहिती खालीं दिली आहे.

१. कायदा:—न्यायकचेऱ्यांमध्यें ज्या कायद्यांची अंमलबजावणी केली जाते ते कायदे, ( १ ) पार्लमेंट व बादशाह यांनीं केलेले, ( २ ) हिंदुस्थानांतील कायदेमंडळांमध्यें मंजूर झालेले किंवा ( ३ ) गव्हर्नर जनरलनें केलेले असतात.

हिंदुमुसलमानांचे आपआपल्या समाजांतील वाद त्या त्या धर्मांतील कायद्यान्वयें तोडले जातात. दिवाणी व फौजदारी खटले सिव्हिल व क्रिमिनल प्रोसीजर कोडप्रमाणें चालतात. फौजदारी खटल्यांमध्यें गुन्हे-

गारांना पीनलकोडप्रमाणें शिक्षा होते.

१८३३ सालीं मेकॉलेसाहेबांची कायदेपंडित म्हणून नेमणूक झाली व त्यांनीं अत्यंत परिश्रम करून पीनलकोड बनविलें. नंतर १८६१ सालीं क्रिमिनल प्रोसिजर कोड झालें.

**२. दिवाणी व फौजदारीः**—कायदे मोडणारांना न्यायासनापुढें खेंचून आणिल्यानंतर त्यांनीं कोणता कायदा मोडला तें ठरवून त्यांना योग्य शासन करणें हें न्यायाधीशाचें काम असतें. दोन व्यक्तींमध्यें मालमत्तेच्या ताब्यासंबंधीं किंवा हक्कासंबंधीं वाद उत्पन्न झाल्यास त्या दाव्याचा निवाडा करण्याचें कामही न्यायाधीशाकडे असतें. फौजदारी व दिवाणी असे गुन्ह्यांचे दोन प्रकार आहेत. खून, दरवडे वगैरे अत्याचार करणारा मनुष्य सर्व समाजास घातक असतो, सबब सरकार त्याच्यावर खटला भरतें. अशा प्रकारच्या खटल्यांस फौजदारी खटले असें म्हणतात. यांचा निकाल फौजदारी कायद्यान्वयें होतो. दोन भावांमध्यें मिळकतीच्या वांटणीसंबंधीं अगर वारसासंबंधीं जे तंटे उत्पन्न होतात, ते दोन व्यक्तीमधील हक्कासंबंधीं केवळ खासगी स्वरूपाचे असतात. सबब त्यांचा निकाल दिवाणी कायद्यान्वयें केला जातो. अशा प्रकारच्या खटल्यांस दिवाणी खटले म्हणतात. यांत सरकारचा निवाडा देण्यापलीकडे कांहींही संबंध येत नाहीं.

## हायकोर्टें

**३. स्थापनाः**—सध्यांची न्यायपद्धति १८६१ च्या कायद्यान्वयें आंखलेली आहे. याच सालीं प्रथम कलकत्ता, मद्रास, मुंबई व नंतर कांहीं दिवसांनीं अलाहाबाद येथें हायकोर्टें स्थापन करण्यांत आलीं. पुढें पंजाब, बहार, व रंगून येथेंही हायकोर्टें स्थापण्यांत आलीं. ब्रिटिश हिंदुस्थानांत सात हायकोर्टें आहेत. दुय्यम प्रतीच्या प्रांतांमध्यें चीफकोर्टें असतात. हायकोर्टांतील न्यायाधीशांची नेमणूक बादशहांकडून होते, परंतु चीफकोर्टांमधील नेमणूक गव्हर्नर जनरलकडून होते.

**४. रचनाः**—एका हायकोर्टामध्यें साधारणपणें २० पेक्षां जास्त न्यायाधीश नसतात. यांपैकीं $\frac{1}{3}$ बॅरिस्टर, $\frac{1}{3}$ न्यायाखात्यांतील सनदी नौकर

व $\frac{1}{3}$ एतद्देशीय वकिलांपैकीं असतात. प्रांतामध्यें हायकोर्ट हीच सर्वांत मोठी न्यायकचेरी असते. कनिष्ठ प्रतीच्या प्रांतांमध्यें ज्युडिशिअल कमिशनर हा न्यायखात्याचा मुख्य असतो. सिंधप्रांतामध्यें ज्युडिशिअल कमिशनरचें कोर्ट आहे. मुंबई हायकोर्टांत १ सर-न्यायाधीश व ९ न्यायाधीश आहेत.

**५. हायकोर्टाचे अधिकारः**—हायकोर्टामध्यें फौजदारी व दिवाणी खटले चालतात. त्यांचे अधिकार मर्यादित नाहींत. इलाख्याच्या मुख्य ठिकाणच्या हद्दींतील अव्वल खटलेसुद्धां हायकोर्टमध्यें चालतात. प्रांतांतील खालच्या प्रतीच्या सर्व फौजदारी व दिवाणी कोर्टाच्या निकालावर हायकोर्टमध्यें अपील चालते.

प्रांतांतील सर्व फौजदारी व दिवाणी न्यायकचेऱ्यांवर हायकोर्टाना देखरेख करावयाची असते. त्यांच्या कामकाजासंबंधीं नियम करणें, नेमणुका करणें, इत्यादि कामें हायकोर्टाचींच असतात. खालच्या कोर्टाला फांशीची शिक्षा द्यावयाची असल्यास हायकोर्टाची संमति घ्यावी लागते. प्रांताधिकाऱ्यांचा ताबा त्यांच्यावर मुळींच नसतो. हायकोर्टमध्यें चाललेल्या अव्वल खटल्यावरील अपील हायकोर्टमध्येंच चालतें. हायकोर्ट व चीफकोर्ट यांच्या निकालाविरुद्ध कांहीं बाबतींत लंडनमध्यें प्रिव्ही कौन्सिलपुढें अपील चालतें.

**६. प्रिव्ही कौन्सिल ( Privy Council ):**—हिंदुस्थानांत दिवाणी व फौजदारी कचेऱ्या अनेक आहेत; परंतु त्या आपल्या अधिकारानुरूप ताब्यांत असलेल्या प्रांतापुरताच न्याय देतात. या सर्व प्रांतिक कचेऱ्यांपेक्षां वरिष्ठ दर्जाची न्यायकचेरी लंडनमधील प्रिव्ही कौन्सिलची होय. ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें यांमधील कोर्टाच्या निकालावर दाद मिळण्याचें हें एकच ठिकाण आहे. त्यामध्यें अव्वल खटले चालत नसून हायकोर्ट व चीफकोर्ट यांविरुद्ध अपीलें चालतात.

साम्राज्यांतील सर्व लोकांस राजाकडे दाद मागण्याचा हक्क आहे. राजानें हें आपलें काम प्रिव्ही कौन्सिलच्या न्यायसभेकडे ( Judicial Committee ) सोंपविलें आहे. रु. १०,००० पेक्षा जास्त मालमत्तेसंबंधीं दिवाणी खटलें हें मंडळ विचारांत घेतें. प्रिव्ही कौन्सिलकड

जाण्यास योग्य अशा प्रकारचा हायकोर्टाचा शेरा असल्यास किंवा प्रिव्ही-कौन्सिलची परवानगी मिळाल्यास फौजदारी खटलाही या मंडळापुढें चालूं शकतो.

## फौजदारी (Criminal)

सर्व प्रांतांतून फौजदारी न्याय देण्याची पद्धति बहुतेक सारखीच आहे.

७. **सेशन्स कोर्टें** (Sessions Conrts):—हायकोर्टाशिवाय फौजदारी खटले सेशन्स कोर्टें व मॅाजस्ट्रेटच्या कचेऱ्या यांमध्यें चालतात. प्रत्येक जिल्ह्यामध्यें एक सेशन्स कोर्ट असतें. यांतील मुख्य न्यायाधीश सेशन्स जज्ज असतो. जरूरीप्रमाणें त्याच्या मदतीला जादा किंवा दुय्यम सेशन्स जज्जेस असतात. सेशन्स जज्जच जिल्हाजजाचें काम करतो. मॅजिस्ट्रेटनें पाठविलेला प्रत्येक खटला येथें चालतो. फांशीची शिक्षा द्यावयाची असल्यास हायकोर्टची परवानगी लागते.

८. **मॅजिस्ट्रेटः**—(Magistrate) सेशन्स कोर्टापेक्षां खालच्या दर्जाच्या न्यायकचेऱ्या मॅजिस्ट्रेटच्या होत. याचे मुख्य तीन वर्ग असून प्रत्येक वर्गाचे अधिकार ठरलेले आहेत. पहिल्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटला २ वर्षें शिक्षा व १००० रुपयेपर्यंत दंड करण्याचा अधिकार आहे. कलेक्टर, असिस्टंट कलेक्टर व कांहीं मामलेदार हे पहिल्या वर्गाचे मॅजिस्ट्रेट असतात. मामलेदार व तहशीलदार हे दुसऱ्या वर्गाचे मॅजिस्ट्रेट असतात. यांना ६ महिने शिक्षा व २०० रुपयेपर्यंत दंड करण्याचा अधिकार असतो. फडणीस व मुनसफ हे तिसऱ्या वर्गाचे मॅजिस्ट्रेट होत. यांना १ महिन्याची शिक्षा व ५० रुपयेपर्यंत दंड करण्याचा अधिकार असतो.

वरील नोकरवर्गांतील मॅजिस्ट्रेटशिवाय सरकारी नोकर नसलेल्या गृहस्थानांही खालील हुद्दे व अधिकार दिलेले असतात.

९. **ऑनररी मॅजिस्ट्रेट** (Honorary Magistrate):—इलाख्याच्या व जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं समाजांतील समतोल बुद्धीच्या व वजनदार लोकांना किरकोळ खटले चालविण्याचा अधिकार दिलेला असतो. हे निर्वेतन काम करतात, ह्मणून त्यांना ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणतात.

१०. **प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट** ( Presidency Magistrate ):—हे इलाख्याच्या मुख्य ठिकाणीं असतात. त्यांना पहिल्या वर्गाचे अधिकार असतात. ते किरकोळ खटले स्वतः चालवितात, व महत्त्वाचे सेशन्सकडे पाठवितात. याशिवाय इलाख्याच्या ठिकाणीं कांहीं सन्माननीय गृहस्थांना जे. पी. ( J. P. ) म्हणजे जस्टिस् ऑफ धि पीस ( Justice of the Peace ) ही पदवी दिली जाते. यांना ऑनररी मॅजिस्ट्रेटपेक्षां जास्त अधिकार असतात.

११. **कोरोनर** ( Coroner ):—कोणी अकस्मात् मृत्यु पावल्यास किंवा मरणासंबंधीं संशय आल्यास त्या बाबतींत चौकशी करण्याकरतां इलाख्याच्या मुख्य ठिकाणीं कोरोनर नांवाचा अधिकारी नेमलेला असतो. इतर ठिकाणीं हें काम मॅजिस्ट्रेट किंवा पोलीसकडे असते.

१२. **फौजदारी कचेऱ्यांचे वर्ग**:—फौजदारी कचेऱ्यांचे पांच वर्ग पडतात. १ हायकोर्टें, २ सेशन्स कोर्टें, ३ तिन्ही वर्गांच्या मॅजिस्ट्रेट-कचेऱ्या, ४ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट कचेऱ्या, ५ ऑनररी मॅजिस्ट्रेट-कचेऱ्या.

१३. **फौजदारी अपिलें**:—दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांच्या मॅजिस्ट्रेटच्या निकालांवर पहिला वर्ग किंवा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे अपील चालतें. पहिला वर्ग--मॅजिस्ट्रेटच्या निकालावर अपीलें सेशन्समध्यें चालतात व सेशन्समधील निकालांवर हायकोर्टकडे चालतात. खालच्या कोर्टांच्या निकालांत कांहीं दोष आढळल्यास हायकोर्टें सर्व पुरावा पाहतात व फेरतपासणी करून निकाल देतात. गव्हर्नर जनरल व प्रांताधिकारी यांना फांशीची शिक्षा माफ करण्याचा अधिकार आहे.

## दिवाणी ( Civil )

१४. **दिवाणी न्यायकचेऱ्या**:—सेशन्स जज्ज हाच जिल्ह्याचा मुख्य न्यायाधीश असतो. जिल्ह्यांतील खालच्या प्रतीच्या दिवाणी कचेऱ्यांवर याची देखरेख असते. याला अव्वल दावे घेण्याचा अधिकार आहे. याच्या मदतीला आसिस्टंट जज्ज व हाताखालीं पहिल्या व दुसऱ्या वर्गाचे सबजज्ज असतात. सर्व प्रांतांमध्यें सबजज्जाचे अधिकार सारखेच नसतात.

दोन्ही वर्गांच्या अधिकारांमध्यें फरक आहे. खेड्यांतील किरकोळ खटले तेथील मुनसफ ( Village Munsif ) चालवितात. सर्वांना न्याय लवकर व कमी त्रासानें मिळावा म्हणून तालुकानिहाय न्यायकचेऱ्या आहेत.

१५. स्माल कॉझेस कोर्टें ( Small Causes Courts ):—इलाख्याच्या व जिल्ह्याच्या कांहीं ठिकाणीं किरकोळ देवघेवीसंबंधीं दाव्याचा निकाल लवकर मिळावा या उद्देशानें हीं कोर्टें असतात. इलाख्याच्या कोर्टांमध्यें २००० पर्यंत व जिल्ह्याच्या ठिकाणीं ५०० पर्यंत दावे चालतात. मुंबई, अहमदाबाद, पुणें, कराची इत्यादि ठिकाणीं असल्या कचेऱ्या आहेत. येथील निकालावर अपील नाहीं. फक्त कायद्याच्या मुद्यासंबंधीं हायकोर्टाचा सल्ला घेतां येतो.

१६. दिवाणी कोर्टांचे वर्ग:—दिवाणी न्यायकचेऱ्यांचे पांच वर्ग आहेत. १ हायकोर्ट, २ जिल्ह्याचा मुख्य न्यायाधीश व त्याचा मदतनीस दुय्यम न्यायाधीश ( Assistant Judge ) यांची कचेरी, ३ स्मॉल काझेस कोर्ट, ४-५ पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या सबजज्जांच्या कचेऱ्या.

१७. अपिलें:—सबजज्जांच्या निकालावर जिल्हा-कोर्टांमध्यें अपील चालतें. परंतु दाव्याची रक्कम फार मोठी असल्यास एकदम हायकोर्टामध्यें दाद मागतां येते. १०,००० वर दावा असल्यास हायकोर्टाच्या निकालावर प्रिव्ही कौन्सिलकडे दाद मागतां येते.

१८. मुलकी न्यायकचेऱ्या:—वर सांगितलेल्या कचेऱ्यांशिवाय मुलकी न्यायकचेऱ्या असतात. सारावसुली व आकारणीसंबंधीं सर्व कामें या कचेऱ्यांमध्यें चालतात, व न्याय देण्याचें काम मामलेदार, कलेक्टर वगैरे मुलकी अधिकारी करतात. जमिनीच्या हक्कासंबंधींचीं कामें दिवाणी कचेऱ्यांत चालतात.

१९. मॅजिस्ट्रेट व न्यायाधीश:—मॅजिस्टेटकडे शांतता राखण्याचें व फौजदारी खटले चालविण्याचें असें दुहेरी काम असतें. परंतु न्यायाधीशांना फक्त त्यांच्यापुढें आलेल्या फौजदारी व दिवाणी दोन्हीही खटल्यांची चौकशी करून निकाल द्यावयाचा असतो. मॅजिस्ट्रेटला पोलिस-

मार्फत गुन्ह्यांचा शोध करून त्यांचा नायनाट करण्याचें व्यापक स्वरूपाचें मुख्य काम करावयाचें असतें न्याय देण्याचें काम दोघेही करतात, एवढेंच फक्त त्यांच्यामध्यें साम्य आहे.

२०. ज्यूरी व असेसर्स ( Jury and Assessors ):—कांहीं फौजदारी खटल्यांमध्यें निकाल देण्याचें काम एकट्या न्यायाधीशाकडे न सोंपवितां, खटला ऐकून त्यासंबंधीं आपलें मत देण्याकरितां सरकारनें कांहीं गृहस्थ नेमलेले असतात, त्यांना ज्यूरी असें म्हणतात. हायकोर्टांतील सर्व फौजदारी खटल्यांत ज्यूरी असते. हायकोर्टच्या ज्यूरीमध्यें नऊ सभासद असतात. इतर ठिकाणीं नऊपर्यंत कोणतीही विषम संख्या असते. यांचें मत न्यायाधीशाच्या विरुद्ध पडल्यास त्याला आपल्या मताप्रमाणें निकाल देतां येत नाहीं. ज्यूरीचा निकाल चुकीचा वाटल्यास खटला फेरतपासणीकरितां हायकोर्टकडे पाठविला जातो.

जेथें ज्यूरीचे अधिकार दिलेले नसतात, अशा ठिकाणीं किरकोळ फौजदारी खटल्यांमध्यें ज्यूरर्सच्या जागीं असेसर्स नेमतात. त्यांचें काम न्यायाधीशाला नुसता सल्ला देण्याचें असतें. ज्यूरीप्रमाणें न्यायाधीशावर त्यांचें मत बंधनकारक नसतें.

२१. युरोपियनांची चौकशी:—युरोपियनांचीं दिवाणी कामें एतद्देशियांप्रमाणेंच चालतात. फौजदारी कामांमध्यें मात्र त्यांना बरेच दिवस विशेष सवलती होत्या व हल्लींही कांहीं आहेत. प्रथम युरोपियनांविरुद्ध फौजदारी कामें फक्त हायकोर्टांतच चालत; त्यामुळें फिर्यादींना फारच जिकीर होई. १८७२ पासून असे खटले सेशन्सजज व पहिल्या वर्गाचे मॅजिस्ट्रेट युरोपियन असल्यास त्यांच्यापुढें चालूं लागले. परंतु न्यायदानांत वर्णभेद असणें वाईट असें वाटून तो नाहींसा करण्याचे हेतूनें चौकशी करण्याकरितां १८८३ मध्यें इलबर्ट कमिशन नेमलें. या कमिशनच्या शिफारशीवरून इलबर्ट बिल पास झालें. या बिलान्वयें सेशन्सजज व पहिल्या वर्गाचे मॅजिस्ट्रेट हिंदी असले तरी त्यांना युरोपियनांचे खटले चालविण्याचा अधिकार मिळाला. मात्र अशा वेळीं आरोपीला निदान निम्मे युरोपियन किंवा अमेरिकन असलेली ज्यूरी मागण्याची सवलत देण्यांत आली.

१९२३ मध्यें हा भेद आणखीही कमी झाला असून हल्लीं ५० रु. पर्यंत दंडाच्या गुन्ह्यांचीं कामें कोणत्याही मॅजिस्टेटला चालवितां येतात.

## २२. कायद्यासंबंधी अधिकारी:—

गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळामध्यें एक कायदेपंडित ( Law Member ) असतो. इलाख्याच्या ठिकाणीं अडव्होकेट जनरल म्हणून मुख्य अधिकारी असून त्याच्या मदतीला सॉलिसिटर्स असतात. याशिवाय बऱ्याच प्रांतांमध्यें लीगल रिमेंब्रन्सर म्हणून अधिकारी असतात. यांचें काम सरकारला कायदेशीर सल्ला देऊन सरकारतर्फे कामें चालविण्याचेंही असतें. जिल्हानिहाय सरकारी कामें चालविण्याकरितां सरकारी वकील असतात. याशिवाय इलाख्याच्या मुख्य ठिकाणीं शेरीफ असतो. याची नेमणूक वार्षिक असते. ज्यूरी बोलावणें, ज्यूरर्सची यादी तयार करणें, जरूर पडल्यास नागरिकांची सभा बोलावून सार्वजनिक प्रश्नांचा ऊहापोह करणें इत्यादि कामें याच्याकडे असतात.

**२३ सारांश:**—कायदा अमलांत आणण्याचें काम न्यायकचेऱ्यांचें असतें. न्यायकचेऱ्या फौजदारी व दिवाणी अशा दोन प्रकारच्या आहेत. फौजदारी कामें सेशन्स जज व मॅजिस्ट्रेट पाहातात. दिवाणी कामें डिस्ट्रिक्ट जज्ज व सबजज्ज चालवितात. इलाख्याच्या ठिकाणीं व मोठ्या शहरांमध्यें स्मॉलकॉझेस् कोर्टें असतात. प्रांतांतील सर्वांत वरिष्ठ न्यायकचेरी म्हणजे हायकोर्ट किंवा चीफ कोर्ट असते. हायकोर्टांना फौजदारी व दिवाणी खटले आणि अपिलें वगैरे सर्व कांहीं कामें चालविण्याचा पूर्ण अधिकार असतो. परंतु अव्वल खटले फक्त इलाख्याच्या ठिकाणचेच घेतां घेतात. याचेवर अपील करणें झाल्यास तें लंडनमधील प्रिव्ही कौन्सिलकडे करावें लागतें.

---

प्रश्न:—१. दिवाणी व फौजदारी यांमध्यें फरक काय? २ न्यायकचेऱ्यांचे एकंदर प्रकार किती आहेत? ३. हायकोर्टाची घटना सांगून त्यांचे अधिकार काय आहेत ते द्या. ४. मॅजिस्ट्रेटचे प्रकार सांगून त्यांचे

अधिकार काय आहेत ते सांगा. ५. युरोपियनांची चौकशी, स्मॉल-काझेस कोर्ट, कोरोनर, चीफकोर्ट, ज्यूरी यांवर टीपा द्या.

---

# ९. पोलीस व तुरुंग

## पोलीस

**१. प्रास्ताविकः**—परकीय स्वारी आल्यास देशाचें संरक्षण करण्याचें काम लष्कराचें आहे. देशामध्यें बंडाळी वगैरे झाल्यास कधीं कधीं लष्कराचा उपयोग करतात, परंतु देशामध्यें सुव्यवस्था ठेवून शांतता राखणें हें पोलीसचें मुख्य काम आहे. सरकार कायदे बनवितें, व न्यायकोर्टें ते अमलांत आणतात; परंतु कायद्यांविरुद्ध वर्तन करणाऱ्या लोकांचा शोध लावून, देशांतील गुन्ह्यांची संख्या कमी करण्यामध्यें मॅजिस्ट्रेटला मदत करण्याचें काम पोलीसचें आहे. सबब न्याय व पोलीस यांचा निकट संबंध येतो.

**२. व्यवस्थाः**—हल्लींची पोलीस खात्याची व्यवस्था १८६१ सालच्या कायद्यान्वयें चालते. परंतु अलीकडे या खात्यामध्यें पुष्कळच सुधारणा झाल्या आहेत. प्रांतिक सरकारच्या ताब्यांत त्या त्या प्रांतांतील पोलीसची व्यवस्था असते. प्रांतांतील मुख्य पोलीस अंमलदार **इन्स्पेक्टर जनरल** असतो. जिल्हानिहाय **डिस्ट्रिक्ट सुपरिन्टेन्डेन्ट ऑफ पोलीस** असतात, व त्यांच्या हाताखालीं **दुय्यम सुपरिन्टेन्डेन्ट** असतात. जिल्ह्याच्या पोलीसवर कलेक्टरची देखरेख असते. जिल्ह्यांत शांतता राखण्याचें काम यांच्या मदतीनेंच केलें जातें. तालुक्यामध्यें **इन्स्पेक्टर** असतात व त्यांच्या हाताखालीं प्रत्येक ठाण्यावर एक एक **सब इन्स्पेक्टर** असतो. चार पांच ठाण्यांवर एक इन्स्पेक्टर असतो. वरिष्ठ दर्जाच्या नेमणुका इंग्लंडमध्यें होतात. सुपरिंटेंन्डेंट वगैरे अधिकारी येथेंच नेमतात.

इलाख्याच्या ठिकाणीं स्वतंत्र पोलीस असून त्यांची सर्व व्यवस्था **पोलीस कमिशनरकडे** असते.

३. **पोलीसचे वर्ग**:—खात्याची व्यवस्था नीट रहावी म्हणून त्याचे अनेक वर्ग केले आहेत. पोलीसचे साधे व लष्करी असे दोन मुख्य प्रकार आहेत. याशिवाय त्यांचे शहरपोलीस, गांव-पोलीस आगगाडी-पोलीस, शिलकी पोलीस, असे अनेक वर्ग आहेत.

जिल्हा-पोलीसचे सशस्त्र पोलीस व निःशस्त्र पोलीस असे दोन प्रकार असतात. खजिन्यावर पहारा करणें, खजिना किंवा कैदी एका ठिकाणाहून दुसरीकडे नेणें, वगैरे कामें सशस्त्र पोलिसांकडे असतात. दुसऱ्यांकडे व्यवस्था व शांतता राखणें, धोक्याच्या वेळीं लोकांना मदत करणें वगैरे कामें असतात.

( १ ) **लष्करी पोलीस** ( Military Police ):—हे हत्यारबंद शिपाई असून त्यांना ज्या प्रांतांमध्यें रानटी व गुन्हेगार जातींचा उपद्रव फार असतो तेथें काम करावयाचें असतें.

( २ ) **शहर पोलीस** ( City police ):—हे शहरांमध्यें शांतता व सुव्यवस्था राखण्याकरतां ठेवलेले असतात. यांची संख्या १,६०,००० आहे.

गांवपोलीसांची संख्या ७,००,००० आहे. खेडेगांवांतील चौकीदार व पोलीस पाटील यांचा ह्यांत अंतर्भाव होतो. मध्यप्रांतामध्यें गांवपोलीस नाहींत. खेडेगांवांतील गुन्ह्यांची सुपरिन्टेन्डेन्टास वर्दी देण्याचें काम यांचें असतें. खेड्यांतील गुन्हे वगैरेसंबंधीं सर्व कामें फार प्राचीन काळापासून यांच्याकडेच आहेत.

( ३ ) **आगगाडीकडील पोलीस** ( Railway Police ):—यांच्याकडे आगगाड्यांत होणाऱ्या चोऱ्या, मारामाऱ्या वगैरेंचा शोध लावून शांतता राखणें व मालमत्तेचें रक्षण करणें इत्यादि कामें असतात.

( ४ ) **शिलकी पोलीस** ( Reserve Police ):—प्रसंगविशेषीं उपयोग व्हावा म्हणून राखून ठेवलेल्या पोलीसांच्या जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं स्वतंत्र तुकड्या असतात. यांना नेहमीं काम नसतें. कोठें बंडाळी वगैरेचीं चिन्हें दिसून आल्यास त्या ठिकाणीं यांची रवानगी होते.

(५) गुप्त पोलीस (C. I. D.):—संशयित वृत्तीचे इसम, गुन्हेगार जाती, अराजक, बनावट कागद वगैरे करणाऱ्या लोकांचा गुप्त रीतीनें तपास करण्याचें काम गुप्तपोलीसांकडे असतें. गुन्ह्यांची युक्तिप्रयुक्तीनें माहिती मिळवून ते उघडकीस आणण्याचीं साध्या शिपायांस न होणारीं कामें यांच्याकडे सोंपविलीं जातात.

४. पोलीसशिक्षण:—प्रत्येक प्रांतामध्यें पोलीस अधिकाऱ्यांना शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. सर्व इन्स्पेक्टरना वर्ष दीड वर्ष शिक्षण घ्यावें लागतें. मुंबई इलाख्यांत नाशीक येथें अशा प्रकारची एक संस्था आहे.

शांतता राखण्याचें काम ज्याप्रमाणें पोलीसांचें आहे, त्याप्रमाणें लोकांचेंही आहे. नागरिकांनीं पोलीसांला योग्य मदत केल्याशिवाय पोलीसचें काम चांगलें होणें अशक्य आहे. सबब लोक व पोलीस यांचें सहकार्य होणें अत्यंत इष्ट आहे.

## तुरुंग.

५. पोलीसचें काम गुन्हे कमी करून शांतता ठेवण्याचें असतें. शिक्षा झालेल्या इसमांना ताळ्यावर आणणें, त्यांना कांहीं धंदा शिकवून स्वकष्टानें निर्वाह करण्यास उत्तेजन देणें वगैरे व गुन्हेगारांची गुन्हे करण्याची प्रवृत्ति न वाढतां त्यांना चांगल्या मार्गाला लावणें हीं कामें तुरुंगांचीं आहेत. सबब पोलीस व तुरुंग यांचा परस्पर निकट संबंध आहे.

६. गुन्हा व शिक्षा:—गुन्हेगारांना पूर्वीं फार भयंकर शिक्षा दिल्या जात. त्यांचें एकादें इंद्रिय छिन्नभिन्न करणें, हालहाल करून मारणें, फटके मारणें, हत्तीच्या पायाखालीं तुडवणें, कडेलोट करणें, वगैरे शिक्षेचे अनेक अमानुष प्रकार असत. त्याचप्रमाणें त्यांची शिक्षा संपेपर्यंत त्यांना घाणेरड्या कोठड्यांत ठेवीत. खुनी, दरवडेखोर व किरकोळ गुन्हे करणारीं मुलें हे सर्व एकाच जागीं ठेवण्यांत येत. तुरुंगांतील हवा वगैरे वाईट असल्यामुळें पुष्कळांचा अंत तेथेंच होई. त्यांतूनही सुदैवानें एकादा सुटलाच, तर तो तेथील संगतीमुळें निगरगट्ट बने.

७. सुधारणा:—ही परिस्थिति सुधारण्याकरतां अनेक प्रयत्न करण्यांत

आले. १८९४ सालीं तुरुंगांचा कायदा झाला. त्याप्रमाणें हल्लीं व्यवस्था चालू आहे. हल्लीं तुरुंगांच्या इमारती हवाशीर बांधलेल्या असतात. कडक शिक्षा नाहींशा केल्या आहेत. निरनिराळया प्रकारचे कैदी अलग ठेवण्यांत येतात. तुरुंगामध्यें कैद्याला कांहीं तरी धंदा शिकवून तो शिक्षा संपून बाहेर पडल्यावर आपलें पोट सहज पण नीतीनें भरील, आणि गुन्ह्याकडे त्याची प्रवृत्ति होणार नाहीं, अशा प्रकारची व्यवस्था केलेली असते. कैद्यांची व्यवस्था कशी काय आहे तें पाहण्याकरितां सन्माननीय गृहस्थांची नेमणूक करण्यांत येते. बऱ्याच ठिकाणीं धर्मपर व नैतिक प्रवचनेंही केलीं जातात.

८. अंतर्व्यवस्था:—स्थानिक परिस्थित्यनुरूप प्रांतांनिहाय तुरुंगांच्या अन्तर्व्यवस्थेसबंधीं नियमांमध्यें फरक आहेत, व कांहीं प्रांतांमध्यें शिक्षेची पद्धतिसुद्धां वेगळी आहे.

शिक्षेच्या प्रकाराप्रमाणें कामामध्यें फरक असतो. साध्या कैदेच्या इसमाला काम देत नाहींत. सक्त मजुरीच्या इसमाला त्याचे ताकदीप्रमाणें श्रमाचीं कामें दिलीं जातात.

साधारणत: कैद्याला नऊ तास काम करावें लागतें. तुरुंगांतील सर्व कामें कैद्यांनाच करावीं लागतात. याशिवाय लडी फोडणें, खणणें, सतरंज्या विणणें, छापणें, सुतारकाम करणें वगैरे अनेक तऱ्हेचीं कामें चालू असतात. कैद्याचें काम समाधानकारक न झाल्यास त्याला न आवडणारें अन्न देणें, कोठडींत कोंडणें, बेड्या घालणें, फटकें मारणें वगैरे शिक्षा दिल्या जातात.

व्यवस्थित रीतीनें नेमून दिलेलें काम करणाराचे शिक्षेचे दिवस कमी केले जातात, व त्याला वार्डर ( Warder ) म्हणूनही नेमलें जातें.

९. गुन्हेगार मुलें:—शिक्षा झालेलीं १५ वर्षांखालील अज्ञान मुलें रेफरमेटरी ( Refomatory ) म्हणून संस्था असतात तेथें पाठविण्यांत येतात. मुंबई इलाख्यांत येरवडा येथें असली संस्था आहे. या संस्था म्हणजे शाळाच होत; परंतु येथील शिस्त शाळेपेक्षां फार कडक असते.

यांत सुतारकाम, लोहारकाम, विणकाम, पुस्तकें बांधणें वगैरे उपयुक्त धंदे शिकविले जातात. या संस्था शाळाखात्याच्या ताब्यांत असतात. मुलींना बहुतेक ताकीद देऊन सोडून देण्यांत येतें.

१०. **काळें पाणीः**—अंदमानांतील हवा वाईट असल्यामुळें, हल्लीं काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या कैद्यांना अंदमान बेटांत न पाठवितां निरनिराळ्या प्रांतांतील तुरुंगांतच ठेवण्याची व्यवस्था झाली आहे. व अंदमानांत असलेल्या कैद्यांचीही सोय जसजशी होईल तसतसें त्यांना इकडे आणण्यांत येत आहे.

११. **तुरुंगांची वर्गवारीः**—तुरुंगांचे तीन प्रकार आहेत. एका वर्षा-पेक्षां जास्त शिक्षा झालेल्या कैद्यांना '**मध्यवर्ती**' ( Central ) तुरुं-गांमध्यें ठेवितात. जिल्ह्याच्या ठिकाणीं असणाऱ्या जिल्हा-तुरुंगामध्यें १५ दिवसांपासून एक वर्षापर्यंत शिक्षा झालेले कैदी असतात. अगदीं खालच्या प्रतीच्या तुरुंगामध्यें किंवा कोठडीमध्यें पंधरा दिवसांपेक्षां कमी शिक्षा झालेले कैदी किंवा खटला चालू असलेले आरोपी ठेवतात.

१२. **अधिकारीः**—प्रांतांतील तुरुंगांचा मुख्य अधिकारी इनस्पेक्टर जनरल असतो. हा अधिकारी व पहिल्या प्रतीचे तुरुंगांचे सुपरिटेन्डेन्ट हे वैद्यक खात्यापैकीं वरिष्ठ दर्जाचे अधिकारी असतात. जिल्हा-तुरुंगावर बहुतेक सिव्हिल सर्जनची देखरेख असते.

१३. **गुन्हेगार जातींची सुधारणाः**—कैद्यांना व गुन्हेगार जातींना योग्य वळण लावण्याचे अनेक प्रयत्न चालू आहेत. तुरुंगांतून सुटलेल्या कैद्यांच्या मदतीकरितां पुष्कळ संस्था आहेत. तुरुंगांतून सुटलेल्या कैद्यांना कपडालत्ता पुरविणें, त्यांना कामधंदा पाहून देणें, वगैरे कामें ह्या संस्था करतात. ह्याशिवाय गुन्हेगार जातींना सुधारण्याकरितां सरकारी खर्चानें जागोजाग वसाहती काढल्या आहेत. यांत मोठ्या इसमांना गिरण्या, कारखाने वगैरे ठिकाणीं कामें लावून दिलीं जातात, व मुलांना सुतारी, लोहारी, शिवणकाम यासारखे अनेक धंदे शिकवून त्यांचें आचरण सुधारण्याचा प्रयत्न केला जातो.

१४. **सारांशः**—गुन्हे शोधून काढून ते कमी करण्याचा प्रयत्न करणें

व देशामध्यें शांतता राखणें हीं पोलीसांचीं मुख्य कामें होत. पोलिसांचे कामाप्रमाणें वर्ग केले आहेत. जिल्ह्यामध्यें सशस्त्र व निःशस्त्र असे पोलिसांचे दोन प्रकार असतात. संशयित वृत्तीच्या लोकांवर टेहळणी करणें व महत्वाच्या गुन्ह्यांचा तपास करणें इत्यादि कामें गुप्त पोलिसांकडे सोंपविलीं जातात. पोलिसांना शिक्षण देणाऱ्या संस्था प्रत्येक प्रांतामध्यें आहेत.

पोलीस गुन्हे कमी करण्याचा प्रयत्न करतात व तुरुंगामध्यें कैद्यांना सुधारण्याचा प्रयत्न केला जातो. कांहींतरी धंदा शिकून, तुरुंगांतून बाहेर पडल्यावर कैद्याला आपलें पोट भरतां येईल व गुन्ह्याकडे त्याची प्रवृत्ति होणार नाहीं अशा प्रकारची योजना केलेली असते. हल्लीं पूर्वीप्रमाणें कडक शिक्षा नाहींत. कैद्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेतली जावी म्हणून तुरुंगांवर वैद्यक खात्यांतील अधिकारी नेमले जातात. काळ्या पाण्याची शिक्षा झालेले लोक शक्य तों येथील तुरुंगांतच ठेवून घेण्याची व्यवस्था केली आहे.

---

प्रश्नः—१ पोलिसांचें मुख्य कर्तव्य काय? व त्यांचे एकंदर प्रकार किती? २ हल्लीं तुरुंगांच्या अंतर्व्यवस्थेमध्यें काय फरक झाले आहेत? ३ तुरुंग किती प्रकारचे आहेत? ४ काळें पाणी, गुन्हेगार मुलें, कैद्यांना मदत करणाऱ्या संस्था यासंबंधीं माहिती द्या. ५ न्याय, पोलीस व तुरुंग यांचे परस्पर संबंध काय आहेत?

---

## १०. हिंदुस्थानचें संरक्षण–लष्कर व आरमार.

१. प्रास्ताविकः—देशाच्या कारभाराचीं लष्करी व मुलकी अशीं दोन अंगें असतात. पहिल्याचें काम देशाचें संरक्षण करणें व दुसऱ्याचें काम कायदे वगैरे करून देशांतील सर्व कारभार सुव्यवस्थितपणें चालविणें हें असतें. राष्ट्रांतील सर्वांत महत्वाची बाब लष्कर ही आहे. त्याच्या जोरावर आपलें संरक्षण करतां आलें व परचक्रापासून देश निर्धास्त

असला म्हणजे देशाची प्रगति भराभर होऊं लागून भरभराट होते व चोहोंकडे शांतता नांदते.

२. **हिंदुस्थानची सरहद्द:**—दक्षिणेस हिंदी सहासागरासारखा अफाट समुद्र व उत्तरेस हिमालयासारखा दुर्गम पर्वत अशी हिंदुस्थानची स्वाभाविक सीमा आहे. फक्त वायव्य व ईशान्य या दिशांकडे थोड्याशा खिंडी असल्यामुळें, त्यांच्या संरक्षणाकरितां मुख्यतः लष्कराची गरज लागते. ईशान्येकडील घाटांपेक्षां वायव्य प्रांताकडच्या घाटांमधून नेहमीं शत्रूंची भीति असते. आजपर्यंतच्या स्वाऱ्या इकडूनच झाल्या. हिंदुस्थानचें बरेंच लष्कर व लढाईची सामुग्री या ठिकाणीं जय्यत तयार ठेविलेली असते. गरज पडल्यास एकदम सर्व सैन्य या ठिकाणीं आणून ठेवतां येईल अशा प्रकारच्या आगगाडीच्या व इतर दळणवळणाच्या सोई केल्या आहेत.

३. **हिंदुस्थानचें संरक्षणः**—हिंदुस्थानच्या संरक्षणार्थ लष्कर, आरमार व विमानें अशा तीन प्रकारच्या योजना आहेत.

( १ ) **लष्कर:**—परचक्र आल्यास किंवा देशामध्यें बंडाळी माजल्यास पुन्हां शांतता प्रस्थापित करण्याकरतां लष्कराची जरूर असते.

( २ ) **आरमार:**—किनाऱ्याचें रक्षण करण्याचें काम ब्रिटिश आरमार खात्याकडे सोंपविलें आहे. याकरितां हिंदी आरमाराची ( Royal Indian Marine ) उभारणी झाली आहे.

( ३ ) **विमानें:**—अलीकडे महायुद्धापासून हिंदुस्थानांत विमानें ठेवण्याचा उपक्रम सुरू झाला आहे. पेशावर, रिसालपूर व क्वेटा हीं मुख्य ठाणीं आहेत.

४. **इतिहास:**—अगदीं प्रथम, कंपनीचा व्यापार सुरू झाला त्या वेळीं वखारींवर पहारा करण्याकरितां रामोशी वगैरे लोकांची नेमणूक केली जात होती. पुढें कंपन्या वाढून त्यांच्यामध्यें चुरशीचे व भांडणाचे प्रसंग वारंवार येऊं लागले. अशा परिस्थितींत वसाहतीचें संरक्षण करण्याकरितां म्हणून १६६९ मध्यें मुंबईस अगदीं पहिली युरोपियन पलटण उभार-

ण्यांत आली. कंपनी जसजशी राजकारणांत पडूं लागली, तसतशी हिंदी लोकांची भरती करणें भाग पडून १७४८ मध्यें मद्रासच्या संरक्षणार्थ पहिली हिंदी फलटण उभारली गेली. यानंतर पुष्कळ युरोपियन व हिंदी पलटणी उभारल्या गेल्या. १८५८ पर्यंत हिंदी लोकांची बरीच भरती झाली होती. परंतु बंडामुळें हिंदी लोकांवरचा विश्वास उडाला व हिंदी सैन्य कमी करण्यांत येऊन पलटणी युरोपियन अंमलदारांच्या ताब्यांत देण्यांत आल्या व हिंदी सैन्य अगदीं ठराविक ठेवण्यांत येऊं लागलें. पूर्वी हिंदी सैन्याकडे पोलीसचेंही काम असे. परंतु १८५८ सालीं स्वतंत्र पोलीस ठेवण्यांत आलें. १८९५ पर्यंत तीन इलाख्यांत सैन्याचे तीन विभाग असत आणि त्यावर निरनिराळे तीन मुख्य सेनापति असत. परंतु ह्या सालीं सर्व सैन्य एक करण्यांत आलें व त्यांत एकच मुख्य सेनापति नेमण्यांत आला.

हिंदुस्थानांतील सैन्याचे 'खास सैन्य' व 'स्वयंसेवक' असे दोन मुख्य प्रकार आहेत.

५. खास सैन्यः—( The Reguler Army ) या सैन्याच्या उत्तर, दक्षिण, पूर्व व पश्चिम अशा चार छावण्या असून त्यांचीं मुख्य ठिकाणें अनुक्रमें मरी, पुणें, नैनिताल व क्वेटा हीं आहेत. याशिवाय ब्रम्हदेशांत पलटणी आहेत. प्रत्येकीवर एकेक सेनापति असतो. ह्या सैन्याची घोडदळ, पायदळ, एंजिनिअर्स, तोफखाना वगैरे प्रमुख अंगें आहेत. सैन्याचे दोन भाग आहेत. विदेशी सैन्यामध्यें मुख्यतः ग्रेट ब्रिटन व आयर्लंडमधील शिपाई असतात; व एतद्देशीय सैन्यामध्यें शीख, गुरखे, रजपूत, मराठे वगैरे लोक असतात.

६. व्यवस्थाः—भारतमंत्री हा लष्करी कारभाराबद्दल मुख्यतः जबाब-दार असून त्याचा मुख्य सल्लागार 'इंडिया ऑफिस' मधील लष्करी चिटणीस असतो. हा हिंदुस्थानांतील अनुभविक असा लेफ्टनंट जनरल असला पाहिजे. याशिवाय भारतमंत्र्याच्या सल्लागारमंडळामध्यें एक हिंदी लष्करामध्यें काम केलेला अधिकारी असतो. लष्करावर मुख्य हुकू-मत 'गव्हर्नर जनरलचीच' असते. परंतु त्याला भारतमंत्र्याच्या मतानें

चालावें लागतें. लष्करावर अंमल चालविणारा व प्रत्यक्ष सर्व व्यवस्था पाहाणारा अधिकारी 'मुख्य सेनापति' ( Commander in Chief ) होय. हा गव्हर्नर जनरलच्या कायदेमंडळाचा सभासद असतो. याचें वास्तव्य राजधानीचें ठिकाण दिल्ली येथें असतें. लष्कराच्या कामाचा व्याप फार असल्यामुळें त्याची खातेवार विभागणी करून तीं खातीं निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या ताब्यांत दिलीं आहेत. १९२१ पासून मुख्य सेनापतीच्या मदतीला 'सेनामंडळ' दिलें आहे. त्यामध्यें त्याच्या हाताखालील अधिकाऱ्यांचा समावेश होतो.

एकंदर लष्कराचा खर्च फार मोठा आहे व तो गेल्या दहा वर्षांत एकसारखा वाढत आहे. युद्धापूर्वी लष्करावर २६।२७ कोट रुपये खर्च होत. हल्लींच्या अंदाजपत्रकामध्यें हा खर्च ६० कोट रुपये आहे.

१९२३ सालीं सैन्यांत ७१००० युरोपियन व १,५३,७०० एतद्देशीय लोक होते.

## स्वयंसेवक पथकें

**७. सक्तीचें शिक्षणः**—संकटसमयीं नुसत्या खास सैन्याच्या जोरावर देशाचें संरक्षण करणें कठीण होऊन बऱ्याच मोठ्या सैन्याची जरूर भासते. परंतु इतकें मोठें सैन्य नेहमीं ठेवणें ही अशक्य कोटींतील गोष्ट आहे. सबब परचक्र आल्यास तोंड देण्याकरितां सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा फार उपयोग होतो. सर्व सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें तरुण लोकांना कांहीं वर्षें लष्करी पेशांत घालवावीं लागत असल्यामुळें संकटसमयीं बोलावल्याबरोबर ते लष्करांत दाखल होतात. डॉ. परांजपे यांनीं अशा प्रकारचें शिक्षण निदान विद्यार्थ्यांना तरी मिळावें म्हणून प्रयत्न सुरू केले आहेत.

**८. स्वयंसेवक**—गेल्या युद्धाच्या पूर्वीपासून स्वयंसेवकांचीं कांहीं पथकें उभारलीं जात, परंतु त्यांमध्यें फक्त युरोपियन व अँग्लोइंडियन यांचाच भरणा करण्यांत येई. युद्धापासून नवीन योजना करून त्याला 'हिंदुस्थानचें संरक्षक सैन्य' ( Indian Defence Force ) असें नांव देण्यांत आलें होतें; परंतु या पथकाची उभारणी समाधानकारक

झाली नाहीं. सबब तें बंद करून त्याच्याजागीं हिंदी स्वयंसेवक पथकें ( Indian Territorial Force ) उभारण्यांत आलीं आहेत.

९. युरोपियन स्वयंसेवक ( Auxiliary Force ):—१९२० सालीं झालेल्या कायद्यान्वयें युरोपियन ब्रिटिश लोकांशिवाय इतरांना या पथकांत प्रवेश नाहीं. त्यांचा उपयोग फक्त देशांतल्या देशांतच करावयाचा असतो. आगगाड्या, लष्करी ठाणीं वगैरेंच्या संरक्षणाचें काम यांचेकडेसच असतें.

१०. हिंदी स्वयंसेवक ( Indian Territorial Force ):—स्वयंसेवक होण्याचा हक्क आतांपर्यंत युरोपियन्स व अँग्लोइंडियन्स लोकांचाच होता. परंतु १९२० च्या कायद्यानें एतद्देशीयांना आपल्या देशाच्या संरक्षणामध्यें भाग घेऊं देण्याचें ठरवून ही नवीन योजना अमलांत आणिली आहे. १९२२–२३ सालीं या सैन्याच्या वीस प्रांतिक पलटणी असून त्यांमध्यें १२००० वर भरती झाली होती. याचे, विश्वविद्यालयाच्या तुकड्या व प्रांतिक पथकें असे दोन भाग आहेत. खास सैन्यास मदत लागल्यास प्रांतिक सैन्यानें परदेशीं जाण्यास तयार असावें लागतें. म्हणून शांततेच्या वेळीं यांना बरेंच शिक्षण देऊन तयार करतात.

११. विश्वविद्यालयाच्या तुकड्याः—या सेवकांपैकीं विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांचीं पथकें फार लोकप्रिय झालीं आहेत. मुंबई, पुणें, कलकत्ता, अलाहाबाद, लाहोर, मद्रास व रंगून या ठिकाणीं सहा तुकड्या आहेत. पाटणा व दिल्ली येथेंही स्वतंत्र पथकें आहेत. यांना वर्षांतून ठराविक शिक्षण दिलें जातें या शिक्षणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना वळण व शिस्त लावण्याचा आहे. यांना देशाबाहेर जावें लागत नाहीं.

१२. संस्थानी फौज ( The Indian States Forces ):—हें सैन्य संस्थानिकांचें असतें व सामध्यें संस्थानी प्रजेमधूनच भरती केली जाते. १८८७ सालीं निझामसाहेबांनीं साम्राज्याच्या संरक्षणार्थ आपल्या खर्चानें अशा प्रकारचें सैन्य उभारलें. त्यानंतर बऱ्याच संस्थानिकांनींही अशा तुकड्या उभारल्या आहेत. यावर एतद्देशीय अंमलदार असतात. परंतु त्यांच्यावर देखरेख युरोपियनांची असते. जरूर पडेल तेव्हां हिंदु-

स्थानसरकारचे मदतीकरितां हें सैन्य तयार असतें. महायुद्धांत या सैन्यानें बरीच चांगली कामगिरी केली.

१३. राजकुमार-पथक ( Imperial Cadet Corps ):—ही तुकडी प्रथम १९०१ मध्यें लॉर्ड कर्झननीं स्थापन केली. यामध्यें राजेरजवाडे, संस्थानिक वगैरेसारख्या उच्च कुलांतील तरुणांना डेहराडून येथें दोन तीन वर्षेपर्यंत लष्करी शिक्षण देण्यांत येतें; या तुकडींत साधारणतः वीस लोक असतात.

१४. सरहद्दीवरील सैन्य ( Frontier Militia ):—वायव्येकडील प्रांताचे संरक्षणार्थ या सैन्याची उभारणी करण्यांत आली आहे. यामध्यें सरहद्दीवरील जातीच्या लोकांचीच भरती केली जाते. याशिवाय, वायव्येकडील प्रांत, आसाम आणि ब्रम्हदेश येथें लष्करी पोलीस सरहद्दीवर देखरेख करतात.

१५. लष्करभरती व हिंदीकरण:—लढाऊ सैन्य साधारण दोन अडीच लाख असतें. यांपैकीं हिंदी सैन्य $\frac{2}{3}$ असून युरोपियन सैन्य $\frac{1}{3}$ असतें. या सैन्याच्या मानानें अंमलदारांचें प्रमाण पाहूं गेलें असतां बहुतेक ब्रिटिश अंमलदारच आहेत. वरिष्ठ दर्जाच्या जागेवर क्वचितच हिंदी इसमास नेमितात. परंतु मॉंटेग्यू साहेबांनीं हिंदी लोकांना सैन्यांत कमिशनच्या जागा देण्यासंबंधीं असलेला प्रतिबंध दूर केला आहे. व युद्धांतील कामगिरीबद्दल कांहीं लोकांना " राजाचीं कमिशनें " ( King's Commissions ) सुद्धां मिळालीं आहेत. अलीकडे हिंदी तरुणांचा लष्करांत प्रवेश सुलभ व्हावा आणि त्यांना योग्य लष्करी शिक्षण देऊन कांहीं प्रमाणांत वरपर्यंत लष्करी जागा त्यांना द्याव्या, असें उदार धोरण स्वीकारण्यांत येत आहे. या धोरणानुसार ' सॅन्डहर्स्ट ' येथील लष्करी कॉलेजामध्यें दरवर्षी १० विद्यार्थी पाठविण्यास सुरवात झाली आहे. दुसरें, ' डेहराडून ' येथेंही एक संस्था ( The Prince of Wale's Royal Indian Military College ) काढली असून तीमध्यें सॅंडहर्स्टमध्यें प्रवेश मिळविण्याकरितां विद्यार्थी तयार केले जातात. यांत ७० विद्यार्थी घेतले जातात. त्याचप्रमाणें डेहराडून येथें पाठविण्याकरितां विद्यार्थी तयार

करणाऱ्या संस्था काढण्याचा विचार आहे. सॅन्डर्स्टप्रमाणें अव्वल दर्जाची लष्करी शिक्षणसंस्था येथें काढण्याविषयीं कित्येक वर्षांपासून मागणी आहे. व या प्रश्नाचा सध्यां स्कीन कमीटी विचार करीत आहे. याशिवाय सर्व हिंदुस्थानांतील आठ पलटणी निवडल्या असून त्यांमध्यें शक्य तितकें लवकर सर्व अधिकारी हिंदी नेमण्यांत येणार आहेत. हा प्रयोग यशस्वी झाला म्हणजे हलके हलके जास्त पलटणींचें हिंदीकरण करण्यांत येईल, व मग सर्व सैन्य राष्ट्रीय होईल.

**१६. लष्करी धोरणः**—परचक्रापासून देशाचें संरक्षण करून अंतः-शांतता राखणें हें हिंदी लष्कराचें मुख्य काम आहे. संकटसमयीं साम्रा-ज्याला मदत करणें हेंही येथील सैन्याचें एक कर्तव्य आहे, असें ईशर कमिटीचें मत आहे.

## आरमार

**१७. हिंदी आरमारः**—समुद्रकिनाऱ्यावरें भय उत्पन्न झाल्यास हिंदु-स्थानचें रक्षण करण्याचें काम ब्रिटिश आरमाराकडे सोंपविलें आहे. गेल्या युद्धांत ब्रिटिश आरमारानेंच या देशाचें रक्षण केलें. १९०३ पासून हिंदी महासागरामध्यें ब्रिटिश आरमाराचा एक ताफा ठेवण्यांत आला आहे. त्याला 'धि ईस्ट इंडियन स्क्वाड्रन' ( The East Indian Squadron ) म्हणतात. या ताफ्याचा ' हिंदी आरमार ' ( The Royal Indian Marine ) म्हणून एक भाग हिंदुस्थानसरकारच्या ताब्यांत असतो.

**१८. कामः**—याकडे लष्कराची नेआण, चांचे लोकांवर पाळत, किनाऱ्याच्या आसपास टेहळणी, दीपगृहांची देखरेख, संकटांत सांपड-लेल्या जहाजांस मदत, अंदमान बेटाचें संरक्षण हीं कामें असतात. हें आरमार लढाऊ नाहीं, तरीही गेल्या युद्धामध्यें त्यानें पुष्कळच कामगिरी केली. याचे खर्चाबद्दल सालीना एक लक्ष पौंड द्यावे लागतात.

**१९. स्वतंत्र हिंदी आरमारः**—सध्यांच्या आरमाराची पुनर्घटना करून त्याला 'स्वतंत्र लढाऊ आरमाराचें' ( Royal Indian Navy ) स्वरूप देण्याचा सरकारचा उद्देश व्हाइसरायांनीं जाहीर केला आहे

( १९२६ ). हें आरमार हिंदुस्थानच्या भावी आरमाराचा पाया असून कांहीं काळानें तें स्वदेशाचें संरक्षण करण्यास समर्थ होईल अशी योजना आहे. एतद्देशीयांस शिक्षण देऊन आरमारी अधिकारी तयार करण्याकरितां मुंबईस शिक्षण देणारें एक जहाज ठेवण्याचाही विचार आहे.

२०. सारांशः—लष्कराचे, खास सैन्य व स्वयंसेवक असे दोन मुख्य भाग आहेत. खास सैन्याच्या चार छावण्या असून त्यांवर चार सेनापति आहेत. या सर्व सैन्यावर मुख्य सेनापति असतो. तो गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाचा सभासद असतो. लष्करी कामाचीं निरनिराळीं खातीं स्वतंत्र अधिकाऱ्यांच्या ताब्यांत आहेत. एकंदर काम मुख्य सेनापति सेनामंडळाच्या मदतीनें पाहतात. स्वयंसेवक-पथकांचे दोन प्रकार आहेत. एकामध्यें फक्त युरोपियन अधिकारीच घेतले जातात व दुसऱ्यामध्यें एतद्देशीयांची भरती केली जाते. आरमाराची व्यवस्था ब्रिटिश आरमार-खात्याकडून होते. स्वतंत्र हिंदी आरमार उभारण्याचा सरकारचा हेतु असून हिंदी लोकांना आरमारी शिक्षण देण्याचाही विचार आहे. अलीकडे सैन्यांतील कमिशनांच्या जागा हिंदी लोकांना देण्यास सुरुवात झाली आहे.

---

प्रश्नः—१. हिंदुस्थानच्या संरक्षणाची काय योजना केलेली आहे ? २. हिंदी आरमारासंबंधीं तुम्हांस काय माहिती आहे ? ३. हिंदी स्वयंसेवकांचे मुख्य प्रकार किती ? व त्यांच्या कर्तव्यामध्यें व जबाबदारीमध्यें काय फरक आहेत ? ४. युरोपियन स्वयंसेवक व हिंदी स्वयंसेवक यांच्यामध्यें मुख्य भेद काय आहे ? ५. लष्कराच्या हिंदीकरणासंबंधीं काय योजना चालू आहे ? ६. संस्थानी फौज, सँढर्स्ट लष्करी कॉलेज, राजकुमार पथक व वैमानिक दळ यांवर टीपा लिहा.

---

# भाग चौथा

# राष्ट्रसंवर्धन

## १ शिक्षण.

१. प्रास्ताविकः—नवीन सुधारणांप्रमाणें जबाबदार राज्यपद्धतीचा पहिला हप्ता आपणांस देण्यांत आलेला आहे. ही प्राप्त झालेली जबाबदारी नीट रीतीनें पार पाडण्याकरितां मतदारसंघ व प्रतिनिधि यांनीं आपली लायकी वाढविणें जरूर आहे. आपले अंगीं स्वराज्याचे हक्क मिळविण्यास लागणारी कर्तृत्वशक्ति, निःपक्षपातीपणा वगैरे आवश्यक गुण व पात्रता येण्याकरितां शिक्षणासारखा दुसरा उपाय नाहीं. सर्व मतदारसंघ सुशिक्षित झाल्यावर स्वराज्याचे पूर्ण हक्क मिळविण्यास फारसें कठीण जाणार नाहीं. सबब या प्रकरणांत शिक्षण हें राष्ट्रसंवर्धक खात्यांपैकीं विशेष महत्वाचें असल्यामुळें त्याची थोडक्यांत माहिती दिली आहे.

२. इतिहासः—प्राचीन काळीं हिंदुस्थानांत धार्मिक संस्थांमधून वाङ्मय, तत्वज्ञान इत्यादि विषयांचें शिक्षण फुकट देण्यांत येई. खाजगी शाळांमध्यें लिहिणें, वाचणें, हिशेब करणें वगैरे विषय शिकविले जात. इंग्रजी अमलानंतर हेस्टिंग्जनें कलकत्ता येथें एक मद्रसा स्थापिली ( १७८२ ). लवकरच बनारस येथें एक संस्कृत महाविद्यालय स्थापन झालें. ( १७९१ ). दक्षिणेंतील मिशनऱ्यांच्या शिक्षणसंस्था पाहून राजा राममोहनरायसारख्या पुढाऱ्यांनीं कलकत्यास हिंदुकॉलेज काढलें. हेंच सध्यांचें प्रेसिडेन्सी कॉलेज होय. यानंतर पुण्यास संस्कृत कॉलेज ( १८११ ) व मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेज उघडण्यांत आलें. ( १८२७ ).

३. मेकाले व इंग्रजी शिक्षणः—हिंदी प्रजेचें खरें हित साधावयाचें असल्यास संस्कृत व अरेबिक ग्रंथ शिकविण्याचे ऐवजीं पाश्चात्य वाङ्मय व शास्त्रें यांचें शिक्षण देणें अत्यंत आवश्यक आहे, असें मेकॉले साहे-

यांचें ठाम मत होतें. त्याप्रमाणें पाश्चात्य शिक्षणास १८३५ मध्यें प्रारंभ झाला. १८३७ मध्यें इंग्रजी ही दरबारी भाषा झाली. व १८४४ मध्यें इंग्रजी जाणणारासच नोकरी मिळेल असें जाहीर करण्यांत आलें; त्यामुळें इंग्रजी शिक्षणास पुष्कळ उत्तेजन मिळालें.

४. सर चार्लस वुडचा खलिता:—१८५४ मध्यें वुड साहेबांनीं सर्व जनतेस शिक्षण देणें सरकारचें कर्तव्य आहे, असें प्रतिपादन केलें. हें साध्य करण्याकरितां त्यांनीं खालील उपाय सुचविले आहेत. १ प्रांतानिहाय शिक्षणखातें असावें. २ इलाख्याच्या मुख्य ठिकाणीं विश्वविद्यालयें काढावीं. ३ शिक्षणशास्त्राचें शिक्षण देणाऱ्या संस्था असाव्या. ४ व खासगी प्रयत्नांना उत्तेजन देण्याकरितां सरकारी मदतीची ( Grant-in-aid ) योजना असावी. या सूचनांप्रमाणें शिक्षणखातीं लवकरच स्थापन झालीं आणि खासगी संस्था व प्राथमिक शिक्षण यांना उत्तेजन देण्याचें ठरलें. या वेळीं इलाख्याच्या ठिकाणीं विश्वविद्यालयें निर्माण होऊन जी शिक्षणपद्धति अमलांत आली, तीच थोड्याबहुत फरकानें अद्याप चालू आहे.

५. हंटर कमिशन ( १८८२ ):—खासगी संस्थांना अधिक उत्तेजन देण्यांत येऊन उच्च शिक्षणावरील सरकारचा ताबा कमी करण्यांत यावा असें कमिशननें सुचविलें. प्राथमिक शिक्षणाकडे या कमिशननें मुळींच लक्ष दिलें नाहीं. दुय्यम व उच्च शिक्षणाच्या उत्तेजनार्थ सरकारनें प्रयत्न करावे असें कमिशनचें मत होतें. परंतु पैशाच्या अभावीं विश्वविद्यालयें डबघाईस आलीं. सरकारी संस्था साधारण बऱ्या असत, पण खासगी संस्थांची दुर्दशा होती आणि सरकारनेंही त्यांच्याकडे कानाडोळा करण्यात सुरवात केली.

६. कर्झनसाहेबांच्या सुधारणा:—शिक्षणाची स्थिति सुधारणें आपलें कर्तव्य आहे असें वाटून कर्झनसाहेबांनीं डायरेक्टर-जनरल ऑफ एज्युकेशनची जागा निर्माण केली, व एक कमिशन नेमून शिक्षणदृष्ट्या हिंदुस्थानची पाहणी केली. १९०४ सालीं विश्वविद्यालयाचा कायदा मंजूर करून घेतला. त्यामुळे विश्वविद्यालयाचे कामास नवीन वळण

लागलें, व सरकारची हुकमत विश्वविद्यालयांवर जास्त चालूं लागली. १९१० मध्यें तर शिक्षणखातेंच स्थापन करण्यांत आलें, व गव्हर्नर जनरलच्या कार्यमंत्र्यांमध्यें शिक्षणखात्याचा मंत्री म्हणून सहावा सभासद नेमण्यांत आला, आणि डायरेक्टर-जनरलची जागा बंद करण्यांत आली.

७. कलकत्ता युनिव्हर्सिटी कमिशनः—१८१७ सालीं कलकत्ता युनिव्हर्सिटीची एकदर सुधारणा करण्याकरितां डॉ. सॅडलर यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशननें हिंदुस्थानांतील सर्व विश्वविद्यालयांमधील लोकांशीं विचारविनिमय करून पुष्कळच सुधारणा सुचविल्या आहेत. त्यांतील मुख्य म्हणजे शाळांतील शिक्षण सुधारण्यासाठीं एक मंडळ नेमण्यांत यावें; त्याकडे दुय्यम शाळांतील उच्च व कॉलेजांमधील इन्टरमीजिएट पर्यंतचे वर्गांची व्यवस्था सोंपवावी; इन्टरमीजिएट हीच शाळेची शेवटची परीक्षा असावी; विश्वविद्यालयांनीं प्रत्यक्ष शिक्षणाचें काम करावें. याशिवाय जेणेंकरून विश्वविद्यालयें कर्तव्यक्षम होतील अशा प्रकारच्या अनेक सूचना केल्या आहेत.

हिंदुस्थानांतील बहुतेक विश्वविद्यालयांनीं या सूचनांचा विचार करून आपणांस काय करतां येईल तें पाहण्याकरितां कमिट्या नेमल्या होत्या. डाक्का व लखनौ येथील विश्वविद्यालयें या सूचनांप्रमाणेंच स्थापलीं गेलीं आहेत, व नागपूर विश्वविद्यालयाची घटना बहुतांशीं या शिफारशीनुसारच आंखली आहे. मुंबई व मध्यप्रांत या ठिकाणीं हायस्कूलच्या सर्टीफिकेट परीक्षेकरितां स्वतंत्र मंडळें नेमलीं गेलीं आहेत.

८. विश्वविद्यालयें:—शिक्षणाचे उच्च, दुय्यम, व प्राथमिक, असे तीन प्रकार आहेत. विश्वविद्यालयें उच्च शिक्षणाचें काम करतात. विश्वविद्यालयाला जोडलेलीं अनेक कॉलेजें असतात. त्यांमध्यें उच्च शिक्षण मिळतें.

वुडच्या खलित्याप्रमाणें १८५७ सालीं कलकत्ता, मद्रास, व मुंबई येथें विश्वविद्यालयें स्थापन केलीं व लवकरच पंजाब आणि अला-

हाबाद येथें विश्वविद्यालयें उघडण्यांत आलीं. मध्यप्रांत व वऱ्हाडकरितां नुक्तेंच १९२३ मध्यें नागपूर-विश्वविद्यालय निघालें आहे.

या संस्थांचा मुख्य अधिकारी म्हणजे चॅन्सेलर हा प्रांताचा गव्हर्नर असतो. प्रत्येक विश्वविद्यालयामध्यें सिंडिकेट व सिनेट नांवाचीं दोन मंडळें असतात. त्यांतील पहिलें कार्यकारी मंडळ असून त्याचा अध्यक्ष व्हाइस चॅन्सेलर असतो. हा नेहमीं सरकारनें नेमिलेला गृहस्थ असतो. सर्व काम पाहण्याकरितां रजिस्ट्रार म्हणून एक अधिकारी असतो. याशिवाय विषयवार अभ्यासमंडळें असतात. पुस्तकें नेमणें, अभ्यासयोजना करणें, वगैरे कामें या मंडळाचीं होत. सीनेट हें या संस्थेचें कायदेमंडळ होय. त्यांतील बहुतेक सभासद सरकारनियुक्त व थोडेसे पदवीधरांनीं निवडलेले असतात. विश्वविद्यालयाचे कामकाजासंबंधीं सर्व निकाल या मंडळामध्यें होतात. परंतु सरकारी मंजुरी मिळाल्याशिवाय ते अंमलांत येऊं शकत नाहींत. १९१९ मध्यें हिंदुस्थानांत फक्त सहा विश्वविद्यालयें होतीं, हल्लीं पंधरा आहेत.

नांवें—कलकत्ता, मद्रास, मुंबई, पंजाब, अलाहाबाद, बनारस, म्हैसूर, पाटणा, उस्मानिया ( हैद्राबाद--निझाम ) डाक्का, अलिगड, रंगून, लखनौ, दिल्ली व नागपूर.

विश्वविद्यालयें नुसतें शिकविण्याचें काम करीत नसून संशोधनाचें व कॉलेजची तपासणी करण्याचें काम करूं लागलीं आहेत.

९. **अभ्यासक्रमः**—निरनिराळया विश्वविद्यालयांमध्यें जरी अभ्यासक्रम भिन्न असले, तरी त्यांची आंखणी एकाच तत्वानुसार झाली आहे. वाङ्मय व शास्त्रीय अभ्यासक्रम चोहोंकडे चार वर्षांचाच आहे. मॅट्रिकनंतर दोन वर्षांनीं इन्टर व नंतर दोन वर्षांनीं पदवीची परीक्षा होते. कायद्याच्या पदवीकरितां परीक्षेस बसण्याची फक्त पदवीधरांनाच परवानगी आहे. याशिवाय शेतकी, वैद्यक, एंजिनीअरिंग वगैरे शिक्षणशाखा आहेत. एक वर्ष वाङ्मयशाखेकडे शिक्षण घेतल्यानंतर यांपैकीं कोणत्याही शाखेकडे जातां येतें.

कांहीं विश्वविद्यालयांमध्यें देशी भाषांचा शिरकाव झाला असून, मुंबई विश्वविद्यालयांत देशभाषा हा विषय घेऊन पदवी घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. देशभाषा ही बोधभाषा म्हणून मान्य व्हावी म्हणून प्रयत्न चालू असून बंगालमध्यें हा प्रयोग पाहण्याकरितां एक कमीटी नेमली आहे.

१०. **भारतीय विश्वविद्यालयमंडळः**—१९२४ मध्यें येथील अखिल विश्वविद्यालयांची सभा भरली होती. सर्व विश्वविद्यालयांमध्यें एकसूत्रता असावी, त्यांचे परस्परसंबंध दृढ व्हावे व विचारविनिमय होऊन ज्ञानवृद्धीचें कार्य सुलभ व्हावें, या हेतूनें एक मंडळ स्थापावें, असें या सभेंत ठरलें. १९२५ मध्यें या शिफारसीप्रमाणें मंडळ स्थापण्यांत येऊन त्यामध्यें हिंदुस्थानसरकारचा एक व प्रत्येक विश्वविद्यालयातर्फे एकएक सभासद घेतला गेला आहे.

११. **दुय्यम शिक्षणः**—प्रत्येक जिल्ह्यामध्यें एक नमुन्यादाखल सरकारी इंग्रजी शाळा असते. इंग्रजी शाळेंतील शिक्षण स्कूल लीव्हिंग परीक्षेपर्यंत असतें. या परीक्षेचे दोन भाग आहेत. कॉलेजमध्यें जाणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां मॅट्रिक, व उच्च शिक्षण न घेतां नोकरी करणारांकरितां स्कूल लीव्हिंग. दुसऱ्या परीक्षेच्याद्वारें नोकरी करणारांना जरूर असें व्यावहारिक शिक्षण मिळावें असा सरकारचा उद्देश आहे. ग्रॅन्ट-इन-एडच्या योजनेनुरूप बऱ्याच खासगी संस्था निघाल्या आहेत.

दुय्यम शाळांतून लावण्याकरितां योग्य पुस्तकांची निवड करणें, अभ्यासक्रम ठरविणें या गोष्टी अध्यापकांच्या हातीं नसून खात्याकडूनच ठरविल्या जातात. कांहीं विषय मातृभाषेतून शिकविण्याची परवानगी नुक्तीच मुंबई, मध्यप्रांत वगैरे विश्वविद्यालयांनीं दिली आहे.

१२. **प्राथमिक शिक्षणः**—पूर्वीं दुय्यम व उच्च शिक्षणाकडेच सरकारचें लक्ष असे, परंतु अलीकडे प्राथमिक शिक्षणाला मुख्यतः महत्त्व देण्यांत येऊं लागलें आहे. बहुतेक प्राथमिक संस्था स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या ताब्यांत आहेत. अलीकडे बऱ्याच प्रांतिक कायदेमंडळांनीं प्राथमिक शिक्षणासंबंधीं कायदे केले आहेत. याशिवाय १९२३ मध्यें

मुंबई येथें कायदेमंडळानें सक्तीचें शिक्षण मोफत करण्याचा कायदा मंजूर केला. त्यामुळें या शिक्षणामध्यें एकसारखी वाढ होत आहे. मुंबई इलाख्यांत कांहीं कांहीं म्युनिसिपॅलिट्यांनीं सरकारचे मदतीनें सक्तीचें शिक्षण पूर्वीच सुरू केलें आहे. मुलांना उत्तेजन मिळावें म्हणून पुष्कळ नादाऱ्या व शिष्यवृत्या देण्यांत येतात. हल्लीं मागसलेल्या वर्गाला पुष्कळ उत्तेजन देण्यांत येतें. १ ते ४ इयत्तांचें शिक्षण पुरें झाल्याशिवाय दुय्यम शिक्षणसंस्थेमध्यें प्रवेश मिळत नाहीं.

## विशिष्ट शिक्षण.

**१३. युरोपियन विद्यार्थ्यांचें शिक्षणः**—हिंदुस्तानांत रहाणाऱ्या युरोपियन व युरेशियन लोकांच्या मुलांमुलींच्या शिक्षणाकरितां स्वतंत्र संस्था आहेत. त्यांची व्यवस्था पाहण्याकरितां प्रत्येक प्रांतामध्यें एक स्वतंत्र इन्स्पेक्टर नेमलेला असतो. या लोकांची सोय उत्तम व्हावी म्हणून बऱ्याच मोठ्या रकमा जमा करण्यांत येतात. युरोपियन शिक्षण राखींव खात्यांपैकीं आहे.

**१४. स्त्रीशिक्षणः**—मुलींच्याकरितांही कांहीं ठिकाणीं इंग्रजी शाळा आहेत व प्राथमिक शाळा सर्वत्र आहेत. मुलींची संख्या वाढत आहे व स्त्रीशिक्षकही मिळू लागले असून पदवीधर स्त्रियांची सख्या वाढत आहे. मुलामुलींना एके ठिकाणीं शिक्षण देणें इतकें प्रशस्त वाटत नसल्यामुळें मुलींकरितां स्वतंत्र संस्था काढण्याची प्रवृत्ति आहे. मद्रास, मुंबई वगैरे ठिकाणीं स्त्रियांकरितां दुय्यम व उच्च प्रतीच्या शिक्षणसंस्था आहेत. दिल्ली येथें बायकांना वैद्यकी शिक्षण मिळावें म्हणून एक कॉलेज ( Lady Hardinge Medical College ) काढण्यांत आलें आहे.

**१५. मुसलमानः**—मुसलमानांकरतांहि स्वतंत्र शिक्षणसंस्था व बहुतेक ठिकाणीं उर्दुशाळा असतात. कांहीं ठिकाणीं कॉलेजेंहि काढण्यांत आलीं आहेत. अलीकडे अलीगड, उस्मानिया वगैरेसारखीं विश्वविद्यालयेंहि स्थापन झालीं आहेत. लवकरच मुंबई येथें एक मोठें कॉलेज निघणार आहे.

**१६. राजकुमारः**—अजमीर, इंदूर, लाहोर, राजकोट व रायपूर या

ठिकाणीं राजेरजवाडे यांना शिक्षण देण्याकरितां स्वतंत्र संस्था काढण्यांत आल्या आहेत. या ठिकाणीं शिक्षण संपल्यावर मॅट्रिक्युलेशनसारखा एक दाखला हिंदुस्थानसरकारकडून मिळतो. उच्च प्रतीचें शिक्षण अजमीर येथील मेयो कॉलेजमध्यें मिळण्याची सोय केली आहे. येथील शिक्षण साधारणतः बी. ए. च्या दर्जाचें असतें. या संस्था प्रांतिक सरकारच्या ताब्यांत नसून हिंदुस्थानसरकारच्या ताब्यांत आहेत.

१७. **अस्पृश्यवर्गः**—या वर्गांतील लोकांना सुशिक्षित करण्याचे बरेच प्रयत्न चालू आहेत. त्यांच्याकरितां स्वतंत्र शिष्यवृत्त्या आहेत व पुण्यास एक सरकारी वसतिगृह काढलें आहे.

१८. **शिक्षकः**—दुय्यम शाळांमधील शिक्षकांना शिक्षणशास्त्रासंबंधीं माहिती देण्याकरितां प्रांतनिहाय संस्था काढण्यांत आल्या आहेत. मुंबई, जबलपूर वगैरे ठिकाणीं असल्या संस्था आहेत. प्राथमिक शिक्षकांच्या-करितां बहुतेक जिल्ह्यांमध्यें वर्ग निघाले आहेत.

१९ **औद्योगिक व धंदेशिक्षणः**—औद्योगिक शाळा बऱ्याच ठिकाणीं आहेत. त्यांतील कांहीं सरकारी व कांहीं म्युनिसिपालिटी वगैरेसारख्या संस्थांनीं चालविलेल्या आहेत. मुंबईस 'व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिटयूट' नांवाची एक उत्तम संस्था आहे. तीमध्यें बऱ्याच धंद्यांचें शिक्षण मिळतें. औद्योगिक खात्यातर्फे उमरावतीस एक 'टेक्निकल इन्स्टिटयूट' उद्योग-धंद्याचें शिक्षण देते. टाटांनीं मोठी देणगी देऊन **बंगलोर** येथें एक शास्त्रीय संस्था काढली आहे. या ठिकाणचें शिक्षण उच्च व संशोधनात्मक असल्यामुळें फक्त उत्तम पदवीधरांनाच तेथील शिक्षणाचा लाभ घेतां येतो. वैद्यक कॉलेजें अकरा असून शाळा पुष्कळ आहेत. याशिवाय कायद्याचें शिक्षण देणारीं कॉलेजें ११, शेतकी कॉलेजें ५, एंजिनिरिंग कॉलेजें ५ व व्यापारी कॉलेजें ५ असून, मुंबईतील कॉलेज सर्वांत उत्तम आहे. चित्रकला व इतर कलाकुसरीचें शिक्षण देणाऱ्या संस्था सर्व इलाख्यांच्या ठिकाणीं व इतर कांहीं ठिकाणींही आहेत. डेहराडून येथें जंगलविषयक शिक्षण देणारी संस्था आहे.

२० बालवीर ( Boy-Scouts ):—इंग्लंडमध्यें लेफटेनेंट जनरल सर बेडेन पावेल यांनीं सुरू केलेल्या 'बालवीर' चळवळीचा हिंदुस्थानांत बराच प्रसार झाला आहे. व्हाइसरॉय हे येथील मुख्य बालवीर आहेत. विद्यार्थिदशेंतच शारीरिक बल वाढविणारें व नियमितपणा, आज्ञाधारकपणा आणि शिस्त या गुणांचें संवर्धन करणारें शिक्षण देऊन मुलांमध्यें नागरिकत्वाची जाणीव उत्पन्न करणें हें या चळवळीचें ध्येय आहे.

२१. खात्याची व्यवस्था:—शिक्षण हें प्रांतिक सरकारच्या ताब्यांतील सोंपींव खातें असल्यामुळें शिक्षणमंत्र्याकडे त्याची व्यवस्था असते. गव्हर्नर जनरलचे कार्यकारी मंडळांतील शिक्षणमंत्री सर्व प्रांतांतील शिक्षणाचें सामान्य धोरण ठरवितात, व त्यावर देखरेख करतात. 'प्रत्येक प्रांतांतील शिक्षणखात्याच्या मुख्य अधिकाऱ्यास **डायरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रक्शन** असें म्हणतात. त्याच्या हाताखालीं प्रोफेसर, इन्स्पेक्टर व शिक्षकवर्ग काम करीत असतो. शाळा--तपासणीचे सोईकरितां प्रांताचे विभाग पाडलेले असतात. त्यांत इन्स्पेक्टर हा मुख्य अधिकारी असतो. व त्याच्या हाताखालीं जिल्ह्यानिहाय डेप्युटी वगैरे अधिकारी असतात.

२२. सारांश:—जबाबदार राज्यपद्धति यशस्वी करून दाखविण्याकरितां शिक्षण सार्वत्रिक झालें पाहिजे. १८५४ पासून अलीकडे शिक्षणाला सुरुवात झाली असें म्हणतां येईल. १८५७ सालीं प्रथम विश्वविद्यालयें स्थापन झालीं. या संस्थांमधून उच्चप्रतीचें शिक्षण दिलें जातें. याशिवाय दुय्यम व प्राथमिक शिक्षणसंस्था आहेत. दुय्यम शिक्षणक्रम झाल्यावर उच्च शिक्षणसंस्थांत प्रवेश मिळतो. याशिवाय औद्योगिक, व्यापारी वगैरे शिक्षणाच्या सोयी आहेत. युरोपियन व मुसलमान विद्यार्थ्यांकरितां स्वतंत्र शिक्षणसंस्था आहेत. शिक्षणखातें सोपींव असल्यामुळें त्याची सर्व व्यवस्था शिक्षणमंत्र्याकडे असते. त्यामुळें लोकांना शिक्षणामध्यें अवश्य त्या सुधारणा करणें सोपें झालें आहे.

---

प्रश्न:—१. सर चार्लस वुडच्या खलित्याचा काय उपयोग झाला? २. कर्झनसाहेबांच्या मुख्य सुधारणा कोणत्या? ३. कलकत्ता युनिव्हर्सिटी-

कमिशनच्या मुख्य शिफारसी द्या, व त्यांचा काय उपयोग झाला तें सांगा. ४. मुंबई इलाख्यांतील प्राथमिक शिक्षणासंबंधीं तुम्हांस काय माहिती आहे? ५. धंदेशिक्षणाच्या पांच मुख्य संस्थांचीं नांवें सांगा.

---

## २. स्थानिक स्वराज्य

१ प्रास्ताविकः—शिक्षणाइतकेंच स्वराज्यपोषक व राष्ट्रसंवर्धक खातें स्थानिक स्वराज्य हें आहे. लोकांना सार्वजनिक संस्था चालविण्याचा अनुभव यावा, व राज्यकारभाराचें शिक्षण मिळून जबाबदारीचीं कामें करण्याची पात्रता त्यांच्या अंगीं यावी, ह्या हेतूनें स्थानिक स्वराज्यसंस्था या देशांत स्थापन करण्यास सुरुवात झाली. मॉंटेग्यूसाहेबांच्या रिपोर्टांतील पहिलें तत्व असें आहे—" स्थानिक संस्थांच्या बाबतींत शक्य तितकी जास्त लोकसत्ता असली पाहिजे; व त्या संस्थांवर बाह्य हुकमतीचा दाब शक्य तितका कमी असला पाहिजे. "

२. इतिहासः—१८४२ सालीं बंगाल्यामध्यें म्युनिसिपॉलिट्या स्थापन करण्याचा कायदा झाला. व १८५० मध्यें सर्व हिंदुस्थानला हा कायदा लावण्यांत आला. १८७० सालीं लॉर्ड मेयो यांनीं ह्या संस्थांना थोडेंसे स्वातंत्र्य दिलें. परंतु १८८२ पर्यंत या संस्थांकडे लोकांचें लक्ष गेलें नाहीं. लॉर्ड रिपन यांनीं १८८२ सालीं निवडणुकीचें तत्त्व मान्य केलें व बिनसरकारी सभासद घेण्यास सुरवात करून या संस्था लोकप्रिय करण्याचे प्रयत्न केले. यापुढें स्थानिक स्वराज्यावरील सरकारचा ताबा कमी होत चालला व निवडणुकीचें तत्त्व जसजसें जास्त प्रचारांत येऊं लागलें, तसतसें या संस्थांना जास्त स्वातंत्र्य मिळत चाललें. १९०८ सालीं गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळामध्यें स्थानिक स्वराज्याचा स्वतंत्र सभासद घेतला गेला व हें एक नवीन खातेंच निर्माण करण्यांत आलें.

३. नवीन धोरणः—१९१७ त नवीन धोरण जाहीर झाल्यापासून म्युनिसिपॉलिट्यांचें कार्यक्षेत्र वाढलें. म्युनिसिपॅलिटींतील लोकनियुक्त

सभासदांची संख्या तीन चतुर्थांश व सरकारनियुक्त सभासदांची संख्या एक चतुर्थांशपेक्षां जास्त नसावी असें हिंदुस्थानसरकारनें ठरविलें आहे. बहुतेक म्युनिसिपॅलिट्यांचे अध्यक्ष लोकनियुक्त असतात. ज्या संस्थांमध्यें पूर्वी सर्व सभासद सरकारनियुक्त असत, त्या हल्लीं पूर्ण लोकनियुक्त होत आहेत. हें खातें दिवाणांच्या ताब्यांत गेल्यापासून प्रत्येक प्रांतामध्यें तें सुधारण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**४. स्थानिक स्वराज्य ह्मणजे काय ?**—ज्याप्रमाणें प्रांतिक सरकार सर्व इलाख्यांतील हरएक प्रकारची व्यवस्था पाहातें, त्याप्रमाणेंच ठराविक हद्दींतील कांहीं ठराविक बाबींचा कारभार पाहण्याचें काम स्थानिक स्वराज्यसंस्थांचें असतें. स्थानिक स्वराज्यांतील मुख्य संस्था म्हणजे ग्रामपंचायती, म्युनिसिपॅलिटया व लोकलबोर्डें होत. या संस्था स्थानिक म्हणजे आपल्या गांवांतील आरोग्य, शिक्षण वगैरे कांहीं ठराविक बाबींसंबंधीं सर्व कारभार पाहातात. स्थानिक कारभार किंवा व्यवस्था करण्याचे बाबतीत या संस्थांस सरकारनें कांहीं हक्क दिलेले असतात, म्हणून त्यांना स्थानिक स्वराज्य (Local Self-Goverment) अशी संज्ञा प्राप्त झाली आहे.

**५. स्थानिक स्वराज्यसंस्थाः**—स्थानिक स्वराज्यामध्यें अनेक संस्थांचा अंतर्भाव होतो. शहरामध्यें म्युनिसिपॅलिटी असते. इलाख्यांच्या मुख्य शहरांतील म्युनिसिपॅलिट्यांना **कार्पोरेशन** म्हणतात. जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या मुख्य ठिकाणच्या म्युनिसिपॅलिटीस अनुक्रमें **जिल्हा** किंवा **तालुका म्युनिसिपॅलिटी** म्हणतात. खेड्यांतील प्रत्येक गांवाच्या संस्थेस **ग्रामपंचायत** म्हणतात.

गांवची व्यवस्था पाहणाऱ्या संस्थांशिवाय जिल्हा, तालुका वगैरेसारख्या विस्तृत क्षेत्रांची व्यवस्था पाहणाऱ्या संस्था असतात, त्यांना **जिल्हा** किंवा **तालुका लोकलबोर्डें** ह्मणतात. कांहीं ठिकाणीं पंचक्रोशींतील गावांचा गट करून त्यांची व्यवस्था एका मंडळाकडे (Committee) सोंपविलेली असते. अशा संस्था मद्रासकडे बऱ्याच आहेत. याशिवाय **शहरसुधराई** (Improvement Trust), बंदरांची व्यवस्था पाहणारीं

मंडळें ( Port Trust ) यासारख्या संस्था कांहीं विवक्षित ठिकाणीं असतात. या सर्व संस्थांच्या सभासदांना कोणत्याही प्रकारचें वेतन मिळत नाहीं. त्यांचें काम ही एक प्रकारची जनसेवाच आहे.

६. **स्थानिक स्वराज्य संस्थांचीं कामें:**—गांवच्या संस्था असोत किंवा जिल्ह्याच्या असोत, त्यांचीं कामें बहुतेक एकाच प्रकारचीं असतात; परंतु संस्थांच्या क्षेत्राच्या मानानें त्यांची जबाबदारी व कामाचा व्याप कमीजास्त असतो. शिक्षण, लोकांच्या सुखसोयी, सडकासारखीं दळणवळणाचीं साधनें, आरोग्य व सुरक्षितता अशीं चार प्रकारचीं मुख्य कामे या संस्थांकडे सोंपविलीं आहेत. यांचा तपशीलवार विचार केल्यास त्यांमध्यें पुष्कळ प्रकारचीं कामे येतात. यांपैकीं प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करणें, सडका बांधणें, त्यांची डागडुजी करणें, दिवाबत्ती करणें, सार्वजनिक इमारती बांधून त्या दुरुस्त ठेवणें, घाण पाणी बाहेर काढून देणें, पाण्याचा पुरवठा करणें, दवाखाने व वाचनालयें उघडणें, सांथीचे रोग न येतील अशी खबरदारी घेणें, वगैरे अनेक कामें या संस्थांना करावयाचीं असतात.

७. **ग्रामपंचायत:**—ही संस्था फार जुनी आहे. खेडेगांवांतील प्रत्येक जातीपैकीं वजनदार कुटुंबांतून पाहूनपाहून एक एक इसम जातीतर्फे निवडून घेतला जाई. यांना **पंच** म्हणत. या पंचांच्या मंडळास **पंचायत** म्हणतात. जमीनसारा गोळा करणें, त्याचा योग्य खर्च करणें, सरकारचा भाग सरकारांत दाखल करणें, शांतता व सुव्यवस्था राखणें, न्याय देणें इत्यादि कामें हीच संस्था करी. या संस्थेंतील **सरपंच** पाटील असे. लिहिण्याचें सर्व काम **कुळकर्णी** करी, व **चौकीदार** शांतता राखी. मुसलमान-अमदानींतही या संस्था भरभराटींत होत्या. इंग्रजी पद्धति अमलांत आल्यापासून खेड्यांतील अधिकाऱ्यांचे हक्क सरकारनें नेमलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे गेले, व त्यामुळें त्या नामशेष झाल्या. या संस्थांचें पुनरुज्जीवन करण्याचें सरकारच्या मनांत आलें असून १९०८ सालापासून या प्रश्नाला चालना मिळाली आहे व बहुतेक प्रांतिक कायदेमंडळांमध्यें या बाबींत कांहींना कांहींतरी प्रगति झाली आहे. बंगाल्यांत १९१९

मध्यें याबाबत कायदा मंजूर झाला, व तीन चार वर्षांतच तेथें खेड्यांतील गटांच्या ६७०० संस्था निर्माण झाल्या. मुंबई पंचायतीचा कायदा १९२० मध्यें मंजूर झाला. या कायद्यान्वयें कोणत्याही खेड्या-मध्यें किंवा खेड्याच्या गटामध्ये लोकांच्या इच्छेनुरूप पंचायत स्थापन करण्याचा अधिकार भागाच्या कमिशनरला दिला आहे. प्रत्येक पंचायती-मध्यें पांच किंवा जास्त पंच असून, ते एकवीसपेक्षां जास्त वयाच्या इस-मांनीं निवडून द्यावयाचे असतात. गांवचा पाटील त्यांच्यापैकीं एक असतो. ते एक सरपंच निवडतात. याची निवडणूक प्रत्येक वर्षीं होते. पंचांची निवडणूक त्रैवार्षिक आहे. सरपंचाला सर्व कारभार पहाण्याचा अधिकार असतो. सर्व पंच गांवांतील वजनदार व वयस्क गृहस्थ असल्या-मुळें त्यांना योग्य न्याय देणें सोपें जातें व लोकही त्यांच्या शब्दाला मान देतात. या संस्था जिल्हाबोर्डाचे देखरेखीखालीं चालतात. संयुक्त प्रांता-मध्यें पंचायतींना हलके दिवाणी व फौजदारी खटले चालविण्याचा अधि-कार आहे. मुंबई इलाख्यांत पंचायतींचा व्हावा तसा प्रसार अद्याप होत नाहीं. सबब सरकारानें हा प्रश्न हातीं घेतला असून एकंदर परिस्थितीचा विचार करण्याकरितां एक कमीटी नेमली आहे.

घरपट्टीसारखे पंचायतीच्या अधिकारांतील कर, प्रांतिक सरकार व लोक-लबोर्डें यांची मदत व मालमत्तेवरील उत्पन्न हें या संस्थांचें उत्पन्न होय.

८. **नोटिफाईड एरिया**:—जीं शहरें म्युनिसिपॅलिटीचे हक्क मिळविण्या-इतकीं मोठीं नसतात; परंतु ज्यांना म्युनिसिपॅलिटीसारख्या संस्थेची जरूरी असते, अशांचा एक गट बनवून त्यांचा कारभार सरकारनियुक्त मंडळाच्या हातीं दिलेला असतो. या मंडळानें आपल्या हद्दींतील आरोग्य, शिक्षण वगैरे कामें व कारभार पहावयाचा असतो. अशा प्रत्येक हद्दीमध्यें एक लहान शहर व बाजार असतो, व एकंदर लोकसंख्या निदान दहा-हजार असावी लागते.

याशिवाय लहानलहान हद्दींमध्यें आरोग्यमंडळें स्थापलीं जातात.

## म्युनिसिपॅलिटी

शहराची व्यवस्था पाहाणाऱ्या संस्थेस ' म्युनिसिपॅलिटी ' असें म्हण-

तात. बहुशः ५००० वस्तीवरच्या बहुतेक शहरांत म्युनिसिपॅलिटी असते.

९ **रचना**:— म्युनिसिपॅलिटीमध्यें लोकनियुक्त, सरकारनियुक्त, व सरकारी अधिकारी, असे तीन प्रकारचे सभासद असतात. शहराच्या महत्त्वाप्रमाणें व वस्तीच्या मानानें सभासदांची संख्या बदलते. म्युनिसिपॅलिटीच्या कायद्यान्वयें या सभेपैकीं $\frac{1}{2}$ पासून $\frac{3}{4}$ पर्यंत सभासद लोकनियुक्त असतात व अध्यक्ष बहुतेक लोकनियुक्त असतो; अलीकडे म्युनिसिपॅलिटीवरील सरकारी सत्ता बरीच कमी झाली आहे. भागाचा कमिशनर व कलेक्टर यांना म्युनिसिपॅलिटीवर देखरेख करण्याचा, जमाखर्चाची तपासणी करण्याचा व खर्चास मंजुरी देण्याचा अधिकार आहे. एखाद्या ठिकाणची व्यवस्था गैरशिस्त व बेजबाबदार दिसून आल्यास कमिशनर तेथील म्युनिसिपॅलिटीचे अधिकार कांहीं काळ काढून घेतो.

म्युनिसिपॅलिटींत उमेदवार निवडून देण्याचा हक्क म्युनिसिपल हद्दींत राहणाराला आहे. परंतु तो इसम नियमान्वयें ठरविलेलें घरभाडें अगर कर देणारा असला पाहिजे.

१०. **उत्पन्न**:— म्युनिसिपॅलिटीकडे सोंपविलेलीं कामें उत्तम तऱ्हेनें पार पाडण्यासाठीं बराचसा पैसा लागतो. हा पैसा स्थानिक पट्टया, मालमत्तेचें उत्पन्न, सरकारी मदत वगैरे मिळून जमतो. ( १ ) बाहेरून गांवांत येणाऱ्या मालावरील जकात, ( २ ) घरपट्टी, ( ३ ) उद्योगधंद्यावरील कर, ( ४ ) वाहनांवरील कर, ( ५ ) पाणीपट्टी, मंडई, बाजारभाडें, शाळा, दवाखाने वगैरेंची फी, इत्यादि रूपानें म्युनिसिपॅलिटीस पैसा वसूल करितां येतो.

११. **कॉर्पोरेशन**:—मुंबई, मद्रास, कलकत्ता, रंगून, वगैरे इलाख्यांच्या मुख्य ठिकाणच्या म्युनिसिपॅलिटीस 'कार्पोरेशन' म्हणतात. येथील मंडळांमध्यें सभासदांची संख्या पुष्कळ मोठी असते. व ते निवडून देण्याचा हक्क वरच्या दर्जाचे लोकांना असतो. कल्पना येण्याकरितां मुंबई कार्पोरेशनचें वर्णन खालीं दिलें आहे. मुंबईमध्यें वर्षाला १२० रुपये घरभाडें देणाऱ्या प्रत्येक मनुष्याला मतदानाचा हक्क आहे. मुंबई कार्पोरेशनमध्यें एकंदर सभासद १०६ असून ७६ लोकनियुक्त

आणि बाकीचे सरकारनियुक्त व संस्थांतर्फे निवडलेले असतात. बायकांनाही निवडून येण्याचा हक्क आहे. अध्यक्ष नेहमीं लोकनियुक्तच असतो. इतक्या सभासदांची सभा भरून त्यांमध्यें लवकर काम होणें कठीण, सबब खातेवार कमिट्या नेमलेल्या असतात. कार्पोरेशनचें काम चर्चात्मक असून सामान्य धोरण ठरविण्याचें व पैसा मंजूर करण्याचें असतें. सरकारनें नेमलेला 'म्युनिसिपल कमिशनर' हा मुख्य अधिकारी असतो व त्याच्या मदतीला १६ सभासदांचें एक मंडळ असतें. मुंबई म्युनिसिपॅलिटी हिंदुस्थानांत पहिल्या दर्जाची असून तिचें वर्षाचें उत्पन्न ३०२ लाख रुपये आहे ( १९२४।२५ ).

## लोकलबोर्डें.

१२. सामान्य माहिती:—म्युनिसिपॅलिट्या शहरांची व्यवस्था पाहतात. परंतु या देशांत शेंकडा १०च लोक शहरांत राहणारे आहेत. बाकीचे ९० खेडेगांवीं राहणारे असल्यामुळें त्यांच्याकरितां जिल्हा व तालुकाबोर्डें स्थापन केली आहे. शहरांत म्युनिसिपॅलिटी जीं कामें करते तींच कामें यांना करावीं लागतात. आसामखेरीज सर्व प्रांतांत हीं बोर्डें आहेत. हिंदुस्थानांत जिल्हाबोर्डें २२१, तालुकाबोर्डें ५५६ व खेड्यांचे गट ८०० आहेत. मुंबई इलाख्यांत जिल्हानिहाय, जिल्हा व तालुका बोर्डें आहेत. तालुकाबोर्डें जिल्हाबोर्डांच्या हुकमतींत असतात. बंगालमध्यें जिल्हाबोर्डें आहेत, पण तालुकाबोर्डें थोडीं आहेत.

१३. रचना:—लोकलबोर्डांत $\frac{3}{4}$ सभासद लोकनियुक्त असतात. या संस्था जरी म्युनिसिपालिटीइतक्या लोकनियुक्त नसल्या तरी अलीकडे सरकारनें या बाबतींत उदार धोरण स्वीकारलें आहे. १९१६–१७ पर्यंत साधारण निम्मे सभासद लोकनियुक्त असत. जिल्ह्याचा मुख्य अधिकारी जिल्हा बोर्डांचा व डेप्युटी कलेक्टर हा तालुका बोर्डांचा अध्यक्ष असे. १९१८ पासून हें धोरण बदललें असून या संस्था शक्य तितक्या प्रातिनिधिक करण्याचें ठरलें आहे. साधारण $\frac{1}{4}$ पेक्षां जास्त सरकारनियुक्त सभासद असूं नयेत असें नवीन धोरण आहे. सर्व बोर्डांना

लोकनियुक्त अध्यक्ष निवडण्याचा हक्क देण्यांत आला आहे. कमींत कमी ३२ व ८ रु. (पंचमहाल व रत्नागिरी येथें १६ व ८ रु.) साऱ्याची जमीन धारण करणारा जमीनदार अगर तेवढी जमीन कसणारें कूळ यांना अनुक्रमें जिल्हा व तालुका बोर्डाच्या निवडणुकींत मत देण्याचा आणि उमेदवार म्हणून उभें राहण्याचा हक्क आहे.

१४. कामकाजः—लोकलबोर्डाचीं बहुतेक कामें म्युनिसिपॅलिटीचींच, परंतु त्याचें कार्यक्षेत्र मोठें असल्यामुळें जास्त व्यापक असतात. जिल्ह्यांतील रस्ते, पुल, दवाखाने, धर्मशाळा, बाजार, सार्वजनिक तळीं, विहिरी, शाळा वगैरे बांधणें व त्यांची दुरुस्ती करणें इत्यादि कामें मोठ्या प्रमाणांत करावयाचीं असतात. रस्ते व पूल यांवरच निम्मे उत्पन्न खर्च होतें.

१५. उत्पन्नः—उत्पन्नाची मुख्य बाब म्हणजे शेतकऱ्यांकडून साऱ्याच्या पाठीमागें रुपयास एक किंवा दोन आणे याप्रमाणें वसूल करण्यांत येत असलेली जमिनीवरील पट्टी (Local Fund) व सडकांच्या नाक्यांवरील उत्पन्न होय. ही पट्टी सरकार आपल्या कराबरोबर वसूल करतें व त्यांत आपली भर टाकून ती रकम बोर्डाच्या हवालीं करतें. तालुकाबोर्डास लागणारा खर्च जिल्हाबोर्डाकडून मिळतो. त्यांना स्वतंत्र पट्टी बसवितां येत नाहीं. याशिवाय तळीं, नावा, शाळा, दवाखाने वगैरेंचें उत्पन्न थोडेंबहुत मिळतें.

१६. सरकारी नियंत्रणः—१९१८ पासून या स्थानिक स्वराज्य-संस्थांना बरेंच लोकनियुक्त स्वरूप देण्यांत येऊन सरकारनें त्यांच्यासंबंधीं उदार धोरण स्वीकारलें आहे; तरीपण हिशेब तपासणें, मोठ्या नेमणुकींना मंजुरी देणें, प्रसंग विशेषीं त्यांना कांहीं गोष्टी करावयास लावणें, वगैरे बाबींत सरकारचा ताबा या संस्थांवर आहे. अधिकाराचा बेकायदेशीर उपयोग केल्यास सरकारला काम तहकूब करतां येतें.

नवीन कायद्यान्वयें हें सोंपींव खातें झालें असून लोकनियुक्त मंत्र्यांच्या ताब्यांत आल्यामुळें त्याची सुधारणा झपाट्यानें होत आहे व लोकांचेंही लक्ष या खात्याकडे बरेंच लागलें आहे. निरनिराळ्या कायदेमंडळांत जास्त हक्क मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत.

आतांपर्यंत सर्वसाधारण सर्वत्र आढळणाऱ्या संस्थांसंबंधीं विचार झाला. यापुढें कांहीं विवक्षित ठिकाणींच काम करणाऱ्या संस्थांची ओळख करून घ्यावयाची आहे. या संस्थांकडे वरील संस्थांप्रमाणेंच कामें असतात परंतु त्यांतील सभासद सरकारनियुक्त असतात.

१७. **शहरसुधराई-मंडळ** ( Improvement Trust ):—मुंबईसारख्या दाटवस्तीच्या शहरांत गलिच्छ वस्तीचे भाग असतील ते खुले करून सडका वगैरे रुंद करून, तेथें जास्त उजेड आणि हवा येईल अशी व्यवस्था करणें; त्याचप्रमाणें शहरांतील गर्दी कमी करण्याकरितां जास्त जागा मिळविणें वगैरे कामें या संस्थेकडे असतात. हीं कामें करण्याकरितां एक व्यवस्थापक ( Trustee ) मडळ असतें. अशा सस्था कानपूर, लखनौ, अलाहाबाद येथें आहेत, व इतर मोठाल्या ठिकाणींही त्यांची स्थापना होत आहे.

१८. **बंदरांची व्यवस्था पहाणारें मंडळ** ( Port Trust ):—मुख्य बंदरांची व्यवस्था पाहणें, गोद्या वगैरे बांधून त्यांची डागडुजी करणें इत्यादि कामाकरितां सरकारनियुक्त सभासदांचें किंवा व्यापारीमंडळ ( Chamber of Commerce ) व असल्याच इतर संस्थांनीं निवडलेल्या सभासदांचें एक मंडळ असतें. याला कायद्यानें बरेच अधिकार दिलेले असतात व त्यावर सरकारचें पुष्कळ नियंत्रणही असतें. या संस्थेनें मुंबई बंदराची बरीच सुधारणा केली असून अलेक्झँड्रा नांवाची एक प्रचंड गोदी बांधली आहे. असल्या संस्था मुंबईशिवाय कलकत्ता, मद्रास, कराची, रंगून वगैरे ठिकाणीं आहेत.

१९. **सारांश**:—लोकांच्या आंगीं जबाबदार राज्यपद्धति यशस्वी करण्याची पात्रता यावी, या उद्देशानें शिक्षण देणाऱ्या संस्थांतील स्थानिक स्वराज्य ही मुख्य संस्था आहे. प्रथम या संस्था पूर्ण सरकारनियुक्त असत. पुढें पुढें बिनसरकारी लोक घेण्यांत येऊं लागले. नंतर निवडणुकीचें तत्त्व मान्य झालें. त्यानंतर लोकनियुक्तांची वाढ होत होत $\frac{3}{4}$ पर्यंत लोकनियुक्त असावे व अध्यक्षही लोकनियुक्त असावे, असें धोरण हल्लीं स्वीकारण्यांत आलें आहे. या संस्थेकडे स्थानिक शिक्षण, आरोग्य व इतर कांहीं कामें

सोंपविलीं आहेत. खर्चाकरितां कर बसविण्याचे त्यांना अधिकार आहेत. " स्थानिक स्वराज्य " सोंपींव खातें झाल्यापासून लोकांचें लक्ष त्याकडे बरेंच वेवलें गेलें आहे. प्रांतानिहाय या संस्थांच्या रचनेमध्यें थोडे फार फरक आहेत.

---

प्रश्न:—१. स्थानिक स्वराज्य ह्मणजे काय ? २. स्थानिक स्वराज्यांमध्यें कोणकोणत्या संस्था येतात ? ३. म्युनिसिपालिटया व लोकलबोर्डें यांच्या उत्पन्नाच्या मुख्य बाबी कोणत्या ? ४. स्थानिक स्वराज्य संस्थांकडे कोणतीं कामें सोंपविण्यांत आलीं आहेत ? ५. गांवपंचायतीची घटना व कामकाजासंबंधीं थोडक्यांत माहिती द्या. ६. नवीन सुधारणांमुळें या खात्याला कसें महत्त्व प्राप्त झालें आहे ? ७ लोकलबोर्ड व म्युनिसिपालिटी यांची तुलना करा. ? ८. शहरसुधराई मंडळ, कार्पोरेशन व नोटिफाईड एरिया यासंबंधीं माहिती लिहा.

---

## ३. आरोग्य व वैद्यक खातें.

१. हिंदुस्थानांतील लोक दुष्काळानें व दारिद्र्यानें पीडिलेले असल्यामुळें त्यांच्या अंगीं रोगप्रतिबंधक शक्ति जितकी असावयास पाहिजे तितकी नसते, त्यामुळें अनेक प्रकारचे रोग उद्भवतात. रोगप्रतिबंधक काम आरोग्यखात्याचें व रोग झाल्यास ते बरे करण्याचें काम वैद्यक खात्याचें आहे.

### वैद्यकखातें ( Medical )

२. देशी वैद्यक:—पूर्वीं या देशामध्यें आर्यवैद्यकाचा पूर्ण उत्कर्ष झालेला होता. परंतु पाश्चात्य वैद्यक इकडे आल्यापासून मूळच्या वैद्यकाची अनास्था झाली आहे. अलीकडे मद्रास, मुंबई वगैरे इलाख्यांत हिंदी वैद्यकास थोडेंबहुत उत्तेजन देण्याचे प्रयत्न चालू आहेत व स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आर्य वैद्यकाचे दवाखाने काढण्यास प्रारंभ झाला आहे.

३. वैद्यकसंस्था:—रुग्णालयांमध्यें ( Hospitals ) रोग्यांना औषध देण्याची व त्यांची शुश्रूषा करण्याची व्यवस्था असते. दवाखान्यांत ( Dispensary ) फक्त औषधें दिलीं जातात. प्रत्येक जिल्ह्यांत एक रुग्णालय असतें, व तालुक्याच्या ठिकाणीं दवाखाने असतात. जिल्ह्यांतील या खात्यांची व्यवस्था सिव्हिल-सर्जनकडे असते.

इलाख्याच्या ठिकाणीं सरकारनें चालविलेलीं मोठमोठीं रुग्णालयें असतात. त्यांमध्यें प्रसिद्ध डॉक्टर असून सर्व प्रकारची सामुग्री असते. इलाख्याच्या मुख्य ठिकाणच्या वैद्यक कॉलेजांना हीं रुग्णालयें जोडलेलीं असतात. मुंबई, मद्रास, कलकत्ता, लाहोर, दिल्ली, लखनौ येथें अशीं कॉलेजें आहेत. लष्करी दवाखाने व रुग्णालयें स्वतंत्र असतात.

स्त्रियांकरतां स्वतंत्र रुग्णालयें व दवाखाने असून त्यांवर बायकांचीच नेमणूक केलेली असते. त्यांना वैद्यकीचें शिक्षण देण्याकरितां दिल्ली येथें लेडी हार्डिंज मेडिकल कॉलेज काढलें आहे.

वेडे, महारोगी, आंधळे वगैरेंचे दवाखाने सरकारनें जागोजाग काढले आहेत. पिसाळलेले कुत्रे डसलेल्या लोकांच्या औषधपाण्याची व्यवस्था बहुतेक चोहोंकडे झाली आहे.

४. महारोग:—हा भयंकर स्वरूपाचा रोग आहे. या रोगानें पछाडलेले रोगी आपल्या देशांत एक लाखावर आहेत. यांना शक्य तों औषधपाणी वगैरेची मदत करून त्यांचे हाल कमी करण्याकरितां प्रांतानिहाय दवाखाने उघडण्यांत आले आहेत. मिशनरी लोकांनीं ( Mission to Lepers ) त्यांच्याकरितां आश्रम बांधले आहेत. जगांतील सर्वांत मोठा आश्रम बंगाल्यांत पुरुलिया येथें असून त्यांत एक हजार रोग्यांची सोय आहे.

१९२४ मध्यें एक मोठी संस्था ( British Empire Leprosy Relief Association ) स्थापण्यांत आली असून इंग्लंडचे युवराज तिचे मुख्य सभासद आहेत. हिंदुस्थानामध्यें या रोगाचा समूळ नाश करण्याकरितां १९२५ मध्यें व्हाइसरायांनीं सर्व पेशाच्या लोकांची सभा बोलावून येथें या संस्थेची एक शाखा काढली आहे. आतांपर्यंत २० लाख रक्कम जमली

असून या निधीचा व्यय (१) संशोधन करणें, (२) डॉक्टर लोकांना उपचारांची माहिती देणें व माहितीचा सार्वत्रिक प्रसार करणें, आणि (३) सध्यांच्या आश्रमांना मदत करणें इत्यादि गोष्टींकडे होणार आहे.

५. खात्याची व्यवस्थाः—प्रत्येक प्रांतामध्यें वैद्यक व आरोग्यखातें असतें आणि त्यावर सर्जन जनरल व डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ हे मुख्य अधिकारी असतात. लहान जिल्ह्यांतील आरोग्याची व औषधाची व्यवस्था सिव्हिल-सर्जनकडेच असते. सर्व इलाखे व प्रांत यांमधील वैद्यक व आरोग्य खात्याचें धोरण ठरवून त्यावर देखरेख करण्याकरितां डायरेक्टर-जनरल व पब्लिक हेल्थ कमिशनर हे हिंदुस्थान-सरकारचे अधिकारी असतात. इलाख्यामध्यें व कांहीं प्रांतांमध्यें सरकारला आरोग्यखात्यासंबंधीं सल्ला देणारें एक आरोग्यमंडळ असतें. हें खातें सोपींव आहे.

## आरोग्यखातें ( Sanitation and Health )

६. स्थानिक स्वराज्य व आरोग्यः—रोगांचीं कारणें शोधून काढून त्यांचा प्रतिबंध करणें हें काम आरोग्यखात्याचें आहे. शहरांतील आरोग्याचें सर्व काम म्युनिसिपॅलिटीकडे असतें. त्यामुळें शहरांमध्यें शुद्ध पाण्याचा पुरवठा करणें, घाण बाहेर काढून देणें, वस्तीचे भाग निर्मळ करणें वगैरे पुष्कळ सुधारणा झाल्या आहेत. शहरांतील आरोग्याकडे लक्ष पुरविण्याकरितां हेल्थ ऑफिसर नेमले जातात. खेड्यांमधील आरोग्याची जबाबदारी लोकलबोर्ड व ग्रामपंचायती यांवर असते. तेथील लोकांना शुद्ध हवापाणी, पथ्यकर अन्न, घरगुती व शारीरिक स्वच्छता व आरोग्य इत्यादि गोष्टींचें ज्ञानच नसतें, त्यामुळें तेथील स्थिति फारच शोचनीय असते.

७. आरोग्यविषयक शिक्षणः—अनेक तज्ज्ञांनीं आरोग्याचीं तत्त्वें समजावून देण्याचें काम चालू आहे. प्राथमिक पुस्तकांतूनही हीं तत्त्वें शिकविलीं जातात. महामारी, प्लेग वगैरे सांथींचा उद्भव होण्याचा रंग दिसल्यास त्यांस प्रतिबंधक उपाययोजना होते. लोकांना औषधें पुरविण्या-

करितां व नियम वगैरे समजावून देण्याकरितां खेडोपाडीं आरोग्य-खात्याकडून नोकर पाठविण्यांत येतात. देवीडॉक्टर व प्लेग वगैरेंचे तपासनीस सर्व वर्षभर दौऱ्यावर असतात, व रोगाविरुद्ध एकसारखी मोहीम चालू असते.

८. **शिशुस्वास्थ्य** ( Child Welfare ):—आपल्या देशामध्यें मुलांची मृत्युसंख्या फार आहे. प्रत्येक वर्षी नवीन जन्मास आलेलीं सुमारें वीस लक्ष बालकें मृत्युमुखीं पडतात. याचें कारण आयांना आरोग्याचे नियम माहीत नसतात किंवा मुलांचें योग्य तऱ्हेनें संगोपन करण्याचीं साधनें नसतात. ही स्थिति नाहींशी करण्याकरितां **लेडी रेडिंग** यांनीं १९२३ पासुन जागोजागीं " **शिशुसप्ताह** " भरवून स्त्रियांना मुलांच्या आरोग्या-संबंधीं सर्व माहिती देण्याचा प्रयत्न चालू केला आहे. मुंबई, पुणें, सुरत, दिल्ली, मद्रास वगैरे ठिकाणीं बायकांना व दायांना शिशुसंगोपनाची माहिती देण्याची सोय केली आहे.

९. **संशोधन**:-रोगनिवारणार्थ रोगाचें चिकित्सात्मक संशोधन होण्याचीं अत्यंत जरूरी आहे. सबब संशोधनसंस्था सरकारी खर्चानें चालू आहेत. **कासावलीस** एक संस्था आहे. तेथें मोठमोठे डॉक्टर संशोधनाचें काम करतात. याशिवाय **परेळ** येथें प्लेगविषयक **शास्त्रीय** प्रयोगशाळा ( The Haffkine Institute ) आहे. येथें प्लेग टोंचण्याची लस तयार करितात. शिवाय **कलकत्ता** येथें ऊष्ण कटिबंधांतील रोगांचें संशोधन करणारी मोठी संस्था आहे. हिंदुस्थानांतील दारिद्य जोंपर्यंत नाहींसें झालें नाहीं व प्रजा सुशिक्षित झाली नाहीं तोंपर्यंत रोगांची पिछेहाट होईल अशी आशा करणें फार कठीण आहे.

१०. **सारांश**:—रोगांचा प्रतिबंध करण्याकरितां आरोग्यखातें व रोग झाल्यास लोकाना औषधपाणी पुरविण्याकरितां व त्यांची योग्य शुश्रूषा व्हावी म्हणून वैद्यकखातें काढण्यांत आलें आहे. वैद्यक खात्यामार्फत जिल्हानिहाय दवाखाने काढलेले आहेत. आरोग्यखात्यामार्फत आरोग्या-संबंधीं कल्पनांचा लोकांमध्यें प्रसार करण्याचें काम केलें जातें. या खात्यां-चीं कामें शहरांमध्यें म्युनिसिपालिट्या व जिल्ह्याच्या इतर भागांत लोकल-

बोर्ड अंशत: करतात. सांथीचे रोग उद्भवल्यास गांवोगांव लोक धाडून, औषधपाण्याची सोय केली जाते. लहान मुलांची लोकसंख्या कमी व्हावी या हेतूनें शिशुसप्ताह भरविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

---

प्रश्नः—१. वैद्यक व आरोग्य खात्यांची व्यवस्था काय आहे ती सांगा २. देशी वैद्यकाची पिछेहाट कां झाली ? ३. खेडेगांवांतील लोकांचें आरोग्य सुधारण्याकरितां काय प्रयत्न केले जातात ? ४. स्थानिक स्वराज्य संस्थांची या खात्यांना कोणत्या प्रकारची मदत होते ? ५. शिशुस्वास्थ व वैद्यकसंशोधन यासंबधीं माहिती लिहा.

---

## ४. सार्वजनिक बांधकाम खातें. (P. W. D.)

१. इतिहासः—हिंदुस्थान सरकारला सार्वजनिक उपयोगाकरितां रस्ते, पूल, धर्मशाळा व निरनिराळ्या कचेऱ्यांकरितां लागणाऱ्या इमारती बांधावयाच्या असतात. याकरितां लॉर्ड डलहौसीनें इ० स० १८८५ मध्यें या खात्याची योजना केली. त्यापूर्वी हीं कामे 'लष्करी मंडळा'कडून ( Military Board ) केलीं जात. परंतु आगगाड्यांचे रस्ते व इतर कामें सुरू झाल्यापासून हें स्वतंत्र खातें निर्माण करण्यांत आलें.

**२. खात्यांचे विभागः**—या कामाचे इमारती व रस्ते बांधणें हा एक, व कालवे, पाट, आणि धरणें बांधणें हा दुसरा, असे दोन विभाग केलेले असून ते प्रांतिक सरकारच्या दोन सेक्रेटरींच्या ताब्यांत असतात. साधारण रस्ते वगैरेची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोंपविण्यांत आली आहे. हिंदुस्थान सरकारचेंही बांधकाम खातें असून तें शेतसारा व शेतकी खात्याच्या मंत्र्याच्या ताब्यांत आहे. हें खातें प्रांतिक सरकारच्या कामांवर देखरेख करतें.

**३. व्यवस्थाः**—व्यवस्थेच्या सोयीकरितां प्रांतांचे भाग ( Circles ) व भागांचे पोटभाग ( Districts ) पाडलेले आहेत. भागांवर सुपरिंटेंडिंग इंजिनियर असतो व पोटभागांवर एक्झिक्यूटिव्ह एंजिनियर असतो.

कालवे, पाटबंधारे या खात्यावर "इनस्पेक्टर जनरल ऑफ इरिगेशन" नांवाचा मुख्य अधिकारी असतो. हिंदुस्थानसरकाराकडे पाठविलेल्या नवीन योजना पाहून प्रांतिक कामांवर देखरेख करणें, हीं याचीं कामें आहेत. कालव्यांच्या योगानें बरीच जमीन सुपीक करण्यांत आली आहे. या खात्याकडून जमिनीस पाण्याचा पुरवठा करण्याकरितां विहिरी, तळीं व कालवे बांधले आहेत. गंगेला तर मोठमोठे कालवे बांधले असून, सिंधमध्यें सक्करजवळ सिंधूनदीचें पाणी अडवून कालवे बांधण्याचें काम सुरू आहे. अवर्षण पडल्यास दुष्काळनिवारणार्थ कालव्यांचा पुष्कळ उपयोग होतो.

**४. आगगाडी खातें:**—सन १९०५ पासून आगगाडीची व्यवस्था बांधकाम खात्याकडून आगगाडी खात्याकडे देण्यांत आली. त्यावर गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळांतील व्यापारी खात्याच्या मंत्र्याचा ताबा चालतो. या बोर्डावर प्रांतिक सरकारची हुकमत चालत नाहीं. या खात्यांतील वरिष्ठ दर्जाच्या नेमणुका हिंदुस्थानसरकारच्या मंजुरीनें होतात. ॲक्वर्थ कमिटीच्या शिफारशीप्रमाणें मंडळाच्या अध्यक्षाच्या जागीं चीफ कमिशनर नेमला असून त्याला बरेच अधिकार दिले आहेत. हाच सरकारचा मुख्य सल्लागार असतो. या कमिशनरच्या शिफारशीप्रमाणें या मंडळाची पुनर्घटना झाली आहे.

खाजगी कंपन्यांचीं व्यवस्थापक मंडळें लंडनमध्यें असतात. कंपनीच्या मुख्य अधिकाऱ्यास 'एजन्ट' म्हणतात. त्याच्या हाताखालीं ट्रॅफिक मॅनेजर, लोकोमोटिव्ह सुपरिटेंडेंट, चीफ इंजिनीअर वगैरे अनेक नोकर असतात. कांहीं कंपन्या सरकारी व कांहीं खाजगी आहेत. खाजगी कंपन्यांची ठराविक मुदत संपतांच त्याही सरकारी बनावयाच्या आहेत. ईस्ट इंडियन व जी. आय. पी. यांची मुदत संपून त्या सरकारी झाल्या आहेत. सरकारी रेल्वेंची सर्व व्यवस्था बोर्डाकडे असून बोर्डास सल्लामसलत देण्याकरितां लोकसभेंतील सभासदांचें एक मंडळ नेमलें आहे.

आगगाड्यांचा मुख्य उपयोग लढाईच्या वेळीं सरहद्दीवर एकदम सैन्य नेण्याकरितां होतो. दुष्काळामध्यें तर एक ठिकाणचें धान्य दुसरी-

कडे नेऊन दुष्काळ नाहींसा करण्यास आगगाडीइतका कशाचाही उपयोग होत नाहीं.

५. **सारांश**:—देशांत दळणवळणाच्या सोयी करणें, सरकारी इमारती, पाटबंधारे व कालवे बांधणें, रस्ते तयार करणें वगैरे कामें सार्वजनिक बांधकाम खात्याला करावयाचीं असतात. या कामाचे हल्लीं बांधकाम व पाटबंधारे असे दोन भाग केले असून ते स्वतंत्र अधिकाऱ्यांच्या ताब्यांत दिले आहेत. पाटबंधाऱ्यांचा शेतीला पुष्कळ उपयोग होत आहे. १९०५ पासून आगगाडिखातें आगगाडीमंडळाच्या ताब्यांत दिलें असून हल्लीं या मंडळाचा मुख्य अधिकारी चीफ कमिशनर असतो. हें खातें वरिष्ठ सरकारच्या एका कार्यमंत्र्याच्या ताब्यांत दिलें आहे. मंडळाची पुनर्घटना झाली असून खाजगी कंपन्यांची मुदत सपतांच त्या सरकारनें ताब्यांत घेण्यास सुरवात केली आहे.

---

प्रश्नः—१. सार्वजनिक बांधकाम खात्याचीं मुख्य कामें कोणतीं ? व कामाची व्यवस्था कशी केली जाते ? २. आगगाडी खात्याची सध्यां व्यवस्था कशी चालते ? ३. खाजगी कंपन्यांसबंधीं सरकारचें धोरण काय आहे ?

---

## ५. उद्योगधंदे

१. **हिंदी धंद्यांची स्थितिः**—या देशामध्यें लहान प्रमाणावर काढलेले व घरगुती पुष्कळ कारखाने असत. पूर्वीं याच कारखान्यांमध्यें येथील सर्व गरजा भागवून परदेशीं पाठवितां येईल इतकी मालाची निपज होई. परंतु अलीकडे या धंद्यांची स्थिति अगदीं हलाखीची झाली आहे. याचीं कारणेंः—( १ ) परकीय माल देशांत येऊं लागला, ( २ ) यंत्रांपुढें घरगुती धंद्यांना टिकाव धरणें कठीण झालें, ( ३ ) कारागिरांना पुरेसें भांडवल मिळत नाहीं व ( ४ ) ते अशिक्षित असल्यामुळें नवीन पद्धति व

उपकरणें यांचा उपयोग करून मालाची निपज वाढविली जात नाहीं.

येथें कच्चा माल विपुल आहे, परंतु त्याचा उपयोग करण्याला पुरेसे कारखाने नाहींत. त्यामुळें तो स्वस्त दरानें परदेशीं पाठविला जातो व त्याच मालाचे नानाप्रकारचे जिन्नस तयार होऊन इकडे येतात आणि ते जास्त किंमत देऊन आपणांस विकत घ्यावे लागतात.

२. मुख्य धंदे:—येथील तीन चतुर्थांश लोक शेतीवर अवलंबून आहेत. चहा पिकाविण्याचा धंदा तर इतका वाढला आहे कीं, या धंद्यामध्यें अजमासें आठ लाख लोक खपत आहेत. शेतीच्या खालोखाल महत्वाचा धंदा विणकामाचा आहे. बहुतेक सर्व प्रांतांमध्यें माग चालतात. या धंद्यावर मुंबई इलाख्यामध्यें आठ लाख लोक आपली उपजीविका करतात. यांशिवाय कापड रंगविणें, धातूंचीं व मातीचीं भांडीं करणें, तेल गाळणें, कळकाचे व वेताचे जिन्नस बनविणें, साखर तयार करणें, कातडीं कमावणें, आगपेट्या व कांच तयार करणें इत्यादि अनेक धंदे आहेत.

यंत्रांचा प्रवेश हिंदुस्थानांत झाल्यापासून कापडाच्या, तागाच्या वगैरे गिरण्या पुष्कळ ठिकाणीं निघाल्या आहेत. मुंबई, अहमदाबाद, सोलापूर आणि वऱ्हाड व मध्यप्रांतांत कापडाच्या गिरण्या पुष्कळ आहेत. टाटांनीं जमशेदपूर येथें एक मोठा लोखंडाचा कारखाना काढला आहे. बहार व ओरिसा प्रांतांमध्यें कोळशाच्या खाणी व मध्यप्रांतामध्यें मॅंगनीजच्या व कोळशाच्या खाणी आहेत. याशिवाय यंत्रांच्या साहाय्यानें काम करणारे कारखाने बरेच निघाले आहेत.

३. शेतकी:—हा देश मुख्यतः शेतकऱ्यांचा असल्यामुळें व उद्योगधंद्यांची वाढ व्हावी तितकी झपाट्यानें होत नसल्यामुळें शेतीची सुधारणा म्हणजेच देशाची सुधारणा व सुस्थिति होय. हें जाणून शेतकऱ्यांना मदत करण्याच्या हेतूनें शेतकी खात्याची स्थापना करण्यांत आली आहे. या खात्यापुढें अत्यंत मोठें काम आहे.

हें खातें प्रांतिक असून सोपींवपैकीं आहे. या खात्याची व्यवस्था दिवाण पाहतात. प्रांतानिहाय दिवाणांच्या हाताखालीं डिरेक्टर आफ अग्रिकल्चर म्हणून मुख्य अधिकारी असतो. प्रांताच्या विभागांवर

डेप्युटी डिरेक्टर असतात व त्यांच्या हाताखालीं अधिकारी वर्ग असतो. हिंदुस्थानसरकारच्या शेतकी खात्याचें मुख्य ठिकाण पुसा असून तेथें शेतकीविषयक संशोधन मोठ्या प्रमाणांत होतें. या खात्यांतील वरिष्ठ दर्जाच्या जागाकरितांही लोकांना येथेंच शिक्षण मिळतें.

पिकांची सुधारणा करणें, पाणीपुरवठा करणें, जमीन सुधारण्याकरितां उपाय योजणें, सुदृढ जनावरांची निपज करणें वगैरे अनेक कामें या खात्यामार्फत केलीं जातात. या प्रत्येक कामाकरितां शास्त्रज्ञांच्या नेमणुका केल्या असून त्यांच्या हाताखालीं शेतकऱ्यांना सल्लामसलत देण्याकरितां जिल्ह्यानिहाय अधिकारी आहेत.

गेल्या वीस वर्षांमध्यें या खात्याकडे सरकारचें लक्ष बरेंच वेधलें असून गेल्या १२ वर्षांत तर शेतीची सुधारण्या करण्याचें सरकारनें मनावर घेतलें आहे. या प्रकरणीं हिंदुस्थानसरकार व विलायत सरकार यांच्यामध्यें बराच विचारविनिमय होऊन नुकतीच ( १९२६ मे ) येथील परिस्थितीचा विचार करून शेतीची सुधारणा कशी करतां येईल याचा सांगोपांग ऊहापोह व्हावा म्हणून शेतकी कमिशनची ( Royal Commision ) नेमणूक झाली आहे.

४. **सरकारी धोरणः**—देशी धंद्यांना उत्तेजन मिळावें म्हणून युद्धाच्या पूर्वीं निरनिराळ्या प्रकारचे नमुन्यादाखल नवीन कारखाने काढण्याची व असलेल्यांना द्रव्यसाहाय्य देण्याची योजना केली होती. परंतु विलायत सरकाराकडून या प्रयत्नाला मंजुरी मिळाली नाहीं. एतद्देशीय धंद्यांची वाढ होणें आवश्यक आहे, असें महायुद्धामुळें प्रत्ययास आलें आहे. सबब १९२१ मध्यें भारतमंत्र्यानें वरिष्ठ सरकारचें उद्योगधंदाखातें काढण्यास मंजुरी दिली. प्रांतांनिहाय याबाबत लहान प्रमाणावर प्रयत्न पूर्वीपासूनच चालू होते.

५. **व्यवस्थाः**—या खात्याचा मुख्य अधिकारी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज असून त्याला सल्ला देण्याकरितां एक मंडळ असतें. कारखान्यांना उत्तेजन देणें, प्रदर्शनें भरविणें, धंद्यांचें शिक्षण देणें, देशाची औद्योगिक दृष्ट्या पाहणी करणें, धंद्यासंबंधीं माहिती मिळवून तिचा लोकांमध्यें

प्रसार करणें, संशोधन करणें वगैरे अनेक कामें या खात्याकडे आहेत. हें खातें एका कार्यमंत्र्याच्या ताब्यांत असतें. प्रांतानिहाय दिवाणांच्या ताब्यांतील सोपींव खात्यांपैकीं हें एक आहे. प्रांतिक खात्यावर वरिष्ठ सरकारची फक्त देखरेख असते. जगांतील आठ औद्योगिक राष्ट्रांमध्यें राष्ट्रसंघानें हिंदुस्थानची गणना केली आहे.

६. सहकार्य ( Co-operation ):—शेतकऱ्यांना जबर व्याज देऊन सावकारांकडून भांवडल मिळवावें लागतें, त्यामुळें त्यांना नफा मिळाला तरी तो सावकारांच्याच घरीं जातो. ही स्थिति सुधारण्याकरितां जागोजागीं सहकारी पतपेढ्या काढण्यांत आल्या आहेत व त्यांची उपयुक्तता हलके हलके लोकांस पटत आहे. या पेढ्या लोकांच्या ठेवी घेतात व शेतकरी, कारागीर वगैरे लोकांना कमी व्याजानें पैसे पुरवितात. हे पैसे हप्त्याहप्त्यानें फेडून घेतले जातात. यामुळें शेतकऱ्यांना काटकसरीनें राहण्याचें शिक्षण मिळतें. या संस्था औतें, खतें वगैरे पुरविणें, लोकांमध्यें नवीन पद्धती व सुधारलेलीं उपकरणें आणि यंत्रें यांचा प्रसार करणें वगैरे कामें करतात. यावर सहकारी पतपेढ्यांचा **राजिस्ट्रार** हा मुख्य अधिकारी आहे.

७. शिक्षण:—१९२२ सालापासून इंग्लंडमध्यें राहून उद्योगधंद्याचें ज्ञान मिळविणारांना तीन शिष्यवृत्त्या हिंदुस्थानसरकारनें ठेवल्या आहेत. पुसा व बंगलोर येथें संशोधनाकरितां संस्था आहेत. पैशाच्या अभावीं सरकारनें योजिल्याप्रमाणें संशोधनाचें कार्य अद्याप सुरू झालें नाहीं. प्रत्येक प्रांतामध्येंही शिष्यवृत्त्या आहेत. येथील धंदे परकीय लोकांच्या नजरेस आणण्याच्या हेतूनें ब्रिटिश साम्राज्याचें प्रदर्शन दरवर्षी विलायतेंत भरविलें जातें. जंगलखात्याच्या तर्फे अनेक उद्योगधंदे काढतां येण्यासारखे आहेत. कागदाकरितां कळकांचा उपयोग करणें, रोशेल व टरपेंटाइन तयार करणें, इमारती लांकडाची पैदास करणें वगैरेसारखीं अनेक कामें या खात्यामार्फत होतात. उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीनें संशोधन व्हावें म्हणून सरकारनें डेहराडून येथें एक संशोधनसंस्था काढली आहे.

## दुष्काळ

हा देश मुख्यतः शेतीवर अवलंबून असल्यामुळें व उद्योगधंद्याचे पुरेसे कारखाने नसल्यामुळें पावसाचें प्रमाण कमजास्त झाल्याबरोबर दुष्काळ पडतो आणि शेतकरी व मजूर यांना पुरेसें काम न मिळाल्यामुळे उपाशीं मरण्याची पाळी येते. दुष्काळनिवारणार्थ तरतूद म्हणून प्रांतानिहाय अंदाजपत्रकांत खालीलप्रमाणें रकमा काढून ठेवण्यांत येतात. पुढील आंकडे हजारांचे आहेत.

मद्रास ६६१, मुंबई ६३६०, बंगाल २००, संयुक्तप्रांत ३९६०, पंजाब ३८१, ब्रम्हदेश ६७, बहार-ओरिसा ११६२, मध्यप्रांत ४७२६, आसाम १०.

या रकमांतून धट्टयाकट्टया लोकांकरितां दुष्काळी कामें काढणें, म्हातारे लोक, मुलें वगैरेंना शिधा वाटणें, शेतकऱ्यांना कर्जाऊ रकमा देणें, इत्यादि गोष्टी केल्या जातात.

आगगाड्यांचे रस्ते चोहोंकडे झाल्यामुळें धान्य वाटेल त्या प्रांतामध्यें नेतां येतें. अवर्षण पडल्यास पिकांना पाणी मिळावें म्हणून पाटबधारे-खात्याकडून मोठमोठीं धरणें धरून कालवे काढण्यांत आले आहेत. सह-कारी पतपेढ्यांचा दुष्काळामध्यें फार उपयोग होतो. सुबत्ता असली म्हणजे लोकांना शिल्लक टाकतां यावी म्हणून खेड्यांपाड्यांतील पोष्टामध्यें सुद्धां बँका उघडण्यांत आल्या आहेत. परंतु देशांतील उद्योगधंद्याची वाढ झाल्याशिवाय दुष्काळ व बेकारी हीं संकटें दूर होणार नाहींत.

# भाग पांचवा

# एतद्देशीय संस्थानें

१. हिंदुस्थानचे, ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें, असे दोन भाग पड-तात. संस्थानी मुलुखाचें क्षेत्रफळ एकंदर हिंदुस्थानाचे क्षेत्रफळाचे $\frac{1}{3}$ पेक्षां जास्त आहे व लोकसंख्या अजमासे ७ कोट म्हणजे हिंदुस्थानाच्या लोकसंख्येच्या $\frac{1}{4}$ आहे.- एकंदर संस्थानें ७०० असून इंग्रज सरकारनें त्यांच्याबरोबर तह केलेले आहेत. या तहांप्रमाणें त्यांचे परस्परसंबंध अस-तात. सर्व संस्थानिक इंग्लडच्या राजाचे मांडलिक आहेत.

२. **इतिहासः**—हीं संस्थानें निरनिराळया काळीं व निरनिराळया परि-स्थितींत ब्रिटिश सत्तेखालीं आलीं. दिल्लीचे राज्यास उतरती कळा लाग-ल्यावर बादशाही केवळ नामधारी राहिली व सर्व सुभेदार आपापल्या मुलुखाचे मालक होऊन बसले. हे सुभेदार बरेच बलाढ्य झाले होते. परंतु कंपनीनें त्यांना न जुमानतां आपलें राज्य वाढविण्यास सुरुवात केली व त्यांचे कित्येक प्रांत जिंकले. कित्येक तैनाती फौजेच्या योजनेमुळे मांड-लिक बनले, व त्यांना इंग्रजांचें सार्वभौमत्व कबूल करावें लागलें. कित्ये-कांचे दत्तक बेकायदेशीर ठरवून त्यांचीं राज्यें खालसा करण्यांत आलीं. परंतु बंडानंतर हें धोरण बदललें व जास्त मुलुख वाढविण्याचा आपला हेतु नसून, संस्थानिकांचे हक्क, मान व दर्जा योग्य तऱ्हेनें पाळले जातील असें राणीसाहेबांनीं जाहीर केलें. त्या वेळीं जीं संस्थानें होतीं तीं हल्लीं हयात आहेतः एवढेंच नव्हे तर कांहीं खालसा केलेलीं संस्थानें परत देण्यांत आलीं आहेत. उदाहरणार्थः—म्हैसूरची व्यवस्था १८३१ मध्यें कंपनीकडे आली होती, परंतु १८८१ सालीं पुन्हां ' **वडेअर** ' घराण्याचे ताब्यांत तें संस्थान देण्यांत आलें. तसेंच १९११ सालीं बनारसचे महाराजांना पुष्कळ नवीन हक्क मिळाले.

३. **संस्थानांची वर्गवारीः**—संस्थानांपैकीं कांहीं अगदीं लहान आहेत

तर कांहीं फारच मोठीं आहेत. सर्वांत मोठें संस्थान हैद्राबाद होय. हिंदुस्थान सरकारशीं असलेल्या संबंधावरून संस्थानांचे तीन निरनिराळे वर्ग पडतात. ( १ ) प्रत्यक्ष हिंदुस्थानसरकाराशीं संबंध असलेलीं, ( २ ) गव्हर्नर जनरलच्या एजटचे देखरेखीखालीं असलेलीं, व ( ३ ) प्रांतिक सरकारचे ताब्यांत असलेलीं.

वर्ग पहिलाः—हैद्राबाद, म्हैसूर, बडोदे, काश्मीर व जम्मू हीं पहिल्या दर्जाचीं आहेत. त्यांच्यावर फक्त व्हाइसरॉयची हुकमत चालते. नेपाळ हें स्वतंत्र संस्थान असून त्याचें स्वातंत्र्य १९२३ च्या तहानें मान्य करण्यांत आलें आहे.

वर्ग दोन मध्यें १७० संस्थानें असून त्यांचे तीन गट केलेले आहेत. ह्यांपैकीं प्रत्येक गटावर गव्हर्नर जनरलचा एजंट हा अधिकारी असतो. हे तीन गट म्हणजे (१) मध्य हिंदुस्तान, (२) रजपुताना व (३) बलुचिस्तान एजन्सी होत. ( १ ) मध्य हिंदुस्तान एजन्सीमध्यें १५३ संस्थानें असून ग्वालेर, इदूर, भोपाळ, रेवा वगैरे मुख्य आहेत. ( २ ) राजपुताना एजन्सींत २० संस्थानें असून उदेपूर, जयपूर, विकानेर हीं मुख्य आहेत. ( ३ ) बलुचिस्थान एजन्सीमध्यें कोलात व लासवल हीं दोन संस्थानें मुख्य आहेत.

वर्ग तीनचीं संस्थानें प्रांतिक सरकारचे ताब्यांत असून त्यांमध्यें बरीच लहान लहान संस्थानें आहेत.

४ प्रांतानिहाय संस्थानांची संख्या खालीं दाखविली आहे.

| प्रांत | संख्या | मुख्य संस्थानें |
|---|---|---|
| ( १ ) मद्रास | ५ | त्रावणकोर, कोचीन. |
| ( २ ) मुंबई | ३७७ | कोल्हापूर, कच्छ. |
| ( ३ ) बंगाल | ३० | सिकीम, कुचबिहार. |
| ( ४ ) संयुक्तप्रांत | २ | रामपूर, गरवाल, बनारस. |
| ( ५ ) पंजाब | ३४ | भावलपूर, कपूरथळा. |
| ( ६ ) ब्रह्मदेश | ५२ | शान संस्थानें वगैरे. |
| ( ७ ) मध्यप्रांत | १५ | रायगड. |

| प्रांत | संख्या | मुख्य संस्थानें |
|---|---|---|
| ( ८ ) पूर्व बंगाल व आसाम | २७ | टिपरा, मणिपूर, खासी संस्थान. |

५. सुधारणा व संस्थानें:—प्रमुख संस्थानांचा संबंध प्रत्यक्ष गव्हर्नर जनरलशीं यावा अशी मॉन्टग्यू-चेम्सफर्ड रिपोर्टाची शिफारस असल्यामुळें गल्या तीन चार वर्षांत बहुतेक प्रांतांमध्यें बऱ्याच संस्थानांना वरच्या दर्जाला चढविण्यांत आलें आहे. मुंबई इलाख्यांत १९२४ मध्यें काठे-वाड, कच्छ व पालनपूर हीं संस्थानें मिळून एक ' पश्चिम हिंदुस्थानांतील संस्थानें ' ( Western India States ) नामक गट करून तो गव्हर्नर जनरलच्या रेसिडेंटाच्या ताब्यांत दिला आहे व मद्रासमधील सर्व संस्थानांचा दर्जा वाढविण्यांत आला आहे. ( १९२३ )

६. सरकारी अधिकारी:—ब्रिटिश सरकारचे एजन्ट किंवा रेसिडेन्ट या संस्थानांमध्यें राहतात; व संस्थानिकांना जरूर पडेल तो सल्ला देतात, किंवा त्यांचे कारभारामध्यें योग्य मदत करतात. अगदीं लहान संस्थानांची व्यवस्था जिल्ह्याचा कलेक्टर किंवा भागाचा कमिशनर पाहतो. दक्षिणें-तील मराठी संस्थानांसारखीं संस्थानें असल्यास त्यांचे गट करून त्यांची व्यवस्था एजंटाकडे सोंपविली जाते. एजन्सीमधील पोलिटिकल एजंटची नेमणूक हिंदुस्थानसरकाराकडून होते. हे सर्व एजन्ट गव्हर्नर जनरलचे परराष्ट्रीय खात्याचे ताब्यांत असतात.

७. हिंदुस्थान सरकार व संस्थानिक:—हिंदुस्थान सरकार व संस्था-निक यांचे संबंध पुढीलप्रमाणें आहेत. परचक्रापासून संस्थानांचें संरक्षण करण्याचें काम व प्रत्यक्ष संस्थानांतही बंडाळी किंवा अराजकता माजल्यास शांतता प्रस्थापित करण्याचें काम हिंदुस्थानसरकाराकडे असल्यामुळें या संस्थानांना परराष्ट्रीय राजकारणच नसतें. त्यांना कोणाही-बरोबर युद्ध करतां येत नाहीं व परस्परांमध्यें किंवा परकीय सरकारा-बरोबर कोणताही संबंध ठेवतां येत नाहीं. त्याचप्रमाणें ठरावापेक्षां जास्त सैन्य ठेवण्याची, हत्यारें तयार करण्याची, किंवा किल्ले वगैरे बांधण्याची

सक्त मनाई आहे. इंग्रजांच्या संमतीशिवाय आपल्या संस्थानामध्यें पर-कीय गृहस्थांना राहण्याची किंवा वखार वगैरे काढण्याची परवानगी देतां येत नाहीं. संस्थानिकाला आपल्या मुलखांतील सर्व महत्वाच्या बाबी संस्थानांतील ब्रिटिश अधिकाऱ्यांस कळवाव्या लागतात. दोन संस्थानां-मध्यें वाद उत्पन्न झाल्यास किंवा कोणत्याही प्रश्नांशीं दोन संस्थानि-कांचा संबंध आल्यास सरकार निकाल देईल त्याप्रमाणें त्यांना वागावें लागतें.

एखाद्या संस्थानिकाला वारस नसल्यास त्याला ब्रिटिश सरकारच्या संमतीनें दत्तक घेतां येतो. कोणत्याही संस्थानिकाला आपल्या मुलांमध्यें आपले संस्थानाची वांटणी करून देतां येत नाहीं. गादी कायदेशीर वारसा-कडेच गेली पाहिजे. सरकार संस्थानांच्या अंतर्व्यवस्थेमध्यें मुळींच हात घालीत नाहीं, परंतु प्रजेवर जुलूम होत असेल किंवा असंतोष माजून बंड वगैरे होण्याची भीति असेल, तर ब्रिटिश सरकाराला त्यांच्या कारभारांत हात घालण्याचा पूर्ण अधिकार आहे. विशेष प्रसगीं संस्थान सुद्धां खालसा करतां येतें. सती वगैरेसारख्या वाईट चाली सक्तीनें बंद पाडतां येतात.

याशिवाय इतर बाबतींत संस्थानिकांना पूर्ण स्वातंत्र्य असतें. ते आपला कारभार चालवितात, कायदे करतात, नाणीं पाडतात, जमिनीची मोजणी करतात व कर बसवितात. त्यांच्या न्यायकचेऱ्या वगैरेही स्वतंत्र आहेत. त्यांच्या हद्दीमध्यें ब्रिटिश कोर्टांची सत्ता चालत नाहीं. संस्थानांमध्यें संस्था-निकांचे परवानगीशिवाय ब्रिटिश हिंदुस्थानांतील आरोपी पकडतां येत नाहींत. चलनी नाणें व जमीनमहसूल वगैरे बाबींमध्यें सरकार संस्था-निकांना सल्ला देतें. परंतु त्यांच्यावर त्या बाबतींत जुलूम होत नाहीं. पुष्कळ संस्थानें शिक्षण, वसूल, जमाखर्च वगैरे बाबतींत ब्रिटिश सरकारचें अनु-करण करतात.

संस्थानिकांना योग्य दर्जाप्रमाणें मान देणें हें सरकारचें मुख्य धोरण आहे.

८. **संस्थानें व लष्कर:**–संस्थानिकांना लवाजमा म्हणून किंवा मुलखा-मध्यें व्यवस्था राखण्याकरितां म्हणून थोडेंबहूत सैन्य लागतें. कारण संस्था-निकांच्या संरक्षणार्थ हिंदुस्थानसरकार तयार असतेंच. तरी पण " संस्थानी

फौज " ( Indian State Forces ) नांवाच्या पलटणी ग्वाल्हेर, काश्मीर, हैद्राबाद, म्हैसूर वगैरे सारख्या संस्थानांत उभारण्यांत आल्या आहेत. संकटसमयीं साम्राज्यसरकारला मदत करतां यावी हा या पलटणींचा मुख्य उद्देश आहे. हें सैन्य सुमारें २२००० आहे.

९. **ब्रिटिश सरकारची मदत:**—संस्थानांना कारभारामध्यें योग्य सल्ला देण्याचे कामीं हिंदुस्थानसरकार पुष्कळ मदत करतें. अनुभविक तज्ज्ञ वारंवार त्यांचे मदतीला दिले जातात. संस्थानिक अज्ञान असल्यास किंवा संस्थानांमध्यें अंदाधुंदी व अव्यवस्था असल्यास सर्व व्यवस्था सरकार पाहतें. राजकुमारांना साधें व लष्करी शिक्षणही देण्याची योजना सरकारनें केलेली आहे. याशिवाय दळणवळणाच्या सोयी पुष्कळच झाल्या आहेत. दुष्काळ पडल्यास ब्रिटिश सरकार संस्थानांना सर्व प्रकारें मदत करतें. संस्थानिकांनीं साम्राज्याच्या मदतीकरितां संस्थानी फौज ठेविली आहे.

१० **नरेंद्रमंडळ** ( The Chamber of Princes ):—गव्हर्नर जनरलच्या आमंत्रणावरून मधून मधून संस्थानिकांच्या परिषदा भरविल्या जात, त्यांच्या ऐवजीं संस्थानिकांची एक कायमची संस्था स्थापण्यांत यावी, अशी सुधारणांच्या रिपोर्टमध्यें शिफारस होती. त्यामुळें १९१९ च्या सुधारणाचा विचार चालू असतांनाच संस्थानांशीं ब्रिटिश सरकारचे संबंध दृढ करण्यासाठीं अशा प्रकारचें एक मंडळ स्थापण्याचें ठरलें. यामध्यें बहुतेक मोठे संस्थानिक असून लहान संस्थानांचे गट करून त्यांच्यातर्फें प्रतिनिधि घेण्यांत येतात. या मंडळाचा अध्यक्ष खुद्द गव्हर्नर जनरल° असतो. गव्हर्नर जनरलचे गैरहजेरींत कोणीतरी संस्थानिक अध्यक्षस्थान स्वीकारतो. मंडळाची बैठक वर्षांतून एक वेळ होते. हें मंडळ १९२१ मध्यें ड्यूक ऑफ कॅनॉट यानीं सुरू केलें. संस्थानिकांना परस्पर विचारविनिमय करण्याला व सर्व संस्थानांच्या हितसंबंधांमध्यें सहकार्य घडवून आणण्याला हा एक मार्ग झाला आहे. यायोगें सरकारालाही संस्थानिकांशीं सल्लामसलत करण्यास सांपडते. सर्व संस्थानिक एके ठिकाणीं जमून कांहीं प्रश्नांची चर्चा करतात, त्यामुळें बऱ्याच संस्थानिकांना फायदा होतो.

त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, ब्रिटिश हद्दींतील प्रजेला मिळालेल्या हक्कांप्रमाणे संस्थानीं प्रजेस कांहीं हक्क देण्यास सुरवात झाली आहे; व कांहीं ठिकाणीं कायदेमंडळें स्थापण्यांत आलीं आहेत.

बिकानेरच्या महाराजांना सर्व संस्थानिकांनीं 'चॅन्सेलर' म्हणून निवडून त्यांच्याकडे अध्यक्षाचीं कामें सोंपविलीं आहेत. त्याचप्रमाणें मंडळाचें सर्व काम पाहण्याकरितां निवडून दिलेल्या सहा संस्थानिकांचें एक कायममंडळ निवडलें आहे. याच्या वर्षांतून दोन तीन सभा होतात. ब्रिटिश सरकार व संस्थानिक यांचा ज्या खात्यांशीं संबंध येतो त्या खात्यांच्या मंत्र्यांशीं महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधीं चर्चा करण्याचें काम या मंडळाकडे असतें.

११. सारांश:—ब्रिटिश हिंदुस्थान व एतद्देशीय संस्थानें असे हिंदुस्थानांचे दोन भाग आहेत व संस्थानांचे तीन वर्ग आहेत. सरकारशीं असलेल्या त्यांच्या संबंधावरून हे वर्ग पडलेले आहेत. परचक्र आल्यास किंवा संस्थानांत बंडाळी माजली असतां संस्थानिकांचें संरक्षण करण्याचें काम हिंदुस्थानसरकारचें आहे. त्यामुळें संस्थानिकांना परराष्ट्रीय राजकारण मुळींच रहात नाहीं. संस्थानांचे अंतर्व्यवस्थेमध्यें सरकार हात घालीत नाहीं. सरकारकडून त्यांना पुष्कळ फायदे होतात. सरकार व संस्थानिक यांच्यामध्यें विचारविनिमय व्हावा व सल्लामसलतीचा फायदा एकमेकांस मिळावा म्हणून नरेन्द्रमंडळ ही संस्था स्थापली आहे.

---

प्रश्न:—१. हिंदुस्थानांतील संस्थानें कशीं बनलीं ? २. संस्थानांचे प्रकार किती व ते कोणत्या तत्त्वानुसार केले आहेत ? ३. संस्थानांच्या बाबतींत हिंदुस्थान सरकारचें धोरण काय आहे ? ४. नवीन सुधारणानुसार संस्थानांच्या दर्जामध्यें काय फरक झाला आहे ? ५. संस्थानामधील सरकारी अधिकाऱ्यांसंबंधीं तुम्हांस काय माहिती आहे ? ६. संस्थानी सैन्य व नरेंद्रमंडळ यांवर टीपा लिहा.

---

# परिशिष्टें

## अ

**भारतमंत्री व त्यांचें सल्लागारमंडळ ( १५२६ ):—**

भारतमंत्री—नेक नामदार अर्ल ऑफ बर्कनहेड.
दुय्यम भारतमंत्री—मेजर नेक नामदार अर्ल विंटरटन,
सर आर्थर हिर्टझेल.
मंडळांतील हिंदी सभासद—सर राजगोपालाचार्य.
श्री. नारायण म. समर्थ
सर महमद रफीक.
हायकमिशनर—सर अतुलचंद्र चतर्जी.

**व्हाइसरॉय व त्यांचें कार्यकारीमंडळ ( १९२६ ):—**

व्हाइसराय—हिज एक्सलन्सी नेक नामदार बॅरन अर्विन ऑफ किर्बी अंडरडेल. ( एप्रिल १९२६ पासून )
१ मुख्य सेनापति—हिज एक्सलन्सी फील्ड मार्शल सर वुइलियम बर्डवुड
२ शिक्षण, आरोग्य व शेती—नामदार खानबहादुर सर महमदहबीबउल्ला साहेब बहादुर.
३ कायदेपंडित—नामदार एस्. आर. दास.
४ व्यापार, आगगाडी इत्यादि—नामदार सर चार्लस इन्नेस.
५ फडनवीस—नामदार सर बेसिल ब्लॅकेट.
६ उद्योगधंदा खातें—नामदार सर भूपेंद्रनाथ मित्र.
७ गृहमंत्री—नामदार सर अलेक्झांडर मुडिमन.

**मुंबईचे गव्हर्नर व कार्यकारीमंडळ ( १९२६ ):—**

गव्हर्नर—हिज एक्सलन्सी नेक नामदार सर लिस्ले ओर्म वुइल्सुन ( १० डिसेंबर १९२३ पासुन ).
गृहमंत्री—नामदार जे. इ. बी. हाटसन
फडणवीस—नामदार सर चुनीलाल व्ही. मेहेता.

महसूल—नामदार जे. एल्. न्यू.
सामान्यमंत्री—नामदार कावसजी जहांगीर.

दिवाण:—

स्थानिक स्वराज्य—नामदार खान बहादुर शेख गुलाम हुसेन हिदायतुल्ला.
शिक्षण—नामदार भास्करराव जाधव.
जंगल व अबकारी—नामदार अल्ली महमदखान देहेलवी.

वरिष्ठ सभेचे लोकनियुक्त सभासद:—

| | | |
|---|---|---|
| १ | मुंबई ( मुसलमानेतर )— | ना. मनमोहनदास रामजी व्होरा. |
| २ | | ना. फिरोज सी. सेटना. |
| ३ | | ना. रतनसी धरमसी मोरारजी. |
| ४ | मुंबईइलाखा ( मुसलमान ) | ना. खानबहादुर इब्राहिम हरुन जाफर. |
| ५ | सिंध ,, | ना. अल्लीबक्ष महमद हुसेन. |
| ६ | मुंबई (चेंबर आफ कामर्स) | ना. सर आर्थर हेन्री फ्रूम, के. टी. |
| १ | मध्यप्रांत ( सामान्य ) | ना. शेट गोविंददास. |
| १ | वऱ्हाडतर्फे | ना. गणेश श्रीकृष्ण खापर्डे. |

अध्यक्ष:—

वरिष्ठसभा:—ना. सर हेन्री मॉनक्रीफ स्मिथ.
लोकसभा:—ना. व्ही. जे पटेल.
मुंबई कायदे-मंडळ:—ना. सर इब्राहीम रहिमतउल्ला.
मध्यप्रांत ,, :—ना. वाय्. एम्. काळे.

---

# आ.

कांहीं वरिष्ठ अधिकाऱ्यांचे वार्षिक पगार:—( आंकडे हजार रुपयांचे आहेत. ) गव्हर्नर जनरल २५६, इलाखे, संयुक्तप्रांत व ब्रम्हदेशाचे

गव्हर्नर १२८, मुख्य सेनापति १००, वरिष्ठ सरकारचे कार्यमंत्री ८०, इलाख्यांतील कार्यमंत्री ६४, इलाख्याचे दिवाणांचा पगार कार्यमंत्र्यांच्या इतकाच किंवा कायदेमंडळ ठरवील तितका कमी असतो. वरिष्ठ व लोकसभेचे अध्यक्ष ५०.

---

## इ

### हिंदुस्थान सरकारचें जमाखर्चाचें अंदाजपत्रक ( १९२५-२६ )

| बसूलाच्या मुख्य बाबी | पक्का हिशेब १९२३-२४ | दुरुस्त अंदाज १९२४-२५ | कच्चा अंदाज १९२५-२६ |
|---|---|---|---|
| जमाः— | लक्ष रुपये | लक्ष रुपये | लक्ष रुपये |
| जकात ... | ३९६९ | ४४७६ | ४६३५ |
| प्राप्तीवरील कर ... | १८२३ | १६४७ | १७३४ |
| मीठ ... | १००१ | ७७३ | ६९५ |
| अफू ... | ४२४ | ३६८ | ३५५ |
| इतर करांचें उत्पन्न... | २२८ | २०८ | २२३ |
| एकंदर मुख्य बाबी... | ७४४८ | ७४७९ | ७६४३ |
| रेल्वे ( नक्त उत्पन्न ) | ३२६९ | ३४१९ | ३३८९ |
| पाटबंधारे ,, | १० | ८ | १० |
| पोष्ट व तार ,, ... | ९६ | ९१ | ६८ |
| व्याज ... | ३१६ | ३७९ | ३६० |
| मुलकी खातीं ... | ६८ | ७० | ७२ |
| चलन, टांकसाळ, हुंडणावळ | ३१२ | ३९४ | ४०८ |
| सार्वजनिक बांधकाम | ३७ | १२ | १० |
| किरकोळ ... | ९४ | ३३ | ४३ |
| लष्करी मिळकत | ४८१ | ४१६ | ४०१ |
| प्रांतिक खंडणी व हिं. व प्रां. सरकार यांच्यामधील हिशेबी मेळ वगैरे. | ९२१ | ९२५ | ६२२ |

| | पक्का हिशेब १९२३-२४ लक्ष रुपये | दुरुस्त अंदाज १९२४-२५ लक्ष रुपये | कच्चा अंदाज १९२५-२६ लक्ष रुपये |
|---|---|---|---|
| जादा बाबी ... | २५१ | २५५ | ३८ |
| एकंदर वसूल | १३३१६ | १३४८२ | १३०६७ |
| तूट | ...... | ...... | ...... |
| एकंदर | १३३१६ | १३४८२ | १३०६७ |
| **खर्चः—** | | | |
| वसूलबाबत खर्च | ५४४ | ५४५ | ५२८ |
| जंगल | ... | २१ | ३२ |
| आगगाडी, व्याज व किरकोळ | २६२५ | २८५५ | २८६५ |
| पाटबंधारे | १६ | २१ | १७ |
| पोष्ट व तारं | २५ | ० | २८ |
| व्याज | १७३३ | १७९२ | १८१८ |
| मुलकी खातीं | ९३३ | १०२६ | १०९७ |
| चलन, टांकसाळ, हुंडणावळ | ९९ | ७३ | ७३ |
| सार्वजनिक बांधकाम | १७० | १९३ | १६८ |
| किरकोळ | ४४६ | ४४७ | ४०१ |
| लष्कर | ६१०४ | ६०४९ | ६०२६ |
| हिं. व प्रां. सरकार यांच्यामधील हिशेबी मेळ | ३७ | ५६ | १५ |
| जादा बाबी | ३४० | ... | २५ |
| एकंदर खर्च | १३०७७ | १३०८२ | १३०४३ |
| शिल्लक | २३८ | ३९९ | २४ |
| एकंदर | १३३१६ | १३४८२ | १३०६७ |

## ई

### मुंबई व मध्यप्रांतातील जमा व खर्चाच्या मुख्य बाबी (१९२५-२६)

( आकडे हजार रुपयांचे आहेत. )

| | मुंबई | | मध्यप्रांत | |
|---|---|---|---|---|
| | वसूल रु. | खर्च रु. | वसूल रु. | खर्च रु. |
| जमीन महसूल | ५६००० | ६८८० | २३००२ | २६६९ |
| अबकारी | ४४९६९ | ५२३३ | १५५०० | २२८० |
| स्टांप | १८४५९ | १२४ | ७२५० | ३३२ |
| जंगल | ७४०५ | ४६०२ | ५४५० | ३६५२ |
| नोंदणी | १३५० | ७३२ | ७३० | २४७ |
| निर्दिष्ट कर | ९५० | २१ | ...... | ...... |
| पाटबंधारे | ५४३६ | ९५२९ | १९० | २७७० |
| व्याज व कर्जफेड | १५९२७ | २५६६३ | १८८ | ८२ |
| न्याय | १६१२ | ७६०५ | ५६० | ३०९६ |
| तुरुंग | ४८० | २७७९ | ३२५ | १०२९ |
| पोलीस | ४७५ | ४७४५३ | १७१ | ५६८५ |
| शिक्षण | ९७८ | २०८७९ | ४८४ | ५३७९ |
| वैद्यक | ६१५ | ५००३ | ४४ | १३५९ |
| आरोग्य | ३७९ | २८९४ | ५८ | ४४२ |
| शेतकी | ३२६ | २८०१ | ३१६ | १५९६ |
| उद्योगधंदा | २७ | ९९ | ७७ | ३६४ |
| किरकोळ खाती | २०० | ५३७ | ६५ | १३४ |
| बांधकाम | १४९० | ११४६७ | ४५० | ७१८० |
| पेन्शन वगैरे | १५८२ | ५८८६ | ११० | २१३९ |
| लेखनसाहित्य | २७७ | १८१६ | ४९ | ५७४ |
| किरकोळ | ६५० | ४२३६ | ३६६ | १५१८ |
| सामान्य कारभार | ...... | २२७७४ | ...... | ६३२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बंदरें, गोद्या वगैरे | ...... | २१ | ...... | ...... |
| शास्त्रीय खातीं | ...... | ७७ | १२ | ...... |
| दुष्काळनिवारण | ...... | ५३६० | ४६८७ | ३७५२ |
| हिं. सरकारचें देणें | ...... | ३४०० | ...... | २२०० |
| प्रां. व हिं. सरकार यांच्यामधील हिशेबी मेळ | १४३९ | ११ | २३ | २२ |
| जादा बाबी. | १४ | ...... | २५० | ३० |
| एकंदर | १६१०४० | १७०५९१ | ५५६५८ | ५५९१३ |

## उ

### मतदानासंबंधीं माहिती.

निरनिराळया संस्थांच्या निवडणुकींत मत देण्याचा अधिकार निरनिराळया अटींवर अवलंबून आहे. या अटी प्रत्येक इसमानें नीट समजावून घेतल्या पाहिजेत. मतदारांच्या याद्या निवडणुकीच्या आधीं बरेच दिवस तयार असतात. त्या प्रसिद्ध झाल्याबरोबर मत देण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक इसमानें आपलें नांव दाखल झालें आहे कीं नाहीं तें नीट पहावें. यादींत नांव नसल्यास ठराविक मुदतींत योग्य अधिकाऱ्याकडे अर्ज करून तें दाखल करून घेण्याची व्यवस्था केली पाहिजे. यादींत नांव दाखल झाल्यावांचून मत देतां येत नाहीं.

**गुप्तमतदानपद्धति** ( Voting by Ballot ):—निवडणुकीच्या दिवशीं मतें घेण्याकरितां निरनिराळीं ठिकाणें ठरवून तेथें मतें घेण्याकरितां अधिकारी नेमलेले असतात. मतें देण्याकरितां शिक्के मारलेले छापील नमुने असतात. त्यावर निवडणुकीकरितां उभे राहिलेल्या सर्व उमेदवारांचीं नांवें वर्णानुक्रमें छापलेलीं असतात. निरक्षर लोकांनाही मत देण्यास अडचण पडूं नये म्हणून प्रत्येक उमेदवाराच्या खुणा ठरवून त्या त्याच्या नांवांपुढें छापतात. यापुढील सदर कोरें असतें. त्यामध्यें मतदारानें मत दिल्याबद्दल खूण म्हणजे फुली करावयाची असते. एका मतदारसंघातर्फे

जितके उमेदवार निवडून द्यावयाचे तितकीं मतें प्रत्येक मतदाराला असतात. त्यांतील त्याच्या मर्जीप्रमाणें वाटेल तितकीं वाटेल त्या उमेदवारास देतां येतात. जितकीं मतें एका उमेदवारास द्यावयाचीं असतील तितक्या त्याच्या नांवापुढें असलेल्या कोऱ्या सदरांत फुल्या करावयाच्या असतात. ठराविक संख्येपेक्षां जास्त फुल्या पडल्यास किंवा त्या सदराच्या बाहेर वाटेल तशा वांकड्या तिकड्या पडल्यास सर्व मतें फुकट जातात. सबब प्रत्येक मतदारानें काळजीपूर्वक फुल्या कराव्या. इतकें झाल्यावर कागद नीट दुमडून तेथें असलेल्या पेटींत टाकावा, म्हणजे मतें देण्याचें काम संपलें. मतें देण्याचें काम एका खोलींत होतें व तेथें मत देणाराशिवाय दुसरें कोणीही नसतें. मत कोणास द्यावयाचें तें अगाऊ ठरलें नसल्यामुळें पुष्कळ इसमांची मोठी तारांबळ उडते.

या पद्धतीप्रमाणें मतदारांवर कोणाचेंही वजन किंवा दडपण न पडतां योग्य वाटेल त्या इसमासच गुप्तपणें मतें देतां येतात. उघडपणें मतें देण्याची पद्धति इतकी चांगली नाहीं. कारण तीमध्यें ज्याला मत दिलें नसेल त्याची गैरमर्जी होऊन वाकुडपणाही येण्याचा संभव असतो. या भीतिमुळें मतदाराला योग्य वाटत असेल त्या इसमाला मत देणें कठीण जातें व योग्य इसम निवडून येण्याचा संभव कमी असतो.

निवडणूक झाल्यानंतर सर्व पेट्या जबाबदार अधिकाऱ्यासमक्ष उघडून मतांची मोजदाद होते व ज्यांना जास्त मतें पडतील ते निवडून येतात.

निवडणुकींत मतें मिळविण्याकरितां लांचलुचपतीचे प्रकार होऊं नयेत म्हणून कडक नियम केलेले आहेत. लांच देणें, धाक अगर भीति घालणें, खोटीं नांवें दाखल करणें हे गुन्हे समजले जातात. उमेदवारानें निवडणुकीचा खर्च किती करावा व कोणत्या बाबिंबद्दल करावा, यासंबंधींही नियम आहेत.

प्रत्येक मतदारानें हजर राहून मतें दिलीं पाहिजेत. तसें न करणें हा जरी कायद्यानें गुन्हा होत नसला तरी नैतिकदृष्ट्या तो गुन्हाच आहे. जबाबदार राज्यपद्धति यशस्वी होण्याकरितां ज्याप्रमाणें शिक्षणाचा प्रसार होणें इष्ट आहे, त्याचप्रमाणें लोकांचें औदासिन्य नाहींसें होणेंही अत्यंत

जरूर आहे. या पद्धतीनुसार सर्व सत्ता मतदारांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या हातीं असते. सबब त्यांनीं लायख, निःपक्षपाती, जबाबदार, स्वार्थत्यागी व कार्यक्षम इसम निवडून देण्याची संधि कधींहि दवडतां कामा नये. असें न करणें म्हणजे राष्ट्राचें व स्वतःचें अनहित करणेंच होय.

---

## ऊ

### मुंबई विश्वविद्यालयांतील स्कूल लीव्हिंग सर्टिफिकेट परीक्षेंत आलेले प्रश्न.

१९१७. १८५८ व १९०९ च्या कायद्यासंबंधीं तुम्हांस असलेली माहिती लिहा. ( पृ. ५, ६ व ८ )

१९१८. कंपनीच्या व्यवस्थेचें वर्णन देऊन तिच्यामध्यें कसकसे फरक होत गेले तें लिहा. ( भा. १ प्र. २ )

१९१९. मुंबई इलाख्यांतील राज्यकारभाराची त्रोटक माहिती द्या. ( भा. ३ प्र. ३ व ४ )

१९२०. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाची सध्यां घटना कशी आहे तें देऊन तेथील कामकाजाचें वर्णन द्या. ( पृ. ३५ ३९ )
म्युनिसिपॅलिटींचीं कामें व उत्पन्नाच्या बाबी कोणत्या आहेत. ( पृ. ११३, ११५ )

१९२१. भारतमंत्री व इंडिया कौन्सिल आणि हिंदुस्थानसरकार यांचे परस्पर संबंध काय आहेत ? ( पृ. २६ )
मुंबई इलाख्यांतील दिवाणी व फौजदारी न्यायकचेऱ्यांचे प्रकार सांगा. ( पृ. ८५–८७ )

१९२२. वरिष्ठ सरकार व मुंबई सरकार यांच्या उत्पन्नाच्या मुख्य बाबी सांगा. ( पृ. ७३ ७६ ).
१९१९ च्या कायद्यान्वयें प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळामध्यें काय फरक झाले आहेत ? ( पृ. ५७ व ६५ ).

१९२३. नवीन सुधारणानुसार प्रांतिक कारभार कसा चालतो ? ( भा. ३, प्र. ३ व ४ ).
भारतमंत्री व त्यांचें मंडळ यांचा हिंदुस्थान सरकारशीं काय संबंध आहे ? पृ. २६ ).
नरेंद्रमंडळ व सनदी नोकर यासंबंधीं माहिती लिहा. ( पृ. १३४ व पृ. ३०, ३१ )

१९२४. स्थानिक स्वराज्य संस्थांसंबधीं तुमची काय कल्पना आहे ? शहरांतील म्युनिसिपॅलिट्यांचीं कामें व उत्पन्नाच्या बाबी कोणत्या ? ( पृ. ११२–११५ ).
दिवाण व कार्यमंत्री यांची तुलना करा व त्यांच्यामधील फरक स्पष्ट सांगा. ( पृ. ४७ ).
हायकमिशनर व इलबर्ट बिल यांवर टीपा लिहा. (पृ.३०--८८)

१९२५. हिंदुस्थानच्या संरक्षणाची काय योजना केली आहे (भा.३प्र.१०)
अंदाजपत्रक म्हणजे काय ? वरिष्ठ व प्रांतिक सरकार यांची आपआपल्या पत्रकावर किती हुकमत चालते ? ( पृष्ठ ७६--७८ ).
शेरा मारून बिल मंजूर करणें ( Certification ) यावर टीपा लिहा. ( पृष्ठ ६४ ).

१९२६. ब्रिटिश हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेमध्यें रेग्युलेटिंग कायदा व पिटचें बिल यांनीं काय फरक झाले ? या दोन्ही कायद्यांचा परिणाम काय झाला तें स्पष्ट लिहा.( पृ.३-४ )
सध्यांच्या राज्यव्यवस्थेप्रमाणें बिनसरकारी सभासदाला कायदे मंडळामध्यें काय काय काम करतां येतें ? ( पृ. ६१; ६२ )
ग. ज. यांस ग. ज. व ग. ज. इन कौन्सिल या दोन्ही नात्यांनीं काय काय अधिकार आहेत तें स्पष्ट लिहा. ( पृ. ३४. ३५ )

३

## हिंदुस्थानांतील कारखाने

हिंदुस्थानांतील कारखान्यांची सामान्य कल्पना विद्यार्थ्यांना असणें जरूर वाटल्यावरून मुख्य उद्योगधंद्यांचीं नांवें व दररोज त्यावर उपजीविका करणारांची संख्या ठोकळ मानानें खालीं दिली आहे. ( १९२१ )

( आंकडे शंभराचे आहेत. )

सीमेंट ६०, तंबाखू ५६, दळण ६७, चिनीचीं कामें ५९, कागद ६३, गाड्याचे कारखाने ६५, चुना ६३, रबर ८०, राकेल ९०, लोंकरीच्या गिरण्या ९२, लाख ९४, रेशीम १०४, दोर ११०, दगडकाम १२०, पेट्रोल १३१, तेल गाळणें १३४, साखर १३४, कातडीं १६०, लाकूड करवतणें १८०, हत्यारें व दारूगोळा १९०, लोखंड २६०, गोद्यांबंदरें २६०, छापखाने ३६०, तागजिन्स ३८०, विटा कौलें ५१०, तांदुळ ६१०, बांधकाम वगैरे ७५०, कापूस जिन्स ४५०, आगगाड्या व ट्राम्वे १५३०, तागाच्या गिरण्या २८७०, कापूस-गिरण्या ३३२०.

# पारिभाषिक शब्द.

Air Force—वैमानिक दळ.

Army Council—सेनामंडळ.

Autonomy—स्वायत्तता.

Auxiliary Force—युरोपियन स्वयंसेवक.

Bicameral—दुहेरी ( कायदेमंडळ. )

Board of Control—नियामक मंडळ.

Budget—अंदाजपत्रक.

Cabinet—प्रधानमंडळ

Cadet Crops—राजकुमारपथक.

Certification—शेरा देणें.

Chamber of Commerce—व्यापारी मंडळ.

Chamber of princes—नरेंद्रमंडळ.

Circle—प्रांताचे विभाग.

Civil—दिवाणी.

Civil Service (Indian)—सनदी नोकर.

Civil Service (covenanted)—करारी नोकर.

Commander-in-Chief—मुख्य सेनापति.

Conservative—पुराणमतवादी

Constitution—राज्यघटना

Constituency—संघ.

Criminal Intelligence Department—गुप्त पोलीस.

Crown Colony—बादशाही वसाहत.

Council—सभा, मंडळ. Executive—कार्यकारी मंडळ.

Council of state—वरिष्ठ सभा.

Court—सभा. (-of Directors—व्यवस्थापकमंडळ.

—of Proprietors—मालकमंडळ.)

Decentralisation—विभागणी.

Defence Force—संरक्षक सैन्य.

Dependency—परतंत्र राष्ट्र.

Dispensary—दवाखाना.

Dominions—वसाहती.

Dyarchy—द्विदल राज्यपद्धति.

Elected—लोकनियुक्त.

Executive Councillor—कार्यमंत्री.

Extraordinary Memder—जादा सभासद.

Finance—राष्ट्राचा जमाखर्च, आर्थिक. ( —Member—फडणवीस.)

Foreign—परराष्ट्रीय,

Franchise—मताधिकार.

Frontier Militia—सरहद्दविरलि सैन्य.

Grant-in-Aid—सरकारी मदत ( शिक्षणाला )

Home Department—गृह किंवा अंतर्व्यवस्था खातें.

Home Government—विलायत सरकार.

Hospital—रुग्णालय.

House of Commons—प्रतिनिधिसभा.

House of Lords—उमरावसभा.

Improvement Trust—शहरसुधराईमंडळ.

India Council—भारतमंत्र्याचें सल्लागारमंडळ

Indian's Parliament—वरिष्ठ कायदेमंडळ.

Indianisation—हिंदीकरण.

League of Nations—राष्ट्रसंघ.

Legislative Assembly—लोकसभा.

Legislatures—कायदेमंडळ. ( Imperial—वरिष्ठ ).

Local self-Government—स्थानिक स्वराज्य.

Military—लष्करी

Minister—दिवाण.

Monarchy ( Limited )—नियंत्रित राजसत्ता.

Nation building—राष्ट्रसंवर्धक.

Nominated—सरकारनियुक्त.
Ordinance—वटहुकूम.
Port Trust—बंदरांची व्यवस्था पाहणारें मंडळ.
Privy Council—राजाचें सल्लागारमंडळ.
Protectorate—संरक्षित देश.
Public Works Deparment—सार्वजनिक बांधकामखातें.
Reguler army—खास सैन्य.
Representative—प्रातिनिधिक.
Reserve—शिल्लक.
Reserved Departments—राखींव खातीं.
Responsible Government—जबाबदार राज्यपद्धति.
Royal Indian Marine—हिंदी आरमार.
Revenue—वसूलकी ( Board o —जमीनमहसूलमंडळ.
Standing Committee—कायम ( साहाय्यक ) मंडळ.
Scheduled Taxes—निर्दिष्ट कर.
Secretary of state for India—भारतमंत्री.
Secretariate—चिटणीसकचेरी.
Self—governing—स्वयंशासित.
Sinking Fund—गंगाजळी.
Soveriegnty—सार्वभौमत्व.
State Forces—संस्थानी फौज
Territorial Fo
Transferred D
Transportatio
Under-Secreta
Veto—नामंजूर करण्याचा अधिकार.
Vote ( casting )—जादा मत.

REFBK-0003129

३३२९